# मॉडर्न

१३-१४


'छोटीसी आशा'
arthquakes
My village is now a
ig graveyard"
"There is no one to console
nyone. Most are dead."
OF THE
SCAM
Prime
SCAM
smuggling
KASHMIR
spect arrested
courge of the Earth
एक सौ रुपये
know whether my wife and children
e or have been cremated."
"The mob set our house on fire. As we ran out, they surrounded my parents,
uncle and aunt and thrust swords into them."
Taslim Banu, 12
HAZRATBAL SIEGE
ॉम्बस्फोट मालिकांनी मुंबई हादरली
Terrorism has
OPERATIO
rvey 1993-94 — Highlights
"What do you do when you ha



कलामंडळ बक्षिस समारंभ — प्राचार्य डॉ. स. य. परांजपे, पं. हृदयनाथ मंगेशकरांचा सत्कार करताना,
शेजारी प्रा. दत्ता लिमये, अध्यक्ष, कलामंडळ



— मराठी रंगभूमी शतकोत्तर सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने —
जयमाला शिलेदार, ज्योत्स्ना भोळे, वसंत शांताराम देसाई, पु. ल. देशपांडे,
डॉ. श्रीराम लागू, प्राचार्य. डॉ. स. य. परांजपे

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे

मॉडर्न महाविद्यालय, पुणे ४११ ००५.

# 'मॉडर्न' नियतकालिक

# १९९३-९४

– संपादक समिती –

- अध्यक्ष
  प्रभारी प्राचार्य डॉ. स. य. परांजपे

- संपादक
  डॉ. अरुण दांडेकर

- सदस्य
  प्रा. विजय जोशी
  प्रा. बाळकृष्ण वाणी
  डॉ. (सौ.) कांचनगंगा गंधे
  प्रा. विलास आल्हाट
  प्रा. व्ही. आर. चिटणीस
  प्रा. कु. एस. एम. गायतोंडे

प्रकाशक डॉ. स. य. परांजपे
प्रभारी प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.

मुद्रक राजेंद्र मराठे
सिद्धार्थ एंटरप्रायजेस
बी—३, श्रीकृष्ण नगर,
१२८, एरंडवणा, पुणे ४११ ००४.

फोटो कंपोज नेहा ग्राफिक्स
७२७ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०.

मुखपृष्ठ संकल्पना प्रा. राजीव कुलकर्णी

## संपादकीय :

*दोन तपे विद्यादानाचे कार्य करून हे महाविद्यालय आज रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण करण्यास सज्ज आहे. आणखी एक लक्षणीय टप्पा म्हणजे प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे १९९३-९४ हे हिरक महोत्सवी वर्ष आहे. माननीय शंकररावजी कानीटकरांनी लावलेल्या रोपट्याचा प्रचंड मोठा वटवृक्ष झाला आहे. आज या वटवृक्षाच्या शाखोपशाखांचा आकडा पचवीसहून पुढे गेला आहे. त्याच संस्थेतील मॉडर्न महाविद्यालय, पुणे - ५, आपल्या खास अस्तित्वाने लोकाभिमुख म्हणून नाव कमावून आहे.*

*आतापर्यंत फक्त वाणिज्य विभागास पदव्युत्तर शिक्षणाची सोय होती पण पुढील शैक्षणिक वर्षापासून वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, इंग्रजी आणि मराठी विषयांत पदव्युत्तर शिक्षणाची सुरुवात होणार आहे. आमचे प्राचार्य डॉ. स. य. परांजपे यांनी पदव्युत्तर शिक्षण महाविद्यालय पातळीवर उपलब्ध करून देण्यासंबंधी, डॉ. ग. रा. एकबोटे, अध्यक्ष, नियामक समिती, प्रो. ए. सो. यांच्या समवेत महत्त्वाची कामगिरी बजावली व निर्दिष्ट केलेले विषय पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी मंजूर होऊन आले. तसेच पदार्थविज्ञान, भूगोल हे विषय सुद्धा पदव्युत्तर शिक्षणासाठी मंजुरीच्या मार्गावर आहेत. सर्व संबंधित विभागात युद्धपातळीवर प्रयत्नांची पराकाष्ठा चालू आहे आणि ९४-९५ या शैक्षणिक वर्षात संस्थेच्या सहकार्याने हे पदव्युत्तर विभाग कार्यप्रवण होतील यात अजिबात शंका नाही.*

*महाविद्यालयातील विविध मंडळाचे अहवाल त्यांच्या कर्तृत्वाचे आरसेच आहेत. विद्यार्थ्यांचा विविध उपक्रमांतील सहभाग तसेच त्यांचे शैक्षणिक क्षेत्रातील अत्युच्च यश संपादन ही आमच्या महाविद्यालाची खास वैशिष्ट्ये आहेत. विद्यार्थ्यांचा ललित लेखनातील सहभाग त्यांच्या अष्टपैलू व्यक्तित्वाची साक्ष आहे. या विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर केलेले अभ्यासपूर्वक लिखाण या वार्षिकाचा प्राण आहे असे नमूद करावेसे वाटते.*

*अर्थात यामागे शिक्षकांचे मार्गदर्शन व सूचना सतत कार्यरत होत्या.*

*हुशार मुलांसाठी स्कॉलर बॅच शास्त्र आणि वाणिज्य शाखेसाठी कार्यरत आहेत व त्याचे चांगले परिणाम मिळत आहेत पण जनसामान्यांची बांधिकली मानणारे हे महाविद्यालय सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी सुद्धा विशेष मार्गदर्शनपर वर्ग रौप्य महोत्सवी वर्षापासून आयोजित करणार आहे.*

*महाविद्यालयाचे कार्यालय आधुनिक उपकरणांनी सज्ज होते आहे. संगणकीकरणामुळें विविध कामे लवकर व सुबक रितीने पूर्ण होत आहेत. कार्यालयीन कर्मचारी विविध प्रशिक्षण पूर्ण करून कामकाज सुकर करण्याबरोबरच जास्तीत-जास्त विद्यार्थ्याभिमुख होण्याच्या प्रयत्नात आहेत. अर्थात या सर्व सुधारणा लगेचच होणार नसल्या तरी लवकरच लक्षणीय आणि चांगले बदल दिसणार हे निर्विवाद*

*हे वार्षिक आपल्या पर्यंत पोहोचविण्यात प्राचार्य स. य. परांजपे यांचे सुयोग्य मार्गदर्शन तसेच संबंधित प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांचेच बहुमोल सहकार्य लाभले. विद्यार्थीवर्गाच्या सहभागामुळेच या वार्षिकाचा स्तर वरचा ठेवता आला. या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद. वार्षिकाच्या छपाईचे काम स्वीकारून व उत्तम प्रकारे हे वार्षिक आपणास सादर करणारे श्री. राजेंद्र मराठे यांचे अभिनंदन व धन्यवाद. वार्षिक नियतकालिकाच्या संपादन मंडळाच्या अथक परिश्रमांमुळेच हे अवघड कार्य सिद्धीस गेले आहे याची पूर्ण जाणीव मला आहे. नियतकालिक मंडळाच्या सर्व सभासदांच्या ऋणात रहाणेच मी पसंत करतो.*

**डॉ. अ. बा. दांडेकर**
निमंत्रक,
नियतकालिक समिती (९३-९४)

# अनुक्रमणिका

## मराठी विभाग


| | | |
|---|---|---|
| ♦ महात्मा फुले — समता परिषद | भारती शिंदे | १ |
| ♦ सखी (कविता) | रानू चटर्जी | ३ |
| ♦ पुणं म्हणजे . . . (कविता) | दिनेश ताशिलदार | ३ |
| ♦ सायकल दिवस | गीता देशमुख | ४ |
| ♦ क्षितिज . . . . ! (कविता) | शिबानी मिटकर | ५ |
| ♦ मराठवाडा नामविस्तार : एक चर्चा | संध्या चव्हाण | ६ |
| ♦ खांब (कविता) | गीता देशमुख | ७ |
| ♦ माझी प्रेयसी | अविनाश आढाव | ८ |
| ♦ जीवन आणि माणूस | संतोष घाटे | १० |
| ♦ खंत (कविता) | शिबानी मिटकर | ११ |
| ♦ क्रिकेट ! क्रिकेट ! (कविता) | संतोष घाटे | ११ |
| ♦ श्री | भुषण संचेती | १२ |
| ♦ खेळ ? (कविता) | शिबानी मिटकर | १२ |
| ♦ कयाकिंग | अनुप्रिता मगर | १३ |
| ♦ शोक (कविता) | श्रीप्रसाद कुलकर्णी | १४ |
| ♦ गिर्यारोहण — एक अनुभव | प्रा. विलास आल्हाट | १५ |
| ♦ माझे प्रेम (कविता) | नंदकुमार कांबळे | १९ |
| ♦ मिलन (कविता) | श्रीप्रसाद कुलकर्णी | १९ |
| ♦ राष्ट्रीय सेवा योजना : पुणे जिल्हास्तरीय विशेष हिवाळी शिबीर | पायस संतोष | २० |
| ♦ भटकंती | आर. पी. काळे | २१ |
| ♦ रोजगार (कविता) | नंदकुमार कांबळे | २४ |
| ♦ उगवता सूर्य | श्रीप्रसाद कुलकर्णी | २४ |
| ♦ कान्हे फाटा एन. एस. एस. शिबीर वृत्तांत | पल्लवी परब | २५ |
| ♦ कविता | श्रीप्रसाद कुलकर्णी | २६ |
| ♦ तोरणा—राजगड प्रवासवर्णन | मीनल नाईक | २७ |
| ♦ नाट्य विचारांना चालना देणारे चर्चासत्र | डॉ. स्नेहल तावरे | २९ |

| | | |
|---|---|---|
| ◆ अशीही एक सहल | सुप्रिया साळकर | ३२ |
| ◆ आशा (कविता) | शिबानी मिटकर | ३३ |
| ◆ वाळवंटीकरण व त्यावरील उपाय | प्रमोद पोखरकर | ३५ |
| ◆ हुंडा एक दुष्ट रुढी | संतोष कराडकर | ३५ |
| ◆ नाती (कविता) | प्रमोद पोखरकर | ३६ |
| ◆ मानव : खरंच पशू की प्राणी ? | प्रमोद पोखरकर | ३७ |
| ◆ पुरावा (कविता) | सूर्यकांत पाटणे | ३८ |
| ◆ तुझ्याशी मी बोलणार नव्हतो (कविता) | राहुल कदम | ३८ |
| ◆ आंतराळविश्वातील भारत | विनोद फुगे | ३९ |
| ◆ मुलगी : शाप की वरदान ? | नारंगी चौधवी | ४१ |
| ◆ जगतो आम्ही (कविता) | पूर्णिमा काळे | ४२ |
| ◆ चूक कोणाची ? | दिपाली चौंबे | ४३ |
| ◆ बदलत्या पर्यावरणातील मानवाची कार्ये | प्रमोद पोखरकर | ४५ |
| ◆ वळत नव्हते (कविता) | पूर्णिमा काळे | ४९ |
| ◆ झाडाझडती : एक परिक्षण | प्रतिभा भालेराव | ५० |
| ◆ चक्र (कविता) | अर्चना पोलकमवार | ५१ |
| ◆ प्रेम (कविता) | सुप्रिया साळसकर | ५१ |
| ◆ मराठी असे आमुची मायबोली | कुदळे पल्लवी | ५२ |
| ◆ करुण कहाणी (कविता) | पूर्णिमा काळे | ५४ |
| ◆ साजणा तू रे ! (कविता) | पूर्णिमा काळे | ५४ |
| ◆ बेवफा | पूर्णिमा काळे | ५५ |
| ◆ मुखवटा राजकारणाचा | भारती शिंदे | ५५ |
| ◆ पश्चात्ताप (कविता) | | ५६ |
| ◆ माझे कॉलेज (कविता) | सोपान गाडे | ५७ |
| ◆ जीवन (कविता) | रमेश फुले | ५७ |
| ◆ ती (कविता) | नंदकुमार कांबळे | ५७ |
| ◆ श्री | वासंती भागवत | ५८ |
| ◆ विश्वबन्धुत्वम् ! | मङ्गला सोमण | ६० |
| ◆ ग्रस्त (कविता) | नंदकुमार कांबळे | ६१ |
| ◆ महागाई (कविता) | नंदकुमार कांबळे | ६१ |

## हिंदी विभांग


- हमारे राष्ट्रीय कवि : मैथिलीशरण गुप्त — मनस्विनी प्रभुणे — ६२
- चलते चलते — मनस्विनी प्रभुणे — ६३
- ब्रम्हाके बेटे — संजय तिवारी — ६४
- प्रकाश — संजय तिवारी — ६४
- प्रयाण — संजय तिवारी — ६५
- हमारा आशियाना — संजय तिवारी — ६५


## English Section


- Life and its Goal — Avinash Adhav — 66
- A Smile (Poem) — P. Vijaya Bharati — 67
- Fermat's Last Theorem — 68
- Gravity & Principal of Equivalence — Barnali Nandy — 73
- Social Life in Animals — Mugdha Potnis — 76
- Writing A Poem (Poem) — Khalid Mulla — 81
- Fashion & Modern College — 82
- Search (Poem) — Shriprasad Kulkarni — 83
- Effects of Environmental Degradation on migratory Birds — Mugdha Potnis — 84
- Pollution : What It does to us ? — Bella Pharate — 86
- Today's World (Poem) — Maria Gaikwad — 87
- Is This My Nation? (Poem) — Poornima Kale — 88
- Examination Is a Cricket Match — Rupali Pradhan — 88
- A Receiple for A smiling Face — Anumita Bose — 89
- That Fatal Dall — Anumita Bose — 89
- The Bajaj Family — Rupali Pradhan — 89
- Miss — R. P. Kale — 90
- The Halmark of Success — Avinash Adhav — 91
- How can a Student PassŠ — Avinaxh Adhav — 92
- Reports — I to XLIII

# Form IV

Statement about ownership and other particulars about

## PROGRESSIVE EDUCATION SOCIETY'S MODERN COLLEGE OF ARTS SCIENCE AND COMMERCE PUNE - 411 005.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Place of Publication | : | Pune |
| 2. | Periodicity of its publication | : | Annual |
| 3. | Printer's Name | : | R. G. Marathe<br>Siddhartha Enterprises,<br>B-3, Shrikrishna Nagar,<br>128, Erandawana, Pune 411 004. |
| 4. | Publisher's Name (Whether citizen of India) if foreigner state country of origin. | : | Dr. S. Y. Paranjape<br>Modern College of Arts Commerce and Science, Pune 5. Indian |
| 5. | Editor's Name (Whether citizen of India) if foreigner state country of origin. | : | Dr. S. Y. Paranjape<br>Modern College of Arts Commerce and Science, Pune 5. Indian |
| 6. | Name and address of individuals, who own the paper and partners or shareholders holding more than one percent of the total capital | : | Modern College of Arts Commerce and Science, Pune 5. Indian<br><br>Not applicable |

I, Dr. S. Y. Paranjape hereby declare that the particulars given above are true to the best knowledge and belief.

**DR. S. Y. PARANJAPE**
Offi. Principal
Signature of Publisher

*Let me not pray to be sheltered*
*from dangers but to be fearless in*
*facing them . . . . .*

*— Excerpt from 'The Prayer'*
*by Gurudeo Ravindranath Tagore*



**- MESSAGE BY THE PRINCIPAL -**

*On the Eve of Silver Jubilee Year (1994-95) Celebrations*

Let us All Resolve
To
Unitedly and Successfully March Towards
Achieving our Goal.

**DR. S. Y. PARANJAPE**




## STAFF ACADEMY

*Staff Academy of owr college arranged a work-shops for teaching staff members on "Computer Awarness."*

*The most suitable personality for its inaguration was Prof. A. S. Kolaskar, The Head, Deptt. of Zoology, University of Poona. When he accepted the invitation, it was decided to felicitate him on the occasion of receiving the prestigious fellowship FNA of Indian National Science Academy (INSA).*

*This function was organised on the eve of Silver Jubilee Year of Modern College, Pune - 5. Prof. A. S. Kolaskar was felicitated by Prof. (Dr.) G. R. Ekbote, Chairman – Business Council, P. E. Society, Who was awarded the FNA for his achievements in the field of Medical Sciences.*

*Dr. (Mrs.) Sulbha Deuskar, the head, Deptt. of Electronics Science welcomed the honourable Guest and introduced him.*

*The workshop on "Computer Awarness" was inagurated by Prof. A. S. Kolaskar and hon. Principal Dr. S. Y. Paranjape following degniteries were present for the function. Dr. A. K. Pande - the Secretary, P. E. Society, Prof. Vivek Sawant of C-DAC, Prof. P. S. Ghaisas, Chairman B. O. S. & the Head, Deptt. of Zoology, S.P. College, Dr. R. R. Bhonde-Scientist from N. F. A. T. C. C., Kothrud, Dr. Nagarkar, Dr. M. V. Joshi, Prof. P. V. Joshi of Entomology Deptt. of University of Poona.*

*Dr. (Mrs.) S. Deuskar and Shri. Chandrashekar of Computer Deptt. along with their sincere colleagues helped in organising the workshop which was responded enthusiastically by staff members of different faculties of Modern College, Pune–5.*



कलामंडळातर्फे आंतरमहाविद्यालयीन विविध पातळ्यांवर पारितोषिक मिळविलेले विद्यार्थी



कलामंडळ १९९३-९४



राष्ट्रीय सेवा योजना १९९३-९४




वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

मा. श्री. लांडगे सत्कार करताना शेजारी श्री. रत्नाकर कुलकर्णी म. न. पा. आयुक्त पुणे



वरिष्ठ महाविद्यालय कबड्डी संघ



कनिष्ठ महाविद्यालय कबड्डी संघ




— मराठी रंगभूमी शतकोत्तर सुवर्ण महोत्सव निमित्ताने आयोजित चर्चासत्र —
डॉ. मनिषा दिक्षित, डॉ. चंद्रशेखर बर्वे, विनायक खेडेकर, डॉ. वि. भा. देशपांडे




प्राचार्य डॉ. स. य. परांजपे, कुलगुरु डॉ. अ. रा. कुलकर्णी यांचा सत्कार करताना




प्रा. डॉ. एस. एफ. पाटील, डीन, विज्ञान शाखा, पुणे विद्यापीठ
सायन्स असोसिएशन आयोजित समारंभाचे उद्‌घाटनपर भाषण करताना




प्रा. डॉ. एस. एफ. पाटील, डीन, विज्ञान शाखा, पुणे विद्यापीठ
भित्तीपत्रक उपक्रमाचे उद्‌घाटन करताना



**कु. मुग्धा पोतनीस**
तृतीय वर्ष शास्त्र (प्राणिशास्त्र)
निबंध स्पर्धा विजेती



**कु. माधवी देशपांडे**
१२ वी गुणवत्ता यादीत
४ था क्रमांक



**संजय नातू**
१२ वी गुणवत्ता यादीत
१४ वा क्रमांक



**कु. सुजाता शेट्टी**
हिंदी १२ वी बोर्डाचे
प्रथम पारितोपिक



**कु. संगीता हुले**
निबंध स्पर्धा द्वितीय क्रमांक



**सुहास शामगांवकर**
व्हॉईस ऑफ द कॉम्पेटिशन



**ऋषिकेश मद्रासी**

आय. सी. एस. आर.
पुणे विद्यापीठ
कबड्डी संघात निवड



**कु. सविता पटवर्धन**

आय. सी. एस. आर. (लेडीज)



**विशाल पवार**

आंतरराज्य सायकल स्पर्धेत
तृतीय क्रमांक



**गिरीष कानिटकर**

पुरुषोत्तम फिरोदिया आणि
मूड इंडिगो स्पर्धेतील
यशस्वी अभिनेता



**पुष्कर कुलकर्णी**

राष्ट्रीय रोलर स्केटिंग
स्पर्धेसाठी निवड



**शैलेश मुळे**

महाराष्ट्र व एव्हरेस्ट क्लब
टेबलटेनिस स्पर्धा विजेता



**पौर्णिमा बहिरट**
पुणे विद्यापीठ फूटबॉल संघात
निवड



**पंकज देव**
जिमनॅस्टिक्स विद्यापीठ संघ
कुरूक्षेत्र येथे सहभाग



**वैशाली रेदासनी**
कबड्डी–पुणे विद्यापीठ संघ
फुटबॉल–पुणे जिल्हा संघ



**उमेश गोलांडे**
११० मि. हर्डल्स
राज्यस्तरावर निवड



**अनिल माने**
बॉक्सिंग – पुणे विद्यापीठ व
राज्यस्तर विजेता



**सतीश जाधव**
ज्युदो – आंतर विद्यापीठ
ब्रांझ पदक विजेता



**पराग जोशी**
वजन उचलणे–राज्यस्तरीय स्पर्धा, द्वितीय क्रमांक



**योगेश तांबट**
कुमार गट–पुणे जिल्हा कर्णधार राज्य संघात निवड



**सोमनाथ नलावडे**
कबड्डी-राज्यस्तर व विद्यापीठ स्पर्धेत प्रतिनिधीत्व



**संदीप त्रिगुप्टे**
पुणे विद्यापीठ क्रिकेट संघात निवड



**राजेश वर्मा**
पुणे विद्यापीठ स्क्वॅश रॅकेट स्पर्धा



**अनिता पारवे**
३ ऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत कबड्डी (महिला) उपविजेता संघाची खेळाडू



**संतोष पायस**
N. S. S. जिल्हा स्तरीय
शिबीर, खडकवासला



**पल्लवी परब**
N. S. S. जिल्हा स्तरीय
शिबीर, खडकवासला



**विशाखा पाटील**
N. S. S. विद्यापीठ शिबीर,
मंचर



**सारंग शिंदे**
N. S. S. विद्यापीठ शिबीर,
शेगांव



**संभाजी तावर**
वीर सावरकर करंडक विजेता
बेस्ट कॅडेट — एन. सी. सी.



**मनोजकुमार फुलसुंगे**
II All India Best Cadet
(N. C. C.)
Youth Exchange
Programme –Canada



**प्रा. एस. आर. रायकर**
ऑफीसर ऑन स्पे. ड्युटी
प्रो. ए. सोसायटी, पुणे



**डॉ. ए. के. पांडे**
सेक्रेटरी प्रो. ए. सोसायटी



**प्रा. जगदीश चिंचोरे**
प्रमुख–कनिष्ठ महाविद्यालय
आजीव सदस्य–प्रो. ए. सोसा.



**डॉ. पी. डी. कुलकर्णी**
L. M. C. Member,
शिक्षक प्रतिनिधी.



**प्रा. गीताराम गायकवाड**
आजीव सदस्य–प्रो. ए.
सोसायटी, पुणे



**शशीकांत कामठे**
एल. एम. सी. तिसऱ्यांदा निवड



**वाय. आर. वाघमारे**
L. M. C. Member



**अंजली पवार**

एन. एस. एस.
बारामती कँपसाठी निवड



**डॉ. डी. डी. निकम**

2nd Lt. Infantry 36
mah. Bat. N. C. C.



**हरिश्चंद्र कोळेकर**



**आर. पी. काळे**

कॉम्प्युटर कोर्स
(सुरत) साठी निवड



**चंद्रशेखर**

कॉम्प्युटर कोर्स
(सुरत) साठी निवड



**श्री. डी. जी. बापट**

निवृत्त ग्रंथपाल

# मराठी विभाग

# महात्मा फुले - समता परिषद

भारती शिंदे
द्वितीय वर्ष, कला

रोज अनेक नवनवीन घटना घडतात, घडणार असतात. या घटनाच लोकांच्या चर्चेचा विषय ठरतात. अशाच अनेक चर्चांच्या गजबजाटात एका विषयाने डोके वर काढले आहे. तो विषय म्हणजे "समता परिषद". १० डिसेंबर १९९३ रोजी महात्मा जोतिबा फुले यांच्या गंज पेठेतील निवासस्थानाचे 'राष्ट्रीय समता भूमी'त रूपांतर करून ते स्मारक राष्ट्रपती शंकरदयाळ शर्मा यांच्या हस्ते राष्ट्राला अर्पण करण्यात आले. त्या निमित्ताने सर परशुरामभाऊ महाविद्यालयाच्या पटांगणावर 'महात्मा फुले समता परिषद' आयोजित करण्यात आली. आपल्या देशाचे भवितव्य सूर्याप्रमाणे तेजस्वी करण्यासाठी पुढे सरसावलेल्या मान्यवर व्यक्ती म्हणजेच राज्यपाल, मुख्यमंत्री आणि इतर मंत्रीही या परिषदेला उपस्थित होते. त्यांनी महात्मा फुले यांच्या असाधारण कार्याचा गौरव करून त्यांना आदरांजली वाहिली. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून सर्व थरातून आलेले लोक मोठ्या संख्येने समता परिषदेत सहभागी झाले होते.

समता ! समता ! ही समता म्हणजे नेमक्या कुठल्या क्षेत्रातली ? स्त्री-पुरुष समता का आर्थिक बाबतीतली समता ? का जाती-भेदाबाबतची समता ? आपल्याला या सर्व क्षेत्रातली समता अभिप्रेत आहे. ही समता, विशेषत: जाती-भेदाबद्दलची समता जी आज प्रस्थापित झाल्याचे आपण पाहतो, त्यासाठी महात्मा फुले यांनी फार मोठे योगदान दिलेले आहे. समाजामध्ये समता प्रस्थापित करण्यासाठी जोतिबा फुले यांनी जे अतोनात कष्ट केले, अनेक संकटांना तोंड दिले, ज्या यातना हसतमुखाने सहन केल्या त्याचे शब्दात वर्णन करणे अवघड आहे. सनातनी परंपरेच्या समाजाने जोतिबांना अतिशय कडवट वागणूक दिली. हेही जोतिबांनी सहन करून समता प्रस्थापित करण्याचे कार्य चालूच ठेवले. त्याचेच आज खऱ्या अर्थाने चीज करणे हा समता परिषद घेण्यामागचा उद्देश आहे. महात्मा फुले यांची जी वास्तू राष्ट्राला अर्पण करण्यात आली, तीच जोतिबांच्या महान कार्याची स्फूर्तिदायक साक्षीदार आहे. त्यांच्या वास्तूच्या समोर असणारी, १२५ वर्षांपूर्वी अस्पृश्यांसाठी फुले यांनी खुली केलेली पाण्याची विहीरच त्यांच्या कार्याची साक्ष पटवून देते. त्याचप्रमाणे त्यांची ही वास्तू त्यांच्या काळाचा संदर्भ लक्षात घेता, उच्चवर्णीय वस्तीपासून दूर, अस्पृश्यांच्या वेगवेगळ्या जाती धर्मांच्या लोकांच्या वस्त्यांमध्ये आहे.

जोतिबांच्या काळामध्ये म्हणजे १२५ वर्षांपूर्वी समाजात फार मोठ्या प्रमाणात एक महाभयंकर रोग पसरला होता, की ज्याने सबंध समाज पोखरून काढला होता, तो म्हणजे 'जातीभेद'. या जातीभेदाने समाजामध्ये प्लेगप्रमाणे धुमाकूळ माजवला होता. महार, मांग, चांभार इत्यादी अठरापगड जातीधर्मांच्या लोकांना तुच्छतेने, जनावराप्रमाणे वागवले जाई. उच्चवर्णीय लोक उकीरड्यातल्या कचऱ्याकडे आपण ज्या किसळवाण्या भावनेने पाहतो, त्या भावनेने अस्पृश्यांकडे पाहत असत. नेमक्या याच गोष्टीची जोतिरावांना घृणा वाटत होती. त्यांना धर्मभेद, वर्गभेद, जातीभेद नसलेली आणि समानता, परस्पर सहानुभूती व बंधुभाव असलेली भक्कम समाजव्यवस्था हवी होती.

'समता' या एकाच गोष्टीचा ध्यास त्यांनी घेतला होता. अस्पृश्य समाजाला भेदभावाच्या महाभयंकर चक्रव्यूहातून सहिसलामत बाहेर काढण्याचे काम जोतिबांनी आपल्या हाती घेतले. अस्पृश्य समाजासाठी आणि स्त्रियांसाठी पुण्यात प्रथम शाळा काढून त्यांनी आपल्या महान कार्याचा श्रीगणेशा केला. त्यांनी आयुष्यभर माणसामाणसांमध्ये भेद करणाऱ्या धर्मावर कठोर टीका करून आग पाखडली. त्यांनी आपले विचार केवळ बोलून दाखवले नाहीत; तर ते प्रत्यक्ष कृतीत उतरविले. त्यांनी लिहिलेल्या 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तक, 'शेतकऱ्यांचा आसूड', 'ब्राम्हण्यांचे कसब' ह्या पुस्तकांमधून त्यांचा समाजातील विषमतेबद्दल असणारा तीव्र संताप व्यक्त होतो.

समता प्रस्थापित व्हावी याकरता महात्मा फुले यांनी जे योगदान दिले, जे विचार मांडले, त्यांची दारे १० डिसेंबर १९९३ रोजी घेण्यात आलेल्या समता परिषदेच्या निमित्ताने उघडी झाली. त्यांचे राहते घर समताप्रधान समाजरचनेसाठी चाललेल्या लढ्याचे स्फूर्तिस्थान बनले. आज जोतिरावांच्या मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. कारण सध्या राजकारणातील व्यक्तींनी परिवर्तनाचे साधन मानले जाणारे राजकारण सवंग, ओंगळ बनवले आहे. राजकारणी कुठलाही विषय आपल्याला अनुकूल होईल अशा पद्धतीनेच हाताळतात. परंतु याची परिणती समाजाची अधोगती होण्यातच होते. आज समतेला महत्त्व देऊन विषमतेला मूठमाती देणे ही पूर्वीप्रमाणेच आजचीदेखील गरज आहे.

महात्मा फुले यांच्या काळातील समाजव्यवस्थेपासून आजपर्यंत विचार केला, तर असे म्हणता येईल की, त्यांनी समता प्रस्थापित करण्यासाठी जो त्याग केला, त्याचे बऱ्याच प्रमाणात सार्थक झाले आहे. परंतु सर्वत्रच समतेने अधिष्ठान मिळवले आहे असा दावा करता येणार नाही. कारण आज अजूनही अनेक ठिकाणी पूर्वीइतके नाही, पण थोड्याफार प्रमाणात का होईना अस्पृश्य, दलित यांना कमी दर्जा दिला जातो. त्यांच्याकडे अजूनही तुच्छतेने पाहिले जाते. त्याचप्रमाणे भारतामध्ये कित्येक ठिकाणी आजच्या या आधुनिक प्रबोधन काळात शिक्षणाचा प्रसार फारसा झालेला नाही. त्यामुळे अज्ञानी, अंधश्रद्धाळू लोक, जातीभेदाच्या विळख्यात अडकून पडले आहेत. खेड्यापाड्यांमध्ये अजूनही दलितांच्या वसाहती गावाबाहेर असल्याचे दिसते. यामध्ये योग्य परिवर्तन घडवून आणण्याचे प्रयत्न चालू आहेत. या प्रयत्नांमध्ये केवळ दलितच नव्हेत, तर उच्चवर्णीय व शासन यांचाही सहभाग आहे. महात्मा फुल्यांपासून १२५ वर्षांमध्ये समतेने बरेच महत्त्व प्राप्त करून घेतले आहे. त्याचप्रमाणे मागासवर्गीयांसाठी शासनाने अनेक सवलती उभ्या केल्या आहेत. त्यांना शिक्षण घेता यावे यासाठी अनेक सवलती दिल्या आहेत. त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी त्यांच्याकरता राखीव जागा ठेवल्या गेल्या आहेत. शिवाय सुशिक्षित, सुसंस्कृत लोक आता पूर्वीसारखे जातीभेद न मानता, निरनिराळ्या जातीच्या लोकांमध्ये मिसळतात, हा फार महत्त्वाचा बदल आज घडून आलेला आहे. हेच जर पुढे चालू ठेवले तर सर्वत्र समता प्रस्थापित होण्यास वेळ लागणार नाही.

१० डिसेंबर १९९३ रोजी घेण्यात आलेल्या समता परिषदेमागचा हेतूच, समताप्रधान समाजव्यवस्था निर्माण करण्याचा आहे. या उद्देशाची सफलता, समता परिषदेला विविध थरातील जनतेने दिलेल्या महत्त्वातच आहे. त्याचप्रमाणे देशाचे भवितव्य हातात असणाऱ्या तरुण-तरुणींनी देखील महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने समता ज्योत घेऊन पुण्याकडे प्रयाण केले. यावरून एक गोष्ट सहज स्पष्ट होते की, आज समतेचे महत्त्व सर्वांना पटत आहे. यातून व्यापक प्रमाणातील समता सिद्ध झाली. स्त्री-पुरुषांनी एकत्रित येऊन समता ज्योत घेऊन प्रयाण केले. विविध जातीधर्मांचे लोक त्यामध्ये समाविष्ट झाले होते. यातून स्त्री-पुरुष समता, वर्गभेदाबद्दलची समता सिद्ध झाली. परंतु असे असले तरी समाजामध्ये काही

समाजकंटक असतात, की जे स्वतःच्या स्वार्थापोटी विषमतेला खतपाणी घालण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे असे अडथळे पार करून समता प्रस्थापित करणे अवघड होऊन बसले आहे. त्यामुळे समता परिषदेची फार आवश्यकता आहे. समतेला महत्त्वाचे स्थान देऊन यापुढेही समता परिषदा घेणे आवश्यक आहे. केवळ अशा परिषदा घेऊन न थांबता, समतेची बीजे लोकांच्या मनामध्ये पेटली पाहिजेत. या बीजांचे मोठे वृक्ष करायचे का त्यांची वाढ खुंटवून ते कुजू द्यायचे, हे शेवटी लोकांवरच अवलंबून आहे. समतेच्या बीजांचे हिरवेगार, भव्य वृक्ष करण्याचे काम समता परिषदेच्या माध्यमातून होणे शक्य आहे.

■ ■ ■

## सखी

सखी तू भूल न जाना
बदल गया तेरा बसेरा तो क्या ?
अपने दिल से मुझे ना भूलाना।

वह प्यार, रुठना, तेरा मनाना,
वह एक साथ खिलखिलाना,
सखी तू भूल न जाना।

वह सपने जो हमने मिलकर संजोए थे,
वह रास्ते जो हमने चुने थे,
सखी तू भूल न जाना ।

अब हम बिछड रहे हैं,
क्योंकी वक्त की यही माँग है,
मगर हृदय में है विश्वास कि
बिछडे हुए मिलेंगे फिर सखी तू भूल न जाना।

**रानू चटर्जी**
द्वितीय वर्ष, वाणिज्य

## पुणं म्हणजे . . .

पुणं म्हणजे . .
सरसर वाढणारं, भरभर पळणारं
कुणासाठी कधी न थांबणारं,
नेहमी स्वतःच्याच तंद्रीत चालणारं

पुणं म्हणजे . . . .

निरनिराळ्या वाटांचं,
पण सर्वांना जोडणारं,
रसिकता शिकवणारं, अन् चर्चा करणारं,

पुणं म्हणजे . .

तब्येतखोर आणि दिमाखदार,
पेशवाईच्या सुगंधी स्मृती पाहणारं,
आरामात खाणं, पिणं नि शयन करणारं

पुणं म्हणजे . . .

संवादापेक्षा वाद घालणारं,
मीच किती खरा हे दाखवणारं,
तरीही सर्वांना भावणारं,

पुणं म्हणजे . . . .

तिरंदाज तिरकसपणा,
समोर आले कि खडूसपणा,
रूढार्थी चांभार चौकशा.

पुणं म्हणजे . . .

कोणी कितीही नावं ठेवोत,
परंतु पुणं आपल्याच थाटात,
कारण, "आमचं हे असंच असतं."

**दिनेश ना. ताशिलदार**
प्रथम वर्ष, शास्त्र

# सायकल दिवस

गीता लक्ष्मण देशमुख
प्रथम वर्ष, वाणिज्य

नूतन वर्ष हे दरवर्षी येत असते. आपण सर्वजण दरवर्षी नव वर्षाचे स्वागत उत्साहाने, आनंदाने साजरे करत असतो. नव वर्षाचे स्वागत झाल्यानंतर महाविद्यालयात विद्यार्थी - विद्यार्थिनी ज्या गोष्टीची उत्सुकतेने वाट पहात असतात, ती गोष्ट म्हणजे स्नेह-संमेलन. स्नेह-संमेलन जवळ आले की, महाविद्यालयात निवडणुका होतात. वेगवेगळ्या विभागाचे प्रतिनिधी निवडले जातात. या प्रतिनिधींच्या अध्यक्षतेखाली स्नेह-संमेलनातील वेगवेगळे कार्यक्रम साजरे केले जातात. महाविद्यालयीन जीवनात थोडासा विरंगुळा, थोडासा बदल, त्याचबरोबर आनंद म्हणून 'रोझ डे' व 'पारंपरिक दिवस' म्हणून साजरे केले जातात. आजच्या महाविद्यालयांमध्ये अशा कार्यक्रमांना प्रतिसादही तेवढाच मिळतो. पण या गोष्टी आपल्याला काही नवीन नाहीत. तरी सुद्धा महाविद्यालयीन तरुण-तरुणी अशा कार्यक्रमांमध्ये भाग घेऊन आनंद लुटतात.

पण तुम्हाला आश्चर्य वाटेल, पुण्यातील अशाच एका महाविद्यालयात एक आगळा-वेगळा उपक्रम हाती घेतला व तो उपक्रम साजरा करण्यात आला. तो उपक्रम म्हणजे 'सायकल दिवस'. त्या दिवशी सर्वांनी महाविद्यालयात सायकली आणल्या होत्या. अगदी श्रीमंतांची मुले सुद्धा सायकलवर महाविद्यालयात आली होती.

आपल्या देशात सायकलींचा वापर इंग्रजांच्या राज्यात होऊ लागला. त्या काळात शहर आणि खेडेगाव यांमधील अंतर जास्त असल्यामुळे लोकांना पायी जाणे त्रासाचे वाटत होते. परंतु सायकल आल्यानंतर हा त्रास कमी झाला. कारण सायकलसारखे दुचाकी असे स्वस्त आणि मस्त वाहन दुसरे कोणतेही नाही असे म्हटले तर गैर होणार नाही. भारतासारख्या विकसनशील देशात गोरगरीबांना सायकल हे वाहन परवडण्यासारखे आहे.

पूर्वी पुणे हे शहर सायकलींचे शहर म्हणून ओळखले जात होते. कारण ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या शहरात राजे-राजवाडे असल्यामुळे साहजिकच अरुंद रस्ते आहेत. अशा रस्त्यांवरून एकाच वेळी दोन-दोन गाड्या चालविणे शक्य होत नव्हते. त्यामुळे अशा रस्त्यांवर सायकल चालविणे कायदेशीर होते. परंतु आता तशी परिस्थिती राहिलेली नाही. ऐतिहासिक संस्कृती बरोबर अलीकडे पुण्याला श्रीमंतांची संस्कृती लाभलेली आहे असे दिसते. त्यामुळे साहजिकच श्रीमंती ऐट ही आलीच. श्रीमंतांच्या घरात नाही म्हणायला निदान दोन ते तीन चार चाकी गाड्या, मुलांना लुना नाहीतर स्कूटर्स उडवायला असतातच. अशा घरांमध्ये महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या मुलांच्या खिशामध्ये पैसा खुळखुळत असतो आणि हातात गाडी. म्हणजे रस्त्यावर श्रीमंती दिमाख मिरवायला असतो. आपण ज्या गोष्टींना चैन, मौजमजा म्हणतो, त्या गोष्टी शेवटी आपल्यासाठी मृत्यूचे दार ठोठावतात. पण हे सांगून कोणालाही पटत नसते. पण जेव्हा समजते तेव्हा फार उशीर झालेला असतो.

खरं म्हणजे इतर वाहनांप्रमाणे सायकलीला नियम क्रमांक देऊन, नियमांचे व्यवस्थित पालन करून,

सायकलीचा वापर जास्तीत जास्त केला पाहिजे. परंतु ज्या वाहनांना वाहतूक नियम आहेत, ती वाहने त्या नियमांचे व्यवस्थितपणे पालन करतात का ? याकडे आपल्याला लक्ष दिले पाहिजे. कारण आज पुण्यात वाहतूक समस्या इतकी वाढलेली आहे की पुण्यातील रस्त्यांवर वाहन चालविणे अथवा चालणे म्हणजे जगातील रस्त्यावर वाहन चालविणे अथवा चालणे होय, असे म्हणण्याची वेळ आता आपल्या पुणेकरांवर आली आहे. कारण या समस्येमुळे प्रदूषण, अपघात याशिवाय वाहतूक पोलिसांना लाच देणे इ. गैरप्रकार वाढल्यामुळे पुणेकरांचे स्वास्थ्य धोक्यात आले आहे. कारण रस्त्यावर जे वाहतूक पोलिस वाहतूक नियंत्रणासाठी नेमलेले असतात, त्या वाहतूक - पोलिसांचे स्वतःच्या मनावरचे नियंत्रण आता उरले नाही. कारण जे वाहन-चालक वाहतुकीच्या नियमांचे पालन करीत नाहीत, त्या वाहन-चालकांकडून ५०-१०० रु. ची नोट लाच या स्वरूपात वाहतूक पोलिस घेतात व त्या वाहन चालकाला सोडून देतात. वाहन चालकांनासुद्धा अशा गोष्टींमध्ये वेळ घालविणे आवडत नाही अथवा इभ्रतीसाठी ते पोलिसांना लाच देतात. शिवाय वाहतुकीचा परवाना काढताना सुद्धा पैसे द्यावे लागतात. परंतु सायकल चालविण्याकरिता अशा काही गोष्टी कराव्या लागत नाहीत. कारण सायकलसारखे स्वस्त आणि सुटसुटीत असे वाहन दुसरे कोणतेही नाही. आपल्याला अपघात, प्रदूषण, इ. समस्यांना तोंड द्यायचे असेल तर सायकलींचाच वापर करणे योग्य आहे.

चीनसारख्या लोकसंख्येने मोठ्या असणाऱ्या देशात राजकारणामधील मोठमोठे नेते, शिवाय इतर अधिकारी वर्ग मोठ्या प्रमाणावर सायकलींचाच वापर करतात. मग भारतात तसे का शक्य नाही ? सर्वच गोष्टी शक्य असतात. फक्त आपण त्या गोष्टींची सवय लावली पाहिजे. कारण अशा गोष्टी स्वतःला शिवाय देशालाही फायदेशीर असतात. वैद्यकीय क्षेत्रात तर चालणे आणि सायकल चालविणे याला फार महत्त्व आहे. त्यामुळे आपले स्वास्थ्य चांगले राहण्यास मदत होते. त्यामुळे सायकल वापरणे आपल्याला आणि देशाला किती फायदेशीर आहे हे कळते.

आज जग एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर उभे आहे. आपल्याला आपला विकास करावयाचा आहे. आपल्याला एकविसाव्या शतकाचा सूर्य उगवताना पाहायचे आहे. प्रदूषण, अपघात इ. समस्याविरहित देश पाहायचा आहे. त्यासाठी सायकल चालविणे फार महत्त्वाचे आहे.

■ ■ ■

## क्षितिज. . . . !

दुरून आर्त बोलावणे आले अन् निघाले मी,  
फक्त त्याच्या हट्टाकरिता, लगेचच अनवाणी !

वळणाच्या वेड्यावाकड्या काटेरी बिकट वाटा,  
तुडवत चालले होते आणि . .

अचानक थबकले विस्फारत आश्चर्याने डोळे मी,  
'ते' स्वतःच अगदी समोर आले होते.

मध्ये फुटलेले बरेच फाटे गुंतागुंतीचे,  
तरी 'ते' अगदी सरळ . . . होते.

चालण्यातच दिवसामागून दिवस गेले,  
पण मला मागे फिरायचेच नव्हते . . !

पायात रुतले काटे, मन रक्तबंबाळ,  
परि 'ते' गवसत नव्हते.

जखमांचे ते कायमचे खोल व्रण !  
यांनीच आज जाणीव करून दिलीय . . ?

'ते' तर क्षितिज . . . ! होते.  
अन्, मी तर त्याला कवटाळू पाहत होते !

**शिबानी एम. मिटकर**  
● द्वितीय वर्ष, वाणिज्य

# मराठवाडा नामविस्तार : एक चर्चा


**संध्या म. चव्हाण**

तृतीय वर्ष, कला


१४ जानेवारी १९९४ रोजी मराठवाडा विद्यापीठाचे "डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ" असा नामविस्तार करून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी १९७४ पासून रेंगाळलेला एक महत्त्वाचा प्रश्न निकाली लावला. मराठवाड्यातील नामविस्तारविरोधी प्रतिक्रिया पाहता निकाली लावला असे म्हणणे धोकादायकच ठरेल.

१९७४ मध्ये मराठवाडा विद्यापीठाचे "डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ" असे पूर्णतः नामांतर करण्याची मागणी पुढे आली व २७ जुलै १९७८ मध्ये महाराष्ट्रात 'पुलोदचे' सरकार सत्तेवर असताना नामांतराचा प्रस्ताव विधिमंडळाने एकमताने मान्य केला. परंतु यानंतर 'नामांतरवादी' विरुद्ध 'नामांतर विरोधी' असे दोन गट पडून संघर्ष सुरू झाला आणि दलित व दलितेतर यांच्यातील वाद विकोपास गेला. या संघर्षाने हिंस्र रूप धारण केले. नामांतर प्रस्तावाची कार्यवाही लांबणीवर टाकावी लागली. त्यानंतर अधूनमधून ही मागणी होतच होती आणि तब्बल वीस वर्षांनंतर नामांतरवादी व नामांतरविरोधी यांच्यात समन्वय साधण्याचा, दोहोंचे समाधान करण्याचा मार्ग म्हणून नामांतराऐवजी नामविस्तार करण्यात आला.

नामांतराच्या या वादातील दोन्ही गटांच्या भूमिका पाहणे महत्त्वाचे ठरते. १९७४ मध्ये नामांतराची मागणी सर्वप्रथम 'मराठवाडा रिपब्लिकन विद्यार्थी संघाने' केली. १९७८ मध्ये नामांतराचा प्रस्ताव मंजूर झाला. त्यानंतर 'नामांतरविरोधी गट' निर्माण झाला. आश्चर्य म्हणजे या गटाचे नेतृत्व कुठल्याही पक्षाकडे अथवा संघटनेकडे नव्हते. तरीही १९७८ मध्ये या ठरावास प्रचंड विरोध झाला. त्याची परिणती हिंसाचारात झाली. त्यानंतर या गटाचे नेतृत्व गोविंदभाई श्रॉफ, कै. अनंतराव भालेराव या नेत्यांनी केली. या विरोधाचे कारण ते मराठवाड्याची अस्मिता कायम राहावी हे देतात. ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या निजामाशी प्राणांचे बलिदान देऊन लढा देणाऱ्या मराठवाड्याने स्वकर्तृत्वावर आपले नाव इतिहासात नोंदवले आहे, असा पवित्रा या गटाने घेतला. दलितमुक्ती चळवळीचे प्रणेते, मराठवाड्यातील शैक्षणिक कार्यासाठी झटलेले थोर नेते, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल आदरभाव व्यक्त करण्यासाठी, त्यांचे नाव मराठवाडा विद्यापीठास देण्याचा आग्रह नामांतरवाद्यांनी धरला होता. या दोन्ही गटाचे समाधान करण्यासाठी नामविस्तार करण्यात आले. १९७८चीच पुनरावृत्ती होऊन, नामांतरविरोधकांनी हिंसक मार्गाने याचे प्रत्युत्तर दिले. काही काळ हा तणाव असाच राहून परिस्थिती कालोघात शांत होईलही. मात्र या वादातून अनेक प्रश्न निर्माण होतात.

भारताला स्वातंत्र्य मिळून ४० हून अधिक वर्षे लोटली आहेत. या काळात दलित-दलितेतर यांच्यातील आर्थिक दरी बऱ्याच प्रमाणात मिटली असली, तरी भावनिक दरी मिटलेली नाही, हे मंडल आयोग व आता नामांतरामुळे पुन्हा एकदा प्रकर्षाने समोर आले. १९७८ मध्ये नामांतराचा ठराव विधिमंडळापुढे मांडताना उत्तमराव पाटील म्हणाले

होते की, "मराठवाड्याचे डॉ. आंबेडकर विद्यापीठ असे नामांतर केले तरी ते विशिष्ट वर्ग अथवा जातीचे विद्यापीठ होणार नाही." नामांतराची प्रक्रिया सामाजिक समतेचे पाऊल असल्याचा प्रचार त्या वेळी व आताही केला गेला. परंतु आजही डॉ. आंबेडकरांभोवती विशिष्ट जातीचे, विशिष्ट वर्गाचे लेबल आहे व त्यामुळे बहुसंख्यांकांचा नामांतराला विरोध होणे अटळ होते. आंबेडकरांचे कार्यच एवढे मोठे होते की, आपल्या कामामुळेच ते अमर झाले आहेत. मग एखाद्या विद्यापीटास त्यांचे नाव दिल्यानेच त्यांची महत्ता सिद्ध होईल काय ? आणि खुद्द आंबेडकरांना नामांतरासारख्या अर्थहीन वादावरून रक्तपात झालेला आवडला असता का ?

कुठल्याही प्रश्नाचे राजकीय भांडवल करून आपला फायदा साधून घेणे हे आपल्या देशातील पक्षांचे ध्येयधोरण आहे. मराठवाड्याचे खरे प्रश्न वेगळेच आहेत. मात्र दुर्दैवाने कुठल्याही राजकीय पक्षाला ते सोडवावेसे वाटत नाहीत. परिणामी माराठवाड्याचा विकास मंद गतीने होत आहे. भारतासारख्या विकसनशील राष्ट्राला विकसित राष्ट्रांच्या पंक्तीत जाऊन बसायचे झाल्यास, देशात शांतता, एकात्मता आणि संघटना यांची नितांत आवश्यकता आहे. मात्र सत्ता-स्पर्धेच्या चढाओढीत नित्य नवीन प्रश्न निर्माण करणारे विविध राजकीय पक्ष, हे प्रश्न चिघळतील कसे याकडे अधिक लक्ष देताना दिसून येतात. याकरिता भारतीय जनता सुजाण, सक्षम होणे गरजेचे आहे. धर्मांधता, जातीयता मोडून, नामांतरासारख्या अर्थहीन प्रश्नासाठी रक्त सांडण्यापेक्षा, त्या महान व्यक्तींच्या तत्त्वानुसार चालणे हेच त्या व्यक्तीचे खरे स्मारक टरेल.

■ ■ ■

## खांब

ऐन रस्त्यातला खांब
मला म्हणाला थांब
मी थबकले.
तारांनी जखडलेला
झेंड्यांनी लखडलेला

देह सावरीत खांब बोलू लागला . .
'अरे तुमच्या जयंत्या होतात, नेते येतात,
मिरवणुका निघतात, जलसे होतात,
तुमचे झेंडे मात्र आम्हाला लागतात,
कधी हिरवे, भगवे, कधी निळे
तर कधी काळेसुद्धा !
एक तर दिवे काढा,
नाही तर बरबटलेले झेंडे काढा
एक तर आम्ही दिव्यांचे खांब राहू
नाही तर चक्क ध्वजदंड होऊ
या झेंड्यांच्या ओझ्यांनी
आमचे देह जडावतील
मग उभं राहणंही मुश्किल होईल.
मग हे झेंडे फाटतील, पडतीलही
कुणाच्या भावना दुखावतील
वाहणारे रक्तपात पाहताना
आमचे दिवे मंदावतील

आता मात्र टरवून टाका, . .
झेंडे हवेत कि दिवे हवेत ?
रस्त्यावरचा एक खांब
मला म्हणाला थांब. . . !

**गीता लक्ष्मण देशमुख**
प्रथम वर्ष, वाणिज्य (क)

# माझी प्रेयसी

**अविनाश श्रीराम आढाव**
तृतीय वर्ष, शास्त्र

काय करावं ? कधी करावं ? आणि कसं करावं ? हे मला अजिबात समजेना. माझा त्रास कमी होत नव्हता. या त्रासाला मी पुरा कंटाळलो होतो. असा अजून किती दिवस त्रास सहन करावा लागणार आहे, याचा पत्ता नव्हता. ती काही माझी पाठ सोडत नव्हती.

मी त्या वेळी इयत्ता ९वीत शिकत होतो. आमच्या दहावीच्या मुलांच्या रात्री शाळेत सहअभ्यास होत. सकाळी ८ला जादा तास असत आणि माझी अशी परिस्थिती असताना ती या तासांबरोबर मला आणखी फारच त्रास द्यायची.

मी जिथे जाईल तिथे ती येत होती. घरात असो किंवा शेतात असो तिथे ती यायची. माझ्याकडे पाहून मिश्किलपणे हसायची. माझ्या गालावर टिचकी मारायची. मला सोडून थोडी सुद्धा दूर जात नसे.

नेहमी ती संध्याकाळच्या वेळी माझ्याकडे लवकरच यायची आणि आता तर ती दिवसा पण माझ्याकडे येत असे आणि शेवटी तर ती वेळकाळ विसरूनच गेली. कधीही, केव्हाही, कुठेही ती येऊ लागली. जोपर्यंत मला अभ्यास करावासा वाटे, त्या वेळी जर ती आली तर मला तिचा राग यायचा. एखादे वेळी अभ्यास नसेल किंवा असताना सुद्धा माझ्या लक्षात नसेल, तर मी स्वतःहून तिच्याशी रममाण होत असे.

माझ्या भावाला हे अजिबात आवडत नसे. तो मला सारखा बजावत असे. 'हे दहावीचे वर्ष आहे. तेव्हा अभ्यास करीत जा, नाही तर नापास होशील. परिणाम बरा होणार नाही. शाळा सोडावी लागेल.' मला मात्र दहावीच्या वर्षाच्या पहिल्या महिन्यापासून पुढे 'ती'ची अतिशय चटक लागली होती. तिचे तोंड पाहिल्याशिवाय मला चैन पडत नसे.

एके दिवशी संध्याकाळी जेवणाच्या अगोदर थोडा अभ्यास करावा म्हणून आत घरात बसलो आणि थोडा अभ्यास उरकल्यावर जेवण करावे असे वाटले. पण माझ्या मनात भीती घर करत होती आणि त्यामुळे आपल्याला अभ्यासाला रामराम ठोकावा लागेल, म्हणून मी दारे-खिडक्या लावून त्यांना आतून कडी लावली. वाटले आता ती कशी येणार आणि इथे आलीच तर दरवाज्यातून आत कशी येणार ?

पण म्हणतात ना 'नशिबात लिहिलेले आहे, ते होणारच' याचाच मला प्रत्यय आला. पाचच मिनिटे झाली असतील, अचानक चमत्कार घडला. मी दरवाज्याकडे सहज नजर टाकली. पाहतो तर दरवाज्याला पाठ लावून ती उभी होती. माझ्याकडे पाहून स्मित करीत होती. तिला पाहताच मला आश्चर्य वाटले. कारण आपण दरवाजा व खिडकी आतून बंद केली असताना सुद्धा ती आत कशी आली ? मी स्वतःला चिमटा घेऊन पाहिला की, आपण स्वप्नात तर नाही ना ? पण मी खरंच स्वप्नात नव्हतो. ती माझ्याजवळ आली. जेवण तयार होताच बाबांनी मला जेवणासाठी हाक मारली. मात्र मला काही ती ऐकू आली नाही. बऱ्याच हाका मारून शेवटी दरवाज्याला धक्के मारू लागले. पण मी तिच्याशी रममाण झालो होतो. बाबांनी

ओळखले की मी आत काय करीत बसलो असेल. शेवटी त्यांनी बाहेरून कडी लावली. सर्व जेवले व झोपले.

मी रात्री दोनच्या दरम्यान उठलो. भूक तर फारच लागलेली. सकाळी ९ वाजता जेवलेलो होतो. तेव्हा उठून कडी काढली; पण तेवढ्यात बाबा उठले. काठी घेतली आणि मला झोडपू लागले. पण आईचे मातृत्व होतेच. त्या वेळी तिने मधे येऊन माझा काठीपासून बचाव केला. बाबा आईला म्हणाले, "तू बाजूला हो, पाहतोच याच्याकडे. तिच्याशिवाय याला अजिबात करमत नाही. याला आज चांगलाच झोडपून काढले म्हणजे हा नंतर तिच्या नादी लागणार नाही. हो तू बाजूला !"

"असू द्या हो, लहान आहे अजून. असंच चालायचं हे."

एके दिवशी शाळेतही नको ते घडलं. इंग्रजीचा तास होता. श्री. बाबर सर शिकवित होते. पण माझे तासाकडे लक्ष नव्हते. डोळे उघडझाप करत होते. कधी तास संपतोय असे झाले होते. तेवढ्यात दरवाज्यातून ती येताना दिसली. ती दुसऱ्यांकडे पाहात नव्हती. माझ्याकडेच पाहून हसत होती. मी सर्वात पाटीमागच्या डेस्कवर बसलो होतो. तिथे ती आली. आणि आम्ही दोघे जण 'गुलगुल' बोलत बसलो. हा काय विचित्रपणा आहे. म्हणून सर्व मुले माझ्याकडे पाहून हसू लागले. एकमेकात चर्चा करू लागली.

तेव्हा अचानक सरांचे लक्ष माझ्याकडे गेले. ते माझ्याकडे आले. पण त्यांच्याकडे माझे लक्ष अजिबात नव्हते. कारण मी तिच्याशी बोलत होतो ना ! प्रेमाच्या चार गोष्टी करत होतो ना ! सरांनी माझ्या पाठीत खण्णकन एक धपाटा मारला तेव्हा मी थोडा भानावर आलो. तोपर्यंत ती बाहेर पळून गेली होती. हे पाहून सर्व मुले फिदीफिदी हसली. मी झटक्यात पुरा भानावर आलो. झालेला प्रकार काहीसा समजल्यावर शरमेने मान खाली घातली.

असे प्रकार दिवसातून बऱ्याच वेळा घडायचे. रात्री तर ती माझ्या जवळच असायची. वाईट वाटे. पण इलाज नव्हता. मी तिला कितीतरी वेळा सांगितले की, तू एवढे वर्ष माझ्यामागे लागू नकोस. पण ती काही माझं ऐकत नव्हती. ती म्हणायची तुमच्याविना मला थोडे सुद्धा करमत नाही. दिवसही जात नाही.

तिच्या नादानेच माझा दहावीचा रिझल्ट फारच कमी म्हणजे ७२.२८ टक्के लागला. वाईट आता वाटते. पश्चात्ताप होतो. केलेल्या चुकीचे आता मला प्रायश्चित्त भोगावं लागतंय. पण करणार काय ?

तरी मित्रांनो, तुम्ही माझ्यासारखं करू नका. प्रेयसीचा नाद धरू नका. फक्त कामापुरता संबंध असावा. अती नको. गग "अती तेथे माती" होतं. पुढच्याला ठेच लागावी म्हणून मागचे तुम्ही शहाणे व्हावेत, यासाठी हे आवर्जून सांगत आहे. नाही तर हातातलं 'परीस' कधी गेला, हे कळायचे नाही.

पण मला तुम्ही प्रेयसी कोणती होती म्हणून विचारलं नाही ? ती होती माझी लाडकी आवडती 'झोप' !

■ ■ ■



# जीवन आणि माणूस

**संतोष चं. घाटे**
प्रथम वर्ष, शास्त्र

जीवन म्हणजे काय हो ? येईल का सांगता ? नाही सांगता येत ना? सहाजिकच आहे. जीवनाचा खरा अर्थ अथवा जीवनाची व्याख्या सांगणे खूप कठीण आहे. जर आपण एका कटाक्ष नजरेने आपल्या जीवनात डोकावून पाहिले, तर आपल्याला सुख-दु:खाचा गुंता दिसेल, जो सोडविण्यात आपण स्वत: गुंतून जाऊ. आणि तरीही हाही गुंता सोडवणे काही कठीण काम नाही. आपण जर आपल्या जीवनाला अनुसरून वागलो तर नक्कीच हा गुंता आपल्याला सुटेल.

जीवन हा एक पाण्यावरचा बुडबुडा आहे. जो आहे म्हणता नाहीसा होतो, नष्ट होतो. आपल्या जीवनाचा अंत कुठे, केव्हा व कसा होईल हे आजच्या युगात सांगणे अवघड आहे. ज्याप्रमाणे बुडबुडा पाण्याच्या पृष्ठभागावर काही सेकंदच रहातो, परंतु तो प्रकाशाकडून सात रंग घेऊन आपले आयुष्य सप्तरंगी करुन स्वत:भोवतीच आनंदाने प्रदक्षिणा घालतो. जणू त्याला दीर्घ आयुष्य लाभले आहे. परंतु तो आपले छोटे आयुष्य दुसऱ्यांचे लक्ष स्वत:कडे वेधवून घेतो व हळूच नष्ट होतो.

जीवन जगावे तर बुडबुड्याप्रमाणे जगावे. मृत्यूच्या भीतीने आपले मिळालेले दिवसही रडत - खडत जगण्यात मूर्खपणा आहे. 'मरावे परि कीर्तिरूपे उरावे' ही म्हण आपल्याला माहीतच आहे. जीवनाचा सूर्य उगवतो व एके दिवशी त्याला मावळायचे असते, हा निसर्गाचा नियम आहे आणि मृत्यू हे एक कटू सत्य आहे. तेव्हा त्याकडे दुर्लक्ष करून परोपकारी वृत्तीने जगावे. आपले आयुष्य दुसऱ्यांसाठी वेचावे, तरच आपण खऱ्या अर्थाने जगलो असे म्हणता येईल.

जीवन ही एक कविता आहे. ज्याचा कवी परमेश्वर आहे, त्याने आपल्या वाट्याला चार ओळी सुखाच्या तर चार ओळी दु:खाच्या लिहिल्या आहेत. माणूस परमेश्वराच्या या देणगीचा गैरवापर करतो. स्वत:ला व्यसनाच्या आधीन करून तो स्वत:च मृत्यूला आमंत्रण देतो. दु:खाला सामोरे जाण्याऐवजी आत्महत्येचा मार्ग अवलंबतो. त्यांना जीवनाचा खरा अर्थ कळलेलाच नसतो. त्यांना जीवन जगतात कसे, त्याचा लाभ घेतात कसे, हेच मुळी ठाऊक नसते. जीवनाच्या कवितेचा अंत असा दु:खमयी करून घेण्यास ते स्वत:च कारणीभूत ठरतात.

त्याच्याविरुद्ध काही माणसे परिस्थितीनुसार जीवनाला नवे रूप देऊन एक महान व्यक्ती म्हणून अमर होतात, तेच खरे जीवन जगले असे म्हणता येईल. त्यांना मिळालेल्या परमेश्वराच्या देणगीचा ते योग्य वापर करतात. स्वत: हसतात. दुसऱ्यांनाही हसवतात. ते स्वत:ची दु:खे लपवून दुसऱ्यांची दु:खे स्वीकारतात, त्यांच्या दु:खात वाटेकरी बनतात व स्वत:चे सुख दुसऱ्यांना वाटतात.

माणसाने माणसाला ओळखण्यास शिकले पाहिजे. सतत हसत आनंदानं जगणाऱ्या माणसाला ही असली दु:खे कुरतडत असतात व चेहऱ्यानं निस्तेज व बावळट दिसणारा माणूसही अतिशय सुखी असू शकतो. जीवन ही काही जणांना आनंदी तर काहींना कंटाळवाणी गोष्ट वाटते. ते त्यांच्या स्वत:च्या जगण्यावर अवलंबून असते.

जर जीवनात काही मानसिक शांतीचे, समाधानाचे क्षण वाट्याला आले तर त्याबद्दल कृतज्ञता बाळगावी, माणसांच्या भावनांची मर्यादा आजमावणं कठीण असलं तरी माणसाच्या भावनांची कदर करण्यास शिकले पाहिजे, दुसऱ्यांना सुखाने जगू द्या व स्वतःही आनंदाने जगा. जीवन ही एकदाच मिळणारी व अत्यंत सुखदायी देणगी आहे, त्याचा पुरेपूर फायदा घ्या.

■ ■ ■

## खंत

माळताना मनातल्या मनात तुला,
        एक मौल्यवान नाते गुंतले गेले,
ते जपता जपता तुझ्यासमोर 'मी'
        साकारायचीच राहून गेले.
सुधारताना चूक तुझी, चुका मी
        तुझ्याकरता करतच राहिले,
त्यांचे निवारण करता करता खरे उत्तर
        मिळवायचेच राहून गेले.
गुंफताना तुझ्याशी हे नवीन नाते,
        आपलेच परके व्हायला लागले,
त्यांना समजावता समजावता तुझ्याशी खूणगाठ
        बांधायचीच राहून गेली.
करताना मैत्री तुझ्याशी, अनेकांच्या मनात
        संशयाचा कल्लोळ माजला,
आणि अनेक 'पणां'न दूर लोटता लोटता
        तुझाच दुरावा सहन करावा लागला.

**शिबानी एन. मिटकर**
द्वितीय वर्ष, वाणिज्य

## क्रिकेट ! क्रिकेट !

**( क्रिकेटमधील खेळाडूंवर काही विनोद )**

- हमखास झेल सोडणारा एक क्षेत्ररक्षक सामन्याला नेहेमी उशीरा यायचा. का ? कारण त्याला बस कधी वेळेवर पकडता यायची नाही.
- एक भारतीय खेळाडूला प्रत्येक बॉल खेळल्यानंतर बॅटच्या बुडाने पिच ठोकण्याची सवय होती. सामन्याचा पंच बऱ्याच वेळापासून त्याच्याकडे रागाने पहात होता. शेवटी तो म्हणाला, "तुम्ही सारखं सारखं पिच ठोकू नका हो." खेळाडू म्हणाला, "का ?" पंच म्हणाला, "जमिनीखालील खाणीत काम करणाऱ्या कामगारांना त्यांनाच काही संदेश मिळतो आहे असे वाटते व दहा वेळा वर विचारायला येतात ते !"
- एक गोलंदाज स्वतःला जगातील एक महान गोलंदाज समजतो. एका सामन्यात त्याला एका षटकात सहा षटकार मारले जातात. त्याला त्याबद्दल विचारले असता तो म्हणतो, "मी तरी काय करू, मैदानच छोटे आहे. आणि जर प्रेक्षकांमध्ये खेळाडू ठेवले असते तर हमखास सहाही झेल घेतले गेले असते.
- एका क्रिकेट-वेड्याला विचारले की, "तुझी बायको व सुनील गावस्कर पाण्यात बुडताहेत हे बघून तू दोघांपैकी कोणाला वाचवशील ?"
- तो म्हणतो, "माझी बायको व सुनिल गावस्कर ? शक्यच नाही, माझ्या बायकोला बॅटच धरता येत नाही. सलामीला ती उतरणारच नाही"

**संतोष घाटे**
प्रथम वर्ष, शास्त्र

# श्री

**भूषण संचेती**
द्वितीय वर्ष, शास्त्र

त्यावेळी माझे वय १७ वर्षे होते. नुकताच तारुण्यात प्रवेश केला. सगळीकडे चैतन्य जाणवू लागले. अनेक आकर्षणे समोर आली. कसे वागावे कळे ना ! द्विधा मन:स्थितीत गुरुजीकडे गेलो. त्यांनी प्रेमाने पाठीवरून हात फिरविला बरे वाटले. माझा प्रश्न त्यांना कळला. त्यांनी अत्यंत सोप्या वाटणाऱ्या गोष्टी आचरणातं आणण्यास सांगितल्या. त्यांपैकी काही तुम्हाला सांगाव्या असे वाटले म्हणून हा अट्टहास. जरी ह्या गोष्टी सोप्या वाटल्या तरी आचरणात आणणे अवघड आहेत.

- मनावर ताबा ठेवणे, संयमी होणे, वेळेचे भान ठेवणे.
- आपण कोणती गोष्ट करत आहोत ? ती कितपत बरोबर आहे ? हे ती गोष्ट करण्याअगोदर विचार करावा.
- कुठलीही गोष्ट करताना मोठ्यांचा सल्ला अवश्य घ्यावा. त्यातला चांगला सोयिस्कर मार्ग निवडावा.
- शक्य तोवर खरे बोलावे.
- चंदन उगळावे, कोळसा उगळीत बसू नये. म्हणजेच भूतकाळातील चांगल्याच गोष्टी आठवाव्यात.
- जे काही करायेच ते स्वकर्तृत्वावर.
- सहसा वचन देऊ नये. दिल्यास ते पूर्ण करावे.
- श्रीमंत होण्याची महत्त्वाकांक्षा ठेवावी. पण श्रीमंत होण्याकरिता घाई करू नये व वाईट मार्ग अवलंबू नये.
- कर्ज काढण्याचे टाळावे आणि कर्ज फेडण्याचा मार्ग मिळाल्याशिवाय कर्ज काढू नये.
- आपले आचरण इतके स्वच्छ असावे की आपल्या निंदकांवर लोकांचा विश्वास बसू नये.
- कुठल्याही व्यसनापासून दूर रहा.
- आपल्या आईवडिलांना विसरू नका.
- दिवसातून एकदा तरी नाम-स्मरण कर.

■ ■ ■

# खेळ ..?

तू मानले होतेस चक्क मलाच खेळ ..?
चालला होता मनमुराद 'टाइमपास' तुझा,
पण या खेळण्याला मन आहे,
हे मात्र तू पूर्ण विसरला होतास.

तुझे खेळणे, माझे भरकटणे. . .
कधी कोणाच्या भावनांशी असं खेळायचं नसतं !

नसेल कळलं कदाचित तुला,
पण खेळात कधी भावना,
जपायच्या नसतात ना ?
हे मलाही उमजलंच नाही !

**शिबानी एन. मिटकर**
द्वितीय वर्ष, वाणिज्य

# कयाकिंग

**कु. अनुप्रिता कृ. मगर**
**अकरावी, शास्त्र**

मानवाला छोट्या होडीतून प्रवास करण्याची अनादिकालापासून आवड आहे. कयाकिंग म्हणजे छोट्या लांबट निमुळत्या नावेतून वल्हे मारीत पाण्यातून जाणे. हा प्रकार प्रथम टुंड्रा शीतप्रदेशातून सुरू झाला. कयाक म्हणजे छोटी निमुळती होडी. तेथील रहिवासी उन्हाळ्यात अशा छोट्या बोटीत बसून पाण्यातून प्रवास करित असत. रेनडिअर प्राण्याच्या कातड्यापासून ही होडी बनविली जाई व त्याच्या आतड्याच्या दोराने शिवत असत. हाडाची वल्ही बनवीत. सध्याच्या यांत्रिक युगात खेळाचा एक प्रकार म्हणून युरोप-अमेरिकेत याचा प्रसार झाला आहे. प्रथम लाकडी व पुढे प्लॅस्टिकच्या कयाक तयार होऊ लागल्या. ॲल्युमिनियमची व प्लॅस्टिकची वल्ही वजनाने हलकी असल्यामुळे ती वापरली जाऊ लागली. हळूहळू ह्या खेळाचा प्रसार व लोकप्रियता वाढू लागली व ह्याचा प्रादेशिक व राष्ट्रीय क्रीडास्पर्धांमध्ये समावेश होऊन त्यांस अधिकृत मान्यता मिळाली.

कयाकिंगमध्ये तीन प्रकार आहेत. एक, दोन किंवा चार खेळाडूंनी या निमुळत्या लांबट नावेत, सीटवर बसून आलटून पालटून दोन्ही बाजूस वल्ही मारत पुढे जायचे. म्हणजे अनुक्रमे कयाकिंग-१, कयाकिंग-२ व कयाकिंग-४. पुढचा खेळाडू पायाने कयाकच्या दोन्ही बाजूने पाठीमागे तारेने जोडलेल्या सुकाणूंमार्फत दिशानियंत्रण करतो. स्पर्धेचे नेतृत्व पुढचा खेळाडू करतो व मागचे त्यास साथ देत असतात. कयाकिंग क्रीडा-प्रकारात समतोलपणा व सर्वांनी एकाच वेळी वेगाने वल्ही मारत योग्य दिशेने पाणी कापत जाणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. खेळाडूंजवळ कौशल्य, चपळता, शारीरिक ताकद व खूप सराव हवा. स्पर्धेची सुरुवात महत्त्वाची आहे. मनाचे केंद्रीकरण व वेगाचे सातत्य टिकायला हवे. स्पर्धेत वेळ संगणकावर दाखविली जात असल्यामुळे शतांश-सेकंदात मोजली जाते. नदीत अथवा सरोवरात ठराविक अंतराच्या स्पर्धेत सुरुवातीस व शेवटी दोन्ही बाजूस स्तंभांना आडव्या सरळ रेषेत तरंगणाऱ्या प्लॅस्टिक फुग्यांनी जोडलेले असते. स्पर्धेची सुरुवात व शेवट खेळाडूंच्या मनावर ताण वाढविणारा असतो. स्पर्धेची अचूक सुरुवात व आघाडी मानसिक धैर्य वाढवीत जाते. शेवटी पुढे कोण आहे हे निश्चित ठरविता येत नाही, म्हणून प्रतिस्पर्ध्याकडे लक्ष दिल्यास मन विचलित होऊन वेग, समतोलपणा व सातत्यावर परिणाम होतो.

ध्यानीमनी नसता केवळ योगायोगाने मला ह्या खेळात भाग घेण्याची संधी मिळाली. दि. १६ ते २५ जाने. १९९४ मध्ये पुण्यात झालेल्या राष्ट्रीय क्रीडास्पर्धांमध्ये महाराष्ट्र असोसिएशन ऑफ कयाकिंग व कनोईंग, पुणे यांनी महाराष्ट्र राज्यातर्फे एक वर्ष अगोदर खेळाडूंचा शोध सुरू केला. माझे नाव त्यातल्या एका खेळाडूने सुचविले. मला सहा महिने प्रशिक्षण देण्यात आले व कसून चाचणी घेतल्यावर माझी निवड करण्यात आली. पुणे इंजिनिअरिंग कॉलेजच्या बोटक्लबवर आम्हाला सैन्यातील एका तरबेज लेफ्टनंटतर्फे प्रशिक्षण देण्यात आले. के-४ (K-4) प्रकारात आम्हा चौघींचा महाराष्ट्रातर्फे दि. २१ व २२ जाने. रोजी मुळा-मुठा नदीत पुना बोट क्लबवर ५०० मीटर अंतराच्या

स्पर्धा झाल्या. केरळ व अंदमान संघामध्ये राष्ट्रीय खेळाडू असल्यामुळे पहिल्या दोन पदकाची आम्हाला आशा नव्हती. महाराष्ट्र व आंध्र प्रदेशात ब्रॉंझपदकासाठी चुरस होऊन आम्हाला ०.१ सेकंदाने ब्रॉंझपदक मिळाले. आमचे प्रशिक्षक, महाराष्ट्र कयाकिंग अयोसिएशनचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत शिरोळे, आमचे आईवडील यांना खूप आनंद झाला. आमचे सर्वांनी खूप कौतुक केले. मी माझ्या मॉडर्न (कॉलेज) महाविद्यालयाचे नाव व परंपरा राखली याबद्दल मला अत्यंत अभिमान वाटतो. माझ्या महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल करण्यास व माझ्या आईवडिलांचे व माझ्या देशाचे नाव उज्ज्वल करण्यास मला शक्ती मिळो हीच माझी ईश्वरचरणी प्रार्थना !!!

■ ■ ■

## चुटके

पती : काय ग, शेजारी नवीन आलेलं बिऱ्हाड कसं आहे ?

पत्नी : अगदी लक्ष्मी - नारायणाचा जोडा !

पती : अग मग ही रोजची आदळआपट त्यांच्या घरी कशी ?

पत्नी : नवरा आहे दरिद्रीनारायण व बायको आहे कडकलक्ष्मी.

* * *

वकील : लग्न झालं आहे का आपलं ?"

साक्षीदार : हो झालंय.

वकील : कोणाशी झालं ?

साक्षीदार : एका स्त्रीशी

वकील : मग काय पुरुषाशी होणार होतं ?

साक्षीदार : हो झालंय ! माझ्या बहिणीचं झालंय पुरुषाशी !

**अर्चना पोलकमवार,**
द्वितीय वर्ष, कला

## शोक

शोक करता करता
आटले डोळ्यातील अश्रू
मावळले कायमचेच आसू
ओठावरचे रम्य हसू

डोळ्यांमधील आसू
कुणी नाही पुसले
मनातले दुःखच
अश्रूंरूपे ओघळले

पसरला डोळ्यांपुढे
काळोख काळा - मिट्ट
शोक करता करता
मनच झाले घट्ट

दुःख माझ्या मनातले
मनातच गिळतो मी
स्वतःच्याच घरात माझ्या
आज आश्रित मी !

**श्रीप्रसाद प्रभाकर कुलकर्णी**
एस्. वाय. बी. कॉम. 'सी'

# गिर्यारोहण : एक अनुभव

प्रा. विलास आल्हाट
भूगोल विभाग

वार गुरुवार. पदभ्रमण मंडळाची बैठकीची तयारी दुपारी ४ वाजता करण्यात आली. विद्यापीठाकडून गिर्यारोहणासाठी योजना आखण्यासंबंधी पत्रक आले होते. आजपर्यंत अशी संधी मिळाली नव्हती. पण मनाची खंत संपुष्टात आली होती. जिल्हास्तरीय गिर्यारोहणाचे आयोजन करण्याचा मान मॉडर्न महाविद्यालयाला मिळाल्याने, पदभ्रमण मंडळाच्या प्रत्येक सभादाला एक प्रकारचा उत्साह वाटत होता. सर्वांनुमते गिर्यारोहणाचा मार्ग ठरविण्यात आला होता. सोबत आणावयाच्या यादीसह ट्रेकिंगचा मार्ग नकाशावर तयार झाला. ३ डिसेंबर ११च्या केळसी गाडीनं वरंधा घाटातील थांब्यावर उतरावयाचे होते. पुणे जिल्ह्यातील ४३ विद्यार्थी व पाच शिक्षक - शिक्षिकांसह तांडा निघाला. ११ वा. व १२ वा. अशा दोन एस्. टी. बसेसमध्ये बसून दोन्ही तुकड्या वरंधा घाटातील वाघजाई मंदिराच्या बस-थांब्यावर उतरणार होत्या. पहिल्या तुकडीचा प्रवास घाटाच्या २५-३० कि मी. अलीकडेच गाडी बंद पडल्यामुळे थांबला होता. तेवढ्यात आमची गाडी त्यांच्यापर्यंत पोहोचली. त्यांनाही आमच्या गाडीत सामावून घेतले. आणि प्रवास, 'गोब्राह्मण प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज' यांच्या जयघोषात सुरू झाला.

वरंधा घाटातील वनराई डिसेंबर महिन्यातही खुलून दिसत होती. घाटाच्या देखण्या वळणामधून कावळ्या किल्ल्याचाही काही भाग दिसत होता. आपापले गिर्यारोहणाचे साहित्य खाली उतरवून रस्त्याच्या कडेला वाघजाईच्या साक्षीने सर्वांनी जेवणं केली. थोड्याच वेळात ट्रेकिंगला सुरुवात होणार होती. वाघजाईच्या थोडंसं पुढे चालून आल्यावर कावळ्या किल्ल्याच्या पाऊलवाटेसंबंधी माहिती सांगण्यात आली. गट पाडण्यात आले. कोणता गट पुढे व मागे याचे आयोजन करण्यात आले व आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. नियम सांगण्यात आले. मात्र सगळ्यात महत्त्वाचा "वॉच आऊट कॉल" नियम सगळ्यांच्या लक्षात राहिला होता. निखळता दगड अथवा अन्य संकटात वॉच आऊट कॉलवरून मदत मागविणे अथवा दुसऱ्याला वाचविण्यासाठी हा कॉल आहे हे जणू चांगल्याच परिचयाचे झाले होते. सतरा ते अठरा इंचाच्या रंगीबेरंगी मण्यांची माळ जणू कावळ्या किल्ल्याने आपल्या हिरव्या मखमली मुरमाड पाऊलवाटेवर चढवली आहे असे पाठीमागून दिसत होते. नुकत्याच झालेल्या पावसामुळे मुरमाड पाऊल-वाटेवर लहान लहान खड्यांची अंथरणं झाली होती.

आपापला तोल सावरत सर्व विद्यार्थीमंडळी कावळा किल्ल्याच्या माथ्यावर पोहोचली. माथ्यावरून राजगड, लिंगाणा, रायगड, तोरणा, सिंहगड अशा पाच किल्ल्यांना जाणाऱ्या चोरवाटा व त्यावर लक्ष ठेवणारा हा कावळा किल्ला याचा रुबाब काही औरच होता. कावळा किल्ला तसा जुनाट वाटांवर लक्ष ठेवून, वर्षानुवर्षं मावळ्यांना स्वातंत्र्याची प्रेरणा देत होता. येथून दक्षिणेकडे पाहिल्यावर शिवथरघळ आपल्या पावित्र्याची पावती घेऊन जणू उभी असल्याचा भास होतो. तिच्याकडे पाहत पाहत तिच्या रोखाने कावळ्याला अभिवादन करून किल्ला उतरण्याचे

ठरविले. उत्तरेकडील घळईने उतरून नैऋतेला असलेल्या शिवथरघळईत मुक्काम करायला जायचे होते. सर्वांच्या परिसरातील या कालावधीमधील पहिलाच अनुभव. किर्रर दाट झाडीमधून, दगडगोट्यांमधून ही वाट अंबे शिवथर - कुंभे शिवथर गावाच्या पूर्वेला निघाली. सायं. ६ वाजून गेल्याने अंधाराची चिन्हे दिसू लागली होती. सर्वांना भराभर चालण्याचे वटहुकुम काढण्यात आले. आता लहानमोठ्या वस्त्यांमधून शिवथर घळईत पोहोचण्यासाठी फक्त अर्धा तास चालायचे होते. पण तेही जीवावर आले होते. तरी आमचा वाटाड्या सर्वांना फक्त पाच मिनिटांच्या अंतरावर आपला मुक्काम राहिला असल्याचे सांगता सांगता एक तासाचा प्रवास पूर्ण झाला होता. त्यामुळे त्याच्यावरील विश्वास उडण्याची चिन्हे दिसताच समोर शिवथरघळीच्या पाण्याचा अवखळ आवाज आमच्या स्वागतासाठी आतूर झाला आहे असे वाटत होते. अंधारात ठेचकाळत भीत भीत चालणाऱ्यांना स्वामींच्या मठाच्या अठरा पायऱ्या मोठ्या डोंगराप्रमाणे वाटत होत्या.

सगळ्यांनी आलेला शीणवठा दूर केला. हातापायाला पाणी लावून स्वामींच्या दर्शनासाठी सज्ज झाले. आता थोड्याच वेळात आरती होणार होती. माझी ही पहिलीच वेळ गिरीभ्रमणामधील मुक्कामाची. त्यामुळे प्रत्येक गोष्ट निरीक्षणातून मनात ठसत होती. आरती संपल्यानंतर जेवणासंबंधी सूचना देण्यात आल्या. रात्रीचे आठ वाजले होते. पाण्याचा धबधबा काळ्या खडकांवरून अविरत तुषार उडवीत जणू काही निसर्ग-संगीतच ऐकवीत होता. अशा वातावरणात जेवण, गप्पागोष्टी, दिवसभरातील अनुभव ! पराकोटीच्या आनंदाचा साठा प्रत्येकाच्या मनात सुखद घर करून होता. रात्री १०-३० वाजता निसर्ग-संगीतात सर्वजण झोपी गेले. झोपण्याअगोदरच सकाळी चहा करणाऱ्या गटाला ताकीद करण्यात आली होती की ५ वाजता चहा तयार पाहिजे व सर्वांनी ६ वाजता येथून निघायचे. हे ऐकल्यावर सर्वांना जणू लगेचच झोपा लागल्या होत्या. उद्याच्या उत्साहासाठी आराम आवश्यक होता.

पहाटे पाचला गार वाऱ्यामुळे आपोआपच जाग आली. निसर्गानेच आम्हाला उठवले. सगळे उरकून रात्रीचा उरलेला रस्सा, भाजी, भात यांचा गरमागरम उकल्ड खात, चहा पीत, नाष्टा झाला असे समजून गिर्यारोहणाला ६-३० सुरुवात केली. काहींचे मनोधैर्य खचल्यामुळे एक शिक्षिका व दोन विद्यार्थिनी घरच्या मार्गस्थ होणार होत्या. सातची शिवथरघळ ते पुणे या गाडीने ते जाणार होते. सॅक पाठीवर बांधत जणू खुट्याच्या वाटेला प्रत्येकजण साद घालत होता. उगवत्या सूर्याच्या साक्षीने स्वामींच्या मठाचे दर्शन घेऊन शिवथर घळईला सार्वजनिक अलविदा केला.

चंद्रराव मोऱ्यांचा वाडा येथून ३ कि. मी. अंतरावरच्या पठारावर होता. मोठी पडझड झालेला, मोठे वृक्ष वाढलेला, डोक्याइतक्या गवतातून मार्ग काढीत, तुऱ्यातून या भयाण वाड्याचं कधीकाळी वैभव ओसांडून जात असेल नाही ? एकमेकाला विचारीत असतानाच वाटाड्याने येथून खुट्याची वाट असल्याचे दर्शविले. ती फक्त त्यालाच दिसत होती. पुन्हा सर्वांची गटवार विभागणी. प्रत्येक गटाचा एक अनुभवी वाटाड्या. गिर्यारोहक ठराविक अंतराने चालणाच्या इराद्याने खुट्याच्या वाटेला निघाले. चढतानाच आदेश देण्यात आला, 'ओव्हरटेक करू नका. दमलेल्यांना आधार द्या. पाणी जास्त पिऊ नका. आवश्यकता असल्यास तातडीने मदत मागा' वगैरे. पुढच्या भयानक चढीचे आगमन असल्याची चाहूल प्रत्येकाच्या कणखर मनाला मिठी मारून बसली होती. अक्षरशः उभ्या कातळ खडकावरून सर्वजण सुखरूप ३६०० फूट उंचीच्या पटारावर पोहोचलो. वरून आलेल्या वाटेकडे पाहिले तर प्रत्येकजण आश्चर्य करत होता. ९-३० वाजता या पठारावरून पुन्हा गडाची माहिती, भूगोलविषयक निसर्गाविष्कार जाणून घेतल्यानंतर, पुन्हा चालायला सुरुवात केली. मध्येच कोरळाईच्या रस्त्यावर झऱ्याचे पाणी पाहून सोबत आणलेल्या कोरड्या नाष्ट्यावर तुटून पडलो. सर्वांनी आवश्यक त्या पाण्याच्या साठ्यासह

पुन्हा चालायला सुरुवात केली. येथून आम्हाला दक्षिणेस असणाऱ्या धानोली गावातून दक्षिणेला रायरेश्वराच्या पुढील गावी संध्याकाळपर्यंत जायचे होते. ओढ्याच्या कडेकडेनं, कड्या-कोपऱ्यांतून, दगड-मुरुमातून, लाल मातीतल्या कणांवर पडणाऱ्या घामाच्या थेंबांतून आपल्या संस्कृतीची, विचारांची ओळख करून घेण्याची जिद्द प्रत्येकाची दिसत होती. शिणलेलं शरीर धानोलीची डांबरी सडक पाहिल्यावर पुन्हा आश्चर्यचकित झाले. धानोलीचा बाजार होता. महाडहून मोठ्या प्रमाणात खाऱ्या माशांची आवक होते. बाजारात जवळपासच्या १२ ते १३ मैलांवरून आदिवासी आले होते. बाजारात आठवड्याचा भरभक्कम बाजार घेऊन जाणारी म्हातारी; कोतारी, कातक परंतु मायाळू, जगण्याचे कुतूहल वाटणारे, प्रत्येक क्षणी आव्हान पेलणारी माणसे एकत्रित दिसत होती. तांदळाची दारू येथील लोकांचे आठवड्याचे जणू पेट्रोलच. जशी प्रत्येक गाडी पंपावर थांबून ऐटीत पेट्रोल भरून सुट्ट्या पैशासाठी भांडत भांडत आठवड्याच्या बाजाराला नवीनच वेगळीच लाली भरत होती. काळी नदीच्या काठी गावाच्या वरच्या बाजूला पुन्हा नदीकाठी जेवणाच्या पंगती बसल्या. जेवण आटोपून १२ ते १५ कि मी.चालायचे सगळ्यांच्या जिवावर आले होते. पण रायरेश्वराचे दर्शनासाठी आतुरलेली मनं पुन्हा चालण्याच्या आदेशाला दुजोरा देत चालू लागली. आता मात्र गाण्याच्या भेंड्या, चुटकुले, गप्पा, नकला, विनोद हे सर्व. चालता चालता कोणाला समजलं सुद्धा नाही की, आपण वाट चुकलो. बरेच पुढे चालून आलो होतो. प्रत्येकाकडे लिंबे होती. प्रत्येक गटातील निम्म्या लिंबाचा रस नियमाप्रमाणे करण्याचे ठरले. तोपर्यंत वाटाडे काही गुराख्यांना व मेंढपाळांना वाट विचारून येणार होते. टरल्याप्रमाणे नदीकाठच्या शेतामध्ये प्रत्येकाच्या पाठीवरील सॅक मानेखाली आली. काही जण पहुडले म्हणजे समजले ना? दमून पडले होते. जे काही वेळाने दमणार होते. त्यांनी रस केला व नंतर ते दमले होते. असे प्रत्येक गटात दमणाऱ्यांची संख्य जसजशी संध्याकाळ होईल तसतशी वाढत गेली. पण लिंबूपाणी, साखर, ग्लुकोज वगैरे शक्तीवर्धक समजून आता बरं वाटतंय असा निर्वाळा दिला. तेवढ्यात वाटाडे वाट शोधून त्यांनी प्लॅन शिक्षकासमोर ठेवला. सर्वांनी त्यावर विचार करून प्रत्येकास सज्ज राहण्याचा इशारा देण्यात आला. इथून १ कि मी. अंतरावर एका टेकडीच्या पठारावर जंगलातील एका शेताच्या तुकड्यावर, आज रात्र काढावयाची ठरली. कोणीच असे जंगलातील सर्वात उंचीवरच्या टेकडीवर दमलेल्या, थकलेल्या पायपुटी शरीराला घेऊन, काहूराच्या मनानं थंडीत काकडत झोपले नसतील. पण निर्णय घेण्यात आला. प्रत्येक गटाने आपापला स्वयंपाक करावयाचा. संध्याकाळी ५ वाजण्याचा सुमार. एक तास वीस मिनिटाने अंधार पडणार, याच्या भीतीने प्रत्येकाने उजेडताच स्वयंपाक करण्याचे ठरविले. दमलेले शरीर पण लहानमोठी लाकडं आणली. रॉकेल ओतून तीन दगडांच्या चुली पेटल्या. काहींच्या दोन चुली, स्वयंपाक लवकरात लवकर व्हावा यासाठी. काहींनी जमीन साफ करून अंथरुणासाठी शेज पसरली होती. कोणाचा रस्सा, वरण, कोणाचा साधा तर कोणाचा मसालेभात यांच्या खमंगदार फोडणीच्या वासाने मुटेश्वराच्या परिसराला नवचैतन्य आले होते. थोड्याच वेळात भांड्यांचा आवाज ऐकू येऊ लागला होता. प्रत्येक गट-प्रमुखाजवळ बॅटरी व हातात उलथणे किंवा चमचा दिसत होता. शिजलं का नाही याबद्दल विचारणा केली जात होती. ती काकुळतीनं की अधिकारानं हे समजत नव्हते. बॅटरीचे महत्त्व जेवण करणाऱ्यांना अधिक जाणवले. पण बिछान्यावर पडून स्वयंपाकातील सूचना करणाऱ्यांनी काही प्रमाणात मौन स्वीकारले होते. कारण चांदण्या दिसू लागल्या होत्या. चकचक आवाजही येऊ लागला होता. रात्र सुरू झाल्याची चिन्हे स्वयंपाक करणाऱ्यांना अधिक जाणवत होती. अधून मधून स्वयंपाकाकडे फेरी मारत शेवटी जेवणाची चव घेण्याची वेळ आली. पंगती गटानुसार

पडल्या. एका गटाचा पदार्थ चव शोधणाऱ्या गटाकडे देण्यात आला. संशोधनानंतर मंचरकरांचे बेसन, बारामतीकरांचा मसालेभात, पुणेकरांचा वरणभात तर आमच्या जेवणात पापड, चटणी, मसाला, रस्सा, तर्रीसह वर कांदा, लिंबू अगदी साग्रसंगीत. इमरजन्सी ट्यूबलाइटमध्ये जेवण जेवून झोपण्यासाठी इमरजन्सी घोषित केली. काही वेळातच झोपण्याच्या तयारीत चोहोबाजूंनी डोंगरमाथ्यामध्येच टेकडीवरचा पठारीभाग, काळोखाची रात्र, समोरच्या टेकडीवर एक दिवा मिणमिणत्या सारखा वाटत होता. एक विमान डोक्यावरून लाल, हिरवी लाइट दाखवत दिसेनासे होइपर्यंत पाहण्याचे मनोधैर्य कोणाचेच नव्हते. कारण कितीही लांब गेले तरी ते म्हणजे ८-९ मिनिटे पाहावे लागेल. म्हणून तारांगणात झोपून ही सृष्टी देखील्यासारखे झाले. सकाळचे नियोजन झाले. किडलेली लाकडे, स्वयंपाक करून उरलेली लाकडे एकत्रित करून मोठा शेक मध्यभागी केला. कारण श्वापदांपासून वाचणाच्या इराद्याने, बचाव करण्यासाठी वगळीत मोठा शेक मोठे क्षेत्ररक्षण करत होता. त्या जाळाच्या कडेने सर्वजण झोपले.

भल्या पहाटे कोंबडं आरवण्याअगोदर गार वाऱ्यामुळे जाग आली. सर्वांना उठविले. जागे केले. त्या निसर्गात रायरेश्वर पाहायचा होता. 'उठ, आवर ! सरळ नीघ माझ्याबरोबर' असे रायरेश्वराचे पठार जणू प्रत्येकाच्या लहान मेंदूला आदेश करण्यासाठी उत्सुक होते. एका महान राजाने स्वातंत्र्याच्या प्रेरणेने स्वराज्याची शपथ ज्या पिंडीभोवती घेतली, त्या पिंडीला स्पर्श करण्यासाठी प्रत्येकाच्या मनातील मनोबळ वाढले होते. सकाळी ६-३० ला महादेवाच्या रागांची सुरुवात करून देणारा, सह्याद्रीला साद घालीत भूपाळी म्हणत सर्वांनी पठार चढणीला सुरुवात केली. पायाला चमक भरली तरी शिवरायांच्या प्रेरणेने रायरेश्वरापर्यंत सहज पोहोचलो. पाठीमागे राहिलेल्यांची वाट पाहाण्यासाठी थांबायचे ठरले. थांबून फक्त बसण्यापेक्षा येथील समाजसेवी मंडळाकडून एक मोठं पातेलं आणलं. सातआठ जणांनी कांदा चिरला. प्रत्येकाने सॅकमधून मिरच्या, हळद वगैरे बाहेर काढले. आणि १५-२० मिनिटात ५० जणांचे पोहे तयार झाले होते. प्रत्येक जण हवे तेवढे पोहे हाणत होता. कारण भूकच तेवढी लागली होती. चालणं जास्त झालं होतं. पोह्यानंतर येथील शिवाजी महाराजांनी स्वहस्ते गोमुख बसविलेल्या झऱ्याचे पाणी पिऊन तसेच पुढे रायरेश्वराची ओळख करून देण्यात आली. रायरेश्वरावर असलेल्या मंदिराचे सर्वधर्मसमभावाचे स्वरूप दिसलं. आकार चर्चसारखा, मनोरे दर्ग्याप्रमाणे, तर मंदिराचा कळसही, उतरत्या छपरामुळे एखादे घर असावे असे लांबून जाणवले जवळच रायरेश्वराचे तळे होते. त्यावर जांभळ्या रानकमळांची पसरण झाली होती. वाटेत पिवळी, गुलाबी, निळी रानकमळे पाहिली. पण ह्यांचा फक्त निळा स्वच्छ, निरागस, प्रामाणिक, निःस्वार्थी स्वातंत्र्यवीराची आठवण करून देणारं निळं आकाशाच जणू थिटं पडलं ते स्वराज्यवीरापुढे मान झुकवून.

शिवरायांच्या जयजयकारात पुणे विद्यापीठाच्या गिर्यारोहकांनी केंजळगडाकडे २-३० ला कूच केले. येथून पूर्वेला केंजळच्या १० कि मी. वर दऱ्याखोऱ्यांनी, दगडकातळांनी सजलेला हा रानमाळ जणू निधड्या छातीच्या माणसांच्या घोड्याच्या टापांखाली येणाऱ्या शत्रूचा नायनाट करणाऱ्या भवानी मातेच्या आशीर्वादानें प्रेरित झालेल्या ह्या परिसराला अभिवादन-वंदन करून, सुळक्याकडे लक्ष जाते न जाते तोच प्रचंड स्वरूपात पाऊस सुरू झाला. पाऊस अपेक्षाविना आल्याने उष्णता-रोधक सगळे भिजत भिजत केंजळगडकडून पायथ्याच्या कालिमातेच्या मंदिरात विसाव्यासाठी आले. गेल्या तासाभरात पावसानं थैमान घालून घसरण केली होती. एकसुद्धा गिर्यारोहक घसरायचा उरला नाही. घसर-रोहकाप्रमाणे टिटेघरच्या पश्चिमेला उतरणाऱ्या स्परने घसरत घसरत गावात आलो. पाऊस कमी झाला होता.

चारची गाडी थोडक्यात चुकली. त्यामुळे पायथ्याच्या गाडीसाठी पुन्हा कमीत कमी १० कि मी. चालायचे म्हणजे १० बॉलमध्ये ३७ रन करण्याची पाळी प्रत्येकावर येऊन ठेपली. प्रत्येकाने जायचे ठरवले.

बरोबर ५ वाजताच्या गाडीला प्रत्येकजण धावत पळत गिरणीच्या थांब्यापर्यंत पोहोचला व काही वेळात एस्. टी. दिसली. आम्ही चिंब भिजलेले सर्वजण ताजेतवाने झाले. उसनं का होईना अवसान आणून प्रत्येकजण एस. टी.त बसला.

अशा अविस्मरणीय गिर्यारोहणाचे आयोजन केले होते प्राध्यापक आनंद पाध्ये, प्रा. विलास आल्हाट, प्रा. चिटणीस काका ऊर्फ श्री. काळे व सौ. मगंला साळुंखे त्याचप्रमाणे ह्या सर्वांचे विद्यापीठाच्या वतीने नेतृत्व केले होते प्रा. आंगरे यांनी. अशा प्रकारे अनेक ट्रेक आपल्या महाविद्यालयातील पदभ्रमण मंडळ आयोजित करते. आपलाही सहभाग येत्या ट्रेकला हवा आहे.

जय महाराष्ट्र वीरा.

## माझे प्रेम

तुजवरी मी असीम प्रेम केले
तुजसाठी दाही दिशा भ्रमण केले
तुला मात्र कशाचीच तमा नव्हती
माझ्या प्रेमाची जाणीव नव्हती.
प्रेमाची अनेकदा तुला मागणी घातली
तू मात्र नाही माझी कदर केलीस
जीवनी माझ्या उरला एकांतवास
तुजविण मला जणू आहे वनवास !

नंदकुमार कांबळे
एम. कॉम. भाग - २

## मिलन

दूर जावे या जगापासून
जावे दूर या मृगजळापासून
जावे अशा शांत ठिकाणी
नसेल जिथे आपल्याशिवाय कोणी

जागा अशी असावी
प्रकाशाची देखील छाया नसावी
तेथे फक्त आपल्याला
मिट्ट काळोखाची साथ असावी

काळोख देखील असा असावा
इमानेइतबारे साथ देणारा
युगानुयुगे आपल्याला
प्रकाशाची जाणीव न करून देणारा

असावे तेथे एकाकीपण
युगायुगांचे
नसावे तेथे बंधन
नात्यागोत्यांचे

त्या जागेतील मिट्ट काळोखात
भेदून जावे कवच सूर्यमंडळाचे
आणि व्हावे मिलन
परमात्म्याशी आत्म्याचे

श्रीप्रसाद प्रभाकर कुलकर्णी
एस्. वाय. बी. कॉम. 'सी'

# राष्ट्रीय सेवा योजना - पुणे जिल्हास्तरीय विशेष हिवाळी शिबीर

**पायस संतोष न.**
द्वितीय वर्ष, विज्ञान

पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व आप्पासाहेब जेधे महाविद्यालय संयोजित जिल्हास्तरीय विशेष हिवाळी शिबीर दि. ८-२-९४ ते १२-२-९४ दरम्यान खडकवासला, पुणे येथे संपन्न झाले. या विशेष हिवाळी शिबिरात पुणे जिल्ह्यातील विविध ५५ महाविद्यालयातील १२५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

शिबिराचे उद्‌घाटन मा. ना. श्री. अभयसिंहराजे भोसले, पालक मंत्री, पुणे जिल्हा यांनी शिवप्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीप प्रज्वलन करून केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान, मा. आ. अशोक मोहोळ यांनी भूषविले तर मा. खा. विदुराजी नवले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शिबिरार्थी विद्यार्थी-विद्यार्थिनींना शैक्षणिक जीवनाबरोबरच सामाजिक कार्याची जाण होणे, तसेच ग्रामीण समस्यांची ओळख व ग्रामीण जीवन अनुभवास मिळावे, हा अशा शिबिरामधील प्रमुख हेतू असतो. 'समाजकार्यातून व्यक्तिमत्त्व विकास' हा राष्ट्रीय सेवा योजनेचा मुख्य उद्देश असून, त्यासाठी विविध मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन आणि त्याचबरोबर समूहजीवन, सर्व सामूहिक कार्य ह्यांची जोड घेऊन विद्यार्थ्यांच्या विचारांना योग्य दिशा व चालना देण्याचा प्रयत्न केला जातो.

खडकवासला येथे पार पडलेल्या हिवाळी शिबिरात विद्यार्थ्यांनी श्रमदान करून बंधाऱ्याची उंची वाढवून त्याची दुरुस्ती, तसेच रस्ता रुंदीकरण व सपाटीकरण, ग्रामसफाई, मंदिराचा परिसर तसेच रस्ते-सफाई, स्मशानभूमीजवळील परिसर सपाटीकरण व प्राथमिक आरोग्य केंद्र खडकवासला येथे परिसर स्वच्छता, सपाटीकरण असे उपक्रम पार पाडले. श्रमदान उपक्रमामध्ये ग्रामस्थांचे सहकार्य व योग्य मार्गदर्शन ही अतिशय महत्त्वाची गोष्ट होती. श्रमदानातून स्वयंस्फूर्तीने ग्रामविकासासाठी प्रयत्न करणे हा संदेश ग्रामस्थांपर्यंत पोहचविण्याचे काम मा. बाबा आढाव , डॉ. मोडक ह्यांनी आपल्या व्याख्यानाद्वारे पार पाडले.

विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या मार्गदर्शनपर व्याख्यानांमध्ये अण्णा हजारे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मा. डॉ. बाबा आढाव, मा. रामनाथ चव्हाण, अध्यक्ष अखिल भारतीय दलित नाट्य संमेलन; मा. विलास चाफेकर, वंचित संघटना पुणे, त्याचबरोबर मा. विश्वनाथ कराड ह्यांची भाषणे झाली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

दि. १२-२-९४ रोजी शिबिराचा समारोप-समारंभ मा. डॉ. बाबा आढाव यांच्या उपस्थितीत व मा. विश्वनाथ कराड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. हे शिबीर यशस्वीरित्या पार पाडण्यात मा. सोनावणे सर, व मा. भोसले सर, कार्यक्रमाधिकारी, जेधे महाविद्यालय यांनी विशेष प्रयत्न केले. त्याबद्दल त्यांचे हार्दिक आभार व अभिनंदन.

विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास व त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी अशा शिबिरांचा उपयोग होतो. समूहजीवनातून राष्ट्रीय एकात्मता आणि वैचारिक एकात्मता ही उद्दिष्टे साध्य होतात. राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक हा 'लोकशाही' संज्ञेचा भावी आयुष्यात देशाच्या उन्नतीसाठी नक्कीच प्रामाणिक प्रयत्न करेल असे मला वाटते !

# भटकंती

**आर. पी. काळे**
(कार्यालय, लेखा विभाग)

गर्द वनराई - हिरवीगार हिरवळ - दवाचे ओलसर थेंब - धुंद करणारा मृदगंध - पहाट पक्ष्यांचे मधुर कूजन - डोंगर कड्यांवरून सर्व सौंदर्य लोटून देत वाहणारे पांढरेशुभ्र जलप्रपात - मोहक आणि रौद्र असे दर्शन एकाच वेळी घडविणारा निसर्ग- इतिहासाच्या खुणा अंगावर वागवत असलेला निसर्ग - किल्ले, गड, कोट, आकाशाचे चुंबन घेऊ पहाणारे कडे - डोंगरमाथा - दुर्गम दुर्ग - खोल दऱ्या.

निसर्गाचा हा ईश्वरी साक्षात्कार भरभरून अनुभवायला हवा. मोकळा प्रभंजन छातीत गच्च भरून घ्यायला हवा. निसर्गाने दिलेल्या तारुण्याचा उपयोग निसर्ग पाहण्यासाठी करायला हवा. आणि यासाठी हवं - पदभ्रमण मंडळ !

१९ व्या शतकात स्थिरावलेला डोंगरयात्रा क्रीडाप्रकार, शास्त्रीय माहिती, नवीन भू-प्रदेशाचा शोध वगैरे संदर्भात मागे पडून आता त्याकडे एक क्रीडा म्हणून पाहिले जाते. यात प्रामुख्याने Hill Walking, Rock Climbing, Snow Climbing यांचा समावेश होतो.

पदभ्रमण किंवा भटकंतीचे स्पष्टीकरण करावयाचे झाले तर ही सहल नव्हे एवढे मात्र नक्की सांगता येईल. या क्रीडा-प्रकारात कष्ट, साहस आणि धाडसाने गडमाथ्यावर पोहोचण्यात अवर्णनीय आनंद असतो. डोंगर-कुशीतील निवासात आनंद असतो. शहरी जीवनात कधीही पाहता येणार नाहीत अशा नानाविध निसर्ग-वैशिष्ट्यांचा उलगडा प्रत्यक्षपणे या ठिकाणी होतो.

या क्रीडाप्रकारात बहुतेक भूगोल, भूगर्भसंबंधी माहिती, त्या संदर्भातले नमुने गोळा करणे. निसर्ग, आकाश, पशू-पक्षी, कीटक, वनस्पती, पाने - फुले , ऐतिहासिक वास्तू, सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास, छायाचित्रीकरण यासारख्या विविध गोष्टींचा समावेश करता येईल. या गोष्टींचा अभ्यास करत असताना मात्र काही नियम आपण निश्चितपणे पाळले पाहिजेत. उदा. पर्यावरणाला धक्का पोहोचेल अशी कोणतीही गोष्ट आपल्या हातून घडणार नाही. सांस्कृतिक, ऐतिहासिक वास्तूंच्या बाबतीत मोडतोड न करता तिचे अधिक चांगल्या रीतीने कसे जतन करता येईल याचाही विचार केला पाहिजे. आपण ह्या ठिकाणास अथवा परिसरास भेट देत आहोत, तो परिसर अस्वच्छ राहाणार नाही याची प्रत्येकाने काळजी घेतली पाहिजे.

पदभ्रमण आणि पर्यावरणाचा अभ्यास करण्यापूर्वी काही गोष्टींची तयारी असणे आवश्यक असते. उदा. ज्या परिसरास आपण भेट देणार आहोत, त्याची भौगोलिकदृष्ट्या माहिती गोळा करणे, उपलब्ध नकाशांचा अभ्यास करणे अथवा मार्गाचा प्रमाणबद्ध नकाशा तयार करणे. भटकंती करणाऱ्या व्यक्तीजवळ शक्यतो आदर, नम्रता, साहस, एखाद्या प्रसंगास धाडसाने सामोरे जाणे, शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त, प्रबळ इच्छाशक्ती, मनाचा खंबीरपणा, जोम, डोंगरदऱ्या व जंगलं फिरण्याची क्षमता, नेतृत्व वगैरे गुण असणे आवश्यक आहे.

गुणवैशिष्ट्यांबरोबरच भौगोलिक परिस्थिती व वातावरण/पर्यावरणास अनुलक्षून सर्व साहित्य, तसेच

कालावधी लक्षात घेऊन त्यानुसार आवश्यक तेवढ्याच गोष्टी सोबत बाळगणे सोयीचे ठरते. त्याशिवाय प्रत्येकाला बी. पी. भोवळ, सर्पदंश वगैरे संदर्भात जीवनरक्षाविषयी शास्त्रीय माहिती असणेही तितकेच आवश्यक आहे. त्या बाबतीत सावधानता व प्रसंगावधान बाळगले पाहिजे. प्रथमोपचाराची माहिती व साहित्य ग्रुप बरोबर बाळगले पाहिजे. सोबत छोटा दोर व दोरांच्या गाठी देखील ज्ञात असणे फायद्याचे ठरते.

वरील विषयांसंदर्भात बऱ्यापैकी शास्त्रीय माहिती विविध पुस्तकांतून उपलब्ध होते. उदा. गो. नी. दांडेकर, बाबासाहेब पुरंदरे यांनी लिहिलेली वर्णने. ह्याशिवाय, आव्हान, गिरीदुर्गांच्या पहाऱ्यातून. . . वगैरे पुस्तकांमधून, घाट वाटा, वाड्या-वस्त्यांचे, गावांचे आराखडे; डोंगर, दऱ्या किल्ले मार्ग- खुणा; आडोसे, मंदिरे, गुहा; आहार, पूरक व्यायाम, पथ्ये, आवश्यक तंत्रज्ञान वगैरे संदर्भात शास्त्रीय माहिती उपलब्ध होऊ शकेल. या शिवाय डॉ. पटवर्धन, आनंद पाळंदे, निनाद बेडेकर, प्रा. रायकर यांच्यासारख्या अनुभवी व्यक्तींकडूनही आवश्यक ते मार्गदर्शन मिळवता येणे शक्य आहे. या शिवाय विविध वर्तमानपत्रे, मासिके, भारत इतिहास संशोधन मंडळातूनही गॅझेटिअर्स टिपण वगैरे माध्यमातून आपणास अधिक माहिती मिळवता येणे शक्य आहे.

मॉडर्न महाविद्यालयाशीच संबंधित पदभ्रमण आणि पर्यावरण अभ्यास मंडळाच्या वतीने चालवल्या जाणाऱ्या ह्या उपक्रमाचा गेल्या वर्षाचा आढावा घेतला तर काही गोष्टींचा खास उल्लेख करावासा वाटतो.

साधारण वर्षभराने ठरलेल्या अथवा ठराविकच ठिकाणी पुणे जिल्ह्यात मर्यादित स्वरूपात पदभ्रमणाचे (ट्रेकिंगचे) कार्यक्रम राबवले जातात. संयोजक म्हणून काही ठराविकच स्टाफ मेंबर्स अशा कार्यक्रमाचे आयोजन करताना आढळतात. विद्यार्थ्यांची संख्याही मर्यादित स्वरूपात असते. अद्ययावत साधन आणि उपकरणांची उणीव सातत्याने भासते. अनुभव व प्रशिक्षणाची कमतरता जाणवते. सरकारी तसेच विद्यापीठाकडून मिळणाऱ्या उपलब्ध सवलतींचा व संधीचा फायदा आपण घेऊ शकत नाही. बऱ्याच व्यक्तींच्या दृष्टिकोणातून हे क्षेत्र उपेक्षित ठरवले जाते. या पाठीमागे कोणती कारणे असावीत व कोणते उपाय त्यावर योजले जावेत की, जेणेकरून या प्रकाराच्या क्रीडाप्रकारास मार्गदर्शन, प्रोत्साहन मिळेल आणि आणखी काहीजण हा क्रीडाप्रकार अधिक गांभियनि अंगिकारतील. या क्षेत्रातील अनुभव आणि व्यासंग वाढवतील. गिरीभ्रमण एक शास्त्र म्हणून अभ्यासतील व ज्यायोगे त्यांचे गिरीभ्रमणावरचे प्रेमही वाढेल.

प्रामुख्याने विद्यार्थ्यांना या क्षेत्रात प्रोत्साहन देण्याकरिता म्हणून नियमितपणे मार्गदर्शनपर अनुभवी व्यक्तींची व्याख्याने, चित्रफिती, प्रदर्शने, कात्रणे यांचा अवलंब केला जावा. त्या करिता म्हणून स्वेच्छेने काही स्टाफमेंबर्सनी पुढे येऊन विद्यार्थ्यांशी या संदर्भात अधिक जवळीक साधणे जरुरीचे आहे. या गोष्टी करत असताना सहल, मौज, मजा व पदभ्रमण / भटकंती यातील महत्त्वाच्या फरकाची जाणीव करून देणे आवश्यक आहे. ज्यामुळे मनस्वी पदभ्रमणाची इच्छा असणारे अधिकाधिक विद्यार्थी-सभासद मिळू शकतील. अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित करत असताना, काही वेळा अनंत अडचणी येतात; पण महाविद्यालयीन शिक्षणाचाच एक भाग म्हणून जर त्याकडे पाहिले तर त्यातूनही मार्ग काढता येणे शक्य आहे. यालाच जोड म्हणून जर नियमित शिबिरांचे आयोजन केले; तर विद्यार्थी व शिक्षक यांचा अनुभव आणि व्यासंग वाढवता येणे शक्य आहे. या शास्त्रीय अभ्यासाला अनुभव आणि व्यासंगाची जोड मिळाली तर उपलब्ध असणाऱ्या सर्व संधी, सवलतींचा फायदा घेऊन जिल्ह्याबाहेर, राज्यात वा राज्याबाहेरही आपणास असे उपक्रम राबवता येणे अशक्य आहे असे वाटत नाही.

अशा कार्यक्रमची व्याप्ती वाढवताना प्रश्न राहतो

तो आधुनिक साधने, उपकरणे, यांचा. तोही सोडवण्याचा प्रयत्न गेल्या वर्षापासून करण्यास सुरुवात केली आहे. त्या बाबतीत मा. प्राचार्य, पी. डी. कुलकर्णी, श्री. गोहेल एम. जी. यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. या वर्षात पदभ्रमणा संदर्भात कायमस्वरूपी उपयुक्त अशा साधनांची खरेदी करण्यात आली असून, हा उपक्रम जिमखाना विभागाचा एक भाग समजून या बाबतीत टप्प्याटप्प्याने परिपूर्णता आणण्याचा प्रयत्न राहील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. या बाबतीत श्री. आनंद पाध्ये यांचेही वेळोवेळी मार्गदर्शन लाभत असते.

पदभ्रमण/ भटकंती या कार्यक्रमाशी निगडित गेल्या काही वर्षातील माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन, या संदर्भात एक क्लब स्थापन करण्यासंबंधीची योजना मांडली आहे. तसे जर प्रत्यक्ष घडलेच तर मॉडर्न महाविद्यालय पदभ्रमण अभ्यास मंडळ व माजी विद्यार्थी क्लब यांच्या संयुक्त प्रयत्नाने हा कार्यक्रम अधिक सुकर रीतीने पार पाडता येईल.

गेल्या वर्षभराच्या मॉडर्न महाविद्यालय पर्यावरण आणि पदभ्रमण अभ्यास मंडळाच्या उपक्रमांचा थोडक्यात आढावा घेतला तर दोन ठळक वैशिष्ट्ये सांगता येतील.

एक म्हणजे राजगड येथील कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पुरातत्त्व खात्याच्या पूर्वपरवानगीने गडावरील पडझड झालेल्या भागांच्या तटांमधील काही बांधकाम पूर्ण केले व स्वच्छतागृह म्हणून त्या जागा वापरता येतील इतपत व्यवस्था तेथे समाजकार्य करून पूर्ण केली.

दुसरी गोष्ट म्हणजे पुणे विद्यापीठातर्फे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय पदभ्रमण कार्यक्रमासाठी सहा विद्यार्थी व पाच शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संयोजक म्हणून निवड करण्यात आली होती. तोही कार्यक्रम यशस्वी रीतीने पार पाडण्यात आला.

तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ११वी व १२वी च्या वर्गातील मुलांना अधिकाधिक समाविष्ट करून सलग पाच वर्ष हे विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी होऊ शकतील व आपला व्यासंग वाढवतील असा प्रयत्न करण्यात आला. उदा. सिंहगडावर १०० चे वर विद्यार्थ्यांचा समावेश होता तर भाजे-लोहगड, पुरंदर-वज्रगड येथील पदभ्रमण कार्यक्रमास अनुक्रमे ५० व ६९ विद्यार्थी सहभागी झाले होते.

या शिवाय रायगड, राजगड, बेडसे लेणी, रोहिडा, रायरेश्वर, केंजळगड, कात्रज ते सिंहगड, मांढरदेवी-पांडवगड - केंजळगड, तोरणा-तुंगी - तिकोना - धनगड, घोरवडेश्वर/ शेलारवाडीची लेणी, नाणोळी, जिवधन - नाणेघाट, कुक्डेश्वर या ठिकाणी पदभ्रमणाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमांसाठी नियोजन-संयोजनात श्री. व्ही. बी. आल्हाट, सौ. मंगला साळुंके, श्री. खरे, श्री. जगताप, (दोघेही कार्यालयीन कर्मचारी) यांचे उत्तम सहकार्य लाभले. तसेच काही माजी विद्यार्थ्यांचेही या बाबतीत सदैव सहकार्य लाभत असते. प्राणिशास्त्र विभागातील प्रा. एच. व्ही. घाटे यांच्या मदतीने कात्रज सर्पोद्यानास भेट देऊन, प्रत्यक्ष विविध जातींचे सर्प हाताळण्यास मिळाले व सर्पदंश व उपाय, प्रथमोपचार या विषयी बरीच माहिती मिळवता आली.

थोडक्यात सांगावयाचे झाले; तर या क्षेत्राकडे जर शास्त्र म्हणून पाहिले आणि महाविद्यालयीन स्तरावरील वाढ करून उत्तम प्रशिक्षणाची शिबिरे भरवून विद्यार्थी व स्टाफ मेंबर्सचा अनुभव वाढवला, तर संपूर्ण भारतभर पदभ्रमणाचा कार्यक्रम राबवता येणे शक्य आहे.

समाजात प्रत्येक गोष्टीस विरोध अथवा टीका करणारे असतातच, नव्हे त्यांची गरज असते. अशा व्यक्तींनी टीकात्मक स्वरूपात जरी उद्गार काढले की, 'या मंडळींना सुटी मिळताच निघाले भटकायला' किंवा 'या सर्वांना गडावरून ढकलून दिले पाहिजे.' काही वेळा असेही म्हटले जाते की, 'पाठीवर पिठलं/ भाकरी बांधून घेतली की निघाले

उनाडायला' वगैरे वगैरे. अशा व्यक्तींची खरोखर कीव कराविशी वाटते. कारण पदभ्रमणाचा किंवा गिरीभ्रमणाचा शास्त्रीय दृष्टिकोण त्यांना माहीतच नसतो. गिरीभ्रमणापासून मिळणारा निर्भेळ आनंद, डोंगरकुशीतील नवनवीन नैसर्गिक घडामोडींचा उलगडा, तसेच धावत्या जगापासून, प्रदूषणापासून, कोलाहलापासून मिळणारी शांतता यांची त्यांना कल्पनाच नसते. अर्धवट माहितीवर आधारीत ते विधाने करीत असतात. अशा व्यक्तींनी सुटी दिवशी खास श्रीखंडांचा बेत करून घरातच पंख्याखाली झोपण्यात आपले विश्व समजावे आणि जीवन जगावे.

■ ■ ■

## रोजगार

"तुम्ही बेरोजगारी दूर करू शकाल काय ?"

" हो सर"

"कसे काय ?"

"एका किनाऱ्यावर सर्व पुरुषांना ठेवीन

दुसऱ्यावर स्त्रियांना."

" तर काय करतील ते लोक ?"

"नाव बनवतील."

**नंदकुमार कांबळे**

एम. कॉम. भाग - २

## उगवता सूर्य

सूर्य नेहमी उगवत असतो
सूर्य नेहमी मावळत असतो
उगवता सूर्य घेऊन येतो
जगण्यासाठी नवी दिशा, नवी उमेद
मावळता सूर्य घेऊन जातो
काळपुरुषाकडे लवकर, जलद

उगवता सूर्य
ही प्रगतीची खूण आहे
तर मावळतीचा सूर्य
ही आहे अधोगतीची वाटचाल

पण थांब मित्रा, क्षणभर थांब !
सूर्य कधी उगवत नसतो
सूर्य कधी मावळत नसतो
तो तर एका जागेवर स्थिर असतो
पण आपल्याला भास होत असतो
कारण आपली पृथ्वी फिरत असते
मावळतीकडून उगवतीकडे

**श्रीप्रसाद प्रभाकर कुलकर्णी**

एस. वाय. बी. कॉम. 'सी'

# कान्हे फाटा N.S.S. शिबीर वृत्तान्त

**कु. पल्लवी स. परब**
द्वितीय वर्ष, कला

माणसाचा सर्वात मोठा गुरू वय ! बालपणाची आठवण आली. शाळा सुटल्यानंतर झोपाळ्यावर किती वेळ जायचा याचं भानच राहायचं नाही. वडील अचानक शोधायला आले की हसतच त्यांना जाऊन बिलगायचे. नृत्य, गायन, वेगवेगळ्या कला जोपासून, शाळेचा रटाळ अभ्यास, गाढवावरच्या लादलेल्या ओझ्याप्रमाणे, दप्तर घेऊन जाता जाता शरीरही थकायचं व मनही. पण त्यातही दमून भागून आल्यावर, एखाद्या कलेचा सराव केल्यावर मन प्रसन्न होई. प्राथमिक शिक्षण व माध्यमिक शिक्षण आनंदात गेलं. उच्च माध्यमासाठी प्रवेश घेतला तेव्हा शिकलेल्या कलांचा आपण काही उपयोग करू शकू त्याचबरोबर बरेवाईट मार्ग दाखवण्याचं काम वडीलधारी मंडळी करायची. त्यातही काही समाजाची बंधनं. यशस्वीरित्या वाटचाल करण्यासाठी ह्या सर्वांची जरुरी पडते.

मोठी भरारी मारण्यापूर्वी पंखात ताकद हवी. त्याचा पाया बालवाडीपासूनच घातला जातो. आपण शिक्षण घेतो म्हणजे तर काय करतो ? सुविद्य, सुसंस्कार याच्यातून जीवनाची यशस्वी वाटचाल आनंदमयी कशी करायची यासाठीच हे प्रयत्न चाललेले असतात. तशी मी काही कलात, खेळात थोडेथोडे प्राविण्य मिळविले. तरी पण शंका असायची की आपण या मोठ्या जगात कुठे तरी कमी पडतो आहोत. भरारी मोठी झाली. महाविद्यालयातच जीवन सुरू झालं. चारी बाजूचे विद्यार्थी, विद्यार्थीनी गोळा झाले. सर्व धर्म, सर्व जाती, निरनिराळे आचारविचार, आवडीनिवडी, इतकेच काय पण उत्तर-दक्षिण, पूर्व-पश्चिमाचा जेवणाचा स्वादही वेगळा.

अशाच पार्श्वभूमीवर राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे एक दिवशीय शिबिरासाठी कान्हेफाटा येथे आम्ही सर्व एकत्र आलो. इंजिनाशिवाय गाडी नाही त्याप्रमाणे ७० ते ७५ मुलींचं मार्गदर्शन करण्यासाठी नियोजन आलंच. हे एक मोठं कुटुंब, प्राध्यापक दीक्षित व वनकळस सरांना चालवायचं होतं. या मागचा उद्देश होता शिक्षणाचा. काहीतरी नवीन शिकायला मिळणार होते.

विद्येचं मंदिर, विद्येची देवता याचीच तिथे पूजा चालली होती. औपचारिकपणे पाहुण्यांचं स्वागत झाले. ओळख झाली. तद्नंतर 'व्यक्तिमत्त्व विकासाचाच' एक भाग म्हणजे नोकरीसाठी घेतली जाणारी मुलाखत यावर कर्नल केळकर सरांनी प्रात्यक्षिक करून दाखवले व मनात अगदी पक्क बसवून दिले की, ज्याच्याकडे स्वयंपाक म्हणजे नुसते जिभेचे चोचले पुरवणे नव्हे. सर्वांनी काम करून दमल्यानंतर एकत्र बसून स्वतः बनविलेल्या स्वयंपाकाचा आस्वाद वेगळा.

माहीत असलेले विचार सर्वांसमोर सराव नसल्यामुळे संकोचामुळे, किंवा भीतीने मांडू शकत नाही. आवाजाचा चढउतार, न घाबरता मुद्देसूद आठवण करून आपले मुद्दे कसे पटवून द्यायचे, समोरच्या श्रोतृवर्गावर वर्चस्व टेवून आपले मुद्दे पटवून द्यायचे, एखाद्या व्यवहारातील वस्तू, उदा. मग, झाडू, बादली इ. त्याचे फायदे काय, तोटे काय व व्यवहारात किती उपयोगी आहे हे दुसऱ्याला पटवून

देणं महत्त्वाचं आहे. हे ज्याला जमलं तो खरा यशस्वी. हे नायडू सरांनी पटवून दिलं. ज्याच्याकडे आत्मविश्वास आहे तो नेहमीच जिंकतो आणि त्यासाठी डॉ. विनायक कुलकर्णी यांनी अध्यात्म याबद्दल मांडलेले विचार सदैव ध्यानात राहातील. नुसतंच बुद्धीची कुवत, कष्ट काम देत नसतात, तर त्यासोबत माणसाला बरे काय, वाईट काय याचा शोध घेऊन ठामपणे निर्णय घेणं आणि ते विचार आचरणात आणि मनात आणण्यासाठी मनाचा निश्चितपणा लागतो, असे कुलकर्णी सरांचे विचार आयुष्यामध्ये उपयोगी ठरतील.

"रात्र थोडी सोंगं फार" शिबिराचा दिवस एकच. रवींद्रनाथ टागोरांच्या आश्रमातील माणूस झाडाखाली बसूनही सुविद्य, सुसंस्कृत बनू शकतो. शिबिरातील एकोपा बघून संघटितपणाची शक्ती काय असते हे कळू शकते.

एक-दुसऱ्याबद्दल प्रेम, आदर कसं मिळतं हे जेव्हा निरोप-समारंभाच्या वेळी त्या क्षणाला लागलेल्या हुरहुरीतून कळतं.

खरंच ! काही वेळा असं वाटतं, कॉलेजच्या चार भिंतींच्या आड जे शिक्षण मिळते, त्याच्या कितीतरी पटीनं अशा संघटित कार्यक्रमातून माणूस शिकतो. पुस्तकी शिक्षणाबरोबरच संघटित जीवन हाही शिक्षणाचा एक विषय आहे. राष्ट्रीय सेवा योजनेची सुरुवात करणाऱ्यांचे शतशः आभार मानून, केलेल्या प्रयत्नांबद्दल आम्ही संचालकांचे आभार मानू.

■ ■ ■

## कविता

कविता म्हणजे नसतात नुसतेच शब्द
त्या असतात मनातल्या भावना
शब्दरूप केल्या गेलेल्या
काही सुप्त कामना

कविता म्हणजे असते माध्यम
विचार व्यक्त करण्याचे
कवितेच्या शब्दांत असते सामर्थ्य
चाबकाच्या फटकाऱ्यांचे

कधी कविता असते कंटाळवाणी
कधी तिच्यात असते रसाळवाणी
कवितेतूनच तयार होतात
कितीतरी गोड गाणी

कवितते दडलेला असतो
खोल घनगर्द अर्थ
त्या अर्थाला समजण्याचा प्रयत्न करतो
पृथ्वीवरला मानव मर्त्य

श्रीप्रसाद प्रभाकर कुलकर्णी
एस्. वाय. बी. कॉम. 'सी'

# तोरणा- राजगड प्रवासवर्णन

**मीनल एम. नाईक**
**प्रथम वर्ष, वाणिज्य**

जगाच्या रोजच्या गोंगाटापासून दूर, शांत अशा ठिकाणी जाण्याची इच्छा झाल्याने व बरेच दिवसात ट्रेक केला नव्हता म्हणून, आम्ही सर्वांनी ट्रेकला जायचे ठरवले. विशेष म्हणजे पाच नोव्हेंबर हा माझ्या भावाचा (मिलींदचा) वाढदिवस. त्यामुळे त्याने तो गडावर साजरा करायचा असे ठरवले होते. अशा ट्रेकमधून जो आनंद मिळतो, तो काही औरच.

पाच नोव्हेंबरला मी, मिलींद व त्याचे मित्र समीर, समाधान, सचिन व विद्या असे सर्वजण ट्रेकला निघणार होतो. सकाळी सात वाजता स्वारगेटवर जमण्याचे ठरले होते. चौकशी केल्यावर साडेसात वाजता बस असल्याचे कळले. परंतु समीर आला नव्हता आणि बसही आली नाही. साडेआठ वाजता बस आली. पद्य म्हणता म्हणता दोन तास मजेत निघून गेले. आणि आम्ही वेल्ह्याला पोहोचलो.

गावाबाहेरील पायवाटेने आम्ही तोरण्याकडे आगेकूच केले. शॉटकर्ट मारण्यासाठी पायवाट सोडून चालू लागलो व रस्ता चुकलो. त्यामुळे अर्धा तास वाया गेला. पुन्हा पायवाट शोधून काढली. सकाळची वेळ होती. प्रसन्न वातावरणामुळे गड चढायला उत्साह वाटत होता. वाटेत एक धबधबा दिसला. त्याचे ते निर्जंतुक पाणी पोटभर पिऊन घेतले व थोडा वेळ वारा व झुळझुळ वाहाणारे पाणी यांच्या गप्पागोष्टी ऐकल्या. थोडे पुढे गेल्यावर गडाचा दरवाजा दिसला खरा; पण थोड्याच वेळात लक्षात आले की "अभी तो दिल्ली बहोत दूर है" मी आणि विद्या भराभर वर गेलो आणि 'हुश्श' करून ठिय्या मारला. थोड्या वेळाने बाकी सर्वजण आले व आम्ही तेथील देवळात जाऊन विश्रांती घेतली. मी व विद्या वाऱ्याच्या झुळुकांबरोबर हेलकावे खात होतो. समोरचा निसर्गरम्य परिसर डोळ्यांसमोर सतत राहावा, असे वाटत होते. तेवढ्यात "जेवायला चला" ची हाक आली व आम्ही देवळात गेलो. सर्वांनी डब्यावर चांगलाच ताव मारला. दहा - पंधरा मिनिटे झोप काढून गड उतरण्यास सुरुवात केली. तोच एक भुयार दिसले. भुयार बुरुजावर पोहचत होते. तिथे एक फेरफटका मारला व पुढे निघालो. पुढे एक रॉकपॅच लागला. तिथे मी (सर्वात लहान असल्यामुळे व समीरची प्रकृती स्थूल असल्यामुळे) स्लिंगच्या सहाय्याने खाली उतरलो. बाकी सर्वजण स्लिंगशिवाय खाली उतरले. आता पुढे लहान - मोठे असे तेहतीस डोंगर पार करावयाचे होते. काही डोंगर पार केले तोच काळोख होऊ लागला. साडेसहा वाजताच अंधार गुडुप होण्याची लक्षणे दिसू लागली. तेवढ्यात गावकऱ्यांनी आम्हाला राहण्याचा आग्रह केला. आमच्या जवळील टॉर्च काढले असता त्यातील एक टॉर्च डिम झाल्याचे लक्षात आले व एकच टॉर्च व एक पेन्सिलटॉर्चच्या उजेडात आम्ही सहाजण पुढे जाणे शक्यच नव्हते. अडचण लक्षात घेऊन आम्ही बालवड (त्या गावाचे नाव) मध्ये राहिलो. बालवड हे गाव तसे लहानच. या गावात फक्त सहा झोपड्या आहेत. तेथील एका झोपडीत ते (मामा) एकटेच राहात होते.

भूक कडकडून लागली होती. डबे तर केव्हाच संपले

होते. म्हणून मामांना विचारून चूल पेटवली. मिलींद व सचिनने फोडणी केली. तेवढ्या वेळात मी व विद्याने एकही बोट चिरून न घेता कांदे, बटाटे, चिरले. चुलीवरती खिचडी शिजत होती; तर खाली कांदे, बटाटे अख्खे शिजत होते. सर्वजण खिचडी कधी होते याचीच वाट बघत होते. शेवटी खिचडी तयार झाली. चुलीतील कांदे व बटाटे यांची गोड चव अजूनही जिभेवर तरळते आहे. जेवण होईस्तोवर नऊ वाजून गेले होते. मामांनाही आम्ही जेवण दिले. जेवण झाल्यावर त्यांच्या कृत्याने मी मिलींदला सावध केले. तसे ते आमच्याशी चांगले वागले होते. परंतु ताडी घेताना पाहून जरा भीती वाटत होती. ती भयाण रात्र आठवली की क्षणभर अंगावर काटा येतो. थंडीमुळे काकडायला होत होते. भयंकर गार वारे सुटले होते. झोपडीला दार नव्हते. अशातच मामाची भीती, झोप लागणे तर अशक्यच होते. त्यातच गावकऱ्यांच्या सभेने भर घातली. दिवसभर चालून चालून थकवा आला होता. पण झोपताही येत नव्हते. तोच तीन वाजत सर्वजण उठून बसले. थंडी खूपच वाजत होती म्हणून चहा प्यायलो. भांडी धुण्याचे काम मुलांवरती सोपविले होते.

पहाटे साडेतीन वाजता समीर व समाधान भांडी धुवायला जवळील टाकीवर गेले. थोड्याच वेळाने मिलींदला त्या दोघांना थोडी भीती दाखवाविशी वाटली म्हणून तेही तिथे गेले. त्यांनी शिट्ट्या व दगडे मारली. त्याबरोबर समीर घाबरला. घाबरून जाऊन त्यांनी पटापट भांडी विसळली. परत येऊन मिलींदने त्यांची कशी मजा केली ते सांगितले. समीर व समाधान जाम टरकले होते. त्यातच विद्याने कोकणात 'चकवा' नामक प्रकार कसा घडतो व कसे भास होतात ते सांगितले. ते आणखीनच घाबरले. तसे मी व विद्याने त्यांना परत जाऊन बघण्यास सुचविले; पण ते तयार होईनात. थोडे उजाडल्यावर मी, मिलींद व समाधान तिथे गेलो. मिलींद थोडा पुढे गेला व त्याने दगड फेकले. तेव्हा मी व विद्याने घाबरल्याची ॲक्टिंग केली व परत आलो. सहा-साडेसहाला मामांचा निरोप घेऊन पुढे निघालो.

एका पठारावर उपासना केली. उपासना केल्यावर पाच मिनिटे बसलो व पुढे निघालो. दोन्ही बाजूला झाडे उगवली होती, ती बाजूला करीत व जपून पाऊल ठेवीत पुढे निघालो. साधारण नऊ वाजता संजीवनी माचीच्या बाजूने वर निघालो. तिथे पाण्याच्या टाकीपाशी थांबलो. बाजूच्या टाकीतील मासे सचिनने पकडून बाटलीत भरून घेतले. तिथे जवळजवळ एक तास बसलो होतो. पुढे पद्मावती माचीवर गेलो. तोपर्यंत पोटात कावळे ओरडायला लागले. चूल पेटवून तयार केली. ती झाल्याबरोबर कॉफी करून प्यायलो. आवराआवर करून एक वाजता राजगड उतरायला सुरुवात केली. वाटेत भेटलेल्या गावकऱ्यांनी चार वाजता शेवटची बस असल्याचे सांगितले. मी बस चुकली तर आणखी एक किलोमीटर चालावे लागेल असे सांगितल्यामुळे व अधिक चालण्याची तयारी नसल्यामुळे सर्वजण पटापट गड उतरू लागले. पळत - पळत, घसरगुंडी करून घसरत, ठेचकाळत कसेबसे आम्ही गडाच्या पायथ्याशी पोहोचलो. वाटेत एक नदी आहे. तिथे पूल नसल्यामुळे दगडावरून पाण्यात चाललो होतो. तेवढ्यात समीरचे तोंड पाण्यात बुडाले व सर्व गावातील बायका हसू लागल्या. त्यांची उडालेली त्रेधातिरपट पाहून आम्हालाही हसू आवरले नाही. चार वाजता वाजेघर येथून बस पकडून आम्ही पुण्यात परत आलो.

ह्या ट्रेकमधील अनेक प्रसंग अविस्मरणीय आहेत. तोरणा-राजगड असे दोन ट्रेक एकदम करण्याची ही माझी पहिलीच वेळ होती. त्यामुळे पाय दुखून आले. तरीही अशा प्रकारचे अनेक ट्रेक मला करावेसे वाटतात व त्यातल्या आठवणी जपून ठेवाव्यात असे वाटते. ह्या ट्रेकचे उद्दिष्ट, एक लांबलचक ट्रेकचा अनुभव असा होता व तो पूर्णतः सफल झाला.

■ ■ ■

# नाट्य विचारांना चालना देणारे चर्चासत्र

**डॉ. स्नेहल तावरे**

मराठी रंगभूमी शतकोत्तर सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने मॉडर्न महाविद्यालय आणि पुणे विद्यापीठातील ललित कला केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसांचे चर्चासत्र मॉडर्न महाविद्यालयात आयोजित करण्यात आले होते. मार्च महिन्याच्या दोन, तीन आणि चार तारखेला हे चर्चासत्र अत्यंत यशस्वीरित्या झाले. या चर्चासत्राचा एकूणच आराखडा ललित युवा केंद्राचे डॉ. ग. श्री. चिंचणीकर व प्रा. शुभांगी बहुलीकर, तसेच मॉडर्न महाविद्यालयाचे डॉ. वि. भा. देशपांडे व डॉ. मेधा लिमये यांनी तयार केला. एकंदर पाच चर्चासत्रांचे आयोजन त्यात होते.

दि. २ मार्च रोजी प्रा. दामू केंकरे यांनी या चर्चासत्राचे उद्‌घाटन दीप प्रज्वलनाने केले. त्याप्रसंगी केलेल्या भाषणात प्रा. दामू केंकरे म्हणाले, "व्यावसायिक रंगभूमी आणि प्रायोगिक रंगभूमी यात काम करणाऱ्या कलाकारांनी परस्पर सहकार्याने नाट्यकलेत नवे विचार आणावेत व रंगभूमीस नवी दिशा द्यावी. व्यावसायिक आणि प्रायोगिक रंगभूमीवरील कलाकार एकमेकांकडे कुचेष्टेने पाहत. खरे पाहता दोन्ही रंगभूमी परस्परांना पूरक आहेत. नवे विचार किंवा प्रयोग कालांतराने परंपरेत सामील होतात. त्यामुळे नव्याचा शोध सतत चालूच असतो. नाट्यकलेच्या बाबतीत हा शोध दोन्ही रंगभूमीवर कार्यरत असणाऱ्यांनी एकमेकांच्या सहकार्याने घेतला पाहिजे." मराठी नाट्यक्षेत्रात झालेल्या बदलाचा आढावा घेताना प्रा. दामू केंकरे म्हणाले, "शतकपूर्वीचा उत्सव झाला त्या वेळी मराठी रंगभूमीचे व्यावसायिक स्वरूप लोप पावत चालले होते. व्यावसायिक नटांना काम न उरल्याने ते इतर व्यवसायांकडे वळत होते. अभिनेते, कंत्राटी पद्धतीने काम करीत होते व नाटकांचा दर्जा, प्रेक्षकांची अभिरुची खालावत होती. ही सर्व परिस्थिती बदलणे हा शतकपूर्तीच्या वेळी झालेल्या उत्सवाच्या प्रमुख उद्देश होता. शतकोत्तर सुवर्णजयंतीच्या कार्यक्रमात काही भरीव स्वरूपांचा विचार व्हावयास पाहिजे अशी त्यांनी अपेक्षा व्यक्त केली. या उद्‌घाटन सोहळयाच्या प्रसंगी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांनी प्रास्ताविक केले. मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्र. य. परांजपे यांनी स्वागत केले. तर डॉ. चिंचणीकर यांनी आभार मानले. डॉ. वि. भा देशपांडे यांनी एकूण चर्चासत्राच्या कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. या कार्यक्रमाचे सूत्र-संचालन डॉ. मेधा सिंधये यांनी केले.

उद्‌घाटनाचा हा सोहळा झाल्यावर त्याच दिवशी दुपारी अडीच वाजता चर्चा-सत्रातील पहिल्या सत्राला सुरुवात झाली. 'संगीत रंगभूमीचा नवा अन्वयार्थ' या विषयावरील निबंधाचे डॉ. श्रीरंग संगोराम यांनी वाचन केले. प्रा. गो. म. कुलकर्णी अध्यक्षस्थानी होते. मराठी संगीत नाटकांवर पारशी नाटकांचा प्रभाव पडला असल्याचे मत डॉ. संगोराम यांनी व्यक्त केले. संगीत नाटकातील प्रतिकूल प्रकारांना आळा घालण्याचे काम गद्य रंगभूमीवरील धुरिणांनी केले असल्याचे सांगून, आदर्श संगीत नाटकाचे स्वरूप, मार्गांतर व यशस्वीता यांचा विचार होणे आवश्यक आहे असे त्यांनी सांगितले.

कालच्या व आजच्या संगीत रंगभूमीच्या संदर्भात प्रेक्षकांच्या अभिरुचीचा विचार महत्त्वाचा आहे असे मत डॉ. क्षमा वैद्य, यांनी केले. या चर्चासत्रातील चर्चेत डॉ. दीनानाथ टाकळकर, डॉ. वि. भा. देशपांडे. प्रा. ज्ञानेश्वर

नाडकर्णी, डॉ. गो. रा. जोशी यांनी भाग घेतला.

'नाट्य लेखन शैली आणि अभिनय शैली' ह्या विषयावरील लेखाचे वक्ते डॉ. दीनानाथ टाकळकर होते. गुरुवार दि. ३ मार्च रोजी झालेल्या दुसऱ्या सत्रातील चर्चा-सत्राचे अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर नाडकर्णी होते. प्रास्ताविक डॉ. स्नेहल तावरे यांनी केले. डॉ. दीनानाथ टाकळकरांनी नाट्य-लेखन शैली व अभिनय शैली याबाबत अनेक उदाहरणे दिली. त्यांच्या मते नाटककार, नकलाकार, गीतकार, संगीतकार, कलाकार या सगळ्या शब्दांमध्ये कृती आवश्यक आहे. अभिनेता म्हणजे मूळ स्वरूपाकडे नेणारा हाच अर्थ अभिप्रेत असतो. कृती हा नाटकाचा आत्मा आहे. कृती करीत राहणे आणि त्यात प्राविण्य, कौशल्य मिळविण्यासाठी परिश्रम, साधना, कलात्मक आणि संवेदनशील प्रवृत्तीचा स्वभाव असणे अत्यंत आवश्यक आहे. नाट्यलेखन आणि नाट्यअभिनय चित्र आहे असे सांगून, १५० वर्षात रंगभूमीवर, रंगभूमीसाठी घडलेले लेखन आणि अभिनय यांचा मागोवा डॉ. टाकळकरांनी घेतला.

'गोथिक' ह्या जर्मन चित्रपटाचा कित्ता आपल्याकडे रंगविला गेल्याचे आणि काळानुसार लेखनशैली बदलत गेली, त्यानुसार संवादही बदलले. असे ज्ञानेश्वर नाडकर्णी यांनी सांगितले. श्री. गो. रा. जोशी, श्रीमती सेवा चौहान, राजाभाऊ नातू, वाघमारे, किरवले, निर्मळे यांनी या चर्चेत भाग घेतला होता.

दुपारच्या भोजनानंतर तुसऱ्या चर्चासत्राला सुरुवात झाली. अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर बर्वे होते. गोव्याहून आलेले श्री. विनायक खेडेकर यांनी 'लोकशैली आणि मराठी नाटक' हा निबंध वाचला. प्रास्ताविक प्रा. स्वाती कर्वे यांनी केले. श्री. खेडेकरांनी सांगितले की, " नाटक हे प्रेक्षकांसाठी, त्यांच्या रंजनासाठी मनोव्यापारांसाठी आहे; तर लोककला या स्वान्तःसुखाय आहेत."

नाटकातून पुष्कळदा लोककलेचे विपरीत रूप दिसून येते. त्याला लोकशैली म्हणता येईल. सादरीकरणात लोक-कलांचा वापर हळुवारपणे मूळ रूपाला बाधा न येता व्हायला हवा. तसेच लोक-कलांचा अभ्यास होणे आवश्यक आहे. लोक-कला ही परप्रांत कला आहे. याचे पूर्ण भान असायला हवे. आविष्करणासाठी लोक-कला वा लोकशैली वापरण्याऐवजी अभ्यासपूर्ण विचक्षणेने लोक-कलातील नाट्यात्मक बीजघटक विकसित करण्याने लोक-कला व नाटक दोन्ही समृद्ध होऊ शकतील." श्री. खेडेकरांच्या अभ्यासपूर्ण निबंधावर डॉ. मनीषा दीक्षित, डॉ. अ. वा. कुलकर्णी, प्रा. गो. म. कुलकर्णी, प्रा. संगोराम, प्रा. दडस आणि डॉ. वि. भा. देशपांडे यांनी चर्चा केली.

'शोकान्तिका : काही सर्वसाधारण विचार' या विषयावरील चर्चासत्र शुक्रवारी दि. ४ मार्च रोजी झाले. प्रा. दामू केंकरे अध्यक्षस्थानी होते. प्रा. लीना पाटणकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अरविंद वामन कुलकर्णी यांनी लिहिलेल्या 'शोकात्मिका : काही सर्वसाधारण विचार' या लेखात ग्रीक साहित्यातील शोकात्मिकेच्या स्वरूपाची सोदाहरण चर्चा केली. भारतीय साहित्यशास्त्रात शोकात्मिकतेचा स्वतंत्र विचार भरतमुनींनी घालून दिलेल्या नियमामुळे झालेला नाही. अव्वल इंग्रजीनंतर आपल्याकडे हा विचार सुरू झाला. आणि तो निसर्गक्रमाला धरून झाला ही वस्तुस्थिती आहे. म्हणजे शेक्सपिअर इ. च्या शोकांतिका वाचनात आल्यामुळे, त्यांची भाषांतरे, रूपांतरे झाली आणि नंतर या विषयाची मराठीत रूपांतरे सुरू झाली. आणि मग या विषयाची मराठीत चर्चा सुरू झाली ती कशा प्रकाराने, हे प्रा. अरविंद वामन कुलकर्णी यांनी स्पष्ट केले. चर्चेमध्ये प्रा. सीताराम रायकर, डॉ. विश्राम मेहेंदळे, मेधा संत, डॉ. अनिल सोनार, डॉ. मनीषा दीक्षित यांनी भाग घेतला.

चर्चा-सत्राच्या उत्तरार्धात नाटक आणि प्रेक्षक या विषयावरील निबंध श्री. ज्ञानेश्वर नाडकर्णी यांनी वाचला. अध्यक्ष श्री. सतीश आळेकर होते. प्रास्ताविक प्रा. सुप्रिया केवळकर यांनी केले. विशेष उपस्थिती श्री. विक्रम गोखले आणि डॉ. श्रीराम लागू यांची होती. सुरुवातीपासूनच हे

चर्चा-सत्र अतिशय रंगले. मराठी आणि इंग्रजी नाटकांच्या आधाराने 'नाटक आणि प्रेक्षक' यांचे परस्परसंबंध अनेक उदाहरणांसह ज्ञानेश्वर नाडकर्णींनी स्पष्ट केले. आघाडीचे रंगकर्मी विक्रम गोखले यांनी नाट्यगृहात प्रेक्षकांचा सहभाग कसा असावा यावर अधिक भर दिला. प्रेक्षकांच्या वागण्याचा कलाकारांना कसा त्रास होतो, त्यावर काय करावे लागते हे सांगताना त्यांनी पाश्चात्य देशातील प्रेक्षकांच्या संयमाची उदाहरणे दिली. डॉ. श्रीराम लागूंनी हाच विचार बोलून दाखविला. परंतु शेवटी भारतीय संस्कृतीच वेगळी आहे, तिची आस्वाद घेण्याची प्रक्रिया ही इतरांपेक्षा पूर्णपणे वेगळी आहे, यावरच अनेक चर्चिकांचे मात्र एकमत झाले.

गेले तीन दिवस अखंडपणे चाललेल्या या चर्चा-सत्राच्या समारोपाचा समारंभ अतिशय देखणेपणाने संपन्न झाला. व्यासपीठावर ख्यातनाम साहित्यिक पु. ल. देशपांडे, डॉ. श्रीराम लागू, स्वरराज छोटा गंधर्व, ज्येष्ठ संगीतकार व गायक पं. जितेंद्र अभिषेकी, अभिनेते चित्तरंजन कोल्हटकर, ज्येष्ठ गायिका जोत्स्ना भोळे, जयमाला शिलेदार, डॉ. दीनानाथ टाकळकर, राजाभाऊ नातू, अनंतराव वर्तक, वसंत शांताराम देसाई हे मान्यवर रंगकर्मी होते. मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. स. य. परांजपे यांनी सर्वांचे स्वागत केले. प्रमुख पाहुणे डॉ. श्रीराम लागू उपस्थित होते. अध्यक्षस्थानी डॉ. गजानन एकबोटे होते. सूत्रसंचालन डॉ. मेधा सिधये यांनी केले.

रंगभूमीविषयक दृष्टिकोण बदलण्याची गरज निर्माण झाल्याचे सांगून डॉ. श्रीराम लागू म्हणाले, "प्रेक्षक व रंगकर्मी यांनी आपला रंगभूमीविषयक दृष्टिकोण तपासून घेतला, तरच त्यांच्यातील संबंध निकोप राहतील व रंगभूमीची प्रगती होईल. आपण नाटकाकडून कोणती अपेक्षा करतो याचा विचारच प्रेक्षकांनी केलेला नाही. मनोरंजन अथवा संदेशाच्या साचेबंद अपेक्षांनी नाटकाकडे पाहिले जाते. साहित्याप्रमाणे एक गंभीर कलाप्रकार म्हणून त्याकडे पाहिले जात नाही. रंगकर्मींही ही मनोवृत्ती किंवा अभिरुची बदलण्याचा प्रयत्न न करता विनाकारण पडती भूमिका घेऊन प्रेक्षकांची अपेक्षापूर्ती करतात." असे सांगून डॉ. श्रीराम लागू म्हणाले, "आपण शेक्सपिअरपासून स्फूर्ती घेतली, कालिदासापासून नाही. 'शाकुंतल', 'सौभद्र' पासून प्रेरणा घेऊन मराठी रंगभूमीने आपली वाट चोखाळली असती तर आज कदचित फार वेगळे चित्र दिसले असते."

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे आणि मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य स. य. परांजपे यांच्या हस्ते व्यासपीठावरील नाट्य व संगीत क्षेत्रातील ज्येष्ठ कलाकारांचा या प्रसंगी सत्कार करण्यात आला. मॉडर्न महाविद्यालयाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. वि. भा. देशपांडे यांनी पी. ए. सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार याप्रसंगी केला. या प्रसंगी प्रकृती बरी नसतानाही पु. ल. देशपांडे यांनी आपल्या नेहेमीच्या विनोदी शैलीत पाच मिनिटात अनेक किस्से सांगून उपस्थितांची मने काबीज केली. ते म्हणाले, "सगळीकडे शिक्षणाचे नाटक चालते, इथं नाटकाचं शिक्षण चालले होते. त्याला इतक्या संख्येने मंडळी आल्याचे पाहून बरे वाटले. डॉ. लागूंचे विचार आणि अनुभव आपल्याला पटल्याचे" सांगून पु. ल. देशपांडे म्हणाले, "मी माझेच विचार ऐकतो आहे असे मला वाटत होते. त्यामुळे मला सारखी शंका येते की लागूंनी माझे एखादे जुने भाषण ऐकले होते की काय?" अतिशय प्रसन्न वातावरणात चाललेल्या या समारोपाच्या कार्यक्रमात डॉ. वि. भा. देशपांडे यांनी आभार-प्रदर्शन केले. शुभांगी बहुलीकर यांच्या पसायदानाने हा रंगीत - संगीत सोहळा संपला.

मॉडर्न महाविद्यालयामध्ये अनेक चर्चा-सत्रे मराठी विभागाने आतापर्यंत आयोजित केलेली होती. परन्तु इतक्या मोठ्या प्रमाणात नाट्य व संगीत क्षेत्रातील ज्येष्ठ-श्रेष्ठ कलाकारांची उपस्थिती प्रथमतः लाभली. मराठी रंगभूमीच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या या चर्चा-सत्राचे फलित म्हणजे वाचल्या गेलेल्या निबंधांचे पुस्तक लवकरच प्रकाशित होणार आहे.

■ ■ ■

# अशीही एक सहल

**सुप्रिया साळकर**
द्वितीय वर्ष, वाणिज्य

सुट्टीचे दिवस आले की वेध लागतात सहलीचे. मग घराघरातून प्रवासाच्या बेतांची चर्चा ऐकू येतात. आम्हीही यंदा दक्षिणभारत सहल करण्याचा निर्णय घेतला. सगळी तयारी झाली. वेळेअभावी आम्ही तीनच ठिकाणे निवडली. ती म्हणजे तिरुपती, बेंगलोर, म्हैसूर. प्रथम तिरुपतीला जाण्यासाठी निघाले. पण म्हणतात ना ! चांगल्या कामाला विघ्न हजार. रात्री साडेअकराला येणारी रेल्वे त्या दिवशी पावणेदोन वाजता आली. त्यामुळे, तिथे उशीरपर्यंत ताटकळत बसावे लागले. पुण्याहून रेणूगंठा या ठिकाणी पोहोचलो. तब्बल चोवीस तास प्रवास होता. तिथून तिरुपल्ली या गावात आलो व तिथून तिरुपती या ठिकाणी आलो. तिथून डोंगरावर श्रीबालाजी क्षेत्र होते. त्यामुळे खूप रात्र झाली.

दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून व्यंकटेश्वराचे दर्शन घेतले. तेथील धार्मिक वातावरण अत्यंत सुखद होते. त्या ठिकाणी शांती मिळत होती. नंतर तिथून आम्ही बेंगलोरला जाण्यास निघालो. तिथे थोडा वेळ आराम केल्यावर आम्ही लालबाग, कब्बन पार्क म्युझिअम, विधानसभा, टिपूज पॅलेस, हायकोर्ट अशी अनेक ठिकाणे पाहिली. कब्बन पार्क, लालबाग येथील ग्लास हाऊस, एच. एम. टी. वॉच पहाण्यासारखंच आहे. आपण इतर देशांतील सौंदर्याबद्दल नेहमीच ऐकत आलो, पाहात आलो; पण आपल्या भारतातदेखील अशी सृष्टीसौंदर्याने नटलेली बरेच शहरे आहेत, हे पाहिल्यावर कळले. सिंगापूर, अमेरिका, जपान या देशांबद्दल आपल्या कल्पना वेगळ्याच असतात. पण भारताची कला, संस्कृती यांची सर त्या देशांना येणार नाही. म्हणूनच परदेशातील लोक आपल्या भारतात आवर्जून येतात व वाहवा करून जातात.

बेंगलोर पाहून झाल्यावर आम्ही म्हैसूर पाहाण्यास निघालो. आमच्या बसमध्ये काही परदेशातील लोकही होते. मला नेमकी अवघ्या २५ वर्षाच्या जपानी मुलीशेजारी सीट मिळाली. ती जपानी बाहुलीच होती. मी बसणार तोच तिने माझे 'Good morning' म्हणून स्वागत केलं. खरं तर, मला वाटायचं की ही माणसं पैशानं, सौंदर्यानं श्रीमंत असतात; पण त्यांच्या वागणुकीबद्दल मनात शंका येते. नीट वागतील की नाही, असा प्रश्न पडतो. पण ती मात्र याला अपवाद होती. तिचा स्वभाव खूप मनमोकळा होता. ती जरी जपानी बोलत असली तरी माझ्याशी इंग्लिशमधून बोलत होती. ती सिंगापूरची राहाणारी होती व तिला कॉलेजकडून ट्रेनिंगसाठी पाठवण्यात आले होते. बरीच ओळख झाल्यावर तिनं मला म्हैसूर पाहिलंस का ? असा प्रश्न विचारला. मी नकार दिल्यावर तिने म्हैसूर बरोबरच उटी या दोन शहरांचे तोंडभरून कौतुक केले. म्हैसूरचे सर्वात आकर्षण असणारे ठिकाण म्हणजे 'वृंदावन बाग' ते एकून मला खूपच आनंद झाला.

खरं तर आपणच असा भेद करतो. आपलं ते चांगलं, दुसऱ्याचं ते वाईट. पण तिच्याजवळ तो भेद नव्हता. देशप्रेम, देशभक्ती या गोष्टी सगळेच पाळतात असे नाही. थोडाफार स्वार्थ असतोच. तिचा निःस्वार्थीपणा मला फारच भावला. खरं म्हणजे, प्रत्येक माणूस हा प्रथम निष्पापच

असतो; पण परिस्थितीमुळे तो स्वार्थी बनतो. त्यामुळे त्याच्यात परकेपणा निर्माण होतो. वर्णाने आपण भेद मानतो; पण माणसांची मने पारखली पाहिजेत. परदेशातील लोकांना आपले विचार पटतील की नाही हा वेगळा प्रश्न, पण माणुसकी या अर्थाने ते आपल्याशी नाते जुळवू पाहतात, पण आपणच त्यांना दूर लोटत असतो. ते आपल्यात मिसळू पाहतात; पण आपणच त्यांना झिडकारत असतो. विचारांच्या देवाणघेवाणीतूनच माणसाचा विकास होतो. पण हे लोक आपल्या देशाची सतत वाखाणणी करत असतात, त्यांच्या मनात असा विचार येतच नाही. असा विचार जर प्रत्येकाने केला तर खरंच या चढाओढी, स्पर्धा, मी श्रेष्ठ का तू श्रेष्ठ या विचारसरणीत गुरफटलेला समाज बाहेर पडेल. असा हा भेद नष्ट करायलाच पाहिजे.

शेवटी तिने मला अगदी आपलेपणाने सिंगापूरला येण्यास सांगितले. पण तिला हे कळणार नाही की या भेटीने मला किती तरी विचार देऊ केले. त्यांना चालना मिळाली. आपणच समन्वय साधला पाहिजे. म्हणूनच या लोकांच्या प्रयत्नांमुळे देशात प्रगती झाली आहे. आपणही आपला देश सुधारू शकतो. त्याला फक्त साथ हवी ती एकतेची.

■ ■ ■

## आशा

जगणे उरलेले नेहमीच जगावे आशेवर,
हाच असतो नित्यक्रम ठसलेला मनावर.
दुःखानंतर असावी सुखाची चाहूल,
जसे उन्हानंतर थंडगार पावसाचे पाऊल.

जीवनात यावा एकदा तरी 'मनासारखा' बहर
निष्पर्ण झालेल्या फांद्यांना सुखाचीच भर,
दुःखालाही म्हणावे सुखाचीच भरती,
आसवांना म्हणावे आनंदाचे मोती.

रात्रीला पिऊन दिवसाची वाट पाहावी,
स्वप्नांना सत्यात बदलवून टाकावे.
ऋतूने आपले रंग नेहेमीच बदलावे,
पण आशेने मात्र ध्रुवतारा असावे.

■ ■ ■

**शिबानी एम. मिटकर**
द्वितीय वर्ष, वाणिज्य

# वाळवंटीकरण व त्यावरील उपाय

**प्रमोद पोखरकर**
तृतीय वर्ष, शास्त्र

आज या स्थितीला जगातील एकतृतीयांश भाग वाळवंटी आहे. आणि तो दिवस दूर नाही की ज्या दिवशी याचे रूपांतर तीनचतुर्थांस मध्ये होईल. जगात सर्वात प्रचंड मानलं जाणारं सहारा वाळवंट हळूहळू दक्षिणेकडे वाढत चाललंय. या वाढत्या वाळवंटीकरणामुळे सहारा वाळवंटापासून शेकडो किलोमीटर दूर असलेल्या जमिनीसुद्धा नापीक बनत चालल्यात. गोबी, अटाकामा सारखे प्रदेश याच अवस्थेला बळी पडलेत. गेल्या निम्म्या शतकात आफ्रिकेच्या ६५ लक्ष हेक्टर जमिनीचे रूपांतर नापीक जमिनीत झाले आहे. वाळवंटाकडून येणाऱ्या वाऱ्यामार्फत वाळूचे छोटे - मोठे खडे आणले जातात व ते सुपीक जमिनीवर पसरले जातात व त्याचे नापीक जमिनीत रूपांतर होते. मालीमध्ये गेल्या २० वर्षात ३५० कि. मी. जमिनीचे रूपांतर वालुकामय प्रदेशात झाले आहे. आपल्या भारतात सुद्धा राजस्थानच्या व थरच्या वाळवंटाभोवताली अशाच घडामोडी घडत आहेत. दुर्दैवाने हे खरं आहे की, जगात दरवर्षी ६ लक्ष हेक्टर जमिनीचे रूपांतर पूर्ण वाळवंटात, तर २१ लक्ष हेक्टर जमिनीचे रूपांतर नापीक जमिनीत होते.

आज भारताची लोकसंख्या ९० कोटीच्या घरात आहे. आणि एके दिवशी अब्ज ही भारत सरकारने आखलेली लक्ष्मणरेखा ओलांडून जायला मागेपुढे पहाणार नाही. त्या भारताला दरवर्षी २४० लक्ष टन धान्याची गरज भासते. पण दरवर्षी भारतात फक्त १३० लक्ष टन धान्य पिकते व ते भारताला अपुरे पडते व मग आयातीचा विचार केला जातो. हे सर्व नुकसान स्वतः माणूसच करतो. घरांसाठी लाकूडतोड, जळणासाठी लाकूडतोड, यामुळे पर्यावरणाचासुद्धा ऱ्हास या मानवामार्फतच केला जातो . लेबाननमध्ये जहाज तयार करण्यासाठी व देवळांसाठी हजारो झाडे तोडली जातात. हिमाचल प्रदेशात १.४ लक्ष झाडे सफरचंदाला लागणाऱ्या पेटीसाठी दरवर्षी तोडली जातात. दर वेळी एकच पीक लावल्यामुळे जमिनीतील त्यासाठी लागणारे रासायनिक पदार्थ संपुष्टात येतात व त्या जमिनीचे रूपांतर नापीकतेत होते. कधीकधी सतत सेंद्रिय खते दिल्यामुळे व सतत पाणी पुरवठ्यामुळेसुद्धा जमिनीचे रूपांतर नापीक जमिनीत होते.

विश्व प्रकृती निधीने (W.W.F. India) हे सर्व थांबविण्याचे ठरविले आहे. त्यांनी नवीन पद्धतीची पाणी-पुरवठा पद्धत शोधून काढली आहे. रासायनिक शेतीचे तंत्रसुद्धा शोधून काढण्यात यश मिळविले आहे.

सौर शक्तीचा वापर करून अनेक यंत्रे त्यांनी कार्यान्वित केली आहेत. राजस्थान, थरच्या वाळवंटासभोवतालची जमीन अधिक वालुकामय न व्हावी म्हणून होऊ पाहणाऱ्या जमिनीत, बाभळीच्या झाडांची लागवड करण्यात आली आहे. ६०,००० हेक्टर जमिनीत अशी लागवड करण्यात आली आहे. असाच एक उपक्रम बदलत्या खाडीप्रदेशात केला जात आहे. या योजनेमुळे जरी प्रचंड वाळवंटात बदल करता आला नाही, तरी त्याच्या सभोवतालचा प्रदेश दाट झाडीचा करण्यात येत आहे. त्यामुळे तरी वाळवंटीकरण आटोक्यात येण्यास हातभार लागेल.

# हुंडा एक दुष्ट रुढी

**संतोष कराडकर**
द्वितीय वर्ष, वाणिज्य

आपल्या भारतीय संस्कृतीचा उच्च आदर्श आपल्यासमोर आहे. तरीही त्यापासून आम्ही भ्रष्ट झाल्याचा शोचनीय देखावा आम्हाला पाहावा लागत आहे. त्यातही स्त्रियांच्या बाबतीत आमचे वर्तन अत्यंत अधोगतीला पोहोचले आहे. स्त्री म्हणजे पुरुषांची सहचारिणी, सुखदुःखातील वाटेकरी, पाठराखीण; पण तिला गुलामीची पदवी प्राप्त झाली आहे. जगात सर्वत्र तिला गुलामगिरीने वागविले जाते. पाश्चिमात्य राष्ट्रात पुष्कळसा झगडा केल्यावर तेथे स्त्रियांना प्रतिष्ठा मिळाली. पण तेथेही स्त्रियांना हव्या असलेल्या सर्व गोष्टी लाभलेल्या नाहीत.

जो तरुण हुंडा घेऊन लग्नाला उभा राहातो, तो स्वतःला, शिक्षणाला, देशाला आणि स्त्री-जातीला बदनाम करतो. देशामध्ये तरुणांच्या अनेक संस्था आहेत. या संस्था समाजाची अंतर्गत सुधारणा करण्याचे भरीव काम करणाऱ्या न होता आपलाच उदो उदो करून घेण्याची साधने बनतात. आपल्या श्रमाचे चीज हे समाजाकडून वाहवा मिळविण्यातच आहे असे त्यांना वाटते.

समाजाला अधोगतीला नेणाऱ्या हुंड्याच्या चालीविरुद्ध जोरदार लोकमत तयार करण्यात यावे. मुलींच्या आई-बापांनीही चांगला वर मिळाला म्हणून दिपून जाऊ नये. आपल्या मुलीला सत्यनिष्ठ आणि धीरोदात्त वर मिळावा म्हणून आपल्या जातीबाहेर अगर प्रांताबाहेर वर-संशोधन करण्यास मागेपुढे पाहू नये.

लग्न म्हणजे आईबाबांनी पैशाकरिता ठरविलेला सौदा ही स्थिती राहता कामा नये. या चालीचा जातीसंस्थेशी जिव्हाळ्याचा संबंध आहे. जातीतील तरुण-तरुणींतूनच वधूवराची निवड करण्याची बंधने आली की, हुंड्याची चाल कितीही टीका केली तरी चालूच राहते. या चालीचे उच्चाटन करायचे असेल तर मुलींनी, मुलांनी किंवा त्यांच्या आईबापांनी जातीच्या कोंडाळ्यातून बाहेर पडले पाहिजे. आणि योग्य वर मिळाला नाही तर मुलींनी अविवाहित राहणे पत्करले पाहिजे.

देशाच्या तरुणपिढीची मनोवृत्ती अजिबात पालटून जाईल असे याकरिता शिक्षण दिले पाहिजे. दुर्दैवाने आपल्या शिक्षणपद्धतीचा आपल्या परिस्थितीशी काही संबंध नाही. त्यामुळे आपल्या राष्ट्रातील मुलामुलींना मिळणाऱ्या शिक्षणाचा परिस्थितीवर काहीच परिणाम होत नाही. अशा स्थितीत या दुष्ट चालीरीतींना पायबंद घालण्यासाठी जे काय जमेल ते केलेच पाहिजे. परंतु या आणि अशा सांगता येण्यासारख्या अन्य दुष्ट चालीरीतींचे निर्दालन करायचे असेल तर देशातील द्रुतगतीने चालणारे शिक्षण हेच उपयोगी पडेल.

लग्नासारख्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाच्या बाबतीत सुद्धा उघड उघड दिसणाऱ्या दुष्ट चालीरीतींचा प्रतिकार करण्यास नाखूष किंवा असमर्थ, कॉलेजात शिक्षण घेतलेले मुलगे किंवा मुली दिसाव्यात म्हणजे काय ? जी चाल मुळीच समर्थनीय नाही आणि मनाला बोचणारी वाटते ती मानावयाची नाही अशी ताकद तरुणतरुणींत उत्पन्न होत नसेल; तर त्यांच्या शिक्षणाची किंमत काय राहिली ? सामाजिक किंवा अन्य दुष्ट चालींविरुद्ध मुलामुलींना जे

शिक्षण झगडण्यास समर्थ करीत नाही, त्या शिक्षण पद्धतीचा दोष आहे. जीवनाच्या हरएक क्षेत्रात उत्पन्न होणारे प्रश्न सोडविण्याची बुद्धी ज्या शिक्षणाने विद्यार्थ्यांत उत्पन्न होते, त्याच शिक्षणाला किंमत आहे.

मुलींचे लग्न करण्यासाठी मुलींचे बाप कर्ज काढतात. तेव्हा त्यांच्यावर दया करून त्यांना कर्ज देणे हा उपाय नव्हे. खरी मदत म्हणजे अशा मुलींच्या बापांना समजावून सांगणे की, पैसे देऊन वराची खरेदी करू नकोस आणि पैशाच्या ऐवजी जो प्रेमाकरिता लग्न करावयास तयार होईल अशा वराची निवड कर. किंवा आपल्या मुलीला निवड करण्याची परवानगी दे. कर्ज काढणाऱ्या बापांची मते वळविणे हा खरा उपाय आहे. हे करावयाचे तर वरसंशोधनाचे क्षेत्र वाढविले पाहिजे. जात आणि प्रांत हे दुहेरी तट ओलांडले पाहिजेत. हिंदुस्थान जर एक देश आहे तर बेटीबंदीसारखी कृत्रिम कोंडाळी असणे बरोबर नव्हे. या क्रूर चालीत धर्म नाही. 'समाजाच्या चालीरीतीत बदल झाल्याखेरीज एकट्याला रुढीविरुद्ध कसे जाता येईल' असे म्हणण्यात अर्थ नाही. अमानुष चालीरीती व रुढी या धीट व्यक्तींनीच प्रथम पायदळी तुडविल्याखेरीज कोणतीही सुधारणा झालेली नाही.

लग्न हा बाजारी सौदा नाही तर ती एक खरोखरीच मानलेली पवित्र आणि प्रतिष्ठेची गोष्ट आहे असे मानावयाचे आणि लग्नाला आलेल्या बाजारी देवघेवीच्या स्वरूपास मान तुकवायची नाही, असे मुलींनी व त्यांच्या बापांनी ठरवले तर त्यांना काय अडचणी सोसाव्या लागणार आहेत? म्हणून मुलींच्या बापांनी कर्ज मागण्याचे किंवा भीक मागण्याचे सोडून देण्याचे धाडस करावे. तसेच त्याने आपल्या मुलीच्या संमतीने जात अगर प्रांत हे विचारात न घेता योग्य वराची निवड करावी.

■ ■ ■

## 'नाती'

असतात काही नाती

अस्पष्टशी, धूसर

अस्पष्टरित्या साकारणारी.

डोळ्यांच्या आडोश्याला

लपून जगतात ती.

नसते नाव त्यांना.

असतात अशीच.

न बोलण्यासारखी.

पवित्र, तर कधी अपवित्रही.

दिसतात अप्रत्यक्षच.

डोळ्यांच्या सावल्यांना.

क्षणभंगूर जीवनात.

क्षणांसाठी आलेल्या व्यक्तींसाठी

ओवाळतात जीव,

तर कधी घेतातही.

कारण,

ना ती नाती असतात.

**प्रमोद पोखरकर**
तृतीय वर्ष, शास्त्र

# मानव : खरचं पशू की प्राणी ?

प्रमोद पोखरकर
तृतीय वर्ष, शास्त्र

आज सर्वत्र आपण पाहातोच चोहीकडे काहीतरी वादविवाद चाललेले असतात. काही प्रश्न, यक्षप्रश्न बनून तसेच स्थिरावलेले असतात. अशा अनेक प्रश्नांपैकी एक छोटासा व साधा प्रश्न "मानव : खरचं पशू की प्राणी ?'

'लोकशाही'. आज आपण हिची व्याख्याच बदलून टाकूया. "लोकांनी लोकांच्या घातासाठी स्थापीत केलेल्या संस्थेला लोकशाही असे म्हणतात." आज भर दिवसा खून, कत्तली, चोऱ्या होतात. ही लोकशाही (लो-कसाई) आता लोकांवरच उठली आहे. "भारत धर्मनिरपेक्ष देश आहे." हे जे आपण आपल्याबद्दल म्हणवून घेतोय ना, ते आता पुरे केले पाहिजे. याच धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली समाजात उलट फूट पडत चालली आहे. एक अस्पष्टशी ठिणगी देखील संपूर्ण वनाला भस्मसात करून टाकते. इंग्रजांनी भारत सोडून जाताना टाकलेल्या ठिणगीचा हा आज आपण वणवा पाहतोय. तो एक महा भयंकर वणवा आहे, जो माझ्या कल्पनेत तरी दिसणाऱ्या परिस्थितीवरून विझणार असे वाटत नाही. हिंदू-मुस्लिमांची एकमेकांशी लढत पाहिली ना; तर कोंबड्यांची झुंज आठवते. एका चढ एक ! एकही माघार घ्यायला तयार नसतो. पण ही कोंबड्यांची झुंज संपतेही व ते दोन कोंबडे नंतर एकत्र राहतातसुद्धा. पण ही जी युद्धे आहेत ना हिंदू व मुस्लिमांची, ही तर अगदी प्राण्यांना सुद्धा लाजीरवाणी वाटतात ! म्हणजे शेवटी निष्कर्ष काय, पशू कोण ? अलबतं माणूसच !

राजकारण ही एक दुसरी न टळणारी घातक, कदाचित नालायक गोष्ट आहे. खरंच Politics is the dirty game of foolish man, हे सत्य आहे. या राजकारणापायी किती जणांचे प्राण गेलेत, त्या निवडणुकीच्या दंगलीत. आपला उमेदवार निवडून येण्यासाठी काय ती धडपड ! निवडून आल्यावर मग पैसे कसे, कोठून, किती मिळतील याची धडपड. निवडून येण्यासाठी विरुद्ध उमेदवाराला धमकी देणे, मारहाण करणे, खून करणे हे एखाद्या भयंकर श्वापदापेक्षाही भयंकर आहे. पुन्हा एकदा आपली पशूता दाखवून मानव पशू म्हणून सिद्ध झालाय.

श्वापदेसुद्धा आपल्या पोटापुरतेच बघतात. ते स्वार्थी नसतात माणसासारखी, पोट भरलं तरी हाव करणारी. या लोकशाही देशात लोकांना स्वतःला जगण्याचा हक्क जणू नाहीच. आज आहे, उद्या असेलच अशी परिस्थिती जरी कुठे नसली, तरी मुंबईत तर शंभर टक्के आहे. बॉम्बस्फोटाची अनपेक्षित घटनेची भीती. याच मुंबईत रिंकू पाटील सारख्या मुलीचा पोलिस बंदोबस्तामध्ये भर दिवसा शाळेमध्ये रॉकेल ओतून, तिचा जाळून खून करण्यात येतो ! ही कसली लोकशाही ? आपली व्याख्याच बरोबर आहे) याच मुंबईत अँटॉप हिलवर बलात्कार होतात. कसली रे ही मानवता ? (नव्हे पशूता). आपण या प्राण्यांच्या कृत्यांच्या तुलनेत इतके पुढे गेलोय की, आपला हातच ते धरू शकत नाहीत. मला तर असंच वाटतंय की प्राणीच आपल्याला पशू म्हणून संबोधीत असतील ! नाहीतरी त्यात काय वावगे आहे ?

प्रदूषण ही एक प्रचंड उत्पत्ती निर्माण करून मानवाने जणू स्वतःच्या पायावर धोंडाच मारून घेतलाय. त्याचे परिणाम म्हणजे निसर्गाकडून मानवाला मिळालेला क्रूर

शाप होय. जगातील संपूर्ण पाण्यापैकी एक टक्का पाणी गोड आहे, की जे आपण नदी, तळे, तलावातून घेतो. त्यातही माणसाने आता आपली लुडबुड सुरू केली आहे. कंपन्या, कारखान्यांतून, सांडपाण्यातून निघणारे पाणी हे इतके प्रदूषित असते की, त्याची कल्पनाच केलेली बरी, ज्यामुळे प्रचंड प्रमाणात रोग उद्‌भवतात. मानवाने स्वतःच स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून आपली मूर्खता सिद्ध केली आहे. वाईट एवढंच वाटते की, तीच कुऱ्हाड या बिचाऱ्या निष्पाप प्राण्यांच्यावर सुद्धा पडली आहे ! मला आठवतोय तो शाप निसर्गाचा– " हे मानवा, तू ज्या ज्या सुखसोयींचा नाश करण्याचा प्रयत्न करशील, त्या त्या वेळी मी अवतीर्ण होऊ नैसर्गिक शक्तीचा तुला धडा देईल." किल्लारीच्या भूकंपातून निसर्गाने आपल्या शापाची पुन्हा एकदा मानवाला आठवण करून दिली आहे.

■ ■ ■

## पुरावा

हळूच झुकणाऱ्या नजरेला,
मी नीट पाहिले होते,
ती माझी झाली होती,
हास्यात पुरावे होते.

एकच चुकार तारा,
शुक्राचा होता गगनी,
ती माझी झाली होती,
मौनात पुरावे होते.

रुसव्यात पुरावा नव्हता,
आसवेच नयनी,
ती माझी झाली होती,
अश्रूत पुरावे होते.

**सूर्यकांत पाटणे**
द्वितीय वर्ष, वाणिज्य

## तुझ्याशी मी बोलणार नव्हतो

आठवणींचा शिशिर चालू झाला होता.
एका एका आठवणींना चालना मिळाली
पण त्याच वेळी
आठवणींना गळती लागली होती.

तू परत परत हसत होतीस
कारण शिशिर संपला होता
वसंत आला होता
असाच शिशिर-वसंताचा
पाठशिवणीचा खेळ !

तू एकच स्मित असं द्यायचीस की
पुन्हा वसंत यायचा !
अन् तू असा एक तिरस्काराचा
कटाक्ष टाकायची की वसंताची
पालवी झडून ....

शिशिर चालू व्हायचा
पुन्हा शिशिर, पुन्हा वसंत.
नुसता लपंडाव ....
शिशिरात तू नजरेस नजर मिळवली
माझ्या आशेला नवी पालवी फुटली
पहिल्या पावसाने वसुंधरेला कोंब
फुटावेत ....
तशी माझी आशा पालवली.
पुन्हा हिरवे धुमारे फुटू लागले
जणू धरित्री हिरवा चुडा भरून
हिरवी शाल पांघरून नटून थटून बसली.

**राहुल कदम**
द्वितीय वर्ष, शास्त्र

# अंतराळविश्वातील भारत

**विनोद फुगे**
तृतीय वर्ष, शास्त्र

इजिप्तच्या पाठोपाठ अतिप्राचीन संस्कृती असलेला एकमेव देश म्हणजे आपला भारत. आपल्या भारत देशाने खूप पूर्वीपासूनचा ऐतिहासिक ठेवा जपून ठेवला आहे. सुजलाम् सुफलाम्, विविधतेने नटलेल्या या भारत देशाने प्राचीन सभ्यता टिकवून आधुनिक विश्वात यशस्वीरित्या प्रगती केली आणि या धावत्या विज्ञान युगात आम्हीही मागे नाही हे सिद्ध केले. अशा या अंतराळ युगात स्वतःचे, भारतीय बनावटीचे उपग्रह जन्माला आले, ही एक खरोखरच अभिमानाची बाब आहे.

भारतीय बनावटीच्या उपग्रहांनी अवकाशात आतापर्यंत यशस्वी कार्य केलेले आहे. हे उपग्रह तंत्रशास्त्राच्या दृष्टीने उत्तम दर्जाचे असून अंतरिक्ष तंत्रज्ञानाच्या शांततापूर्ण विकासात्मक उपयोगाच्या दृष्टीने जगभरात उच्च समजले जातात. या भारतीय उपग्रहांद्वारे दूरध्वनी, दळणवळण, दूरदर्शन प्रसारण, हवामानाचा अंदाज, कृषी, जंगले व खनिजे या संबंधी महत्त्वाची माहिती पुरविण्यात येते. आणि यातूनच जनजीवन सुखकर, सुरळीत होण्यास बहुमोलाचे कार्य घडते.

असा हा भारतीय अंतरिक्ष कार्यक्रम सन १९७२ मध्ये स्थापन करण्यात आला. अंतरिक्ष विभागामार्फत भारतीय अंतरिक्ष संशोधन संस्था (ISRO) कार्यान्वित आहे. या संस्थेतर्फे विकास, उड्डाण आणि अंतरिक्ष योजनांचे कार्यक्रम या संदर्भात महत्त्वपूर्ण भूमिका बजाविण्यात येते. अंतरिक्ष विभागाची मदत राष्ट्रीय प्रयोगशाळा आणि भौतिक संशोधन प्रयोगशाळा यांनाही होते.

या उपग्रह मालिकेतील आपल्या यशाची घोडदौड पुढीलप्रमाणे : प्रायोगिक उपग्रहांमध्ये पहिला म्हणजे —

**आर्यभट्ट :**

आर्यभट्ट हा उपग्रह अंतरिक्षात शास्त्रीय प्रयोग करण्यासाठी यशस्वीरित्या विकसीत करण्यात आलेला पहिला भारतीय उपग्रह आहे. ३६० किलो वजनाचा हा उपग्रह १९ एप्रिल १९७५ रोजी रशियन इंटर् कॉसमॉस रॉक्टद्वारे सोडण्यात आला होता. या उपग्रहामुळे अंतरिक्ष तसंच जमिनीवरच्या योजनांसाठी आरेखन, उभारणी आणि एका पूर्ण उपग्रहाच्या कार्यान्वयासाठी अनुभव मिळाला. यामध्ये क्ष-किरण, खगोलशास्त्र, सौर भौतिक शास्त्र आणि अंतरिक्ष शास्त्रासाठी तीन यंत्रणा बसविण्यात आल्या होत्या.

**भास्कर १ आणि २ :**

हे दोन्ही प्रायोगिक पृथ्वी निरीक्षण उपग्रह होते. हे सन १९७९ साली सोडण्यात आले होते. यामध्ये दोन टीव्ही कॅमेरे, मायक्रोवेव्ह रेडियोमीटर बसवण्यात आला होता. या उपग्रहांचा उपयोग एशियाच्या इंटरकॉसमॉस रॉक्टद्वारे सोडण्यात आले.

**ॲपल :**

ॲपल हा भारतानं तयार केलेला पहिला प्रायोगिक भू-स्थिर दळणवळण उपग्रह होता. युरोपियन अंतरिक्ष संस्थेच्या (ESA) एरिएन उड्डाणाद्वारे हा १८ जून १९८१ रोजी सोडण्यात आला. ॲपलमुळे भूस्थिर दळणवळण उपग्रहांच्या बांधणी आणि कार्यान्वयासाठी बहुमूल्य अनुभव मिळाला. या उपग्रहाचा रेडिओ नेटवर्किंगसाठी खूप उपयोग झाला. यामध्ये संगणक वापरण्यात आला होता.

**रोहिणी मालिका :**

वैज्ञानिक उपग्रहांची रोहिणी मालिका भारतीय

बनावटीच्या एस्. एल. व्ही. ३ या उपग्रह उड्डाण यानावरून सोडण्यात आली. वाढीव रोहिणी मालिकेतील स्रॉस (Sross) हा उपग्रह २० मे १९९२ रोजी पृथ्वी जवळच्या कक्षेत सोडण्यात आला.

**इनसॅट यंत्रणा :**

भारतीय अंतरिक्ष कार्यक्रमाने देशाच्या दूरसंदेश दळणवळण, टेलिव्हिजन प्रसारण आणि हवामानविषयक माहितीसाठी ऑगस्ट १९८३ मध्ये इनसॅट १-ब हा बहुउद्देशीय भूस्थिर उपग्रह सोडण्यात आला. इनसॅट हा अंतरिक्ष विभाग, दूरसंदेश दळणवळण विभाग, भारतीय हवामान विभाग, आकाशवाणी आणि दूरदर्शनचा संयुक्त प्रकल्प आहे. इनसॅटची पहिली पिढी ही परदेशातून आणण्यात आली होती. त्यात भू-छायाचित्रणासाठी एक उच्च शक्तीचा रेडिओमीटर बसविण्यात आला होता. यामध्ये टीव्ही प्रसारणासाठी उत्तम सोय होती. अमेरिकेच्या डेल्टा उड्डाण वाहनावरून १२ जून १९९० रोजी पाठविण्यात आलेला इनसॅट १-५ हा उपग्रह ऑगस्ट १९९० मध्ये आपल्या आयुष्याची निर्धारित सात वर्षे पूर्ण केलेल्या इनसॅट १-ब च्या जागी कार्य करत आहे.

**इनसॅट २ उपग्रह :**

इनसॅट उपग्रहांची दुसरी पिढी पूर्णपणे भारतात बनविण्यात येत आहे. या मालिकेतील पहिला उपग्रह इनसॅट २-अ हा १० जुलै १९९२ रोजी एरियन या उड्डाण यानावरून पाठवण्यात आला. इनसॅट- २ उपग्रहांकडे पहिल्या पिढीतील इनसॅट पेक्षा ५० टक्के जास्त क्षमता आणि उच्च-धारकता आहे. दोन उच्च शक्ती एस्-बॅन्ड टीव्ही प्रसारण संवाहक यामध्ये आहेत.

इनसॅट-२ मालिकेतले इनसॅट-२ क, इनसॅट-२ ड आणि इनसॅट-२ इ हे आणखी तीन कार्यान्वित उपग्रह तयार करण्याचे काम चालू आहे. इनसॅट उपग्रहांच्या कक्षावृद्धी आणि सतत कक्षांतर्गत कार्यावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी कर्नाटकातल्या हसन इथल्या मुख्य नियंत्रण कक्षातून पार पाडण्यात येते. इनसॅट मालिकेतील २ ब हा उपग्रह नुकताच २३ जुलै १९९३ रोजी सोडण्यात आला. या उपग्रहामध्ये दोन उच्च शक्ती दूरदर्शन प्रसारण संवाहक बसविण्यात आले आहेत. आणि म्हणूनच दूरदर्शनवर पाच प्रमुख वाहिन्या चालू झाल्या आहेत. त्यामध्ये मनोरंजन, विज्ञानविषयक माहिती, संगीत, क्रीडाविषयक माहिती, इत्यादींचा समावेश आहे. या वाहिन्या आपण डिश - अँटेनाद्वारे पाहू शकतो.

**इनसॅट यंत्रणेचे प्रमुख उपयोग :**

- १२६ भूस्थिर केंद्रामधून अनेक शहरं, गावं आणि दुर्गम भागांना विश्वासार्ह टेलिफोन सेवा पुरविणे.
- खात्रीलायक माहिती देवाणघेवाणीसाठी संगणक संजाल पुरविणे.
- ७५ टक्के लोकसंख्येला टेलिव्हिजन प्रसारण पुरवण्यात आणि विभागीय कार्यक्रमांसाठी मदत करणे.
- स्वयंचलित चक्रीवादळ दुर्घटना इशारा सुविधा.
- ग्रामीण दूरसंदेश वहन संजालाला मदत करणे.
- हवामान निरीक्षण आणि त्याविषयीच्या माहितीचे खात्रीलायकरित्या तत्परतेने प्रसारण करणे.
- तातडीचे दळणवळण आणि शोध आणि मदत कार्याला सहाय्य.

ISRO उपग्रह केंद्र हे बंगलोर येथे आहे. हे केंद्र वैज्ञानिक, तंत्रशास्त्रीय, कार्यान्वयन मोहिमांसाठी उपग्रह यंत्रणाचे आरेखन, निर्मिती, चाचणी आणि व्यवस्थापन करण्याची जबाबदारी पार पाडते. आणि मुख्य नियंत्रक कक्ष हे कर्नाटकामध्ये हसन येथे आहे. हे कक्ष उड्डाणपश्चात कार्याची जबाबदारी संभाळते.

विज्ञान-मोहिमेत भारताने सक्रिय सहभाग घेतला होता आणि घेत राहील. भारतीय बनावटीच्या उपग्रहांची भविष्यात वृद्धी केली जाईल. हे असेच सातत्य राखण्यासाठी जास्तीत जास्त आर्थिक आणि नवशास्त्रीय यश मिळविण्यासाठी युवावर्गाने प्रयत्नशील राहावे म्हणजे आपल्या यशाची ही मालिका अशीच वृद्धिंगत होईल आणि देशाचा लौकिक होईल.

# मुलगी : शाप की वरदान ?

नारंगी चौधरी
प्रथम वर्ष, वाणिज्य

मुलगी ! मुलगी म्हटली की आज प्रत्येकाच्या कपाळावर लगेच आठ्या पडतात. मग ती कितीही श्रीमंत किंवा सुधारलेले घराणे असो, कुठे ना कुठे तरी छोटीशी खंत ही त्यांना लागून राहिलेली असते. आता ही मुलगी आहे आणि आपण हिला खूप जपलं पाहिजे असं प्रत्येकाचं मत होतं. पण का ? मुलगी झाली म्हणून काय झालं ? ती सुद्धा इतर प्राण्यांसारखीच एक सजीव प्राणी आहे. तिलाही इतरांसारखेच दोन हात व दोन पाय आहेत. मग मुलगी म्हटली की लोकांना काळजी का वाटते ?

आज मुलींच्या किंवा सुनांवरील अत्याचाराबाबत आपण नेहमीच काही ना काही वाचत असतो, ऐकत असतो किंवा पाहात असतो. त्या वेळेस आपणाला कित्येकांकडून असंही ऐकायला मिळतं की, जे काही होत आहे ते ठीक नाही. पण काही काळाने हीच मंडळी इतरांसारखी वागू लागतात. आज असं म्हटलं जातं की, मुलगी काय अन् मुलगा काय, दोन्ही सारखेच. पण हे विचार खूप थोड्या लोकांत रुजू झालेले आहेत. आपल्या देशामध्ये, कित्येक जातींमध्ये, समाजामध्ये मुलींना आजही त्याच हालअपेष्टा सहन कराव्या लागतात. ज्या आधीच्या मुलींनाही सहन कराव्या लागत. विशेषतः खेडेगावातून आजही मुलींच्या शिक्षणाला कित्येक अडथळे येतात. त्यातून एखादी हुशार मुलगी असेल आणि तिला शिकण्याची खूप इच्छा असेल, तर हा समाज तिला शिकू देणार नाही. तिच्या प्रत्येक कामात अडथळे निर्माण करतो आणि त्या मुलीच्या इच्छांवर, आशांवर काळे धूर पसरले जातात. तिची स्वप्ने ही स्वप्नेच राहतात, ती कधीच साकार होऊ शकत नाहीत.

खेडेगावातच नाही, तर आज शहरातही असे कित्येक लोक आहेत की, जे फक्त समाजाच्या नावाखाली मुलींचा छळ करीत असतात. धर्म, संस्कृती यांच्या नावावर निष्पाप मुलींच्या इच्छांचा, भावनांचा बळी दिला जातो. पण ती मुलगी काही करू शकत नाही कारण कोणीही तिच्याबरोबर नसतो. ती एकटी असते. खरं तर ती एकटी पडत नाही, तर हा समाज तिला एकटी राहण्यास भाग पाडतो. मग शेवटी तिला सगळ्यांचे ऐकावेच लागते. ती एकटी काय करणार ? आणि जरी एखादी स्त्री किंवा मुलगी बंड करून उठली तरी हा समाज तिला खाली दाबण्यासाठी अगदी खालच्या पातळीला जाऊन पोहोचतो. शेवट ती स्त्री हताश होते, निराश होते. एखादी स्त्री यशस्वी होते देखील; पण त्यांची संख्या फारच कमी असते. अगदी बोटावर मोजण्याइतकी. यासाठी कित्येकांचा बळी जातो आणि या भयाने कोणीही पुढे येण्यास तयार नसतो.

दरवर्षी निवडणुका होतात आणि आपलं सरकार नुसती आश्वासनं देत राहतं की, 'आम्ही हे करू ते करू.' पण हे सगळं काही कागदांवरच राहातं. सगळ्यांना थोडासा पैसा दिला की, ज्या काही सुधारणा व्हायच्या आहेत, त्या फक्त कागदांवरच होतात. आज फक्त महाराष्ट्र, मुंबई यासारखे काही भागच सुधारलेले आहेत. बाकी सगळीकडे आजही धर्म आणि संस्कृतीची माला जपली जाते. खरं तर धर्म आणि संस्कृती आपल्याला हे शिकवत नाही की, तुम्ही मुलींवर अत्याचार करा, त्यांच्याद भेदाभेद करा. मग

हे सारे आले कुठून ?

विशेषतः राजस्थानमध्ये आजही मुलींवर तितकेच अत्याचार आणि अन्याय होतात. पण हे तर मुलींनाच उमजत नाही. कारण त्यांची सद्सद्विवेकबुद्धी ही अगदी सपाट असते, तिला कुठेही धारच नसते. आणि त्यामुळे त्यांनी विचार करण्याची शक्ती गमावलेली असते. पण ह्या सर्वांना एकच कारण आहे आणि ते म्हणजे निरक्षरता. जर कोणी शिकलंच नाही तर तो विचार कसा करेल ? आणि काय विचार करणार ? त्यांच्यात काही गोष्टी इतक्या रुजलेल्या असतात की त्या चांगल्या नाहीत हे मान्य करायला ते मुळी तयारच होत नाहीत. आजही राजस्थानमध्ये बालविवाह मोठ्या प्रमाणावर होतात. अगदी पाळण्यात लग्नं होतात. बिचारे ते निष्पाप दोन जीव, ज्यांना अजून बोलताही येत नाही, ते आपल्या जन्माच्या साथीदाराला काय ओळखणार ? बरं, मोठे झाल्यावर समजा मुलगा वाईट निघाला तर काय करणार ? त्या मुलीचं तर आयुष्य उमलण्यापूर्वीच मावळून गेलेलं असणार.

पण कोणीही या विरुद्ध आवाज उठवत नाही. कारण आजच्या या जगात कुणाला इतका वेळच नसतो की कुणाची सुखदुःखं वाटून घ्यावी, त्यांच्याबरोबर मनमोकळेपणाने काही बोलावे आणि त्यांचे दुःख हलके करावे. पण हे सर्व मुलींवरच का म्हणून ? शेवटी मुलींनी असा कोणता अपराध केला आहे की, ज्याची तिला इतकी मोठी शिक्षा भोगावी लागत आहे ? तिलाही इतरांसारख्या भावना आहेत, तिच्याही आपल्या जीवनाबद्दल काही आशा आहेत, हे या समाजाने का समजावून घेऊ नये ? खरंच मुलींबरोबरच असं का होतं ? याच उत्तर मला मिळेल का ?

आज आपल्यापुढे अशा कितीतरी मुलींची उदाहरणे आहेत की, त्यामुळे तरी ह्या झोपलेल्या समाजाला जाग येईल. पण हे तेव्हाच शक्य होईल, जेव्हा त्यांच्या डोळ्यांवरची खोट्या चालीरीतींची पट्टी काढली जाईल. मुलगी ही देखील एक वरदानच आहे. आज असं कोणतंही काम नाही की जे मुलगी करू शकत नाही. कारण प्रत्येक क्षेत्रात स्त्री [illegible]वी [illegible]त्येक व्यवसायात तर ती पुरुषांच्याही पुढे गेली आहे. तेव्हा या कुजलेल्या, मागासलेल्या समाजाला माझी अगदी मनापासून विनंती आहे की, आता तरी आपल्या डोळ्यांवरची पट्टी उघडा. मुलींना शिकू द्या, त्यांच्या इच्छा पूर्ण होऊ द्या, भावना फुलू द्या, त्यांना 'शाप' नाही 'वरदान' माना.

■ ■ ■

## जगतो आम्ही

जगायचे म्हणून जगतो आम्ही
काळयाभोर अंधारात.

खळगी भरावयाची म्हणून भरतो आम्ही
उपवासाच्या विळख्यात.

मुले संभाळायची म्हणून संभाळतो आम्ही
कचऱ्याच्या पेटाऱ्यात

त्यांना जगवायचे म्हणून जगतो आम्ही
पापी संसाराच्या पिंजऱ्यात

जगात चालायचे म्हणून चालतो आम्ही
अमावस्येच्या उजेडात

पिढ्यान् पिढ्या हे आले जन्मी आमच्या
रीत पाळायच्या नादात.

जगायचे म्हणून जगतो आम्ही
उघड्या छताच्या घरात
आणि भविष्याच्या काळयाभोर अंधारात.

**पूर्णिमा अ. काळे**
एस्. वाय. बी. एस्सी. (ब

# चूक कोणाची ?

**दिपाली चोंधे**
द्वितीय वर्ष, वाणिज्य

आजचा बहुचर्चित विषय म्हणजे आजची बिघडलेली तरुण पिढी. आजचे तरुण बिघडले आहेत. . . त्यांच्यावर वेळीच संस्कार केले नाहीत— अशा प्रकारचे लेख आजकाल सतत वर्तमानपत्रे, मासिके यामध्ये प्रसिद्ध होत असतात. पण हे लेख वाचून दुःखाचे सावट आल्यासारखे वाटले. कारण हा आरोप काही तरुणांवरच झाला नाही तर साऱ्या तरुण पिढीवर झाला आहे.

बरेचदा आजी-आजोबा, वरिष्ठमंडळी यांच्या तोंडून 'काय ही बिघडलेली आजकालची तरुण - पिढी ?' असा उल्लेख होतो. पण आपणास माहीत आहे का ? हे आजचे (आम्ही) तरुण का बिघडलो ? अनेक विचारवंत या विषयाबद्दल महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी चर्चा करतात. आणि याविषयी कारणे शोधून काढतात. माझ्या मते याविषयी बरीच कारणे अभ्यासली जाऊ शकतात. केव्हाही आपल्या पुढील पिढी ही हुशारच असते. पण या हुशारपणाचा उपयोग काही तरुण, तो वेगवेगळ्या कारणाकरता करतात. त्यापैकी काही तरुण तो स्वार्थ्याकरिता तर काही देशाच्या उन्नतीकरिता किंवा रक्षणाकरिता करतात. कारण ज्या जगात आपण सर्वजण वावरत आहोत, ते जगच मुळी स्पर्धात्मक जग आहे.

'स्पर्धा' हे मुख्य कारण या प्रश्नाचं असेल असे मला नेहेमी वाटते. प्रत्येक तरुण-तरुणींमध्ये अनेक प्रकारच्या असंबंधित स्पर्धा चाललेल्या असतात. 'सुंदर असणे' हे प्रत्येकाच्या हातात नसते; पण तरीसुद्धा आजकाल सौंदर्यस्पर्धा होत असते. या स्पर्धेमुळे प्रत्येक तरुण आपण कसे सुंदर दिसू या बाबतीते प्रयत्नशील असतात. त्यामुळे गल्लोगल्ली ब्युटी-पार्लर्स थाटलेली दिसतात. आणि एक पैसा कमाविण्याचे साधन उपलब्ध होते. येथूनच सुरुवात होते हेव्यादाव्याला.

हा हेवादावा लहानपणापासून संस्काराबरोबरच शिकवला जात असावा. एखाद्या लहान मुलीला, समजा तिच्या मैत्रीणीने एखादी नवीन वस्तू दाखविली, तर साहजिकच त्या मुलीला ही वस्तू आपल्याकडेही असावी असे वाटेल; पण अनुभवाचे बोल असे की, " जर ती वस्तू तिच्याकडे आहे तर माझ्याकडे का नाही ?" असे लहान मुलीच्या तोंडून शब्द बाहेर पडतील. आणि आईवडीलही ती वस्तू मुलीला घेऊन देतील; पण तिला आपल्या परिस्थितीची जाणीव करून देतील असे मला वाटत नाही. त्यासाठी आई-वडील कोणत्याही प्रकारची कामे करण्यास तयार असतील. आजकालची मध्यमवर्गीय मुले/ मुलीही कॉलेजला (शाइन) रुबाब दाखवण्याकरता गाड्या घेऊन येतात. मग परिस्थितीची जाणीव असताना ते सायकलवरून किंवा बसने कॉलेजला का येऊ शकत नाहीत ? याचे कारणही हेवादेवा हेच असावे असे मला वाटते. श्रीमंती थाटात वाढलेल्या मुलांची तर गोष्टच सोडून देणे चांगले. कारण त्यातील प्रत्येकालाच कष्टाची, पैशाची जाणीव असते असे मी सांगू शकत नाही.

आजचे चित्रपट व्यवसायही या विषयाला कारणीभूत असू शकतील. अनुकरण करणे हा मानवीस्वभाव. धर्मामुळे अनेक मासूम बळी पडले आहेत. उदा. रिंकू पाटील

खूनप्रकरण, फर्गसन कॉलेजमधील खून आणि आत्महत्या, असे अनेक बळी पडले असतील. आपले इंप्रेशन पाडण्याकरिता तरुण चोऱ्यामाऱ्याही करतात. अर्थात हा परिणाम चित्रपटांचाच. आणि झटपट पैसा कमविण्याचा मार्ग शोधू लागतात. काहीजण स्वार्थ साधतात तर काही जण देशाची उन्नती व संरक्षण करतात. उदा. पैसा कमावण्यासाठी दाउद इब्राहिमसारखे देशद्रोही बनतात. या बाबतीत काही शिक्षकही मागे नाहीत. हे शिक्षक शाळेत व्यवस्थित न शिकवता मुलांना शिकवण्या लावण्यास सांगतात. आणि बाहेरून पैसे कमवितात. आजकाल राजकारणात होणारा भ्रष्टाचार, लाचलुचपतखोरी ही सुद्धा शिक्षकांमध्ये येऊन पोहोचली आहे किंवा ते सुद्धा या मोहातून सुटले नाहीत. परवाचीच गोष्ट, एका शिक्षकाने १२ वी (ऑक्टो.) इंग्रजीची प्रश्नपत्रिका एका विद्यार्थ्याला रु. ४०० ला विकली. पण मोहापायी शिक्षकच विद्यार्थ्याला धमकी देऊन पैशाची मागणी करू लागले. मग गुरूची विद्या गुरूलाच म्हणून त्या विद्यार्थ्याने आपल्या मित्राबरोबर त्या प्रश्नपत्रिकेची झेरॉक्स काढून ही बातमी पेपरमध्ये छापण्याची धमकी शिक्षकाला दिली आणि शिवाय हे गुपित राखण्यासाठी दहा हजार रुपयांची मागणी केली.

आजचे तरुण विद्यार्थी हे उद्याचे भावी नागरिक आहेत आणि जर त्यांच्यावर अशा प्रकारे संस्कार शाळेपासूनच झाले तर ही चूक कोणाची? समाजाची की त्या विद्यार्थ्याची? तसेच आजकाल महाविद्यालयीन प्रवेशासाठी. उदा. मेडिकल, इंजिनिअरिंग. मध्यमवर्गातील पालकही लाखो रुपयांच्या भाषेत बोलायला तयार असतात. पण एवढे करूनही यश येईल की नाही हे सांगता येत नाही. कारण इथेही थोडी हातचलाखीची अनोखी कला आहे. अनेक हुशार विद्यार्थी परिस्थितीमुळे आणि पश्चात्तापात स्वतःला मृत्यूच्या खाईत लोटून देतात. आमच्यासारख्या तरुणांची भांडखोरवृत्ती आणि एकमेकांबद्दल द्वेष होण्यालाही हा समाजच कारणीभूत आहे. कारण हाच समाज अनेक छोटे-मोठे वाद सरकारसमोर मांडून वेळ घालवत असतो. उदा. रामजन्मभूमी - बाबरी मश्जिद, मराठवाडा विद्यापीठ नामांतर बंद, दंगली यासारख्या हिंसक प्रकारांना खतपाणी देत राहातात. आणि शिवाय "आम्ही सारे एक आहोत" अस म्हणून तोंडाची वाफ वाया घालवतात. त्याऐवजी जर थोडाफार युवक, त्यांच्या समस्या, त्यांचे आरोग्य, आवडनिवड, खेळ याकडे लक्ष दिले, तर आपला सर्वांचा भारत स्वसंरक्षणासाठी तयार राहील आणि एकजूट वाढीस लागेल.

बरेचदा याबाबतीत मला जपानी लोकांची आठवण येते. हे लोक आपला वेळ मुळीच गप्पागोष्टीत किंवा इतर गोष्टीत वाया घालवत नाहीत. ते सतत काहीतरी नवीन करण्याच्या प्रयत्नात असतात. नाहीतर आपल्या भारतातील लोक बराच वेळ गप्पागोष्टीत घालवतात. फार दूरची गोष्ट नाही. पण संध्याकाळ असो व दुपार असो, फर्गसन कॉलेज रोडवरील, हॉटेलमध्ये, तरुण - तरुणी आपला अमूल्य वेळ घालवत असतात. ही गोष्ट मनाला फार खटकते. ज्ञान संपादन करण्याचे वय फक्त वयाच्या २५शी पर्यंतच असते. मग आपण विद्यार्थी असा वेळ आळशीपणामुळे की संस्कारामुळे वाया घालवतो ?

माझी अशी इच्छा आहे की, मी व माझ्या सर्व मित्र--मैत्रिणींनी या देशाची उन्नती कशी होईल याबाबतीत सखोल अभ्यास करावा. आणि आम्ही ती करण्याचा सदैव प्रयत्न करू. आपल्या सुंदर, संस्कारक्षम भारताला भ्रष्टाचार, लाच-लुचपत, खून, मारामाऱ्या या दुष्ट रूप घेतलेल्या राक्षसाचा वध करूया. मग आपली तरुण पिढी सुधारण्यास वेळ लागणार नाही. आणि आपल्यासारख्या सुसंस्कृत, सुशिक्षित नागरिकांमुळे भारत सुखी होईल, अशी आशा करू.

■ ■ ■

# बदलत्या पर्यावरणातील मानवाची कार्ये

प्रमोद पोखरकर
तृतीय वर्ष विज्ञान

'निसर्गाकडे चला' कित्येक दशकापूर्वी रूसो यास उमगलेले सत्य आज कुठेतरी प्रतिबिंबित होत आहे. ज्या वेळी 'निसर्गाकडून चला' म्हणण्याची वेळ होती, त्या वेळी रूसोसारख्या चाणाक्ष नजरेने मानवी कृतीला हेरलं व त्याने त्याच वेळी असा निश्चय केला की, आपण पर्यावरणाला जपलेच पाहिजे.

सुमारे ४०० कोटी वर्षापूर्वी पहिली जैवीकपेशी पृथ्वीवर उगम पावली. त्यानंतर कित्येक वनस्पती, प्राणी, कीटक या सारखे जीव उदयास आले. वनस्पतींच्या असंख्य पेशी निर्माण झाल्या. त्यानंतर आजपासून सुमारे २ ते ३ लक्ष वर्षापूर्वी मानव पृथ्वीवर अवतरला व ४०,००० वर्षापूर्वी त्याचे आधुनिक मानवात रूपांतर झाले. मानवाने स्वत:ला सभोवतालच्या बदलत्या पर्यावरणाप्रमाणे जुळवून घेतले. असा प्रचंड बदल इतर कोणत्याच प्राण्याला स्वत:त करून घेता आला नाही. मानवाने त्यानंतर अग्नीची निर्मिती केली. हत्यारेसुद्धा तो बनवू शकत होता. कित्येक वर्ष निसर्गावर या मानवी कृत्याचा तसूभरही परिणाम झाला नाही व जरासुद्धा फायदा झाला नाही. त्यानंतर त्याला उदरनिर्वाहाची व जगण्याची चिंता भासू लागली. मग तो निसर्गावर अवलंबून राहू लागला. त्याच्या या कृत्यांमुळे निसर्ग अजिबात विचलित होत नव्हता. आज आपण पाहतोच की नॉर्मंडिक समाजातील काही शिकारी तात्पुरत्या निवासासाठी दक्षिण अफ्रिकेतील जंगलातील काही पृष्ठभाग साफ करतात. काही दिवसांनी मुळ्या, फळे व काही प्राणी मारून, तेथून ते निघून जातात. मग काही दिवसातच तोच पृष्ठभाग परत आपल्या मूळच्या स्थितीस येतो. १०,००० वर्षापूर्वी मानवाने बी पेरून त्यापासून झाड तयार होण्याचे तंत्र हेरले. मग त्याने झाडावरून वाऱ्याने उडणाऱ्या बिया, त्याचे अंकुरण, मग त्याचे मोठ्या रोपट्यात कसे रूपांतर होते याचे नीट निरीक्षण केले. प्रत्येक हंगामात त्याला तेच दृश्य दिसे. संपूर्ण निरीक्षणानंतर त्याने तीच रोपटी एका ठरविक जागेत लावली व त्याचे उत्पन्न तो घेऊ लागला. त्याचा परिणाम असा झाला की, तो एकाच जागेवर स्थायिक झाला. त्यानंतर तो इतर तंत्रज्ञान विकसीत करण्यावर भर देऊ लागला. उदा. विणकाम, लोहार, सुतार, कुंभार. शेतीमुळे हळूहळू धान्याचे उत्पन्न त्याच्या गरजेपेक्षा वाढू लागले. त्यानंतर समाजात दोन भाग पडले गेले. एकात शहरी समाजाचा विकास व दुसऱ्यात शेतकरी समाजाने मूळ परिसरापासून सर्व दिशांना समान पसरणे. या ठिकाणी मानव खूपच शहाणा, चाणाक्ष व विचारी झाला होता.

सर्व समाज एकाच ठिकाणी स्थायिक झाला होता. एकमेकात तंत्रज्ञानाचे दळणवळण होत होते. कृषीविषयक युक्त्या तो अभ्यासू लागला. खूपच वर्षापूर्वी मानवाला उमगले होते की सतत लागवड केल्याने जमिनीची जनन-क्षमता कमी होते व त्यामुळे उत्पन्नही घटते. त्या वेळी भरपूर प्रमाणात जमीन उपलब्ध होती; पण त्यात लागवडीखालील जमीन कमी प्रमाणात होती म्हणून मानवाने 'पाळीपाळीने लागवड' (Shifting Cultivation) या पद्धतीचा वापर सुरू केला. या पद्धतीत मोठ्या जमिनींपैकी

एखादा तुकडा निवडायचा व त्या जमिनीच्या तुकड्यात उत्पन्न काढायचे. जेव्हा त्या जमिनीच्या तुकड्यात खालावलेल्या जननक्षमतेचे चिन्ह दिसू लागे, शेतकरी पुन्हा दुसऱ्या तुकड्याकडे वळे. अशा प्रकारे ते जीवन कंठीत असत. त्यानंतर काही दिवसांनी पुन्हा पहिल्या तुकड्यात जननक्षमता दिसू लागे. पण जसजशी लोकसंख्येत अवास्तव वाढ होऊ लागली, तसतशी अन्नाची कमतरता भासू लागली. जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली येऊ लागली. पाळीपाळीने लागवड म्हणजेच स्थलांतरित लागवड पूर्णपणे बंद झाली. मानव जंगले नष्ट करून ती जमीन लागवडीखाली आणू लागला. उष्ण व समशितोष्ण कटीबंधातील मानवाने शेतजमीन मिळावी म्हणून जंगले नष्ट करून टाकली. त्यानंतर लोकसंख्येबरोबरच मानव नवनवीन पिकांच्या जाती, पद्धती शोधून काढू लागला. थोड्याशा जागेत तो प्रंचड प्रमाणात उत्पन्न घेऊ लागला. आपण एक उदाहरण घेऊ. मध्यंतरी राहुरी कृषी विद्यापीठाने अशीच एक जात विकसीत केली होती की, ज्यांत एकाच रोपट्याला वर टोमॅटो व जमिनीत मुळास बटाटा होता. या रोपट्याचे नावही त्यांनी 'पोमॅटो' ठेवले. पोमॅटो म्हणजे Potato व Tomato चे मिश्रण. काही कालावधीनंतर ही जात खूपच मागे पडली. कारण ही जात अपेक्षेपेक्षा खूपच कमी उत्पन्न देत होती. पण आंब्याच्या जातींमध्ये झालेली प्रचंड उलथापालथ आपण दृष्टीआड करू शकत नाही. हापूस, पायरी, रत्ना, अल्फान्सो, आम्रपाली, लांगरा अशा अनेक जाती संकर घडवून आणून त्यात दैदिप्यमान कामगिरी करण्यात मानवाने यश मिळविले आहे. थोड्याशा जागेत भरपूर उत्पन्न व भरपूर पैसा मिळवून देणारे हे एकमेवाद्वितीय उदाहरण आहे. मानव या जमिनीच्या हव्यासापायी पर्यावरणाच्या समतोलात पाहिजे तेव्हा हस्तक्षेप करू लागला. शेती ही मानवाने निसर्गात केलेली प्रचंड लुडबुड. हजारो वर्षे वृक्षांनी हवामानाशी व धूपदाबाशी स्थापित केलेला समतोल आपण पाहतोच आहो. सततच्या लागवडीने जमिनीवरचा मातीचा थर पिठाळ झाला आहे. ज्यामुळे जमिनीची प्रचंड प्रमाणात धूप होण्याचा संभव नाकारता येत नाही. आणि तुम्ही ते नाकरूही शकत नाही. जमिनीची धूप ही हळूहळू घडणारी नैसर्गिक क्रिया आहे. गंगा नदी व इतर काही नद्यांच्या पात्रातही या जमिनीच्या धुपीमुळे उद्धवून वाहून जाणाऱ्या माती-दगडांचे प्रमाण खूप आहे. ती माती खाली येऊन त्याचे सुपीक प्रदेश बनतात. मानवी हस्तक्षेपामुळे त्याचे खूपच प्रमाण वाढले. मग तो आर्थिक, व्यावहारिक प्रश्न होऊ लागला. सामाजिक व पर्यावरणाच्या या प्रश्नामुळे त्याला हळूहळू सरपटत येणारा मृत्यूही (creeping death) संबोधले आहे. कोट्यवधी खर्च करून बांधलेली धरणेही गाळ साचल्याने निकामी झालीत. पुण्याजवळील पानशेत हे एक उदाहरण घेऊ शकतो. अमेरिकेत दरवर्षी २० लाख टन इतकी माती समुद्रात ओतली जाते. याच्या उलट भारतात धुपेमुळे होणाऱ्या नुकसानीच्या आकडा ७५० कोटीच्या घरात आहे. दरवर्षी गंगेला व ब्रह्मपुत्रेला येणाऱ्या पुराकडे आपण दुर्लक्ष केले नाही पाहिजे. त्याचे परिणामही अतिभयंकर आहेत.

औद्योगीकरणाने व तंत्रज्ञानिक वाढीमुळे, वैद्यकीय शास्त्रातील खूपसे शोध मानवाच्या आयुष्य वाढीला कारणीभूत ठरले आहे. त्यामुळे मृत्यूदर घटला आहे व वाढणाऱ्या लोकसंख्येला शेतीचे प्रश्न भेडसावू लागले आहेत.

उत्पन्न वाढण्यासाठी मानव कृत्रिम खताचा वापर करू लागला. त्यामुळे सेंद्रिय खताचा (fertiliser) फारच उपयोग होऊ लागला. या कृत्रिम खतामुळे मानवाला खूपच उत्पन्न मिळू लागले. पण त्याचा परिणाम माती व पाण्यावर फार प्रमाणात होऊ लागला. खताच्या भरपूर वापराने व पाणीपुरवठ्यामुळे जमिनीची जननक्षमता फारच खालावली. आज मानव भरपूर उत्पन्नासाठी आपल्या आरोग्याचा सुद्धा नीटसा विचार करताना आढळत नाही. डी. डी. टी., बी.

एच. सी., कार्बारिल अशा अनेक विषारी औषधे पिकांवर फवारून तो स्वत:ला जणू रोगाच्या खाईतच ढकलतोय. या विषारी औषधाचे अनेक छोटे कण मातीत तसेच पडून असतात. ते तसेच रोपट्यात आणले जातात व ते जेव्हा आपल्या आहारात येतात तेव्हा त्याचे परिणाम आपल्या दृष्टोत्पत्तीस पडतात. डी डी टी मुळे केंद्रिय मज्जासंस्था पूर्णपणे निकामी होते. याच डी डी टी वर खुद्द अमेरिकेने बंदी आणली आहे. सांडपाण्यामुळे व त्यातील रसायनामुळेच मातीवर त्याचा खूप खोलवर परिणाम होतो. कारखान्यातून निघालेल्या पाण्यात वाढणारे मासे, पाण्यातली जी प्रचंड प्रमाणात सापडणारे रसायने आहेत त्यात पारा (Hg) शिसे (pb), As, Cd (असेंनिक, कॅडमियम) यासारखे भरपूर विषारी पदार्थ असू शकतात व तेच पदार्थ मासे गिळंकृत करतात. त्या माशांना डबक्याच्या कडेला राहणारी आदिवासी लोक खाऊन कदाचित मृत्युमुखी पडू शकतात. पारा हा रक्तातील हिमोग्लोबिनची प्रक्रिया बंद पाडू शकतो. पारा हा किडनीवाटे बाहेर पडू शकतो; पण त्याचे प्रमाण जर जास्त झालेच; तर ते पुन्हा उलट परिणाम दाखवून देतात. ते कण हृदयावरसुद्धा आक्रमण करतात. कॅडमियममुळे किडनीचे विकार होतात.

मानवाच्या गरजा वाढत होत्या. तो यंत्राची निर्मिती करू लागला. ज्यामुळे तो एखादी वस्तू मोठ्या स्तरावर बनवू लागला. त्याने तंत्रज्ञानात प्रचंड वाढ घडवून आणली. एका वस्तूचे तंत्रज्ञान तो दुसरीकडे वापरू लागला. १७व्या शतकाच्या अखेरीस त्याने भरपूर प्रकारच्या चांगल्या यंत्रांची निर्मिती केली. त्यानंतर १८व्या शतकात एक क्रांतीच घडून आली. ती औद्योगिक क्रांतीच होती, जी प्रथम इंग्लंडमध्ये उगम पावली व नंतर इतर सर्व युरोप खंडातील देशात विखुरली गेली. मानवाला चांगल्या उत्पन्नासाठी ऊर्जेच्या नवनवीन मार्गाची गरज भासू लागली. ज्यामुळे तो ती ऊर्जा यंत्रास देऊ करेल. आणि पहिल्यांदाच त्याने पाणी व वारा याचा वापर करून यंत्रास शक्ती दिली. लवकरच त्याला कोळशाचा उपयोग लक्षात आला. मग तो कोळसा वापरून शक्तीदायक यंत्रे, निर्मितीसाठी उभी करू लागला. औद्योगिक देशात ऊर्जावाढीसाठी स्पर्धा वाढू लागली. यावेळेला मानव इतका हतबल झाला होता की त्याने कधी नव्हे एवढी ऊर्जा निसर्गाकडून बळकावली. कृषी, तंत्रज्ञान, औद्योगिक क्षेत्रात वाढ झाल्यामुळे गेल्या दोन तीन शतकात जगाच्या लोकसंख्येत अतिप्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे. आज जगाची लोकसंख्या आठशे कोटीच्या घरात आहे. लोकसंख्या वाढ ही गेल्या चार-पाच दशकात खूपच होत चालली आहे. थोपवू न शकणाऱ्या या लोकसंख्येमुळे शहरी विभागात अतिप्रचंड प्रमाणात गर्दी झाली व त्यामुळे त्याच्या सर्व सुखसोयी धोक्यात येऊ लागल्या.

अन्न, पाणी, जमीन व जळण साधनसामुग्रीचा तुटवडा येऊ लागला. स्वप्ननगरी म्हणवून घेणाऱ्या मुंबईत ५ ते १० टक्के लोक दोन वेळचे जेवण घेऊ शकत नाहीत. का? तर कामधंदा नाही. पैसा नाही त्यामुळे अन्न नाही. 'भिका मागून जगतायेत माणसे'. १० टक्के लोकांना घरे नाहीत. का ? तर जमीन अपुरी. अक्षरश: डोंगरावर घरे बांधलीत माणसाने. तेही अपुरे पडू लागलीय तर फुटपाथवर आपला पथारा मांडून बसला आहे. जिथे मोकळी जागा दिसेल, (मुळात जागाच नाही) रेल्वेस्टेशन, गटारीच्या कडेला, अगदी वाट्टेल तिथे माणसाने पाय पसरायला सुरुवात केली आहे. त्यामुळे वाढणारी दुर्गंधी, रोगराई व वाढणारे साथीचे रोग यानेच आज कित्येक टक्के लोकांचे आयुष्य म्हणा, भवितव्य म्हणा मृत्यूच्या दाढेत आहे. धड ते मरूही शकत नाहीत व जगूही शकत नाहीत ! काय त्या स्वप्ननगरीत आहे कोण जाणे ?

प्रचंड लोकसंख्या, मानवी गरजा व स्वार्थी प्रवृत्तीमुळे मानवाने स्वत:च आपल्याभोवती असणारे निसर्गाचे संबंध तोडून टाकले आहेत. नैसर्गिक गोष्टींचा दुरुपयोग व अव्यवस्थेमुळे त्याचे खूप गंभीर प्रमाणात दुष्परिणाम आज जाणवत आहेत, त्यामुळे प्रदूषण वाढले आहे. प्रदूषण

म्हणजे हवा, पाणी, जमीन यांच्या भौतिकी, रासायनिक व जैविक गुणधर्मात अचानक होणारा प्रचंड बदल, ज्यामुळे मानवी जीवन, वनस्पती, औद्योगिक क्रिया व सांस्कृतिक परिस्थितीस मोठ्या प्रमाणात धोका संभवतो.

ज्या गोष्टीमुळे प्रदूषण वाढते, त्याला पोलुटंट (pollutant) म्हणतात. ते कोणतीही अवस्था (घन, द्रव, वायुरूप) घेऊ शकतात. औद्योगिक क्षेत्रात पर्यावरणाचे प्रदूषण हा एक भेडसावणारा प्रश्न आपल्या समोर येऊन ठाकला आहे. सर्वात धोकादायक म्हणजे वातावरणातील प्रदूषण. कारण त्यातून प्रचंड प्रमाणातून निघणारे प्रदूषित वायूआपल्या शरीरसंस्थेवर खूपच खोलवर परिणाम करतात. वातावरणात मुख्यत्वेकरून सल्फर-डायऑक्साइड ($SO_2$), नायट्रोजन मोनॉक्साइड (NO), ना. डायॉक्साइड ($NO_2$), कार्बन मोनॉक्साइड (CO), नायट्रोजन ट्रॉयॉक्साइड ($NO_3$), कार्बन डायॉक्साइड ($CO_2$) यासारखे अनेक प्रदूषित वायू प्रचंड प्रमाणात आढळतात. हेच ते वायू जे वातावरणात असताना आर्द्रतेमुळे त्याचे थेंबात रूपांतर होते. त्यानंतर ते जमिनीवर पडतात व दुष्परिणाम उद्भवून देतात. $SO_2$ ह्या वायूचे जेव्हा वातावरणातील पाण्याच्या थेंबाशी क्रिया घडते, तेव्हा सल्फ्युरस ॲसिडमध्ये रूपांतरीत होतो, तोच ऑक्सिडेशन होऊन सल्फ्युरिक ॲसिड मध्ये रुपांतरीत होतो. जे अतिघातक द्रव म्हणून ओळखले जाते.

$SO_2 + H_2O \; H_2SO_3$

$H_2SO_3 + \frac{1}{2} O_2 \rightarrow H_2SO_4$

$NO_2 + NO_3 \; N_2O_5$

$N_2 O_5 + H_2 \; 2HNO_3$

हीच ती आम्ले जमिनीवर पडतात व त्यामुळे मातीची जननक्षमता कमी होते. ह्या आम्लांचा मानवी शरीरावर फारसा परिणाम दिसून येत नाही; पण आपण हे लक्षात घेतले पाहिजे की दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अमेरिकेने जेव्हा जपानवर दोन अणुबॉंब्सचा हल्ला केला, तेव्हा प्रचंड प्रमाणात हाहा:कार झाला. त्यात निर्माण झालेल्या आगीत असंख्य लोक होरपळली गेली. त्यात निघालेल्या प्रदूषित वायूचे बाष्पीभवन होऊन, तेच पावसाच्या रूपाने पुन्हा जमिनीवर पडले. तेव्हा जेवढ्या जगल्या-वाचलेल्यांचा अंगावर ते पावसाचे थेंब पडले, त्यामुळे पडलेले व्रण अजूनही त्या घटनेची साक्ष देतात. त्या पावसाला 'ॲसिड रेन' असे संबोधतात. खूपशा प्रमाणात निघालेल्या गोष्टी, ज्या अपुऱ्या जळणातून उत्पन्न झाल्या, त्यात 'स्मॉग' (smog - smoke + fog) मुख्यत्वे थंड हवामानात उत्पन्न झाल्या.

दररोज आपण पाहातोच की, रस्त्यावरून जाणाऱ्या गाड्या, वाहने प्रचंड प्रमाणात धूर बाहेर वातावरणात सोडत असतात. ज्या पेट्रोलच्या धुरामध्ये 'ट्रेट्राइथिलिन लेड' व टेट्रामिथिलिन लेड हे १, २ डायक्लोरोइथेन व १, २ डायफ्लोरोइथेन या बरोबर मिश्रीत असते. ज्यातील शिसे (pb) आपल्या शरीरातील रक्तातील तांबड्या पेशीला अतिधोकादायक आहेत.

शिश्याचे प्रमाण जर २०० मायक्रॉन/ग्रॅम च्या पुढे गेले तर 'हिमॅटोलॉजिकल' रोग वाढीस लागतात. त्यामुळे तर ॲनेमिया (Anamia) सारखा रोग होतो. पेट्रोलच्या, डिझेलच्या किंवा कोणत्याही ज्वलनातून CO वायु मुक्त होतो. त्याच्यामुळे शरीरात मोठा परिणाम जाणवतो. दर वर्षी आपण वातावरणात ३५० लाख टन एवढा CO सोडून देतो. जो CO चवहीन, रंगहीन, वासहीन असला तरी अपायहीन नाही.

CO तर अती अपायकारक आहे, हे आपण ध्यानात घेतले पाहिजे. CO चे वातावरणातील प्रमाण जर १००० पी. पी. एम. म्हणजेच ७०% आले तर माणसाला तत्काळ मरण येते. आपल्याला कदाचित माहीत असेल की, पुण्यातील अलका टॉकीजपुढचा चौक हा पुण्यातील जास्तीत जास्त प्रदूषित असलेला भाग आहे. कर्वे रोड हा पुण्यातील एकमेवद्वितीय प्रदूषित रोड आहे. हेच जे प्रदूषित

वायू आहेत ते दमा, फुफ्फुसाचे रोग यासारखे घातक रोग निर्माण करतात. सध्या पाणी प्रदूषण हा भेडसावणारा प्रश्न निर्माण झाला आहे. आजवर प्रत्येकाला शुद्ध पाणी मिळण्याची शाश्वती कोणी देऊ शकत नाही व प्राण्याचे प्रदूषण हे मुख्यत्वे करून औद्योगिक कृषी मानवी घाणीमुळे होत आहे. मातीचे प्रदूषण सुद्धा डोके वर काढत आहे. सांडपाण्यातील रसायनामुळे डबक्याचे रूपांतर एका कोरड्या जमिनीत होते. त्या प्रक्रियेला आपण युट्रॉफिकेशन असे म्हणतो.

पुण्यातील गणेशखिंड रोडवरील वृक्ष, जे रानडे, टिळक, आगरकरांच्या काळातून तिथे उभी होती, त्यांच्याही मस्तकी कुऱ्हाड घालायला माणसाने मागेपुढे पाहिले नाही. रस्तारुंदीचे निमित्त केले व एके काळी पुणे विद्यापीठाकडे जाणारा राजरस्ता संबोधणाऱ्या या रस्त्यावर स्मशानभूमीची अवकळा पसरलेली आज दिसते आहे. सर्वत्र धूळ, प्रदूषण, आवाज, गोंगाट, लाउडस्पीकर (चोली के पीछे) यामुळे फक्त स्मशानरस्ताच नव्हे तर पुण्यातील इतर सर्व रस्ते आज वृक्षहीन झाले आहेत. पण परत वृक्षारोपण करायचे नावही नाही. समजा, लोकलज्जेस्तव तसा प्रयत्न केलाच तर त्याला सांभाळणार कोण? आपण पाहतोच की आज या मंत्र्याकडून, उद्या त्या संत्र्याकडून अमुक इथे वृक्षारोपण होणार आहे. त्याची देखभाल तेवढा आठवडाच, नंतर संपलं. दुसऱ्या वर्षी कशाला, दुसरा खड्डा खणण्याचा त्रास, म्हणून दरवर्षी एकच 'कॉमन खड्डा' आपल्या दृष्टोत्पत्तीस पडतो. मला तर या महानगरपालिकेची एवढी भीती वाटायला लागली की, राजभवनपुढची असलेली झाडीसुद्धा हे तोडतात की काय? या पी. एम. सी. ची नजर लागू नये म्हणून तेथील ओळीने २५-३० झाडांना मी वंगण लावले आहे. याला तुम्ही अंधश्रद्धा म्हणाल; पण आज आपण पाहतोच की मानव खूपच पुढे गेलाय व अशा पद्धतीने त्याने ठेच खाऊन घेतलीय. म्हणून मला वाटतं, थोडंसं मागं राहावं. म्हणतात ना, 'पुढच्यास ठेच मागचा शहाणा'. मलाही असंच वाटतं. निसर्गाची सेवा करावी व ज्याप्रमाणे मानव स्वतःच निसर्गाला मागे टाकून पुढे निघून गेलाय. त्याप्रमाणे न करता निसर्गालाही घेऊन त्याच्या बरोबरीने गेले पाहिजे; तरच मानव काहीतरी निसर्गाकडून नावलौकिक मिळवेल. आणि असं जर झालं नाही तर प्रत्येक गावाचे, शहराचे रूपांतर किल्लारीत होण्यास क्षणाचाही विलंब होणार नाही.

■ ■ ■

## वळत नव्हते

मी प्रार्थना करत होते देवळात
तू मला दिसत नव्हता दुसऱ्यांच्या हृदयात
मी इकडे बसत होते हात जोडून अंधारात
तू मला शोधत होता, तिकडे दारिद्र्यात.

मला माहीत असूनही मी तुला हाक मारत होते
तू दिसणार नाहीस हे मला जाणवत होते
पण तरीही मी डोके आपटीतच होते
तुझे अस्तित्व कर्मात आहे, हे विसरतच होते.

खुळ्यासारखी मी तुझ्याशी बोलतच होते
पण तू तिकडे अश्रू पुसत आहेस हे विसरतच होते.

इतरांचे दुःख दूर करण्यातच सुख आहे,
हे मी जाणत होते.
तरीही मी आपल्या सुखालाच कुरवाळीत होते.

काय करू, कसे शोधू याचाच विचार करीत होते
तू प्रत्येकात आहेस, हे उमजूनही वळत नव्हते.

**पूर्णिमा अ. काळे**
एस्. वाय. बी. एस्सी. (ब)

# झाडाझडती : एक परीक्षण

**कु. भालेराव प्रतिभा**
प्रथम वर्ष, कला

१९९१ साली मराठी वाङ्‌मयात एक विशेष घटना घडली, ती म्हणजे एका तरुण जिल्हाधिकाऱ्याने एका अगदी वेगळ्याच विषयावर कादंबरी लिहिली. त्या कादंबरीला एकूण पाच पुरस्कार मिळाले. त्यापैकी सर्वात मानाचा म्हणजे 'साहित्य अकादमीचा' पुरस्कार होय. ती कादंबरी म्हणजे विश्वास पाटलांची 'झाडाझडती' ही कदंबरी होय. ह्या कादंबरीचा विषय मराठी वाङ्‌मयात पूर्णपणे नवीन होता. हे विश्वास पाटलांचे वैशिष्ट्यच आहे. तरुण वयाला न पेलणारा अवघड विषय त्यांनी अगदी सहज पेलून दाखविला आहे.

ह्या कादंबरीत 'धरण' ही एक महत्त्वाची घटना. जेव्हा ह्या घटनेला राजकीय नियतीचं उग्र स्वरूप लाभते, त्या वेळेस सामान्यांना 'झाडाझडती' म्हणजे 'न संपणारे दु:ख' सहन करावे लागते. धरणामुळे सर्वांच्या बागा फुलतात, ऊसमळे झुलतात, साखर कारखाने निघतात, यंत्रे चालतात. प्रत्येकाच्या घरात वीज खेळते, त्यासाठी धरणग्रस्त स्वत:चा गाव, स्वत:चं भवितव्य धरणाच्या घशात कोंबतात. विकासाचा नारळ फोडण्यासाठी धरणग्रस्तांची डोकी वापरली जातात. खोबरं मात्र सारी लाभक्षेत्रातील जनता खात असते, आणि आपल्या अन्न, वस्त्र, निवारा ह्या मूलभूत गरजांसाठी धरणग्रस्तांना सर्वत्र हात पसरावे लागतात. ह्या कादंबरीतील हे जिवंत चित्र मन सुन्न करते.

'धरण' बांधणे म्हणजे विकासाची कास धरणे असे आपल्या सरकारला वाटते. धरण बांधल्याने अनेक फायदे होतात हे तर उघड आहे; पण त्याचे तोटे कोणी विचारात घेतात काय? धरणामुळे कृषी उत्पन्न वाढते, वीज येते, औद्योगीकरण वाढते, देशाची आर्थिक स्थिती मजबूत होते. पण याचबरोबर याचे तोटेही होतात. धरणांमुळे आज महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर अनेक कलह माजले आहेत. (नर्मदा प्रकल्प , कावेरी पाणीपुरवठा प्रश्न) मोठ्या धरणांमुळे भूकंप उद्भवतात. गावेच्या गावे उठतात आणि या गावांच्या पुनर्वसनाकडे सरकारचे दुर्लक्ष आणि त्यातून उभे राहिलेले मोर्चे, उपोषणे इ. हे फायदे आणि तोटे पाहिल्यावर, आपणास असा प्रश्न पडतो की, सरकार यातून सुवर्णमध्य साधू शकणार नाही का?

आपल्या महाराष्ट्र सरकारने धरणग्रस्तांसाठी पुनर्वसनाचा कायदा केला आहे. हे महाराष्ट्रातील सामान्य जनतेला सरकारदेवतेकडून लाभलेले एक वरदानच आहे. पण हा कायदा धाब्यावर बसवून त्याचा स्वत:च्या स्वार्थासाठी सरकारी अधिकारी सुंदर उपयोग करतात. सरकारनं दिलेल्या सेवासुविधा खाली पाझरू दिल्याच जात नाही.

पुनर्वसनानंतर धरणग्रस्तांची एक वेगळीच जात निर्माण केली जाते. त्यामुळे त्यांना लाभक्षेत्रातील लोक आपल्यात सामावून घेत नाहीत. मुलांना व्यवस्थित शिक्षण मिळत नाही. तरुणांना नोकऱ्या नसतात. धरणग्रस्त असल्यामुळे मुलींची लग्ने जुळत नाहीत. सरकारतर्फे दिली जाणारी मदत मध्येच ठगांनी हडप केल्याने ती त्यांच्यापर्यंत पोहोचतच नाही. आज महाराष्ट्रातील प्रत्येक धरणाची आणि पर्यायाने धरणग्रस्तांची हीच स्थिती आहे.

आज आपल्या महाराष्ट्रात अनेक धरणे बांधली गेली आहेत, अनेक बांधली जात आहेत. परंतु प्रत्येक धरण बांधताना दिसते ते सरकारचे अव्यवस्थित नियोजन आणि पुनर्वसनाकडे दुर्लक्ष. सरकारी अधिकाऱ्यांना पुनर्वसनाचे काम म्हणजे डोकेदुखी वाटते. आजही प्रत्येक धरणग्रस्ताला योग्य न्याय मिळाला नाही. आज ज्या हलाखीच्या परिस्थितीत जगावे लागत आहे, त्याची कल्पनाही आपण करू शकणार नाही. आपल्याला माहिती आहे, कोयना धरणग्रस्तांच्या घरात आज रॉकेलचा दिवाही जळत नाही.

श्रीमती मेधा पाटकर आज ह्याच धरणग्रस्तांच्या प्रश्नांसाठी लढत आहेत. आपल्या सरकारला नेहमी मोठ्या योजना राबवण्याची सवय आहे. पण त्याऐवजी जर सरकारने लहान लहान धरणे बांधली तर गावे उठणार नाहीत आणि पाणीही तेवढेच मिळेल. नाहीतरी साठ सत्तर वर्षात मोठी धरणे गाळाने भरतात.

■ ■ ■

## चक्र

रात्र विचार करते उद्याच्या दिवसाचा.
सकाळ म्हणते कसा असेल दिवस आजचा ?
पण, दिवसाला कसलीच चिंता नसते !
तो उगवतो नवे भविष्य घेऊन !
साकार करतो अनेकांची स्वप्ने
पहाट विचारते दिवसाला, " आज काय घडेल बरे ?"
दिवसाला घेऊन हवा खेळते.
नवीन आशेचे बीज मनात पेरते.
मिनिटा - मिनिटाला जग बदलते
हे रात्रन् - दिवसाचे "चक्र" असेच चालते !

**अर्चना पोलकमवार**
द्वितीय वर्ष, कला

## प्रेम

प्रेम प्रेम म्हणजे नक्की काय असतं ?
'मी'पणातच गुरफटून जायचं असतं
त्याच्यासाठी जगाला विसरायचं असतं
यालाच आपल्या हृदयात माळायचं असतं
त्याच्या वाटेवर डोळे लावून बसायचं असतं ! ॥ १ ॥

प्रेम प्रेम म्हणजे नक्की काय असतं ?
त्याच्याच विचारात गुंतायचं असतं
त्याच्याच 'आठवणीं'वर जगायचं असतं
त्याच्याच आशेवर विसंबून राहायचं असतं
स्वप्नात गुंगत जायचं असतं ॥ २ ॥

प्रेम प्रेम म्हणजे नक्की काय असतं ?
अबोल राहून 'डोळ्यांनी' बोलायचं असतं
इशाऱ्यातच 'बेहोष' व्हायचं असतं
त्याला आपलंसं करायचं असतं
दिल्या-घेतल्या 'वचनांची' शपथ घालायचं असतं ॥३ ॥

प्रेम प्रेम म्हणजे नक्की काय असतं ?
सहन न होणारा 'दुरावा'सुद्धा असतं
त्याच्यासाठी मनातल्या मनात झुरायचं असतं
डोळ्यात खुणेच्या वाटा शोधायचं असतं
'विरहा'साठी किती किती रडायचं असतं
त्याच्यावरच जीव ओवाळून टाकायचं असतं ॥ ४ ॥

पण खरं सांगू,
प्रेम कसं करायचं असतं,
ते ज्याचं त्यालाच 'टाऊक ' असतं !!

**सुप्रिया साळसकर**
द्वितीय वर्ष, वाणिज्य

# मराठी असे आमुची मायबोली

कुदळे पल्लवी भगवानराव
प्रथम वर्ष, कला

"मराठी असे आमुची मायबोली
जरी भिन्न धर्मानुयायी असू।
तसे आमुच्या मात्र हृन्मंदिरी।
जगन्मान्यता हीस अर्पू प्रतापे
हिला बैसवू वैभवाचे शिरी ॥"

माणूस जन्माला येतो तोच मुळी माथ्यावर काही ऋण घेऊन. त्या अनेक ऋणांपैकी एक ऋण असते ते मातृभाषेचे. कल्पना करा की माणसाला मातृभाषा गवसली नसती तर त्याने काय केले असते? बाळाने आईजवळ हट्ट कसा केला असता? बाळाला मातृभाषा लाभते ती त्याच्या आईवडिलांकडून, आजी-आजोबांकडून. बाळ पाळण्यात असते तेव्हा त्याच्या कानावर अंगाईगीत पडते ते मातृभाषेतून. आजीकडून चिऊकाऊच्या गोष्टी ऐकतो त्याही मातृभाषेतून आणि मग तो आपल्या बोबड्या बोलांतून गाऊ लागतो, "चांदोबा, चांदोबा भागलास का?" हेही मातृभाषेतूनच.

अशी ही मातृभाषा आपली जन्मापासूनची साथीदार असते. आपल्यावर चांगले संस्कार घडविण्याचे कार्यही ही मायबोलीच करत असते. ती आपल्याला घडवते. मोठं करते. विचार आणि भावना यांची देवाणघेवाण मातृभाषेच्या सहाय्याने होते.

' मराठी ही माझी मातृभाषा आहे याचा मला सार्थ अभिमान आहे. किंबहुना तो प्रत्येक मराठी भाषिकास असावयास हवा. मराठी भाषा ही संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश, पैशाची, मागधी आणि शौरसेनी या सहा भाषांपासून तयार झाली आहे. म्हणून कवी नरेंद्र पंडित म्हणतात,

"जिथे भाषेचिया रसवृत्ती,
सा भाषांचे कुपे कीजेति निगुति ।
ते मऱ्हाटी कवण जाणे निरुति,
जे रसांचे जीवन ॥"

मराठी भाषा अतिशय रसाळ आहे. श्रेष्ठ आहे. साने गुरुजींनी तर उद्गार काढले आहेत, "माझ्या मराठीचे भाग्य असे महान की तिचा पहिलाच कवी हिमालयाएवढा महाकवी होऊन गेला " आपल्या लक्षात आलेचं असेल की हे उद्गार कोणाला उद्देशून काढले असतील. अहो ज्ञानराजा, ज्ञानियांचा राजा. आमची मराठी अमृताशीसुद्धा पैज जिंकेल असे म्हणणाऱ्या ज्ञानेश्वरांविषयी.

'अशी ही ज्ञानेश्वरांची, तुकारामांची , एकनाथांची, शाहीर रामजोशींची मराठी, हिची थोरवी वर्णिताना योगवाशिष्ठ म्हणते :

"परिमलांमध्ये कस्तुरी।
का अंबरामध्ये शंबरारी ।
तैसे मऱ्हाटी सुंदर
सर्व भाषांमध्ये ॥"

आज माझ्या मराठीला राज्यभाषेचा दर्जा मिळाला आहे. शिवरायांनी तर तीनशे वर्षांपूर्वीच तिला हा मान देऊ केला होता. पण तरीही 'आज इंग्रजीच्या लाटेत माझी मराठी टिकेल का? ' याची प्रत्येक मराठी माणसाला धास्ती वाटत आहे. मग मनात नाना प्रश्न उभे राहतात की, खरोखरच हिचे पांग आम्ही हिचे सुपुत्र फेडत आहोत

का ? नाही. कारण प्रतिष्ठेच्या आहारी गेलेल्या मनाला इंग्रजीचे आकर्षण आहे. दीडशे वर्षांची राजकीय गुलामगिरी संपली पण इंग्रजीची मानसिक गुलामगिरी सोडायला आम्ही तयार नाही. उलट दिवसेंदिवस तिचे अधिकच स्तोम माजविले जात आहे. आज या आकर्षणापायीच अनेक पालक आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालण्यासाठी धडपडत असतात.

वास्तविक शिक्षणाचे माध्यम हे मातृभाषाच असले पाहिजे; कारण जेव्हा आपण कोणत्याही गोष्टीचे चिंतन करतो ते मातृभाषेतून करतो. कोणतेही ज्ञान मातृभाषेतून ग्रहण केल्याने अधिक सुलभ होते. परक्या भाषेतून शिक्षण घेताना ती भाषा अभ्यासण्यातच आपली शक्ती आणि वेळ वाया जातो. म्हणून केव्हाही ज्ञानभाषा आणि मातृभाषा एकच असणे योग्य ठरते. 'उच्च शिक्षण मराठीतून का नको ?' या प्रश्नालाही सर्वत्र एकच उत्तर मिळते आणि ते म्हणजे आजची प्रगत शास्त्रे आणि त्यांच्या परिभाषा या मराठीला पेलवणार नाहीत. पण ही आपली विचारसरणी सर्वस्वी चुकीची आहे. अणुबॉम्बने उद्ध्वस्त झालेल्या जपानसारख्या छोट्याशा राष्ट्रानेही हे दाखवून दिले आहे. शिवाय अमेरिकेसारख्या समर्थ राष्ट्रांपुढे उभे राहण्याची ताकद असणाऱ्या रशियाचेही उदाहरण डोळ्यासमोर आहे.

म्हणूनच म्हणते, जर आपल्याला सांस्कृतिक, सामाजिक सर्व बाजूंनी उत्कर्ष साधायचा असेल, तर मराठी टिकवली पाहिजे. मराठीचा मान सोडून तो इंग्रजीला देणे म्हणजे आईचा मान परस्त्रीला देण्यासारखा आहे. मराठी वाचविण्यासाठी आपण सार्वत्रिक जीवनात तिचा कटाक्षाने जास्तीत जास्त वापर केला पाहिजे. कारण आज चार मराठी सुशिक्षित माणसे जरी एकत्र आली, तरी ती बोलणार मात्र इंग्रजीतूनच. मग आपल्या मातृभाषेचे ऋण आपण कसे फेडणार ?

'वास्तविक या मराठीचे माझ्यावर कितीतरी उपकार आहेत. मातृभाषेने शब्दांच्या अर्थच्छटा दिल्या. अर्थाचे नेमकेपण कळल्याने जीवन अधिकच समृद्ध बनले. मराठी चित्रपट पाहताना खळखळून हसणारे आम्ही इंग्रजी चित्रपट पाहण्याची खोटी प्रतिष्ठा सांभाळतच असतो.

'मुळातच रुढी - परंपरा , संस्कृती , आचार-विचार, वातावरण या सर्वांतच फरक असताना आणि साहित्यात समाजाचे प्रतिबिंब दिसत असताना, इंग्रजी साहित्य जवळचे कसे वाटेल ? त्यामुळेच कुसुमाग्रजांची लखलखीत अग्निफुले आम्ही विसरू शकत नाही. अत्र्यांचा विनोद पुन्हा पुन्हा आठवत राहतो. पु. लं. चा विनोद अंतर्मुख करतो. शाहिरी कवने स्फूर्ती आणि प्रेरणा देतात; तर संतकाव्य शांतरसाची शिंपण करून नव्या उमेदीने आयुष्य जगायला सामर्थ्य आणि जिद्द देतात. बालकवींच्या 'फुलराणी, निर्झरास, औदुंबर' या कविता एकदाच वाचल्या की आपण अक्षरश: त्याच्या प्रेमात पडतो. कारण या सर्व कवींच्या काव्यातला तो कल्पनाविलास, त्यातलं ते नाट्य, ती भावविभोरता, आशयघनता आणि अर्थगर्भिता या साऱ्यांची मोहिनी मनावर नक्कीच अधिक असणार . कारण त्यातला प्रत्येक शब्दन् शब्द हा आपला असतो.

म्हणून सरतेशेवटी मला काय वाटते, हे सांगताना कुसुमाग्रजांच्या कवितेतील काही ओळी आठवतात :

"माझ्या मराठी मातीचा
लावा ललाटास टिळा
हिच्यासंगे जगतील,
मायदेशातील शिळा ॥"

■ ■ ■

## करुण कहाणी

एका मनाची, कोमल हृदयाची, निष्पाप जीवाची
करुण कहाणी ऐका.

स्त्री जीवनाची, सत्यकथा ही गोष्ट तुम्ही ऐका.

लग्न करुनी पती घेऊन गेला तिला
घेऊन गेला तिला, न पाठवले परत तिला
पतीराज मोठे हट्टी, म्हणाले,
एक अंगठी, एक स्कूटर, एक टि.व्ही.
आणून माहेरून, दे माझ्या घरी.

ती रडली, पडली, पाय धरले,
माझ्या घरची गरिबी.
कशी पुरविणार मी तुमची मागणी ?
परंतु, पतीराजाने सोडला हुकून भारी,
तीन दिवसांत नाही आणले, तर ठार करीन तुला घरी
पण, ती मोठी शहाणी. नाही गेली बापाच्या घरी.

पहिल्या दिवशी झाला जाच
दुसऱ्या दिवशी उपवास, आणि
तिसऱ्या दिवशी त्या राक्षसाने केला तिचा घात.

ठार मारले तिला घरी,
पोत्यात कोंबून टांगले खुंटीवरी,
आणि दिले पेटवुनी.
तिचा झाला अंत, कुणाला झाली नाही त्याची खंत.
पैसे देऊन केले पोलिसांना शांत

सर्वांचा झाला नाविलाज, मग कोण उठविणार आवाज ?
कोण करणार त्या विरुद्ध बंड ?
तुम्ही ! हो तुम्ही, युवक आणि युवतींनो !
जागे व्हा, तिचा अंत करणाऱ्याला फासावर द्या आणि
एका मनाचा, कोमल हृदयाचा, निष्पाप जीवाचा,
करुण इतिहास नका घडू देऊ पुन्हा आपल्यात

**पूर्णिमा अ. काळे** एस्. वाय. बी. एस्सी. (ब)

## साजणा, तू रे !

डोकावुनी मनी माझ्या
मन तू चोरून नेलेस माझे.
बघता बघता हृदयात माझ्या
घर तू केलेस तुझे

जवळुनी पाहण्यास तुला,
तू आस लावली माझ्या मना.
मनातील माझी प्रीत,
फुलवलीस तू चोरून साजणा.

स्वप्नातल्या घरी माझ्या,
नेहमीच येतोस तू सख्या.
पाहण्याास तुझे स्मित हास्य
मी पाऊलखुणा शोधते तुझ्या.

तुझ्या नजरेने बेहोप तू केलेस मला,
धुंद केल्यास जीवनातल्या वाटा माझ्या
वाटते, पाहत राहावे तुला मी सारखे
लाजऱ्या चेहऱ्याने माझ्या.

उत्कंठा ही लावुनी मनी माझ्या,
मन तू चोरून नेलेस माझे.
बघता बघता हृदयात माझ्या,
घर तू केलेस तुझे.

**पूर्णिमा अ. काळे**
एस्. वाय. बी. एस्सी (ब)

## बेवफा

सुनसान राहों पर चलते,
हम दोनों मिले थे अजनबी बन कर।
याद है, पहेलेही मुलाकात में,
हम दोनों ने खाई थी कसम मिल कर
पर तुमने दिखलाई बेवफाई मेरे सनम बन कर ॥

कितने सपने देखे थे अपने ही प्यार के,
कितने वादें किए थे दिल पर हाथ थाम के।
पर तुमने वो सब गुलाब चुराये अपने दुनिया के,
बस्स ! काँटे ही छोड दिए मेरे लिए,
दिलदार बेवफा बनके।

काश ! मेरा दिल जान पाता तुम्हारी झूठीं कसमें,
शायद मैं उसे रोक सकतीं, तुम्हारा आशिक बनते।
प्यार को जलाया तुमने मेरे,
कागज का नजराना समझके।
बस्स ! यहीं दिल रह गया है अब
तुम्हारी बेवफाई सहके।

चाँद तारे तो नहीं माँगे थे तुमसे.
सिर्फ तुम्हारा प्यार चाहा था मन से।
सच्ची मोहब्बत की थी मैंने तुमसे,
खुदा को अपना गवाँह बनाके।
बस्स ! यहीं तो भूल हुई मुझसे,
वफाई की मैंने तुझ बेवफासे।

**पूर्णिमा अ. काळे**
एस्. वाय. बी. एस्सी. (ब)

## मुखवटा राजकारणाचा

राजकारण म्हणतात ते काय असतं बरं ?
मला नाही वाटत त्यातलं सगळं असतं खरं
स्वार्थीच स्वार्थी त्यातली माणसे असतात सगळी.
सत्तेसाठी देतात आपल्या बांधवांना बळी.

एवढं करून सुद्धा कधीच नसतात समाधानी
धर्माच्या नावाखाली करतात मोठी हानी,
कारस्थान घडवून आणणं असतं त्यांच्या हाती,
खापर त्याचं फुटतं मात्र दुर्बलांच्या माथी

स्वार्थासाठी बनतात फक्त सत्तेचे भक्त,
दिसत नाही त्यांना जनतेचे सांडलेले रक्त

सत्ता मात्र मिळते त्यांना घेऊन जनतेचे प्राण
पण याचे मात्र राहत नाही कोणालाच भान

भक्ष्याला फसवायला हा शिकारी टाकतो सापळा
आपणही मूर्ख कसे, आपण आपलाच कापतो गळा.

आता सांगेल का कोणी समजावून मला,
यापेक्षा दुसरा कोणता रंग असतो राजकारणाला ?

**भारती शिंदे**
द्वितीय वर्ष, कला

## पश्चात्ताप

माझा चेहरा नेहमी असायचा हसरा
मला वाटे माझ्यासारखा नाही कोणी दुसरा

रस्त्याने जाताना लोक म्हणत सज्जन
गर्दीतून मीच शोधीत असे दुर्जन

आचरणाचा माझ्या मला होता अभिमान
दुसऱ्याला नावे ठेवण्यात यायची मजा छान

एक दिवस माझाच मला घडला उपवास
पाहतो तर नवलच, झालो होतो नापास !

हा धक्का मला नाही झाला सहन
एका सेकंदात वाटू लागले व्यर्थ हे जीवन

अशातच वाईट मुलांची संगत जडली
मनाची माझ्या अस्थिरता मलाच घडली

बरोबर त्यांच्या घेऊ लागलो गर्द
घेतल्यावर वाटू लागले आहे मी मर्द

गर्दसाठी घरातील वस्तू करू लागलो चोरी
नव्हता उपाय गेली होतो गर्दच्या आहारी

कोपऱ्यात बसून गर्द घेत आहे मी वेड्यासारखा
मेलो इथेच तर उचलून नेतील कुत्र्यासारखा

गर्द घेऊन मला आता होतोय पश्चात्ताप
यापुढे गर्दला शिवणार नाही जन्मात

गर्द स्पर्श म्हणून नका करू
जीवाला नरकाकडे नका सारू.

## चुटके

मालक : अरे महादू, मी पोस्टाच्या पेटीत टाकायला दिलेल्या पत्रावर ५० पैशाचं तिकीट लावलेलं होतं का?

गडी : लावलं नसलं तरी हरकत नाही साहेब, मी गपचिप कोणी पाहात नाही हे बघून हळूच पेटीत टाकलं बगा.

* * *

डॉक्टर : तुम्हला न्युमोनियाचा त्रास कधी झाला होता का?

पेशंट : हो, एकदा.

डॉक्टर : केव्हा झाला होता?

पेशंट : त्याचं स्पेलिंग आमच्या साहेबांनी विचारलं होतं तेव्हा !

* * *

"अहो, येथून एखादी मुलगी बॉबकट, टाइट पँन्ट घातलेली जाताना पाहिली का ?"

"हो, तसा एक मुलगा जाताना पाहिला. तुम्ही त्याचे वडील वाटतं?"

"नाही, मी तिची आई आहे !"

* * *

**अर्चना पोलकमवार**
द्वितीय वर्ष, कला

## माझे कॉलेज

विद्येचे माहेर शोभावे असेच अमुचे विद्यामंदिर
आशा - आकांक्षांचे नंदादीप उजळावे असे आमुचे
श्रद्धास्थान
इथेच तुटती साखळदंड जातीधर्मांचे
गुण्यागोविंदानं नांदती पाखरे इथे प्रेमाने
विशाल मैदान आणि व्यायामशाळा
सुसज्ज ग्रंथालय, भव्य प्रयोगशाळा,
नसे इथे कशाचीच कमतरता
किती गुण गावे, प्राचार्य अमुचे बहुगुणी
निस्वार्थाचे व्रत घेतलेले गुरुजन अथांग ज्ञानी
कर्मध्यासी, ज्ञानलालसी विद्यार्थी सर्व जिज्ञासी.

**सोपान गंगाधर गाडे**
प्रथम वर्ष कला

## 'ती'

दिसायला ती अतिशय सुंदर होती
कडेने रस्त्याच्या दिमाखात चालली होती.
चालीत तिच्या हळुवार मादकता होती
रुबाबात ती पावले टाकत होती
पाहताच तिला वाटले बाहुपाशात घ्यावे
अनंत काळ तिचे चुंबन घेत राहावे
ती पुढे, मी तिच्या मागे चालत होतो
तिने मागे पाहिले तर नजर चुकवित होतो.
एकटक तिच्याकडे पाहत राहिलो
सुंदर रंगरूप तिचे न्याहाळत राहिलो
समोरून तेवढ्यात चार-पाच कुत्री धावली
आणि 'ती' बिचारी 'मँव' करत पळून गेली

**नंदकुमार कांबळे** एम. कॉम. भाग - २

## जीवन

जीवनात माणसानं फुलायचं असतं
कुजायचं नसतं
अंगभरल्या वेलीनं वाढायचं असतं
पण खुरटायचं नसतं
दुःखाचे कढ सोसत सोसत पुढं चालायचं असतं
पण उरी जखम घेऊन थांबायचं नसतं
वादळी वाऱ्यातून वाट काढीत चालायचं असतं
पण "गतीला" थांबवायचं नसतं.
फाटक्या - तुटक्या स्वप्नात डुंबायचं नसतं
अन्
आयुष्यात जे जे काही मिळविता येईल
ते ते मिळवायचं असतं
मरणाच्या दारात देखील हसत - हसत सामोरे जायचं
अन्
यालाच खरंखुरं "जीवन" म्हणायचं असतं.

**रमेश फुले**
अकरावी शास्त्र

## कामसू कुत्रा

एक माणूस कुत्रा विकत होता. कुत्र्याचे गुणवर्णन करताना तो म्हणत होता की, "हा कुत्रा सर्व कामे करतो. झाडून काढतो, कपडे धुतो, भांडी घासतो."

दुसरा माणूस, "मग तो कुत्रा का विकता ?"

पहिला माणूस म्हणाला, "परवा घरी चोर आले होते तेव्हा हा कंदिल घेऊन त्यांना रस्ता दाखवीत होता."

**नंदकुमार कांबळे**
एम. कॉम. भाग - २

# श्री

**वासंती भागवत**
प्रथम वर्ष, वाणिज्य

जिव्हाया , शोभनं चेष्टा नाम भाषा सा एव संस्कृत भाषा। एषा भाषा मृता भाषा इति सर्वे वदन्ति। अहं अपि एतादृशं एव विचारं कृतवती। परन्तु अहं एकदा श्रुतवती दक्षिण देशे संस्कृत संभाषणस्य जागरणाय एका संस्था अस्ति प्रस्थापिता । तैः वर्षपर्यन्त प्रयत्नान् कृत्वा एकं ग्रामं पूर्णतया संस्कृतमयं कृतम्।

अचिरात् अहं श्रुतवती यत् कर्नाटक प्रदेशे उडुपि नगरे अखिल भारतीय संस्कृत विद्यार्थी संमेलनं आयोजितम्। अस्य संमेलनस्य मुख्यः उद्देशः तैः पत्रकद्वारां प्रसारितः यत् भारते ये ये संस्कृत प्रेमिणः विकीर्णाः सन्ति तेषां एकीकरणं अपि संमेलिनैः द्वारा भवतु तथा च संस्कृत सम्भाषणस्य प्रचार अपि भवतु । अनन्तरं कोऽपि वक्तुं न शक्नोति यद् संस्कृत भाषा मृता भाषा इति।

पत्रकं दृष्ट्वा तत्र गन्तव्यम् इति विचारः मनसि आगतः। एतद् संमेलनं तु पञ्चदिवसात्मकं भविष्यति इति श्रुतम्। प्रथमं तावद् अल्पकालपर्यन्त अस्ति रति विचिन्त्य गमनं निश्चितं कृतम्। इतः वयं द्वादश जना दिनत्रयं प्रवासं कृत्वा मङ्गलूर नगरं प्राप्तवन्तः ततः उडुपि नगरम् गतवन्त:।

तत्र सर्वं संस्कृत वातावरणं दृष्ट्वा वयं संस्कृतस्य अनुरागिणः एव अभवान् । तत्र एकस्मिन् मंदिरे विविधान् प्रदेशतः आगताः नैके छात्राः आंग्ल भाषा संपर्क भाषा इति तस्या उपयोगं विस्मृत्य संस्कृतेन एव सम्भाषणे कुर्वन्ति स्म। एतद् तु बहु संतोषकरं यत् आंग्लभाषया विना वयं अन्यभाषा भाषिकैः सह वक्तुं शक्नुमः । संस्कृतभाषा सम्भाषणार्थं तु नूतना तथापि वयं परस्पर भावना आदान प्रदानं कर्तुं शक्नुमः। एषः तु प्रथम सुखदः हृद्यः च प्रसंगः। अनन्तरं तु एतादृशाः अगणितप्रसंगाः आगताः ?

अनन्तरं अस्माकं द्वादशजनानां विभादनं भिन्नेषु गणेषु तथा गृहेषु कृतम्। यतः केवलं अस्माकं एव वार्तालापः न भवेत । सर्वैः सह परिचयः संस्कृतेन एव करणीयः । नाम संस्कृतभाषायां लघुभारतस्य निर्माण संयोजकैः कृतम्।

अक्टुबर षड् दिनाङ्कतः संमेलनस्य प्रारम्भः अभवत्। तत्र दिवसस्यत विभाजनं सुष्ठु कृतम्। प्रतिदिनम् एका 'गणगोष्ठी' नाम कार्यक्रमः आयोजितः यत्र वयं वैयक्तिकतया परस्परम् वक्तुं शक्नुमः। अनन्तरं एकद्वे वा ' समूह गोष्टी ' नाम संस्कृत विषये अथवा अन्यस्मिन् विषये ये जेष्ठाः श्रेष्ठाः च तेषां व्याख्यानं, भोजनं, उपहारः तथा च दिनान्ते दशवादने दीपनिर्वाणं भविष्यति। एवंविधः दिनक्रमः तैः कथितः।

एतद् सर्वं श्रुत्वा वयं उद्घाटन समारंभार्थं गतवन्तः। तत्र एव वयं च मू कृष्णशास्त्रीमहोदयं तथा श्री श्री सुगुणेन्द्रतीर्थस्वामिनं दृष्टवन्तः। एते संस्कृते बहु विद्वांसः । अहं श्रुतवती श्री सुगुणेन्द्रतीर्थस्वामी ये उडुपितीर्थक्षेत्रस्य मठाधिपाः अपि तथा च च मू कृष्णशास्त्री महोदयः द्वादशवर्ष पर्यन्तं विना एकस्थापि शब्दस्य उच्चारणं न कृतवान्। उद्घाटन समारंभे तैः उक्तं यद् 'संस्कृत वदतु न तु संस्कृतविषये'।

अनन्तरं एतस्मिन् संमेलने संस्कृतस्य अवनतेः

कारणानि संस्कृत छात्राणां समस्या: परिहा न् सरलसंस्कृत सम्भाषणं संस्कृतस्य पुनरुज्जीवनार्थं कार्ययोजना, विद्यार्थीशक्ति: इत्यादिषु बहूषु विषयेषु चिन्तनं अभवत् ।

अस्मिन् संमेलने केवलं एतान् विषयान् अधिकृत्य एव न भाषण चर्चा अभवत् अपि तु तत्र सरलसंस्कृतेन सम्भाषणं कथं करणीयं एतद् अपि अवदत् । वयं तु अस्माद् कारणात् शुद्ध संस्कृतेन किञ्चित् किञ्चित् वक्तुं समर्था: अभवाम। अत्र वयं अखिल भारत नेतृणां मार्गदर्शनम् अपि लब्धवन्त: । एकस्मीन गोष्ट्यां एक: वक्ता कन्नडभाषायांभाषणं अकरोत्सर्वे तत् ज्ञातुं न शक्तवन्त: एतद् तु आश्चर्यकारकं नास्ति परंतु तत्रस्थितेन विश्वास य: चमत्कार कृत: स: तु अविस्मरणीय: । तेन कन्नड भाषाया: अनुगमित संस्कृत अर्थ: शीघ्रतया कृत्वा श्रावित: ।

वयं तत्र संस्कृकवीथीनाटकानां प्रत्यक्ष दर्शनम् अकरोत् । एष तु महान् अनुभव: । पात्राणि वीथिनाटकं कुर्वन्ति । सर्वे जना: ये संस्कृतं न जानन्ति, ते अपि उत्सुकतया पश्यन्ति संस्कृतश्रृण्वन्ति च ।

संस्कृत सम्बधिनी प्रदर्शिनी तै: आयोजिता । संस्कृतभाषा नूतना भाषा अत: सर्वेसर्ववस्तूणां नामानि न जानन्ति । अत: तेषां नामानि तथा संस्कृतस्य विषये फलका: अपि तत्र आसन् । तत्रागता: माननीया: अस्मान् संस्कृत शास्त्रविमर्श: अपि कथितवन्त: । तथा च वयं ध्येयचिन्तनं अपि कृतवन्त: ।

उडुपि नगरे वयं केवलं गंभीर विषयाणां चर्चाम् एव न अकरोत् । नैका : भाषाक्रीडा: अपि वयं क्रीडीतवन्त: 'समूह गोष्ठ्या: आरम्भे वयं संस्कृतगीतनि अपि गीतवन्त: । प्रति राज्यस्य कृते पञ्च निमिषा: दत्ता: । तत्र संस्कृतगीतं अनुसृत्यं एकं ' लावणीगीतं', अस्माभि: गीतम् ।

संस्कृते अपि वयं हासविलास: कर्तुं शक्नुम: इति तत्र एव प्रथमं ज्ञातवन्त: वयम् । संस्कृत भाषा पुरातना । अत: केवलं पुरा यद् आसीत् तद् एव संस्कृतं इति न मन्तव्यम् । संस्कृत भाषाया: सम्बन्ध: आधुनिके जगति अपि संबंधयितुं शक्नुम: । अस्मिन् संमलने वयं श्रुतवन्त: संस्कृत भाषा संगणकस्यकृते उपयुक्ता भाषा तथा च संस्कृतेन संगणक प्रात्यक्षिकम् अपि रामानुजन् महोदयेन अस्मान् दर्शितम् ।

तथा च वैदिकगणितस्य उपयोग: आधुनिके काले कथं करणीय: इत्यस्य प्रात्यक्षिकम् अपि दर्शितम् एच्. एन्. पडियार महोदयै: । वैदिक गणितम् तु अतिप्राचीनम् परन्तु अधुना अपि तस्य उपयोग: अस्ति इति ज्ञातम् अस्माभि: ।

ईदृशंमेत् त्संमेलनम् दृष्ट्वा अस्माभि: अपि मानसि निश्चय: कृत: । यत्वयमपि संस्कृत रक्षणाय वर्धनाय यावद् शक्यं प्रयतामहे ।

वयं सर्वे भारतीया: संस्कृतवर्धनाय तस्या: लोकभाषारूप निर्माणाम प्रतिदिनं, प्रतिसप्ताहम्, प्रतिमासं निश्चित समयस्य दानं कर्तव्यभावनयाकुर्म: चेत् संस्कृतोन्निति: अस्मिन् जन्मनि (याचि देहि याचि डोळा) एव वयं अनुभोक्तुं शक्नुम: इत्यत्र नास्ति संशय: ।

जयतु संस्कृतम, जयतु भारतम् ।

■ ■ ■

## चुटके

"हे दंतवैद्य कसे काय आहेत ? चांगले दात काढतात का हो ?"

"हो, चांगलेच दात काढतात. मी परवा त्यांच्याकडे गेलो होतो तेव्हा त्यांनी माझा किडलेला दात काढण्याऐवजी चांगलाच दात काढला."

**अर्चना पोलकमवार**
द्वितीय वर्ष, कला

# विश्वबन्धुत्वम्।

**कु. मङ्गला सोमण**
तृतीय वर्ष, शास्त्र

अस्माकं देशे आविर्भूतं वेदवाङ्मयं जगति सर्वसु प्राचीनतमम्। अर्वाचीनो इतिहासोऽपि एतद् स्वीकरोति। अस्माकं ऋषयः मुनयः तपस्विनः यद् चिन्तनं कृतवन्तः तेषां विचाराणां सारं नाम अस्माकं वेदाः। माता पृथिवी पुत्रोऽहं पृथिव्याः इति वेदाः कथयन्ति। विश्वबन्धुत्वं नाम वसुधैव कुटुम्बकम्। विश्वस्मिन विद्यामानाः श्रेष्ठतमाः विचाराः अस्माकं परम्परायां दृश्यन्ते। शिकागो नगरे सर्वधर्मपरिषदे अखण्डं विश्वं प्रति बन्धुभावनां प्रकटीकृत्वा यदा विवेकानन्दमहाभागैः (अमेरिकायां) भोः मम बन्धुभगिन्यः" इति आवाहनं कृतं तदैरव सहस्रजनानां मनस्सु तदेव विश्वबन्धुत्वं प्रकटीभूतम्। तेषां महाभागानां मार्गदर्शनिन एव लोके वेदानां प्रचारकार्ये स्वामी रामतीर्थाः गतवन्तः। तेषामेव जीवने एषः प्रसङ्गः।

एकदा स्वामी रामतीर्थमहाभागैः जलमार्गेण (नौकया) अमेरिकां प्रति प्रस्थानं कृतम्। ते सन्यस्ताः आसन्। काषायवस्त्रधारिणः एते महोदयाः अतीव कोमलहृदयाः। जनैः सह बहु आदरेण आचरणम् एतेषाम्। न किमपि याचितं कस्मै अपि। वेदेषु सूक्ष्मः अभ्यासः तथा आङ्ग्लभाषायामपि प्रभुत्वम् आसीत्। अनात्मचिन्तया तेषां अमेरिकाप्रवासः अतीव सुलभः अभवत्।

यथाकालं अमेरिकायाः समुद्रतीरः दृष्टिपथमागतः अधुना प्रवासः समाप्तः भविष्यतीमि मत्वा अपरैः जनैः अवतरणार्थं यत्नाः प्रारब्धः। परस्परमेलनं स्ववस्तूनां एकत्रीकरणम् अभवत्। निकटमागता समुद्रतीरेण सह यात्रिकानां शीघ्रं बहिर्गन्तुम इच्छा अपि प्रवृद्धा तथापि रामतीर्थमहोदयाः तु चिरगम्भीराः आसन्।

अधुना प्रवासः समाप्तः। नौका प्रशान्ता। पान्थाः गच्छन्तीति सर्वत्र दृश्यम आसीत्। सर्वे जनाः शीघ्रं स्वेषु गृहेषु गतवन्तः परन्तु रामतीर्थमहोदयाः तत्रैव स्थाने स्थिताः आसन्।

तैः सह कानि अपि वस्तूनि प्रवाससाहित्यं नासीत्। यदा अन्ये सर्वे जनाः स्वेषु गृहेषु गतवन्तः तदा धीरेण रामतीर्थमहाभागाः समुद्रतीरं आगतवन्तः न कोऽपि यात्रिकः आसीत् तत्र। समीपे नगरवासिनः रामतीर्थान् दृष्ट्वा अगच्छन। तेषु कोऽपि गच्छन् तान् अपश्यत। स्वामेः काषायवासं, सुहास्यवदनं मुखस्योपरि धीरगाम्भीर्यं समाधानं च। तानेव गुणान् दृष्ट्वा स रामतीर्थं प्रति आकृष्टोऽभवत्। सकौतुकं तान्प्रति दृष्टो स्थितः।

रामतीर्थाः महाभागाः नावि अवतीर्य जलनिधीं पश्यती स्थिताः। निसर्गसौन्दर्यं अमेरिका जनपदानां पश्यन्तः तेषां मुखकमले अतीव आनन्द आसीत्। किञ्चित्समयानन्तरं सः गृहस्थः विस्मयचकितोऽभवत्। कौतुहलप्रेरितः सः रामतीर्थमहाभागानां समीपे आगतः यदा ते स्नेहयुक्तेन दृष्ट्या तं अपश्याम तदा सः अधिकमेव मन्त्रमुग्धेन जातः।

तेन रामतीर्थः महोदयाः पृष्टं "कुत्र गन्तव्यं भवतः?" इति। स्वामयः मन्दस्मितपूर्वकम् अवदन, "कुत्र गन्तव्यम् इति अधुनाऽपि न निश्चितम्।" स पुनः अपृच्छत्, "भवतः प्रवाससाहित्यानि वस्तूनि कुत्र तथा कस्यापि परिचयपत्रकं वा?" रामतीर्थ महाभागाः अकथयन्, "भोः ममसमीपे

किमपि साहित्यं परिचयपत्रकं वा नास्ति।".

स अमेरिकावसिन् बहु आश्चर्यो जातः तेन मृदुशब्दैः तान् पुनः पुष्टं "भवन्तः भारतवासिनः ननु। अपरे राष्ट्रे कथं वसयिष्यामः ? केऽपि आप्ता अत्र वसन्ति वा ?"

तान् सर्वान्प्रश्नान् श्रुत्वा तस्य समीपे गत्वा स्वहस्तं तस्य स्कन्धोपरि स्थापयित्वा रामतीर्थः महाभागाः अवदन् आम्। मम एकः बन्धुः अस्ति अत्र।

"कः स : ?" तेन सविस्मयं पृष्टम्। क्षणमेकं तं दृष्ट्वा ते अब्रूवन्, भवान् एव मम बन्धु : किल।" ते शब्दाः तस्य हृदये स्मिताः । तस्य मनसि रामतीर्थान्प्रति समदि एव बन्धुत्वभावः जागृतः। रामतीर्थ महोदयस्य हस्तौ स्वहस्तयोः आदाय तेन, "तर्हि गृहं गच्छावः।" इति कथितम्।

अधुना स्वामिनां अमेरिकायां वास्तव्यं प्रति न काऽपि चिन्ता कार्या । तैः तेन सह गृहं प्रति प्रस्थानं कृतम्

■ ■ ■

## ग्रस्त

गुरुजी : मुलांनो, 'ग्रस्त' हा प्रत्यय असलेले काही शब्द सांगा पाहू.

विजय : गुरुजी, दुष्काळग्रस्त.

अशोक : गुरुजी, पूरग्रस्त.

गुरुजी : रमेश, तू सांग पाहू.

रमेश : (गुरुजींच्या डोक्याकडे बघत) गुरुजी, टक्कलग्रस्त.

**नंदकुमार कांबळे**
एम. कॉम. भाग - २

## महागाई

पालेभाज्या महागल्या, कडधान्ये महागली
पगार कमी, मात्र घरभाडी वाढली
गॅस, रॉकेलच्या किंमती भडकल्या
रेल्वे, टॅक्सी, रिक्षाची भाडी वाढली
स्वस्त असे काही राहिलेच नाही
महागाईचा हंगाम आला
फक्त 'जीव' मात्र स्वस्त झाला !

**नंदकुमार कांबळे**
एम. कॉम. भाग - २

## वायरमनचे डोके

मालकीण : (वायरमनला उद्देशून) तुम्ही काल दरवाज्याची घंटी दुरुस्त करायला येणार होता ना ?

वायरमन : बाईसाहेब, मी आलो होतो; पण मी बराच वेळ घंटीचे बटण दाबूनही काहीच प्रतिसाद मिळाला नाही व दरवाजा उघडला नाही म्हणून मी परत निघून गेलो.

**नंदकुमार कांबळे**
एम. कॉम. भाग - २

# कपील देव

मी अनेक कसोटी सामने खेळलो. काही कायमचे आठवणीत रहाण्याजोगे तर काही विसरण्याजोगे. १९७८ साली फैसलाबादच्या मैदानावर मी कसोटीत पदार्पण केले व त्यानंतर मी खूप बळी मिळविले. खूप धावाही जमा केल्या. अलिकडे सामने एकापाठोपाठ इतके होतात की एखादी वैयक्तिक घटना स्मरणात राहणे कठीणच. अशा सातत्याच्या सामन्यामध्ये अनेक घटना केव्हा घडतात तेच लक्षात रहात नाही. तरीही काही क्षण आजही मला स्पष्टपणे दिसतात हे खरे !

माझ्या दृष्टीने तर एक सामना मी कधीही विसरू शकणार नाही. तो म्हणजे १९८३ च्या जागतिक अजिक्यपदासाठी झिम्बाब्वेविरुद्धचा. केंटमधील टन ब्रीज वेल्सचे नयनमनोहर मैदान. मोठ्या क्रिकेटमध्ये प्रथमच प्रवेश करणाऱ्या झिम्बाब्वेच्या संघाविरुद्ध आम्ही खेळणार होतो. अगदी हातातून गेलेला सामना आम्ही जिकला. क्रिकेट हा खेळच अनिश्चिततेचा आहे हे त्या सामन्याने दाखवून दिले. भारतीय संघाची स्थिती होती चार बाद नऊ धावा ! पराभव समोर दिसत होता. मी फलंदाजीला जाताना त्याक्षणी माझ्या मनात कोणते विचार होते असे अनेकजण मला विचारतात. मोठी खेळी खेळायची असे टरवूनच मी मैदानात उतरलो होतो का ? वगैरे, वगैरे ..... खरं पाह्यलं, तर त्यावेळी मी नशिबवान होतो असंच म्हणावं लागेल. आयुष्यात एकदाच अशी होऊ शकणारी खेळी मी त्या दिवशी खेळलो. परत अशी खेळी माझ्याकडून खेळली जाईल की नाही हे मी सांगू शकणार नाही. त्यावेळी फलंदाजीस जातांना मी खूप रागावलो होतो हे सत्य ! मला पूर्ण जाणीव होती की माझ्याकडून फलंदाजी नीट झाली नाही तर हा सामना भारताला गमवावा लागणार ! म्हणूनच खेळपट्टीवर चिकटून राहण्याचा उद्देशाने मी मैदानात उतरलो. मी खेळपट्टीवर टिकून राहिलो तर धावा आपोआप होतील अशी माझी धारणा होती. ती वेळच अशी होती की त्यावेळी आत्मघातकी खेळी खेळणं मला परवडणारं नव्हतं. एक बाजू मी लावून धरत असतानाच दुसऱ्या बाजुनं आमचा आणखी एक गडी बाद झाला. भारत पाच बाद १७ धावा. त्यावेळी उपहाराची वेळ झाली. त्या दरम्यान माझ्या आयुष्यातील सर्वात जास्त वेळ घेत मी माझे अर्धशतक पूर्ण केले. उपहाराच्या वेळी मी पॅव्हेलियनमध्ये आलो खरा, पण मला धक्काच बसला. माझ्या संघातील एकही खेळाडू तेथे नव्हता. झटकन मी शांत झालो. माझ्या भोवती उपस्थित राहणे हे इतर खेळाडूंना किती अवघड वाटलं हे माझ्या लक्षात आलं. मी हसायचा प्रयत्न केला खरा. पण खेळाडू माझ्यापासून दूर दूरच राहिले. माझ्या खुर्चीवर टॉवेल होता. समोर पाणी होतं. पण एकही सहकारी नव्हता. मी एकटाच. या वेळी माझी मनोमन खात्री झाली की आमची धावसंख्या कितीही असो, प्रत्येक खेळाडूने आत्मसमर्पणाच्या थाटातच खेळलं पाहिजे. त्याच जोरात मी नंतर खेळपट्टीवर गेलो. १७५ धावा काढल्या. आम्ही सामना जिकला. हा माझा जागतिक विक्रम नंतर व्हिव्हियन रिचर्डस् ने मोडला.

जे घडलं तो इतिहास झाला. आम्ही हरणारी खेळी जिंकली.

म्हणतात नां, ज्याचा शेवट गोड, तीच घटना खरी !

■ ■ ■

# हिंदी विभाग

# हमारे राष्ट्रीय कवि : मैथिलीशरण गुप्त

**मनस्विनी प्रभुणे**
प्रथम वर्ष, साहित्य

हिंदी साहित्य जगत की काव्यधारा में मैथिलीशरण गुप्तजी का नाम बड़े आदर से लिया जाता है। गुप्तजी हिंदी साहित्य में राष्ट्रीय कवि के रुप में जाने जाते है। मैथिलीशरणजी भारत के राष्ट्र के अतीत के प्रति अत्यंत जागरुक कवि है। भारत की संस्कृति को मुखर करनेवाले रुप में कविता का विषय बनाना यह आपकी विशेषता है।

गुप्तजी का जन्म १८८६ ईसवी में उत्तरप्रदेश के झाँसी जिले के चिरगाँव में हुआ । इनके पिता एक ओर रामभक्त थे तो एक ओर कवि का संगम स्थल थे। रामभक्ति और कविता मैथिलीशरण जी को वंशपरंपरागत रुप में मिली । इसीलिये उनके काव्य में वैष्णव-भक्ति के अंकुर दिखायी देते है। "साकेत" यह काव्यखंड रामायण पर आधारित है। इनकी काव्य-प्रतिभा के विकास में महावीरप्रसाद द्विवेदी का विशेष योग रहा है। द्विवेदीजी की प्रेरणा से ही उनकी प्रमुख रचनाएँ 'सरस्वती' नामक समाचर पत्र में प्रकाशित होने लगी।

उनके व्यक्तित्व में तीन बाते मुख्य हैं। रामप्रेम, साहित्यप्रेम, राष्ट्रप्रेम। आरंभ में इन्होंने भी अन्य युवक कवियों के समान प्रेम-यौवन के गीत लिखने शुरु किये थे, किंतु जल्द ही आचार्य द्विवेदी के प्रेरणा से उनके स्वर आदर्श राष्ट्रीयता के क्षेत्र में मुखरित होने लगे। शीघ्र ही इन्हें इस क्षेत्र में ख्याती भी प्राप्त हो गयी। जैसे ही इनका 'भारत-भारती' नामक काव्य प्रकाशित हुआ, लोगोंने स्वत:ही इन्हें राष्ट्रकवि कहना आरंभ कर दिया। इसके बाद इनके काव्य में राष्ट्रीयता की धारा बहने लगी। परिणाम स्वरुप जब भारत स्वतंत्र हुआ तो देश के प्रथम राष्ट्रपिता ने संवैधानिक रुप से इन्हे देश का राष्ट्रकवि घोषित किया। और राज्यभाषा का सदस्य भी मनोनीत किया गया, जिस पद पर वे जीवन के अन्तिम क्षणों तक बने रहे है। गुप्तजी राज्यसभा में भी अपने विचार अक्सर कविता में ही प्रगट किया करते थे।

मैथिलीशरण गुप्त की साहित्य में अपनापन है। यह काव्य खास करके हमारे लिए गुप्तजी ने लिखा है, ऐसा लगता है। इन्हीं उनके अपनापन की वृत्ती से नवयुवक साहित्यकारों को प्रोत्साहित करना वे अपना राष्ट्रीय कर्तव्य ही मानते है। इनकी एक कविता है 'नवयुवकों के प्रति' इस कविता में गुप्तजीने नवयुवकों को राष्ट्रीयता का उपदेश किया है। उनका घर-आंगन हमेशा छोटे-बड़े साहित्यकारों का संगमस्थल रहा करता था।

मैथिलीशरण गुप्तजीने लगभग ४० के आसपास अपने काव्य ग्रंथ लिखे है। इनमें 'जयभारत' प्रबंधकाव्य, 'साकेत' महाकाव्य और 'पंचवटी', 'अनघ', 'सिद्धराज', 'जयद्रथ-वध' आदि खण्डकाव्य उल्लेखनीय है। 'जयभारत' की रचना 'महाभारत' के कथाप्रसंगों के आधार पर चित्रित किया गया है। इनके काव्य की और एक विशेषता ये है कि इन्होंने अपने काव्य में उपेक्षित व्यक्तियों के अंतरंग को प्रकट किया है। उदाहरण के तौर पर हम कैकयी को ले सकते है । 'साकेत' इस महाकाव्य में हमे कैकयी का एक अलग रुप दिखाई देता है। हम राम,

भरत, सीता, लक्ष्मण को आदरपूर्वक देखते है। कैकयी के चरित्र पर लगे कलंक को दूर करने का प्रयास गुप्तजीने अपनी कविता के माध्यम में किया है। और एक पात्र है जिसका गुप्तजीने बहुत सुंदर चित्रण किया है, वो है उर्मिला। लक्ष्मण की पत्नी उर्मिला के विरह को बडी मर्मस्पर्शी शैली में अंकित किया गया है।

ज्यादा तर इन्होंने अपना काव्य साहित्य स्त्रियोंपर लिखा। उनका दुःख इन्होंने समझा है। अपने कविता के जरिये उसे प्रक्ट किया है। इनकी काव्य की और एक खूबी है, की वह काव्य के पात्र को एक ऐसे उँचे मकाम पर भी पहुँचाते है और उसी प्रकार पात्र को सामान्य मनुष्य की तरह प्रस्तुत करते है। राम, लक्ष्मण, भरत, गौतमबुद्ध को इन्होंने अपने काव्य में सामान्य मनुष्य की भाँति प्रस्तुत किया है और महान रुप भी दिया है।

'वनवासिनी सीता' इस कविता में मैथिलीजीने सीता के वनवास के कालखंड को चित्रित किया है। सीता को यहाँ सामान्य स्त्री का प्रतिक बनाया है। राजप्रासादों के सुख के बगैर भी सीता वन में कैसे सुखी है यह दिखाया गया है। "निन सौंध सदन में उटन पिता ने छाया, मेरी कुटीया में राज-भवन मन भाया।" ऐसा सीता अपनी कुटियाँ के बारे में कहती है।

'यशोधरा' इस खंडकाव्य रचने का उद्देश गौतम बुद्ध की पत्नी यशोधरा के माध्यम से भारतीय नारी के जीवन में व्यास युग-युगों की करुणा और ममता की भावना को चित्रित करना ही है। इस बात का प्रमाण उनकी इन पंक्तियों से मिल जाता है।

"अबला जीवन हाय ! तुम्हारी यही कहानी !

आँचल में है दूध और आँखो में पानी !"

नारी जाती के दुःख का वर्णन इस पंक्तियों में दिखाई देता है।

गुप्तजी समन्वयवादी कवि थे, अतः उन्होंने विभिन्न संस्कृतियों और धर्म-सांप्रदायों के प्रति सहानुभूति व्यक्त की है। रामभक्त होने पर भी 'द्वापर' में कृष्णभक्ति का सरस निरुपण किया है। इसी प्रकार 'काबा और कर्बला' में इस्लाम धर्म के प्रति तथा 'गुरुकुल' में सिक्ख गुरुओं के प्रति श्रद्धाभाव का चित्रण मिलता है। 'अजित' काव्यखंड में राष्ट्रीय आंदोलक कविताएँ है। गुप्तजी काव्य का जीवन से सहज सम्बन्ध मानते थे। इसलिए उनके काव्य में भक्ति, समाज, राष्ट्र आदि का विभिन्न रुपों में चित्रण हुआ है।

सामान्यतया एक राष्ट्रकवि के जो दायित्व होते है, गुप्तजी में उनका निर्वाह सफलता के साथ किया है। ऐसे देश के प्रति, संस्कृती के प्रति, उपेक्षित व्यक्तियोंके प्रति, अपनी भावना के काव्य में लिखनेवाले महान राष्ट्रीय कवि का देहान्त झाँसी में ही १९६४ में हुआ ।

मैथिलीजी अपनी कविता के कारण हमे अपने लगते है, हमारे लगते है, इसीलिए तो 'हमारे राष्ट्रीय कवि : मैथिली शरण गुप्त' यह शिर्षक सार्थक होता है।

■ ■ ■

## चलते चलते...

"आप जब जा ही रहें हैं तो तकल्लुफ कैसा ?
यह जरुरी तो नहीं हाथ मिलाया जाये ॥

"वो साथ थे तो अजब धूप छाँव रहती थी,
अब तो बस एक ही मौसम ठहर गया मुझ में ॥"

"आप जा रहे हैं तो कुछ याद आता नहीं
वरना कुछ हमने आपसे कहना जरुर था ॥"

"उजाले अपनी यादों के हमारे साथ रहने दो
न ज़ाने किस गली में जिंदगी की शाम हो जाये ॥

**मनस्विनी प्रभुणे**
प्र. व. साहित्य

## ब्रह्मा के बेटे

स्वप्न और यथार्थ ब्रह्माके दो लाडले पुत्र थे। एक दिन दोनों में लड़ाई हुई। दोनों पिता के पास पहुँचे और बोले, "भगवान, आज निर्णय हो जाना चाहिए कि, हम दोनों में किसकी महिमा अधिक है ?" विधाता मुस्कुराए और बोले, "जमीन पर खड़े-खड़े जो आकाश छू लेगा उसकी महिमा सबसे बड़ी है।"

दोनों बेटे परीक्षा देने को उतावले हो उठें। स्वप्न ने आकाश तो छू लिया मगर उसके पैर जमीन तक नहीं पहुँच सके। वह निराश हो गया। अब यथार्थ की बारी आयी। जमीन पर तो वह स्थिर हो गया; मगर आकाश तक वह हजार उछल कूद के बाद भी नहीं पहुँच सका।

दोनों के विफल प्रयासों को देख विधाता हँसे, फिर सस्नेह बोले, "देख लिया न, तुम्हारी महिमा एक दुसरे के पूरक होने में है, अकेले में नहीं।"

**संजय तिवारी**

## प्रकाश

"गुरुदेव, मैं आपसे कुछ जानना चाहता हूँ। मेरे मन में एक प्रश्न घूम रहा है। क्या आप मेरी जिज्ञासा पूरी करेंगे ?" शिष्य ने चरण स्पर्श किया।

"कहो बेटा, क्या समस्या है ? प्रश्न अगर यथार्थ से है तो अवश्य उत्तर मिलेगा।" गुरुदेव ने आशिर्वाद देते हुए कहा।

"गुरुदेव, मैंने राम की पूजा की । कृष्ण को जानने की कोशिश की। ईसा मसीह का चित्र श्रद्धा से देखता आया हूँ। कुरान को पढ कर अल्लाह के बारे में जानना चाहा। इसके अलावा गौतम बुद्ध, महावीर स्वामी, गुरु नानक, सभी का विस्तार से अध्ययन किया । लेकिन इतना सब जानने के बाद, अब मेरे मन में शंका आ गई है कि, सब का जीवन चरित्र एक दूसरे से, लगभग भिन्न है, उनके उपदेश अलग अलग परिस्थितियों में अलग हैं तो आप ही बताईये मैं किसे श्रेष्ठ मानूँ ?" शिष्य ने समस्या सामने रखी।

गुरुदेव मुस्कुराएँ फिर कहा, " बेटा, इन दीपकों को देख रहे हो । साथी के आकार-प्रकार एक दुसरे से सर्वथा भिन्न है। लेकिन उनसे निकलने वाले प्रकाश को क्या तुम अलग कर सकते हो ?" राम, कृष्ण, ईसा, बुद्ध, महावीर, मोहम्मद, जिन्हें तुम पढते हो, देखतो हो, वे सब विभिन्न प्रकार के दीपक है। तुम केवल उनकी ओर देखते हो इस लिए सब अलग दिखते है। लेकिन अगर उनमें से निकलता हुआ प्रकाश देखोगे तो वह एक सा दिखाई देगा। एक दीपक का प्रकाश, दुसरे के प्रकाश से मिलकर, अलग नहीं दिखाई देता। बल्कि दोनों मिलकर और प्रखर हो उठते हैं। इसलिए तुम दीपकों को मन देखो, केवल उनकी रोशनी देखोगे तो तुम्हारी शंका का समाधान हो जायेगा।"

शिष्य को प्रकाश मिल चुका था और संतुष्ट होकर गुरु के चरणों पर गिर पडा।

**संजय तिवारी**

■ ■ ■

## प्रयाण

नहीं लौटना सीखा मैंने
कदम अगर आगे बढ जायें ॥१ ॥

विस्मृत नहीं राम का साहस
कुरुक्षेत्र न भुला मैंने,
अभिमन्यू की दिव्य वीरता
क्षण- क्षण भरती तेज हृदय में
भय से क्यों भयभीत हुआ वह
जिसने मृत्यु वसन पहना हो
उसके आगे पथ - बाधा क्या?
जो बाधाओं से जन्मा हो,
पीठ दिखाता नहीं योद्धा
अगर सामने रण आ जाए
नहीं लौटना सीखा मैंने
कदम अगर आगे बढ जायें ॥२ ॥

चारों ओर निराशा यदि है
आशा की रोशनी यही है
घना - तिमिर घनघोर घटा गर
शीत प्रकाशित ज्योति यहीं है
मुझे ढूँढना उसी किरण को
जो पथ की गरिमा दर्शाये
मुझें ढूँढना उसी पवन को
मंजिल की सुरभि ले आये
खोज रहेगी जारी तब तक,
जब तक मंजिल न मिल जाए
नहीं लौटना सीखा मैंने
कदम अगर मेरे बढ जाए ॥३ ॥

**संजय तिवारी**
तृतीय वर्ष, शास्त्र

## हमारा आशियाना

टूट गये सब तानें बानें
डुबा है आशियाँ हमारा
दफन हो गयी राष्ट्र एकता
आज लूट गया जहाँ हमारा ॥१ ॥

हमने की थी प्रबल लड़ाई
आजादी को पाने को
नहीं मरे थे, राष्ट्र वीर सब
अपने स्वार्थ और लालच में
मारा गया विवेक हमारा ॥ २ ॥

नहीं स्वप्न था यह गांधीं का
न थी भगतसिंह की आशा
समरभूमि के रणवीरों की
स्वतंत्रता की यह परिभाषा?
उत्तर खोज रही भारत-माँ
कहाँ छिपा एकात्म हमारा? ॥ ३ ॥

धर्म, जाति, आस्थाएँ वंश
यह तो सब अपनी खेती है
यही धरा हम सब की जननी
यही धरा सब को सेती है
मजहब की निर्मल धाराएँ
भूला है यह राष्ट्र हमारा ॥ ४ ॥

टूट गये सब तानें बानें
टुटा है आशियाँ हमारा ॥ ५ ॥

**संजय तिवारी**
तृतीय वर्ष, शास्त्र

# इंग्रजी विभाग

# LIFE AND ITS GOAL

AVINASH ADHAV
T.Y.B. Sc.

A life without goal is in short, no life without a direction, without any meaning. It is a life which is floating without any goal, which has no worth, no significance.

" Life is real, life is earnest

And the grave is not its goal."

Life looses all its attraction when it no longer has any purpose. People commit suicide just because they think that life has lost all to its meaning. Their tragedy lies in having been able to overcome temporary hindrance of the goal seeking selfeffected image. The best analogy of such a life which has no goal can be given as :

"Like sailing a boat in a desert."

" A beautiful intense life in lived" say Parlor, "Only by man who all his long life pursues a goal which is attainable yet never attained or the man, who strenuously passes from one goal to another. All progress and culture are a function of their goal seeking reflex."

**How to Achieve a Goal :**

Things necessary to achieve a goal are :

- Have a clear picture - vision of exactly what you want to do or accomplish in life.
- Believe that you can and will succeed in doing it.
- Start a fresh to do it again and again and keep at it.

The first and the great factor in success is a definite goal, a clear picture or exactly what an individual wants do to. There must be a clear defined objective - a specific four square goal to work towards a bull's eye to shoot at. Note what you want and make a shortest route for it. Lack of target is a source of unhappiness.

Having set a target or a goal, believe firmly, deeply and unflinchingly. That you will attain it. Don't let doubt creep into your thinking. Eject it mercilessly out of your mind.

"A doubting thought seldom
achieves anything

Our doubts are trailors

And make us loose the goal,we
often might win

By fearing to make an attempt."

You have your goal, you have built your dream castle in the air. You firmly believe that you will realise it. Now get busy! To day-night now. Put the foundation under it. Don't let it dangle in the air. Make it come true

keep on working at it and you will work a miracle as surely as day follows night.

Achieving is a habit. It can be developed by making yourself believe.

James Henry used to preach "Will you believe." Set about to form this habit of belief in people, in life, in God, belief in yourself in your innate greatness.

Little by little, brick by brick, slowly, steadily, surely, patiently, confidently, persistently, unwaveringly - it is long pull. But keep at it hour by hour, day by day. Have faith it is shaping.

The world belongs to the enthusiast purchasers who have their mind cool. The God will sell its all good things at the price of persistent labour.

Don't let idle diversion interrupt your efforts in the attainment of your goal.

A man who has unattering faith in himself is not discouraged by failures. For him failures are stepping stones who used to say that, "'imposible' is a word found in the dictionary of fools."

Don't be afraid of doing slowly, only be afraid of standing still.

In the persuit of your goal you cannot have more inspiring motto than the following lines of Robert Frost, which Pandit Nehru adopted as his own motto :

"The words are lovely, dark and
deep,
But I have promised to keep.
And miles to go before I sleep,
And miles to go before I sleep."

■ ■ ■

## A SMILE

Riddle me, riddle me,riddle me- ree,
What is it that you can give,
For as long as you live,
And it doesn't lost a thing,
Answer me that,
And I'll give you a smile !

Yes it is a smile thats-
Like lightening in the sky,
Like a colourful butterfly,
And brings so much joy.

It is like a cresent moon
At night in the sky high up,
Like a rainbow downside up,
Like a wagging tail of a pup,
And brings more joy than any toy.

All kinds of hearts it mends,
Gets you many friends,
It gives you a feelings of mirth,
You can never measure its worth.

A smile makes you want to sing
without reason,
It has no religion,
No language and no region,
A smile gets you another.

So get ready for the best,
And turn up your mouths' ends,
At brothers, sisters and friends,
Father, mother and the rest.

**P. Vijaya Bharati**
XI C

# FERMAT'S LAST THEOREM

**History's Most Celebrated Maths Probelm,**
**$X^n + Y^n = ? Z^n$**
**Is Sloved At Last.**

On the morning of Wednesday, June 23, 1993, an event took place in Cambridge, England, which can be described as the mathematical equivalent of splitting the atom. At the end of a series of three lectures entitled, "Modular forms, elliptic curves and Galois representations, " **Prof. Andrew Wiles** calmly announced to an audience of over a hundred experts that he had solved the Fermat Conjecture.

*One of the great events in the history of maths occured recently when the British mathematician Andrew Wiles, came up with a solution to a 350 years old problem "Fermat's Conjecture."*

Our story begins in 1637, when Frenchman **Pierre de Fermat**, a lawyer, a poet and an amateur mathematician, obtained a copy of **Bachet's** translation of the Greek work by the third century mathematician **Diophantus** and read the proof giving all solutions in whole numbers of equation :
$a^2 + b^2 = c^2$,

For example, $3^2 + 4^2 = 5^2$ and $5^2 + 12^2 = 13^2$ and there are infinitely many such solutions.

In the margin of that book, Fermat wrote :

"On the contrary, it is impossible to separate a cube into two cubes, a fourth power into two - fourth powers or generally,

*It is impossible to find non-zero whole numbers x,y,z which satisfy the equation :*

*$X^n + Y^n = Z^n$ where $n > h2$; which is 'Fermat's Last Theorem.'*

Fermat further added : " I have found for this, a truely wonderful proof, but the margin is too small to hold it."

By profession, Fermat was a jurist and parliamentarian. His diversion was maths, which he approached as amateur but developed as a master of masters. He is most famous for his work in theory of numbers, although he was one of the founders of analytic geometry and the calculus.

Actually, Fermat gave a proof for n=4,but not for any higher valûe. Since then, there was no time in the history of mathematics when the Fermat conjecture was not the centre of attraction. A number of eminent

mathematicians and amateurs alike have tried to reconstruct when he wrote those sentences in margin.

The great German mathematician **Carl Friedrich Gauss** attempted the case n=3 and solved it. In the process, he discovered the new realm of complex numbers. Gauss undoubtedly attempted the highest cases of the Fermat conjecture but didn't pursue it. Perhaps he was looking for a general method that would resolve it with one stroke.

In 1816, the Paris Academy announced a prize for the solution to the Fermat conjecture. In a letter dated March 21,1816, **Gauss** wrote to his friend **Olbers** :

" I am very much obliged for your news concerning the Paris prize. But I confess that Fermat's conjecture as an isolated proposition has very little interest for me, because I could easily lay down a multiple of such propositions,which one could neither prove nor dispose of."

At that time, it was too early to determine the role of the Fermat conjecture in the development of mathematics. The essential concepts were missing. It took another century to evolve them. The success of Gauss in the case n=3 suggestged a new kind of arithmetic and the beginnings of the theory of algebraic number fields.

So, in 1820's a number of distinguished French and a German mathematicians were trying very hard to solve the general case.

Some success came only after long labour and that too only in small cases, for instance,

In 1825, 'Lejeune Dirichlet' read a paper in Paris's Academy for the case n=5. His proof was incomplete, as was pointed by **Legendre**, who finally provided an independent and complete proof. Dirichlet then completed his own proof and published it in 1828. In 1832, he settled the case n-14.

In 1839, 'Lame' solved the case n=7. Each case revealed a new number field and a new kind of arithmetic. But no general pattern was emerging.

At that time, it was well known that, "to prove the Fermat conjecture in general, it is sufficient to prove it for odd prime."

And hence mathematicians now concentrated on prime values of n.

Thus, in 1847, Lame generalised his method and published a "proof" in Liouville's journal. After its publication, Liouville noticed that the proof was not valid since Lame had assumed, without justification, that 'fundamental theorem of arithmetic was valid in these new realms of number fields that arose in connection with the Fermat

conjecture.

The 'Fundamental Theorem of Arithmetic' for integers is the assertion that : Every positive integer >1, can be factored into prime numbers in an essentially unique way, and, for the rings of algebraic integers, the statement of fundamental theorem of arithmetic is that, Every non-zero non-unit can be written uniquely as a product of prime (irreducible) elements.

That, this property didn't hold for the higher red lams of number fields arising in the Fermat conjecture was very exciting. In fact, it was an indication of the 'subtlety' of the problem.

In Germany, the mathematician **'E. E. Kummer'** devoted himself to the study of these higher realms of numbers. He recognised that though the unique factorisation into prime numbers didn't hold for these number fields, there was a way to circumvent it. To do this, he investigated the nature of factorisation and discovered two new fundamental concepts, the notion of a 'ring' and the notion of an 'ideal'.

Thus,

In evolution of mathematics, Fermat problem has proved highly fertile for the growth and development of new ideas.

Annual prize distribution and college feast
So will our teachers kindly tell us
When to study so as to come out of the Ordeal with flying colours ???

**Avinash S. Adhav**
T. Y. B. Sc.

# रिचर्ड हॅडली

क्रिकेट या खेळात मी जीव ओतून खेळतो. इतक्या वेळा आणि इतक्या देशांशी मी सामने खेळलो आहे की असंख्य घटनांची भाइगर्दी माझ्या डोळ्यासमोर उभी राहते. सगळ्याच आठवणी सांगणं शक्य नाही. म्हणून त्यातल्याच काही वेचक घटना मी सांगतो.

१९७१-७२ साली मी कँटरबरीकडून खेळत होतो. माझ्याबरोबरचे खेळाडू हे नाणावलेले व जागतिक प्रतिष्ठा लाभलेले असे होते. प्रत्येकाच्या तोंडात त्यांची नावे सहजतेनं यायची. त्या सामन्यात अकल्पितपणे एका छोट्या मुलाने आपली वही माझ्यासमोर आदळली. म्हणाला, "स्वाक्षरी करा". मी ती वही सहज वरवर चाळली. त्यात अनेक स्वाक्षऱ्या होत्या, हेडली हॉवर्थ, बॉब क्यूनिक्स, रॉस मॉर्गन, ग्रॅहॅम डाइलिंग, ब्रायन हेस्टिंग्ज .... इ. मातब्बर खेळाडूंच्या स्वाक्षऱ्या. मी माझी स्वाक्षरी केली. तोच एकाएकी त्या छोट्या मुलाने विचारले, "पण तुम्ही कोण ?" मी म्हटले, 'मी रिचर्ड हॅडली, एक नवोदित खेळाडू.' तो उत्तरला, 'ओऽ असे काय ? तर मग तुमची स्वाक्षरी मला नको. तुम्ही स्वाक्षरी केलीच आहे. ती ती कशी खोडता येईल हे जरा कृपया सांगाल का ?. अशा संभ्रमात टाकणाऱ्या, ओशाळून टाकणाऱ्या प्रसंगाबद्दल मी काय सांगणार ? १९७८. लॉर्डस मैदानावरील सामना. इंग्लंडविरूद्धची तिसरी कसोटी. आमच्या संघाने ३०० धावा केल्या होत्या. इंग्लंड तीन बाद २००. प्रसंग बाका आहे हे आम्ही ओळखले. सामन्याला अचानक कलाटणी मिळाली. आम्ही इंग्लंडचा संघ २५० धावात गुंडाळला व आशादायक असा पुढावा घेतला. त्यानंतर मात्र आमच्यावर संकट कोसळले. चवथ्या दिवसअखेर धावफलक होता ७ बाद ३७. आमचा डाव संपला तेव्हा विजयासाठी इंग्लंडला केवळ १२० धावांची जरूरी होती.

त्याचवेळी एक लाजवणारा प्रसंग घडला. तोही माझ्याच बाबतीत. मी चेंडू टाकण्यासाठी धाव घ्यायला सुरुवात केली. प्रथम माझ्या पायाची आढी पडते. मी थोडासा थबकतो व नंतर धाव घ्यायला सुरुवात करतो. हे अनेकांनी पाहिले आहे. अशीच धाव मी सुरु केली. आणि काही कळायच्या आत मी खेळपट्टीवर दणकन् आदळलो. थेट तोंडावर. पायातपाय अडकून मी पडलो. प्रेक्षकांना व संघातील साऱ्या खेळाडूंना वाटले की मी जाणूनबुजून गंमत केली. २८००० प्रेक्षकांसमोर माझी अशी फजिती झाली. एवढेच नव्हे तर दिवाणखान्यात आरामात बसून अनेकांनी दूरदर्शनवर हा प्रसंग बघितला असणारच. मी लाजेनं अगदी लालेलाल झालो.

न्यूझीलंडचा १९७६ चा भारत, पाकिस्तान दौरा हा दुर्दैवीच ठरला. आठ आठवड्यातील ६ कसोटी सामन्यांपैकी आम्ही ४ हरलो. आमचं मनोबल पार खच्ची झालं. अशावेळी आम्हाला सावरुन घेण्याचं कार्य इतरांनी केलं. मुख्यतः जॉन मॉरिसन व शाळाशिक्षक अँडी रॉबर्टस् यांनी. त्यांनी आम्हाला खूप मोकळ्या व गंमतीशीर वातावरणात नेले. गंमत म्हणजे फळ्यावरती आम्हां सगळ्यांचे फोटो चिकटविले. हातातील छडीने प्रत्येक खेळाडूला कोणते स्वतंत्र खाते सांभाळावयास दिले आहे ते दाखविले. प्रत्येक खेळाडूला त्यांनी मंत्री बनविले. खातेवाटपही केले. अशा प्रकारे त्यांनी नियुक्त केलेल्या सरकारात आमचा पंतप्रधान होता ग्लेन टर्नर. अंतर्गत व्यवहार खातेही त्याच्याकडेच दिले. कारण काय तर त्याने एका भारतीय स्त्रीशी विवाह केला होता. विरोधी पक्षाचा नेता म्हणून रॉबर्ट अँडरसनची नियुक्ती केली. कारण वरिष्ठ खेळाडूंनी काहीही म्हटलं किंवा काहीच म्हटलं नाही तरी तो त्यांच्याशी कधीच सहमत व्हायचा नाही. स्थलांतरीतचं खातं दिलं डेव्हिल ओ सुलिव्हानला. कारण भारत व पाकिस्तान दोन्ही देश त्याला आवडले नव्हते. केव्हा परत एकदा न्यूझीलंडला जाईन असे त्याला झाले होते. आरोग्यखात्याचा मंत्री झाला होता वॅलीलीस्. कारण तो कायमच आजारी असायचा पाठदुखीमुळे. पर्यटन खाते गॅरी दूपला मिळाले. कारण संपूर्ण दौऱ्यात तो फक्त दोनच सामने खेळला. अर्थमंत्री होती रिचर्ड कॉलिंज. कारण संघाचे आर्थिक व्यवहार तोच बघायचा. ऊर्जामंत्री झाला पीटर पेथेटिक. आपली फिरकी गोलंदाजी दिवसातून सातत्यानं ३० पटकं टाकायचा. तरीही दमायचा नाही म्हणून त्याला हा नजराणा. समाजकल्याणकाते जिऑफ हॉवर्थकडे. कारण तो घरगुती प्रश्नांनी आधीच भंडावलेला. शेती व मच्छीमारी खात्याचा मंत्री बनला लान्स केर्न्स. कारण या दौऱ्यात सर्वोत्कृष्ट जेवणावर ताव मारण्याचा त्याला कोण अभिमान. करमणूक खाते मात्र मॉरिसनने स्वतःकडे ठेवले. कारण तरल विनोदबुद्धीचा तो साऱ्या संघात एकटाच अशी त्याची दृढ भावना. परराष्ट्रीय व्यवहार खाते माझ्याकडे सोपविण्यात आले. कारण मला एकट्यालाच इतरांपेक्षा खूप पत्रे यायची व त्यांनी मी उत्तरे ही लगेचच लिहायचो.

# वार्षिक अहवाल

# क्रीडा विभाग अहवाल १३-२४

## वरिष्ठ महाविद्यालय

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विद्यार्थी खेळाडूंमधून विविध खेळांसाठी क्रीडा प्रतिनिधींची निवड करण्यात आली, ती खालीलप्रमाणे :

श्री. परदेशी हरिष – क्रिकेट, श्री. शिंदे राम – मैदानी स्पर्धा व जलतरण स्पर्धा, श्री. थिटे संतोष – हॉकी, श्री. तहशीलदार दिनेश – टेबल टेनिस, श्री. परदेशी विजय – व्हॉलिबॉल, श्री. खांडे अमर – बॅडमिंटन, श्री. ऋषीकेश मद्रासी आणि कु. सविता पटवर्धन – आय. सी. एस. आर.

या वर्षी आमच्या महाविद्यालयाने विविध सांघिक व वैयक्तिक क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेतला. पुरुष व महिला कबड्डी संघाने आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत उपविजेते-पद संपादिले. सतीश जाधव याने आंतरमहाविद्यालयीन ज्युदो स्पर्धेत विजेतेपद संपादिले; तर विक्रांत आढाव याने वजन उचलण्याच्या स्पर्धेत पुन्हा प्रथम क्रमांक पटकाविला.

तर एन. एस. यू. आय. विद्यार्थी संघटनेने भरविलेल्या राज्य आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत, पुरुष संघाने विजेते तर महिला संघाने उपविजेते पद संपादिले. ह्या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन.

आमच्या महाविद्यालयातील खालील खेळाडूंना पुणे शहर विभागातून, पुणे विद्यापीठ आयोजित आंतर विभागीय स्पर्धेत भाग घेतला.

| | | |
|---|---|---|
| श्री. सोमनाथ नलावडे | एम. कॉम. | कबड्डी |
| श्री. ऋषीकेश मद्रासी | एस. वाय. बी. कॉम. | कबड्डी |
| कु. नंदिनी गोखले | एम. कॉम. | कबड्डी व फुटबॉल |
| कु. अनिता पारवे | एस. वाय. बी. ए. | कबड्डी |
| कु. सविता पटवर्धन | टी. वाय. बी. एस्सी. | कबड्डी |
| कु. वैशाली रेदासनी | एस. वाय. बी. एस्सी. | कबड्डी व फुटबॉल |
| कु. पौर्णिमा बहिरट | एफ. वाय. बी. कॉम. | फुटबॉल |
| कु. भारती कुलकर्णी | एफ. वाय. बी. कॉम. | क्रिकेट |
| श्री. संदीप त्रिगुणे | टी. वाय. बी. कॉम | क्रिकेट |
| श्री. मिलिंद कदम | टी. वाय. बी. कॉम. | फुटबॉल |
| श्री. सतीश जाधव | टी. वाय. बी. कॉम. | ज्युदो |
| श्री. राजेश वर्मा | एस. वाय. बी. एस्सी. | स्क्वॅश रॅकेट |
| श्री. पंकज देव | एस. वाय. बी. एस्सी. | जिम्नॅस्टिक |

| | | |
|---|---|---|
| श्री. विक्रांत आढाव | एस. वाय. बी. कॉम. | वजन उचलणे |
| श्री. शैलेश मुळे | ... वाय. बी. कॉम. | टेबल—टेनिस |
| श्री. राजमाने राम | ...न. कॉम. भाग १ | व्हॉलीबॉल |

आमच्या महाविद्यालयातील खालील खेळाडूंनी आंतर विद्यापीठ स्पर्धांत पुणे विद्यापीठाकडून भाग घेऊन महाविद्यालयाची आणि पुणे विद्यापीठाची शान वाढवली.

| | | |
|---|---|---|
| श्री. ऋषीकेश मद्रासी | एस ... कॉम. | कबड्डी |
| कु. अनिता पारवे | एस. वाय. बी. ए. | कबड्डी |
| कु. नंदिनी गोखले | एम. कॉम. | कबड्डी |
| कु. वैशाली रेदासनी | एस. वाय. बी. एस्सी. | कबड्डी |
| कु. पौर्णिमा बहिरट | एफ. वाय. बी. कॉम | फुटबॉल |
| कु. कुलकर्णी भारती | एफ. वाय. बी. कॉम. | क्रिकेट |
| श्री. जाधव सतीश | टी. वाय. बी. कॉम. | ज्युदो |
| श्री. वर्मा राकेश | एस. वाय. बी. एस्सी. | स्क्वॅश रॅकेट |
| श्री. देव पंकज | एस. वाय. बी. एस्सी. | जिम्नॅस्टिक |

त्याचप्रमाणे खालील विद्यार्थ्यांनी अखिल भारतीय आंतर विद्यापीठीय स्पर्धेत भाग घेऊन मॉडर्न महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर टाकली.

| | | |
|---|---|---|
| कु. भारती कुलकर्णी | एफ. वाय. बी. कॉम. | सॉफ्ट बॉल. |
| श्री. वर्मा राजेश | एस. वाय. बी. एस्सी. | स्क्वॅश रॅकेट |

कु. अनिता पारवे एस. वाय. बी. ए. हिची पुणे येथील तिसऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र राज्याच्या कबड्डी संघात निवड झाली. या स्पर्धेत तिला उपविजेते पदाचे 'रजत पदक' मिळाले, ही खरोखरच अभिनंदनीय व कौतुकास्पद गोष्ट आहे.

कु. नंदिनी गोखले हिची 'हिसार' येथे आयोजित महिला कबड्डी स्पर्धेत, राज्यपातळीवर निवड झाली.

श्री. सतिश मुळे याने इंडियन एक्स-सर्व्हिसेस लीग महाराष्ट्र आणि एव्हरेस्ट क्लब आयोजित टेबल-टेनिस, एकेरी मध्ये विजेतेपद संपादिले.

वरील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आमच्या सर्व खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन.

वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयीन खेळाडूंनी मिळविलेल्या अभिनंदनीय यशाकडे पाहताना एक गोष्ट नमूद केली पाहिजे की, यामागे मा. प्राचार्य, मा. उपप्राचार्य, क्रीडा शिक्षक, मा. चेअरमन, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व मार्गदर्शक यांचे सतत मिळणारे मार्गदर्शन, प्रोत्साहन व सहकार्य आहे.

**प्रा. पी. डी. कुलकर्णी**
कार्यवाह जिमखाना

**श्री. ऋषीकेश मद्रासी / कु. सविता पटवर्धन**
विद्यार्थी प्रतिनिधी

## कनिष्ठ महाविद्यालय

परंपरागत क्रीडा क्षेत्रातील यशोध्वज सदैव फडकत ठेवण्याचे व त्या परंपरेत भर टाकण्याचे / घालण्याचे कार्य आमच्या महाविद्यालयातील खेळाडूंनी केले हे नमूद करताना अतिशय आनंद होत आहे.

**विशेष उल्लेखनीय कामगिरी :**

आंतरशालेय (महाविद्यालयीन गट) कबड्डी स्पर्धा १९९३-९४ — मुले उपविजयी

आंतरशालेय (महाविद्यालयीन गट) कबड्डी स्पर्धा १९९३-९४ — मुली उपविजयी

आंतरशालेय राज्यस्तरीय लॉन टेनिस स्पर्धा १९९३-९४ — मुले विजयी संघ

**पराग जोशी** आंतरशालेय, विभागीय वजन उचलणे स्पर्धेत, ५९ किलोगट — प्रथम क्रमांक
आंतरशालेय, राज्यस्तरीय वजन उचलणे स्पर्धा, (१९९३-९४) द्वितीय क्रमांक

**प्रियदर्शन भाटे** आंतरशालेय, विभागीय व राज्यस्तरीय लॉन टेनिस स्पर्धेतील विजयी संघाचा कर्णधार

**सुयश बाबर** आंतरशालेय, विभागीय व राज्यस्तरीय लॉन टेनिस स्पर्धेतील विजयी संघाचा खेळाडू

**विक्रम गोडबोले** आंतरशालेय, विभागीय व राज्यस्तरीय लॉन टेनिस स्पर्धेतील विजयी संघाचा खेळाडू

**पुष्कर कुलकर्णी** त्रिवेंद्रम येथे झालेल्या राष्ट्रीय रोलर स्केटिंग स्पर्धा १९९३ मध्ये, महाराष्ट्र राज्य संघाकडून सहभाग.

**विशाल पवार** पंजाब येथे झालेल्या राष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेसाठी, महाराष्ट्र राज्याकडून निवड व तृतीय क्रमांकाचा मानकरी.

**कु. अनुप्रिता मगर** पुणे येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धांमध्ये कनोयिंग क्रीडा प्रकारासाठी महाराष्ट्र राज्याकडून निवड व 'ब्राँझ मेडल्स' (तृतीय क्रमांक) विजेती.

**उमेश गोलांडे** आंतरशालेय व आंतरशालेय विभागीय मैदानी स्पर्धा १०० मी. अडथळ्यांची शर्यतींमध्ये, प्रथम क्रमांक व लांब उडी आंतरशालेय स्पर्धेत प्रथम क्रमांक

दरवर्षी भरविण्यात येणाऱ्या आंतरवर्गीय क्रीडा स्पर्धा (सांघिक व वैयक्तिक) या वर्षीही घेण्यात आल्यात. विद्यार्थ्यांचा उत्कृष्ट सहभाग लाभला.

**या स्पर्धेतील यशाचे मानकरी खालीलप्रमाणे आहेत :**

सर्वसाधारण विजेतेपद (सांघिक) १२ वी ब

सर्वसाधारण विजेतेपद वैयक्तिक (मुले) उमेश गोलांडे (१२ वी कला)

सर्वसाधारण विजेतेपद वैयक्तिक (मुली) कु. छाया गायकवाड (११ वी कला)

कनिष्ठ महाविद्यालयातील खेळाडूंनी मिळविलेल्या या अभिनंदनीय यशाकडे दृष्टीक्षेप टाकताना एक गोष्ट कृतज्ञतेने नमूद करताना, आम्हाला अतिशय आनंद होत आहे, ती ही की, या मिळणाऱ्या यशामागे मा. प्राचार्य, मा. उपप्राचार्य, मा. पर्यवेक्षक, प्रमुख कनिष्ठ महाविद्यालय प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विविध खेळांचे सल्लागार व मार्गदर्शक यांचे सतत मिळणारे मार्गदर्शन, प्रोत्साहन व सहकार्य हे होय.

विजयी खेळाडूंचे अभिनंदन !

प्रा. पी. डी. कुलकर्णी
कार्याध्यक्ष

# वार्षिक स्नेह-संमेलन

भूकंपाच्या महाभयंकर हादऱ्यांनी उद्ध्वस्त झालेल्या संसारांच्या करुण कहाण्यांनी संपूर्ण जग हादरले. मनःस्थिती फार बिघडलेली असताना त्याचे पडसाद दैनंदिन जीवनावर दूरगामी उमटणे स्वाभाविकच आहे. ह्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी यंदाचे वार्षिक स्नेहसंमेलन अत्यंत साधेपणे साजरे करण्याचा एकमुखी निर्णय घेतला.

२७ व २८ जानेवारी, ९४ असे दोन दिवस स्नेह-संमेलन साजरे करण्यात आले. त्या वेळी अल्पोपाहार व एस. वाय. बी. कॉम. व टी. वाय. बी. कॉम. यांची एक-दिवसीय क्रिकेटची अंतिम मॅच आयोजिण्यात आलेली होती. विद्यार्थी प्रतिनिधींनी वर्गनिहाय विविध गुण-दर्शनाचे कार्यक्रम रद्द करून, त्यासाठीची रक्कम रु. २,१५०/— संत तुकारामनगर येथील भारतीय जैन संघटना संचालित भूकंपग्रस्तांच्या पाल्यांच्या शिक्षण संस्थेस देण्यात यावी असे ठरविले. त्याप्रमाणे मा. प्राचार्य, डॉ. स. य. परांजपे व श्री. ऋषीकेश मद्रासी, कु. पटवर्धन ह्या विद्यार्थी प्रतिनिधींनी वरील रक्कम संत तुकारामनगर येथे जाऊन संस्थेकडे सुपूर्त केली. संस्था चालकांनी विद्यार्थ्यांच्या सामाजिक जाणिवेचे कौतुक केले. त्या वेळी संस्थेच्या कामकाजाची सर्वांनी पाहणी करून, तेथील विद्यार्थ्यांसमवेत काही काळ घालविला.

स्नेह-संमेलन व्यवस्थित पार पाडण्याच्या कामी विद्यार्थी प्रतिनिधी, शिक्षक, शिक्षकेतर सहकारी व मा. प्राचार्य डॉ. स. य. परांजपे, उपप्राचार्य प्रा. अ. गो. गोसावी ह्यांनी विशेष सहकार्य केले.

प्रा. म. आ. कुलकर्णी
कार्याध्यक्ष

सौ. सुधा शाळीग्राम
उपकार्याध्यक्ष

# कलामंडळ

विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा म्हणून अनेक महाविद्यालयांतर्गत स्पर्धा भरविण्यात आल्या.

- **मेंदी स्पर्धा :** या स्पर्धेस चांगला प्रतिसाद मिळाला. ८५ स्पर्धकांनी यांत भाग घेतला. वरिष्ठ गट व कनिष्ठ गट अशा दोन गटात वेगवेगळी बक्षीसे देण्यात आली. प्रा. सुनील गोसावी यांनी या स्पर्धेचे आयोजन व कामकाज पाहिले.

- **'महा' संगीत स्पर्धा :** कनिष्ठ गटात जवळजवळ ५५ स्पर्धकांनी भाग घेतला. वरिष्ठ गटात प्रचंड प्रतिसाद मिळाल्यामुळे एक प्राथमिक फेरी व नंतर अंतिम फेरी घेऊन स्पर्धेचा दर्जा टिकवावा लागला. दोन दिवस चाललेल्या या स्पर्धेचे उद्घाटन, प्रसिद्ध गायक श्री. श्रीकांत पारगावकर यांनी केले.
  परीक्षक म्हणून श्री. आपटे, श्रीमती खाडिलकर, श्रीमती टिळक यांनी काम पाहिले. प्रा. लीना पाटणकर, प्रा. अनिल वनकळस व प्रा. सुधीर वैशंपायन यांनी या स्पर्धेचे आयोजन केले.

- **'महा' स्पर्धा :** आपल्या महाविद्यालयातील या अभिनव स्पर्धेत ११ एकांकिका, १२ नाट्यवाचन संघ, १५ एकपात्री व १२ कथा-कथन स्पर्धक असा समावेश होता. विद्यार्थ्यांचा सहभाग वाखाणण्याजोगा होता.
  श्री. प्रकाश रानडे, श्री. श्रीराम रानडे व राणी पारसनीस यांनी परीक्षकांचे काम केले.
  प्रा. अमृता सातभाई यांनी ह्या सर्व स्पर्धांचे कामकाज पाहिले.

आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांतूनसुद्धा आपल्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. व तेथे बक्षीसेही मिळाली आहेत. कल्याणी स्पर्धा, इंडसर्च, मीरा भजन, पुरुषोत्तम करंडक, फिरोदिया करंडक, MOOD INDIGO- 94, या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला.

या करिता प्रा. सुषमा जोग, प्रा. अनिल वनकळस, प्रा लीना पाटणकर, प्रा. गोहेल, प्रा. नरेन्द्र नायडू यांचे प्रचंड सहकार्य लाभले.

## वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ :

दि. २८ फेब्रुवारी, ९४ रोजी पं. हृदयनाथ मंगेशकरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. प्राचार्य डॉ. स. य. परांजपे यांनी स्वागतपर भाषण केले. कलामंडळाचे अध्यक्ष यांनी वर्षभराच्या कार्यक्रमांचा अहवाल सादर केला. तदनंतर पारितोषिक वितरण झाले. पंडितजींनी छोटेसे नेटके भाषण करून नंतर काही प्रश्नांची खुमासदार उत्तरे दिली. श्रोत्यांच्या आग्रहास्तव 'दयाघना' हे गाणं उर्दू ढंगात व मराठी साजातही पेश केले. सुहास शामगावकर याने पसायदान म्हटले. प्रा. (सौ.) लीना पाटणकर यांनी सूत्रसंचालन केले.

प्रा. वनकळस, प्रा. वैशंपायन, प्रा. आठवले, प्रा. (सौ.) कुवळेकर व प्रा. (सौ.) कांचन राजाध्यक्ष यांनी या कार्यक्रमाकरिता बरेच परिश्रम घेतले. वर्षभरातील अनेक उपक्रमांमध्ये प्रा. राजीव कुलकर्णी यांचे सातत्याने सहकार्य लाभले.

पुढील वर्ष हे संस्थेचे अमृतमहोत्सवी वर्ष, तसेच महाविद्यालयाचे रौप्यमहोत्सवी वर्ष असल्यामुळे कला मंडळाने

आणखीन नाविन्यपूर्ण व भरीव कार्यक्रम घेण्याचे योजिले आहे.

**स्पर्धा व संबंधित विजेत्यांची नावे खालीलप्रमाणे :**

- **मेंदी स्पर्धा**

**वरिष्ठ गट**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक : | पल्लवी परब | प्र. व. कला |
| द्वितीय क्रमांक : | संगीता कुलकर्णी | द्वि. व. कला |
| तृतीय क्रमांक : | माया रानडे | द्वि. व. कला |

**कनिष्ठ गट**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक : | सुषमा नागवडे | बारावी H |
| द्वितीय क्रमांक : | उमा लाहोटी | बारावी H |
| तृतीय क्रमांक : | योगिनी देशपांडे | बारावी G |
| उत्तेजनार्थ : | रीता मणियार | तृ. व. शास्त्र |
| | शिल्पा भांडगे | द्वि. व. वाणिज्य |
| | सीमा परब | बारावी D |
| | चित्रा लुनिया | अकरावी J |
| | शिबानी वडनप | अकरावी J |

**'महा'संगीत स्पर्धा**

**वरिष्ठ गट**

**हिंदी चित्रपट गीत - मुले :**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक : | सुहास शामगावकर | तृ. व. वाणिज्य |
| द्वितीय क्रमांक : | विजय गायकवाड | तृ. व. कला |
| तृतीय क्रमांक : | मनोज बोपर्डीकर | द्वि. व. शास्त्र |
| उत्तेजनार्थ : | बिपीन इनामदार | द्वि. व. कला |
| | आनंद गोरे | प्र. व. वाणिज्य |

**हिंदी चित्रपट गीत - मुली**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक : | सोनाली चौधरी | द्वि. व. शास्त्र |
| द्वितीय क्रमांक : | लीना खरे | तृ. व. वाणिज्य |
| तृतीय क्रमांक : | लीना सुगंधी | द्वि. व. संगणकशास्त्र |
| उत्तेजनार्थ : | दीपाली देशपांडे | तृ. व. शास्त्र |

- **सुगम संगीत - मुले**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक : | अभिजित केळकर | प्र. व. वाणिज्य |
| द्वितीय क्रमांक : | सुहास शामगावकर | तृ. व. वाणिज्य |
| तृतीय क्रमांक : | बिपीन इनामदार | द्वि. व. कला |

**सुगम संगीत - मुली**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक : | लीना खरे | तृ. व. वाणिज्य |
| द्वितीय क्रमांक : | सुजाता घाटे | तृ. व. कला |
| तृतीय क्रमांक : | दीपाली देशपांडे | तृ. व. शास्त्र |
| उत्तेजनार्थ : | रेश्मा देशमुख | द्वि. व. कला |
| | यशोधरा अभ्यंकर | द्वि. व. शास्त्र |

- **वाद्यसंगीत - पाश्चात्य वाद्ये**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक : | दीपक उपाध्ये | द्वि. व. कला |

**भारतीय वाद्ये**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक : | राहुल जोशी | तृ. व. वाणिज्य |
| द्वितीय क्रमांक : | आनंद मिरासदार | द्वि. व. शास्त्र |

- **द्वंद्वगीत**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक : | बिपिन इनामदार, | द्वि. व. कला |
| | रेश्मा देशमुख | द्वि. व. कला |
| द्वितीय क्रमांक : | आनंद गोरे | प्र. व. वाणिज्य |
| | अभिजित केळकर | प्र. व. वाणिज्य |

-

| | |
|---|---|
| Voice of the Competition (Senior) - | सुहास शामगावकर |
| सर्व परीक्षकांतर्फे विशेष पारितोपिक - | दीपक उपाध्ये. |

- कनिष्ठ गट
- हिंदी चित्रपट गीत - मुले.

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक : | भाग्येश बवरे | बारावी J |
| द्वितीय क्रमांक : | अच्युत जोग | अकरावी G |
| तृतीय क्रमांक : | नीलेश नेर्लेकर | अकरावी H |

हिंदी चित्रपट गीत - मुली

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक : | चंद्राणी मुखर्जी | बारावी G |
| द्वितीय क्रमांक : | संजीवनी शिंदे | बारावी B |

- सुगम संगीत - मुले

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक : | अमोल चिपळूणकर | अकरावी F |

सुगम संगीत - मुली

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक : | चंद्राणी मुखर्जी | बारावी G |
| द्वितीय क्रमांक : | पुष्पा गुठाळ | बारावी A |
| तृतीय क्रमांक : | संजीवनी शिंदे | बारावी B |

- वाद्यसंगीत

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक : | शिरीष कुलकर्णी | अकरावी J |
| | शिवानी वडनप | अकरावी J |
| Voice of the Competition (Junior) | | चंद्राणी मुखर्जी |

- 'महा' स्पर्धा

नाट्यवाचन – सांघिक

| | |
|---|---|
| प्रथम क्रमांक : | बिझिनेस अँड बिझिनेस |
| द्वितीय क्रमांक : | तुझे आहे तुजपाशी |
| तृतीय क्रमांक : | अश्रू तिचे गोठले |

**वैयक्तिक - मुली**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक : | प्रीती रणदिवे | द्वि. व. शास्त्र |
| द्वितीय क्रमांक : | कीर्ती शेंडे | द्वि. व. शास्त्र |
| तृतीय क्रमांक : | प्रिया जोशी | |
| उत्तेजनार्थ : | मोहिनी केसकर | तृ. व. शास्त्र |
| | संगीता घुले | |

**वैयक्तिक मुले**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक : | रोहित सहस्त्रबुद्धे | द्वि. व. वाणिज्य |
| द्वितीय क्रमांक : | महेश धोमकर | द्वि. व. वाणिज्य |
| तृतीय क्रमांक : | विजय संचेती | प्र. व. वाणिज्य |
| उत्तेजनार्थ : | अनिल कुलकर्णी | तृ. व. वाणिज्य |
| | राहुल बोरकर | द्वि. व. शास्त्र |

- **कथाकथन**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक : | गिरीश कानिटकर | तृ. व. वाणिज्य |
| द्वितीय क्रमांक : | सीमा दाते | तृ. व. शास्त्र |
| तृतीय क्रमांक : | बिपीन इनामदार | द्वि. व. कला. |

- **नाट्याभिनय**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक : | प्रीती रणदिवे | द्वि. व. शास्त्र |
| द्वितीय क्रमांक : | गिरीश कानिटकर | तृ. व. वाणिज्य. |
| तृतीय क्रमांक : | सीमा दाते | तृ. व. शास्त्र. |
| उत्तेजनार्थ : | अर्चना दांडगे | द्वि. व. शास्त्र. |
| | अनुपमा देव | अकरावी I |

- **एकांकिका**

**सांघिक**

| | |
|---|---|
| प्रथम क्रमांक : | द रिंग अगेन |
| द्वितीय क्रमांक : | बिझिनेस अँड बिझिनेस |
| तृतीय क्रमांक : | सूर्यास्ता जरा थांब |
| उत्तेजनार्थ : | मेल्याशिवाय स्वर्ग |

● **वैयक्तिक अभिनय - मुली**

| | | |
|---|---|---|
| द्वितीय क्रमांक : | प्रतीक्षा खळदकर | द्वि. व. शास्त्र. |
| तृतीय क्रमांक : | प्रतिभा भालेराव | प्र. व. कला. |
| उत्तेजनार्थ : | वैशाली पाटील | प्र. व. कला. |

**वैयक्तिक अभिनय - मुले**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक : | रोहित सहस्रबुद्धे | द्वि. व. वाणिज्य |
| द्वितीय क्रमांक : | गिरीश कानिटकर | तृ. व. वाणिज्य. |
| तृतीय क्रमांक : | महेश धोमकर | द्वि. व. वाणिज्य. |
| उत्तेजनार्थ : | विजय संचेती | प्र. व. वाणिज्य |
| | चंद्रशेखर कांबळे | तृ. व. वाणिज्य. |

● **दिग्दर्शन**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक : | महेश धोमकर | द्वि. व. वाणिज्य. |

● **स्पर्धेतील सर्वोत्तम कलाकार** 'THE MAHA STAR' - गिरिश कानिटकर

काही आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्येसुद्धा आपल्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला व यशही प्राप्त केले.

कल्याणी स्पर्धा - बी. जे. मेडिकल महाविद्यालय आयोजित.

वादनाचे विशेष पारितोपिक : दीपक उपाध्ये.

**इंडसर्च** - कै. नानासाहेब फाटक स्मृती करंडक आंतरमहाविद्यालयीन नाट्यवाचन स्पर्धा.

एकांकिका : **'काळोख'**

| | |
|---|---|
| सहभाग - प्रतीक्षा खळदकर | द्वि. व. शास्त्र. |
| कीर्तिमृणाल शेंडे | द्वि. व. शास्त्र. |
| गिरीश कानिटकर | तृ. व. वाणिज्य. |

- **मीरा भजन स्पर्धा (सेंट मीराज् कॉलेज, पुणे)**

  सहभाग : सोनाली चौधरी, दीपाली देशपांडे, मनीष साठ्ये, गोडबोले.

  द्वितीय क्रमांक : सोनाली चौधरी.

- **पुरुषोत्तम करंडक : आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा**

  सहभाग : गिरीश कानिटकर, प्रीती रणदिवे, चंद्रशेखर कांबळे, गीता गोहाड, दीपक पर्वत, राकेश तट्टू, समीर नाडगौडा, अनुपमा देव, अंजली चिंचोरे, कीर्तिमृणाल शेंडे, प्रतीक्षा खळदकर, वीरेन्द्र नेवासकर, समीर नाखरे, शिल्पा कुलकर्णी, आनंद गोरे, सचिन शहा.

- **MOOD INDIGO - JII POWAI. आंतरमहाविद्यालयीन विविध स्पर्धा.**

  सहभाग : गिरिश कानिटकर, आशुतोष कारखानीस, मनीष साठ्ये, बिपीन इनामदार, दीपक उपाध्ये, शिरीष कुलकर्णी, अच्युत जोग, दीप्ती देशपांडे, रश्मी देशमुख, समीर नाडगौडा, सुहास शामगावकर, नागराज शेट्टी, प्रशांत दुराफे, हिमांशू सांख्ये.

- **एकपात्री अभिनय :**

  प्रथम क्रमांक : गिरीश कानिटकर

  Aqua Games ( पोहणे) द्वितीय क्रमांक : आशुतोष कारखानीस.

- **फिरोदिया करंडक : आंतरमहाविद्यालयीन विविध गुणदर्शन स्पर्धा**

  **सहभाग :**

  अभिनयाचे पारितोषिक : गिरीश कानिटकर

## वक्तृत्व व वादविवाद मंडळ

या शैक्षणिक वर्षात आपल्या महाविद्यालयातील वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांनी आंतरमहाविद्यालयीन स्तरावरील वक्तृत्व, वादविवाद, निबंध - लेखन, कथाकथन, प्रश्नमंजुषा इ. स्पर्धांत भाग घेतला.

- **हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर आयोजित वक्तृत्व स्पर्धा**

  १) श्री. किरण गणपत पवार - बारावी शास्त्र

  २) कु. प्रतिभा राजाराम सावंत - तृ. व. वाणिज्य

- **महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे आयोजित हिंदी वक्तृत्व स्पर्धा**

| | | |
|---|---|---|
| १) | कु. संध्या मधुकर चव्हाण | तृ. व. कला |
| २) | श्री. रमेश जगन्नाथ निकम | बारावी वाणिज्य |
| ३) | कु. उज्ज्वला मारुती गाडेकर | अकरावी कला |
| ४) | कु. अमृता चंद्रसेन कोळपकर | अकरावी कला |

- **सेठ वालचंद हिराचंद स्मृती वक्तृत्व स्पर्धा**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कु. मारिया गायकवाड | प्र. व. वाणिज्य | द्वितीय क्रमांक |
| २) | कु. संध्या मधुकर चव्हाण | तृ. व. कला | |
| ३) | कु. अनघा देसाई | प्र. व. वाणिज्य | |
| ४) | कु. वर्षा उंब्रजकर | द्वि. व. वाणिज्य | प्रथम क्रमांक |
| ५) | कु. शिल्पा कुलकर्णी | तृ. व. वाणिज्य | तृतीय क्रमांक |
| ६) | कु. माधुरी नरगुंदकर | द्वि. व. वाणिज्य | |
| ७) | श्री. राहुल कुलकर्णी | तृ. व. वाणिज्य | |
| ८) | कु. रेवती देशमुख | प्र. व. वाणिज्य | |
| ९) | श्री. प्रवीण जोशी | द्वि. व. वाणिज्य | |
| १०) | श्री. विद्याचरण पुरंदरे | द्वि. व. वाणिज्य | |
| ११) | कु. प्रतिभा सावंत | तृ. व. वाणिज्य | |
| १२) | कु. अश्विनी वैद्य | द्वि. व. वाणिज्य | |
| १३) | कु. पूर्वा गांधी | प्र. व. वाणिज्य | |
| १४) | कु. राजश्री लक्का | द्वि. व. वाणिज्य | |
| १५) | कु. रचना शेळके | द्वि. व. वाणिज्य | |

- **'साहित्य सहकार' फर्गसन महाविद्यालय आयोजित निबंध स्पर्धा**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | कु. संगिता भानुदास घुले | प्र. व. कला | द्वितीय क्रमांक | रु. १५०/- |

- **भारती विद्यापीठाचे श्री. यशवंतराव मोहिते महाविद्यालय, पुणे आयोजित निबंध स्पर्धा**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कु. हिमानी वसंत पंडित | प्र. व. कला | उत्तेजनार्थ |
| २) | कु. मनस्विनी प्रभुणे | प्र. व. कला | |
| ३) | कु. अर्चना शिंदे | प्र. व. कला | |
| ४) | कु. माया काकडे | प्र. व. कला | |
| ५) | कु. ज्ञानेश्वरी खोडके | प्र. व. कला | |
| ६) | श्री. गुणेश मुळे | द्वि. व. शास्त्र | |
| ७) | श्री. प्रशांत टेंबरे | द्वि. व. वाणिज्य | |

- **पोलिस सुरक्षा सप्ताहानिमित्त आयोजित निबंध स्पर्धा**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सोपान गंगाधर गाड | प्र. व. कला |
| २) | श्री. अजय ज्ञानेश्वर अडसुळ | प्र. व. कला |
| ३) | श्री. महेश विष्णूदास दरेकर | प्र. व. कला |

- **संघवी केशरी महाविद्यालय, चिंचवड, आयोजित प्रश्नमंजुषा स्पर्धा**

- **'प्रज्ञाभारती' कॅम्लिन पुरस्कृत वाग्भट, पुणे, आयोजित वक्तृत्व स्पर्धा**

| | | |
|---|---|---|
| १) | कु. कावेरी विनायक थोरात | प्र. व. शास्त्र |

- **हुंडा विरोधी चळवळ, मुंबई, आयोजित वक्तृत्व स्पर्धा**

| | | |
|---|---|---|
| १) | राहुल अ. कुलकर्णी. | तृ. व. वाणिज्य |

- **सिम्बायोसिस कला व वाणिज्य महाविद्यालय, पुणे आयोजित 'What's the Good Word' स्पर्धा**

| | | |
|---|---|---|
| १) | कु. स्वाती कोल्हे | द्वि. व. वाणिज्य |
| २) | कु. मिथाली अयंगार | द्वि. व. वाणिज्य |

- **श्रीरामपूर क्लब आयोजित निबंध स्पर्धा**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. संदीप बाबुराव वाडेकर | प्र. व. कला |

| | | |
|---|---|---|
| २) | श्री. मोरेश्वर लक्ष्मण लोळगे | तृ. व. कला |
| ३) | गोपी लहू जाधव | द्वि. व. कला |
| ४) | श्री. सोपान गाडे | प्र. व. कला |
| ५) | श्री. सचिन सूर्यकांत बेल्हेकर | अकरावी शास्त्र |
| ६) | श्री. राकेश विठ्ठल हांडे | अकरावी कला |

- **महात्मा फुले मंडळ, पुणे आयोजित वक्तृत्व स्पर्धा**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. राहुल अ. कुलकर्णी | तृ. व. वाणिज्य. |
| २) | श्री. समीर अशोक नाडगौडा | बारावी वाणिज्य. |
| ३) | श्री. गिरीश सुधाकर कानिटकर | तृ. व. वाणिज्य |

- **श्री. छत्रपती संभाजीमहाराज इतिहास-कथन स्पर्धा**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. राहुल अविनाश कुलकर्णी | तृ. व. वाणिज्य |

- **आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे आयोजित – हिंदी वक्तृत्व स्पर्धा**

| | | |
|---|---|---|
| १) | कु. दीपा हनुमंत काटीकर | बारावी वाणिज्य. |
| २) | श्री. रमेश जगन्नाथ निकम | बारावी वाणिज्य |

**प्रा. गीताराम गायकवाड**
कार्याध्यक्ष

## NCC ARMY WING

- JUO Tribhuan S. V. participated in Republic Day Parade, 1994 at New Delhi. He was awarded the best cadet of the Poona group in Pre-CATC- I camp at Solapur, 2nd best cadet award in Maharashtra State in CATC-I camp.He also participated as a member of the Maharashtra team for the National Intergration Awareness Quiz during the R. D. camp.
- Cadet Tawar S. P. was awarded the "Veer Savarkar" Trophy for the best cadet of the army wing of the Poona Group.
- CSM Shetty N.J. was awarded the 2nd best cadet prize in annual training camp conducted by 36 MAH BN NCC, Pune.
- In elocution competition organised by 36 MAH BN NCC Pune on the subject "Communal Harmony" cadet Pardeshi V. was awarded 2nd prize.

- LCPL Kulkarni L. A. and cadet Parmar. V. were the members of the winner team of the 36 MAH BN NCC in the "Treasure Hunt Competition" in the Shivaji Trail Trek, Kolhapur. LCPL Paranjape P.M. participated in National Integration Camp at Bijapur, Karnataka. LCPL Parchure S. and cadet Bhatt participated in Rock Climbing Camp at Ambarnath (Bombay).
- Cadets participated as volunteers in Ganesh Festival, National Games 1994, Pune-Mini marathon, Pune International Marathon, Sadbhawana Rally, Blood Donation,Tree Plantation and Water Harvest Project carried out by 36 MAH BN NCC, Pune, at Vadgaon Maval.
- One week refreshment allowance of the cadet, one day salary of ANO and materials viz. grains and non-perishable food articles , clothings utensils and other useful items were collected from volunteer donors of Shivajinagar locality and donated to the earthquake victims of Latur and Osamanabad.

## 3 MAH NAVAL UNIT, N.C.C.

- Following cadets volunteered for national games during January 1994 :
  (1) Cadet Hans K.J. (2) Cadet Tiwari S.V. (3) Cadet Kardekar M.H. (4) Cadet Nadkarni Y. (5) Cadet Phunge (6) Cadet Deore (7) Cadet Nikam J. V. (8) Cadet Anthoni G.
- Achievements by cadets during the year 1993-94 :
  – Cadet Captain Manojkumar Eshwarlal Fursunge, participated in State Level Rowing Competition. Attended two water sports cadre at N.D.A. Attended Republic Day Camp 1994. Marched in NCC contingent on 26th January 1994. Was selected as Second All India Best Cadet (Naval). Selected for Youth Exchange Programme (Canada).
  – Cadet Kedar Chandaule participated in State Level Rowing Competition. Attended one water sports cadre at N.D.A.

## नियोजन : चर्चा मंडळ

मॉडर्न महाविद्यालयीन नियोजन - चर्चा मंडळाचे औपचारिक उद्‌घाटन ८ सप्टेंबर 'साक्षरता-दिन' या दिवशी महाविद्यालयाचे माननीय उपप्राचार्य, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ए. एल्. पायरे यांच्या हस्ते झाले. १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात नियोजन मंडळाने खालील उपक्रम आयोजित केले होते.

## व्याख्यानमालिका

- ८ सप्टेंबर १९९३ रोजी 'माळशिरस, एक प्रयोग' हा माहितीपट दाखविण्यात आला. पुरंदर जिल्ह्यातील 'माळशिरस' या उपेक्षित भागात जाऊन, तेथे काही काळ वास्तव्य करून त्या गावातील स्त्रियांमध्ये जिद्द निर्माण करण्यास, त्यांना त्यांच्या पायावर उभे राहाण्यासाठी मदत करण्यास, त्यांचा शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी पुढे सरसावलेल्या श्रीमती मनिषा गुप्ते यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान व त्या अनुषंगिक ग्रामीण पातळीवर नियोजनाच्या संदर्भात चर्चा, प्रश्नोत्तरे असा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.
- 'धर्म व राजकारण फारकत विधेयक' या विषयावर प्रा. श्री. उल्हास बापट (आय. एल्. एस्. विधि महाविद्यालय, पुणे) यांचे या विधेयकाची तात्त्विक बाजू स्पष्ट करणारे व्याख्यान दि. १४ सप्टेंबर १९९३ रोजी 'राज्यशास्त्र' विभागातर्फे आयोजित करण्यात आले.
- दि. २ ऑक्टोबर १९९३ रोजी, गांधी जयंती निमित्त 'नर्मदा बचाव आंदोलन ' या विषयावर श्रीमती साधना दधीच (सामाजिक कार्यकर्त्या) यांचे व्याख्यान 'राज्यशास्त्र ' विभागातर्फे आयोजित करण्यात आले.
- सर्वचर्चित असा 'डंकेल प्रस्ताव' या विषयावर आधारित प्रस्तावाची तात्त्विक बाजू स्पष्ट करणारे प्रा. श्री. अतुल सप्रे (आय. एम्. डी. आर. फायनान्स सेक्शन, पुणे) यांचे व प्रस्तावाची नकारात्मक बाजू स्पष्ट करणारे डॉ. श्री. आनंद करंदीकर ( Management Consultant, लोक विज्ञान, संघटनेचे कार्यकर्ते) या उभयतांचे व्याख्यान दिनांक १२ फेब्रुवारी १९९४ रोजी आयोजित करण्यात आले.
- 'अर्थसंकल्प' या विषयावर आपल्या महाविद्यालयातील डॉ. मुकुंद महाजन यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान व 'विद्यार्थ्यांशी बातचीत' असा कार्यक्रम दि. १४ फेब्रुवारी १९९४ रोजी आयोजित केला. या कार्यक्रमाचे नियोजन विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे केले. दिनांक २६ फेब्रुवारी रोजी श्री. श्रीधर नागनूर फॅकल्टी लीडर, सेंट्रल बँक ऑफ इंडिया ट्रेनिंग सेंटर यांचे लीड बँक स्किम १ मार्च १९९४ रोजी श्री. व्ही. जी. फडके यांचे चलनक्षम दस्तऐवज यावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

'फोरम ऑफ फ्री एंटरप्रायझेस' या संस्थेने पुरस्कारित केलेली २८ वी 'सेठ वालचंद हिराचंद वक्तृत्व स्पर्धा' दिनांक ९ ऑक्टोबर १९९३ या दिवशी आयोजित करण्यात आली. वरिष्ठ महविद्यालयातील कला व वाणिज्य विभागातील एकूण १६ विद्यार्थ्यांनी यात भाग घेतला. स्पर्धेचे विषय व त्यानुसार बोलणाऱ्या वक्त्यांची संख्या पुढीलप्रमाणे होती :

| | विषय | वक्त्यांची संख्या |
|---|---|---|
| i) | Regulation of Capital Market in India. | 04 |
| ii) | India's Export Potential. | 03 |
| iii) | Problems of Urbanization in India. | 03 |
| iv) | Water Management and Agriculture in India. | 03 |
| v) | Importance of Human Resource Developement. | 03 |

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून मॉडर्न महाविद्यालयातील प्रा. सौ. विनिता कुलकर्णी (अर्थशास्त्र विभाग), प्रा. श्री. गीताराम गायकवाड (राज्यशास्त्र विभाग), प्रा. सौ. नीता बोकील (राज्यशास्त्र विभाग) यांनी काम पाहिले. त्यांच्या सहकार्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद !

या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ दि. ९ जानेवारी १९९४ रोजी आयोजित करण्यात आला. या समारंभाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे माननीय प्राचार्य डॉ. स. य. परांजपे यांनी भूषविले. या स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी पारितोपिके पटकावली.

| निकाल | नाव | वर्ग |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | कु. जोशी तृप्ती | तृतीय वर्ष, वाणिज्य |
| द्वितीय क्रमांक | श्री. केळकर अभिजित | प्रथम वर्ष, वाणिज्य |
| तृतीय क्रमांक | श्री. कानिटकर गिरीश | तृतीय वर्ष, वाणिज्य |
| उत्तेजनार्थ | कु. उंब्रजकर वर्षा | द्वितीय वर्ष, वाणिज्य |
| उत्तेजनार्थ | श्री. कुलकर्णी अनिल | तृतीय वर्ष, वाणिज्य |
| उत्तेजनार्थ | कु. खाडिलकर मोहिनी | तृतीय वर्ष, वाणिज्य |

यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

**व्यवसाय मार्गदर्शन**

दिनांक ९ जानेवारी १९९४ रोजी, वक्तृत्व स्पर्धेच्या पारितोपिक वितरण सोहळ्यासोबतच विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय मार्गदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांना श्री. श्रीधर नागनूर, (फॅकल्टी लीडर, झोनल स्टाफ ट्रेनिग सेंटर, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शिवाजीनगर, पुणे १८), डॉ. एस. बी. कुलकर्णी (मॅनेजर, क्वालिटी कंट्रोल डिपार्टमेंट, हिंदुस्थान अँन्टिबायोटिक्स, पिंपरी), श्री. एस्. एम्. घाटपांडे (चार्टर्ड अकाउंटंट) या त्रयींनी मार्गदर्शन केले. पदवीनंतरच्या विविध व्यवसायांची ओळख करून दिली. विद्यार्थ्यांनी या व्याख्यानांना उत्स्फूर्त प्रतिसाद केला.

ह्यावर्षी नियोजन-चर्चा मंडळात प्रा. सौ. विनिता कुलकर्णी, प्रा. मधू साटम, प्रा. डी. एल. लिमये व प्रा. नीता बोकील या सदस्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खूप परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी श्री. एम. वाय. कुलकर्णी व श्री. खोपकर व शिक्षकेतर कर्मचारी यांनी बहुमोल सहकार्य केले.

**राजेश छाजेड**
विद्यार्थी प्रतिनिधी

**आर. बी. शहा**
कार्याध्यक्ष.

# राष्ट्रीय सेवा योजना

समाजसेवेतून व्यक्तिमत्त्व विकास या राष्ट्रीय सेवा योजनेच्या ध्येय धोरणांशी सुसंगत असे अनेकविध उपक्रम या शैक्षणिक वर्षात संपन्न झाले. या विभागात एकूण १५० विद्यार्थी दरवर्षी सहभागी होत असतात. ह्या वर्षी या योजनेतील उपक्रमांचा प्रारंभ परिसर स्वच्छता या कार्यक्रमाने झाला. वृक्षारोपण, व्याख्याने, प्रौढसाक्षरता, दारूबंदीप्रसार, सांस्कृतिक कार्यक्रम, अंधश्रद्धा निर्मूलन, एडस् प्रतिबंध उपाय, ध्वजदिन निधी संकलन, भूकंपग्रस्तांसाठी मदत संकलन, इ. कार्यक्रम पुण्यात, दत्तक खेडे मु. पो. मांडकी कान्हेफाटा येथे, तसेच मुलांचे निरीक्षण गृह, कुष्ठरुग्णांचे हॉस्पिटल कोंढवा या ठिकाणी घेतले. या वर्षी विविध शिबिरांमधून व स्पर्धांमधून विद्यार्थी सहभागी झाले व पारितोषिकांचे मानकरी ठरले.

दि. १७ ते २६ नोव्हेंबर या काळात मांडकी या दत्तक खेड्यात विशेष हिवाळी शिबीर घेतले. शिबीरकाळात ग्रामसफाई, शोषखड्डे खोदाई, रस्ता दुरुस्ती, दारूबंदी, आरोग्य संवर्धन, क्रीडांगण सपाटीकरण, आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण इ. उपक्रम राबविले. विविध विषयांवरील तज्ज्ञांची प्रबोधनपर व्याख्याने झाली. डॉ. बोरकर ( विज्ञानवर्धिनी) यांचे अंधश्रद्धा निर्मूलन या विषयावर सप्रयोग व्याख्यान झाले. त्याचबरोबर मा. प्राचार्य, प्रा. गोसावी, प्रा. पाथरे, प्रा, वि. भा. देशपांडे, प्रा. माधवी मित्र, प्रा. चिंचोरे, प्रा. गीताराम गायकवाड, प्रा. नायडू, प्रा. रुमा बावीकर (कर्वे इन्स्टिट्यूट), श्री. सरिता पुंगलिया श्री. संजय पिरंगुटे (अनुभव शिक्षा केंद्र), प्रा. शहा, श्री. कुलकर्णी (आयुर्विमा), श्री. शिंदे (मुख्याध्यापक, न्यू इंग्लिश स्कूल, मांडकी), गावचे पोलिस पाटील, सरपंच, प्रा. सौ. नरगुंद यांची शिबीरस्थळी व्याख्याने व चर्चासत्रे झाली. ओंकार कलामंच, कोथरुड यांनी शिबिरार्थी व गावकरी यांच्यासाठी 'महाराष्ट्राची लोकधारा' हा उत्तम अभिनयपूर्ण कार्यक्रम सादर केला. शिबीरकाळात वीरधरण व तेथील विद्युतगृह पाहण्यासाठी विद्यार्थ्यांची सहल आयोजित केली होती.

दि. ६ फेब्रु. या दिवशी कान्हेफाटा येथे एक-दिवशीय शिबीर घेतले. त्यामध्ये श्री. केळकर, प्रा. नायडू, व श्री. वि. य. कुलकर्णी यांची मुलाखत व 'व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर व्याख्याने झाली. भूकंपाच्या आपत्तीमुळे अनाथ व निराधार झालेल्यांपैकी ३५ मुलांसाठी, कान्हेफाटा येथे प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीने प्राथमिक शाळा सुरू केलेली आहे. त्या शाळेचा उद्घाटन समारंभ त्याच दिवशी पार पडला. मा. विजय कुवळेकर (संपादक, सकाळ वृत्तपत्रसमूह), मा. मदन बाफना, सोसायटीचे पदाधिकारी, परिसरातील मान्यवर मंडळी याप्रसंगी उपस्थित होती. रा. से. योजनेतील विद्यार्थ्यांनी या शाळेतील बालमित्रांबरोबर एक दिवस घालविला.

या विशेष कार्यक्रमांव्यतिरिक्त इतर कार्यक्रमांचा आढावा पुढीलप्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| जुलै | : | स्वयंसेवक नोंदणी व प्रशिक्षण. |
| २०,२४ जुलै | : | परिसर स्वच्छता. |
| २ ऑगस्ट | : | रक्षाबंधन व सांस्कृतिक कार्यक्रम. निरीक्षण गृह, शिवाजीनगर येथे. |
| ३ ऑगस्ट | : | मा. प्रा. गंभीर स. य. यांना भावपूर्ण निरोप, मा. प्रा. परांजपे स. य. यांचे व्याख्यान व त्यांचे हस्ते वृक्षारोपण. |
| ८ ऑगस्ट | : | लेण्याद्री येथे वृक्षारोपण कार्यक्रमात शिंदे सारंग व शिवाजी भालकेश्वर यांचा सहभाग. |

१५ ऑगस्ट : महाविद्यालयातील वर्गसफाई व त्यानंतर मा. प्राचार्यांचे विद्यार्थ्यांशी हितगुज.

१६ ऑगस्ट : प्रौढ साक्षरता प्रशिक्षण, वक्ते : मा. निकम एन. एस्. (संयोजक, रा. से. यो. पुणे विद्यापीठ)

२२ ऑगस्ट : रक्तविषयक माहिती. कार्यशाळेत २७ विद्यार्थी सहभागी.

२४ ऑगस्ट : एन. एस. व्ही. श्री. दळवी यास निरोप.

२६ ऑगस्ट : परिसर-स्वच्छता व वृक्षारोपण तयारी.

२७ ऑगस्ट : मांडकी येथे ग्रामस्थांबरोबर शिबीर चर्चा.

२८ ऑगस्ट : जिल्हा समन्वय समिती सदस्यांची सभा.

२९ ऑगस्ट : स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन शिबिरात, मंचर येथे अंजली पवार व हेमंत नागपुरे यांचा सहभाग.

१ सप्टेंबर : टी. जे. महाविद्यालय येथे स्वामी विवेकानंद यांचेवर घेतलेल्या निबंध स्पर्धेत आठ विद्यार्थ्यांचा सहभाग.

४ सप्टेंबर : सद्भावना-दिन कार्यक्रमासाठी पुणे विद्यापीठात चार विद्यार्थ्यांचा सहभाग.

५ सप्टेंबर : डॉ. मोहाडीकर जीवन यांनी घेतलेल्या एडस् विषयक कार्यशाळेत प्रा. दीक्षित, कु. रोहिणी बादरायणी व गोस्वामी किंशुक यांचा सहभाग.

६ सप्टेंबर : शिक्षकदिनानिमित्त पोस्टर्स तयार केली व प्राचार्य, उपप्राचार्यांचा सत्कार.

८ सप्टेंबर : आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त पुणे विद्यापीठाच्या साक्षरता फेरीत २० विद्यार्थी सहभागी.

१५, १६ सप्टेंबर : सेवाधाम ट्रस्टतर्फे घेतलेल्या एडस् विषयक कार्यशाळेत चार विद्यार्थ्यांचा सहभाग.

२० सप्टेंबर : गणेशोत्सवानिमित्त, निरीक्षणगृह शिवाजीनगर येथे सांस्कृतिक कार्यक्रम.

२०, २१ सप्टेंबर : स्वामी विवेकानंद, शिकागो व्याख्यान शताब्दी कार्यक्रमात पुणे विद्यापीठात तीन विद्यार्थ्यांचा सहभाग.

२४ सप्टेंबर : गणेशोत्सवानिमित्त लेप्रसी हॉस्पिटल कोंढवा येथे सांस्कृतिक कार्यक्रम.

१२ ऑक्टोबर : सेवाधाम ट्रस्टतर्फे आयोजित केलेल्या एडस् प्रशिक्षण शिबिरात प्रा. वनकळस व प्रा. सौ. बोकील यांचा सहभाग.

१६ ऑक्टोबर : सेंट मिराज कॉलेज येथील शिबिरात तीन विद्यार्थिनी सहभागी.

२३ ऑक्टोबर : खंडेनवमी निमित्त शस्त्रपूजा.

३१ ऑक्टोबर
१ नोव्हेंबर : रा. से. यो. रौप्यमहोत्सवी वर्ष प्रारंभीच्या कार्यक्रमासाठी पुणे विद्यापीठात विद्यार्थी व प्राध्यापकांचा सहभाग

१७ नोव्हेंबर ते
२६ नोव्हेंबर : मांडकी येथे शिबिरात ५७ विद्यार्थ्यांचा सहभाग.

२३ नोव्हेंबर ते
१ डिसेंबर : अंजली पवार हिचा प्रजासत्ताकपूर्व संचलन शिबिरात, बारामती येथे सहभाग.

२ ते ४ डिसेंबर: एडस् प्रतिबंध प्रशिक्षण वर्गासाठी प्रा. दीक्षित यांचा कुटुंबकल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन येथे सहभाग.

१६ डिसेंबर : विशेष हिवाळी शिबिरात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचा पालकांशी हितगुज.

१९ डिसेंबर : मॅरेथॉन स्पर्धेसाठी आठ विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून सहभागी.

३ ते ९ जाने. : वाहतूक सुरक्षासप्ताहानिमित्त, पोलिस आयुक्तांनी घेतलेल्या निबंध स्पर्धेत तीन विद्यार्थी सहभागी, घोषवाक्य स्पर्धेत पाच विद्यार्थी सहभागी, त्यापैकी प्रीतम रणपिसे यास तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. या काळात पुणेशहर-वासियांसाठी घोषवाक्य संकलन केंद्र म्हणूनही महाविद्यालयाने काम पाहिले.

१२ जानेवारी : (स्वामी विविकेनंद जयंतीनिमित्त) मा. प्रा. चिरपुटकर यांचे व्याख्यान. वर्गसफाई.

१५, १६ जाने. : राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी ५१ विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून सहभागी.

२६ जानेवारी : प्रजासत्ताक-दिनानिमित्त परिसर सफाई व तिळगूळ समारंभ.

२७ ते ३१ जाने. : विद्यापीठ पातळीवरील शिबिरात मु. पो. भुगाव येथे, कु. मदुरा पटवर्धन व विशाखा पाटील सहभागी.

३० जानेवारी : यशवंतराव मोहिते कॉलेजमधील निबंधस्पर्धेत ५ विद्यार्थी सहभागी. कु. हिमानी पंडित हिस उत्तेजनार्थ पारितोषिक.

६ फेब्रुवारी : मु. पो. कान्हेफाटा येथे एक-दिवशीय शिबीर ७१ विद्यार्थी सहभागी.

८ फेब्रुवारी ते प्रा. मुंडे यांचे स्पर्धा-परीक्षा मार्गदर्शन या विषयावर व्याख्यान.

१२ फेब्रुवारी : जिल्हा पातळीवरील शिबिरात खडकवासला येथे संतोष पायस व पल्लवी परब सहभागी.

१३ फेब्रूवारी : मराठवाडा मित्रमंडळ महाविद्यालयातील शिबिरात कु. वर्षा दळवी व मनिषा पवार यांचा सहभाग.

१५ ते १९ फेब्रु.: विद्यापीठ पातळीवरील, शेवगाव येथील शिबिरात सारंग शिंदे याचा सहभाग.

३ मार्च : वार्षिक कामाचा आढावा व अहवाल लेखन.

**पारितोषिके**

श्री. शंकर सेवा पारितोपिके : माणिक सोनावणे.

कै. बाबुरव काशिनाथ सातपुते पारितोपिक : संतोष पायस.

या सर्व कार्यक्रमांसाठी मा. प्राचार्य डॉ. परांजपे , मा. निकम ( संयोजक, रा. से. यो. पुणे विद्यापीठ ), उपप्राचार्य प्रा. गोसावी यांचे बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य मिळाले. तसेच प्रा. गीताराम गायकवाड, श्री. श्री. य. कुलकर्णी, श्री. दि. शं. खोपकर, श्री. इनामदार, श्री. दोशी, अन्य प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी या सर्वांचे वेळोवेळी सहकार्य मिळाले.

या समितीमधील प्रा. वनकळस, प्रा. साळुंके, प्रा. आल्हाट, प्रा. गोहेल, प्रा. सौ. गंधे यांच्या सहकार्यामुळेच सर्व कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाले. सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**श्री. संतोष पायस**
विद्यार्थी - प्रतिनिधी

**प्रा. प्र. ग. दीक्षित**
कार्यक्रमाधिकारी.

# पदभ्रमण आणि पर्यावरण अभ्यास मंडळ

यंदाचे वर्षापासून विकासाच्या दृष्टाने काही पाउले उचलायची असे मंडळाने ठरवले होते व ठरवल्याप्रमाणे काही प्रमाणात त्याला यशही प्राप्त झाले. वर्षभराच्या चाकोरीबद्ध कार्यक्रमांच्या आयोजनातून बाहेर पडून काही वेगळ्या मार्गाने / पद्धतीने हा उपक्रम कसा राबविता येईल या संदर्भात पदाधिकारी व सभासद यांच्या सभा घेऊन, तसेच जिमखाना विभागाचे चेअरमन, प्राचार्य यांचेशी या बाबतीत चर्चा करून काहीशा वेगळ्या पद्धतीने मंडळाने वाटचाल करावी असे ठरवण्यात आले.

वर्षभरातील काही महत्त्वाच्या गोष्टींचा उल्लेख खालीलप्रमाणे करता येईल.

- राजगुरू येथील दि. १८, १९, २०, २१ फेब्रु. १९९३ रोजी आयोजित करण्यात आलेला पदभ्रमणाचा कार्यक्रम हा जरा वेगळ्या पद्धतीने आखण्यात आला होता. त्यामध्ये ११ विद्यार्थी व ५ संयोजक (स्टाफ मेंबर्स सहभागी झाले होते. या ठिकाणी स्वच्छतेच्या दृष्टिकोणातून राजगडावरील पूर्वेच्या तटबंदीकडील तसेच राजवाड्यालगतच्या तटातील पडझड झालेल्या व वापरात नसलेल्या स्वच्छता गृहांची डागडुजी/ दुरुस्ती करून त्याचा गडाला भेट देणाऱ्यांनी वापर करावा अशा प्रकारची योजना आखून पुरातत्त्व खात्याच्या लेखी पूर्व-परवानगीने ती तीन दिवसात अमलात ण्यात आली, याचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागेल. त्यासाठी लागणारे बांधकामाचे साहित्य विद्यार्थ्यांनी स्वतःबरोबर बाळगले होते.
- पुणे विद्यापीठ कायाण मंडळाने आयोजित केलेल्या जिल्हा-स्तरीय पदभ्रमण (निवड) कार्यक्रमासाठी आपल्या महाविद्यालयातील सहा विद्यार्थ्यांची निवड कार्यक्रमासाठी तर पाच स्टाफ मेंबर्सची संयोजक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

| **विद्यार्थी** | **संयोजक** |
|---|---|
| स्वाती चिटणीस (S. Y. B.Com.) मंदार गुप्ते (S. Y. B. Sc.) | प्रा. व्ही. आर. चिटणीस |
| मुग्धा पोतनीस (T. Y. Sc.) राहुल कुलकर्णी ( S. Y. Com.) | प्रा. व्ही. बी. आल्हाट |
| निखिल संसारे ( S. Y. Com.) | श्री. बी. एस. नरवडे, |
| | श्री. काळे आर. पी., |
| | सौ. मंगला पुं. साळुंखे. |

दि. ३, ४, ५ डिसेंबर रोजी या निवड पदभ्रमणाचे कार्यक्रमात पुणे जिल्ह्यातील भोर, बारामती, घोडेगाव, सांगवी व पुणे (शहर) येथील विविध महाविद्यालयांतील ३६ विद्यार्थी सहभागी झाले होते. या सर्वांमधून पुणे विद्यापीठ स्तरीय (३ जिल्हे) पदभ्रमणासाठी निवडल्या जाणाऱ्या १५ विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षण शिबिरासाठी आपल्या महाविद्यालयातील दोन विद्यार्थ्यांची निवड झाली. या पंधरा विद्यार्थ्यांपैकी मनाली अथवा अन्य ठिकाणी होणाऱ्या बेसिक कॅम्पसाठी पुणे विद्यापीठातर्फे निवड करण्यात येईल. त्या साठीचा खर्च विद्यापीठातर्फे केला जाईल.

- महाविद्यालयीन पदभ्रमणाचा कार्यक्रम यशस्वी रीतीने चालवण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयातील मनापासून आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी, मोठ्या प्रमाणावर काही पदभ्रमणाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. सरासरी ७०/८० विद्यार्थी ह्या कार्यक्रमात सहभागी झाले होते. या उपक्रमातून काही अनुभवी, मार्गदर्शक विद्यार्थी सलग पाच वर्षात तयार होतील अशी अपेक्षा आहे.

- यंदाच्या वर्षभरात आयोजित पदभ्रमणाचा थोडक्यात आढावा सरासरी १५-२० विद्यार्थी व ४-५ संयोजक, अशा रीतीने वर्षभरात रायगड, राजगड, वेडसे-लेणी, भाजे- लोहगड, रोहिडा, रायरेश्वर - केंजळगड, पुरंदर - वज्रगड, कात्रज ते सिंहगड, मांढरदेवी - पाडकाड, तोरणा, तुंगी - तिकोना, कावळ्या -- शिवथर - रायरेश्वर-केंजळगड (विद्यापीठ ट्रेक) शेलारवाडीची लेणी - कुंडमाळ-नाणेळी, जिवधन - नाणेघाट - कुकडेश्वर अशा विविध ठिकाणी पदभ्रमणाचे कार्यक्रम आयोजित करून तेथील पर्यावरण, जन-जीवन, पक्षीजीवन, सामाजिक , सांस्कृतिक व ऐतिहासिक गोष्टींचा अभ्यास करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे आयोजन यशस्वी रीतीने पार पाडण्यासाठी कॉमर्स विभागातील प्रा. व्ही. आर. चिटणीस, भूगोल विभागाचे प्रा. आल्हाट, व्ही. बी. कार्यालयीन कर्मचारी श्री. खरे वि. का., श्री. काटे आर. पी., श्री. जगताप, श्री. नरवडे व सौ. मंगला साळुंखे यांचे सहकार्य लाभले.

असे उपक्रम अधिक कार्यक्षमतेने जिमखाना विभागाच्या मदतीने कसे राबवता येतील या दृष्टिकोणातून प्राचार्य व जिमखाना विभागाचे चेअरमन प्रा. पी. डी. कुलकर्णी यांनी काही कायमस्वरूपी उपयोगी पडतील अशा साधनांची /उपक्रमांची खरेदी करण्यास परवानगी दिली व टप्प्याटप्प्याने मंडळाची कार्यक्षमता कशी वाढवता येईल याचेही मार्गदर्शन केले. या शिवाय कार्यालयाचेही वेळोवेळी सहकार्य लाभतच असते.

चिटणीस
**एम. जी. गोहेल**
पदभ्रमण आणि पर्यावरण अभ्यास मंडळ

# ग्रंथालय

मार्च १९९४ अखेर ग्रंथालयातील ग्रंथांची संख्या ५४,७४० इतकी झाली. वरील ग्रंथाशिवाय एकूण ५२ नियतकालिके, मुंबई आणि पुणे येथून प्रसिद्ध होणारी प्रमुख वर्तमानपत्रे ग्रंथालयासाठी घेतली जातात.

ग्रंथालय समितीत या वर्षी खालील सभासद होते :

- १) प्रा. सौ. चिकटे पी. पी. (कार्याध्यक्षा) २) प्रा. डॉ. पुंडे डी. डी. ३) प्रा. कुलकर्णी पी. डी. ४) प्रा. सौ. कुलकर्णी व्ही. एस. ५) प्रा. सौ. केळकर आय. पी. ६) प्रा. सौ. डोळे बी. एस. ७) प्रा. बापट डी. जी. (निमंत्रक).

विद्यापीठ अनुदान पुस्तक-पेढी योजनेत या वर्षी ६६ विद्यार्थ्यांना पुस्तकाचे संच वर्षभर वापरण्यास देण्यात आले.

महाविद्यालयाचे पहिले ग्रंथपाल प्रा. बापट डी. जी. हे ३१ डिसेंबर १९९३ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या नंतर ग्रंथालयाची सूत्रे सहाय्यक ग्रंथपाल श्री. चंद्रगुड ए. एस. यांनी स्वीकारली. ग्रंथालय उभारणी आणि वृद्धीमध्ये प्रा. बापट यांनी विशेष परिश्रम घेऊन समृद्ध ग्रंथालय केले. त्यांच्या २३ वर्षाच्या सेवेमध्ये ग्रंथालयीन सेवकांना बहुमोल मार्गदर्शन लाभले.

दरवर्षी प्रमाणे यंदाही ग्रंथालयाला मान्यवर संस्था आणि व्यक्ती यांजकडून भेटीदाखल ग्रंथ मिळाले. याबद्दल मान्यवर संस्था व व्यक्तींचे आभार.

**ए. एस्. चंद्रचूड**
सहाय्यक ग्रंथपाल

## वाणिज्य संघटना

संघटनेतर्फे विद्यार्थ्यांसाठी या वर्षात खालील कार्यक्रम करण्यात आले :

- श्री. शाम वाघ यांचे व्यवसाय मार्गदर्शनपर भाषण झाले. भाषणाचा विषय होता, 'Careers in Managements'
- 'Uptron' या सरकारी संस्थेचे प्रतिनिधी श्री. व्यंकटेशन यांचे 'संगणक क्षेत्रात वाणिज्य विद्यार्थ्यांचा सहभाग या विषयावर भाषण झाले. Uptron संस्थेतर्फे विद्यार्थ्यांना संगणकविषयक अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी काही शिष्यवृत्त्या दिल्या जातात. त्यासंबंधीची माहितीही या भाषणात देण्यात आली.
- विद्यार्थ्यांसाठी एक वादविवाद-स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धेचा विषय होता, 'पुरुषांपेक्षा स्त्री ही व्यवस्थापनात यशस्वी होऊ शकेल.' या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. डॉ. भारती डोळे, प्रा. गीताराम गायकवाड यांनी काम केले.
  गतवर्षीप्रमाणे याही वर्षी विद्यार्थ्यांसाठी एक हस्तलिखित स्पर्धा आयोजित केली.
  हस्तलिखित स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना तीन विषय दिले होते.

  1. Drug Addiction
  2. Traffic Problems and Traffic Management in Pune City.
  3. Stock Exchange.

  ह्या अंकाच्या परीक्षणाचे काम पुण्यातील नेस वाडिया महाविद्यालयातील वाणिज्य विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रतिमा जोशी व प्रा. जावडेकर यांनी केले.

- तृतीय वर्ष शास्त्र, कला आणि वाणिज्य विद्यार्थ्यांसाठी 'वाटा उद्याच्या' हे व्यवसाय मार्गदर्शन शिबीर दिनांक २२, २३ व २४ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आले. शिबिराचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ. स. य. परांजपे यांच्या हस्ते

करण्यात आले.

या शिबिरात अंतर्भूत करण्यात आलेले कार्यक्रम खालीलप्रमाणे -

| | मार्गदर्शनाचा विषय | मार्गदर्शक / वक्ता |
|---|---|---|
| 1. | Careers in Defence | Col . Chitale. |
| 2. | Careers in Hotel Management | Mrs. Gangoli - Principal, Food Craft Institute - Pune. |
| 3. | Professional Courses in Commerce ( C.A., C.S. ICWA., and C.F.A.) | Prof. Waghmare |
| 4. | Foreign Education, Scholarships and Employment. | Mr. V. G. Pradhan |
| 5. | Foreign Language | Prof. Damle, Director, Ranade Institute, Pune. |
| 6. | Application Writing | Prof. S. Raykar. |
| 7. | Group Disscussion | Prof. (Mrs.) Parulekar. |
| 8. | Interview Techniques | Prof. A. G. Gosavi. |
| 9. | Preparing for M.P.S.C., UPSC | Prof. A. G. Gosavi, Prof. M.A. Kulkarni. |
| 10. | Careers in Marketing | Shri Padhye. |
| 11. | Entrepreneurship as a Career | Shri Subhash Deshpande. |
| 12. | Psychological Tests | Prof. (Mrs.) Shaligram. |
| 13. | Careers in Computers | Shri H. W. Ranade, Director Jnanaprabodhini, Computer Centre. |

- तृतीय वर्ष वाणिज्य विद्यार्थ्यांनी महाविद्यालय व प्राध्यापक याविषयीच्या त्यांच्या भावना व्यक्त करण्यासाठी एक 'कृतज्ञता समारंभ' आयोजित केला.

ह्यावर्षी तृतीय वर्ष वाणिज्याचा एक अभ्यासू विद्यार्थी, प्रदीप शेट्टी याचे अल्पशा आजाराने निधन झाले. विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने एक निधी उभारला.

हा निधी विद्यार्थ्यांनी संस्थेचे कार्यवाह, श्री. पांडे यांच्याकडे कृतज्ञता समारंभाच्या दिवशी सुपूर्त केला. या निधीतून द्वितीय वर्ष वाणिज्याच्या प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला पुस्तकरूपाने मदत देण्यात येणार आहे.

- संघटनेचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ २२ मार्च रोजी करण्यात येणार आहे.
समारंभाचे प्रमुख पाहुणे आहेत नेस वाडिया वाणिज्य महाविद्यालयातील प्रा. जावडेकर
कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी खालील उपक्रम करण्यात आले :

१. बारावीतील विद्यार्थ्यांसाठी प्रा. अ. गो. गोसावी यांचे 'Group Disscussion Techniques' या विषयावर भाषण.

२. बारावीतील मुलांचे Advertisement या विषयावरील Group Presentation.

३. बारावीतील विद्यार्थ्यांची पुणे शेअर बाजाराला भेट.

४. इ. बारावीतील विद्यार्थ्यांसाठी प्रा. गोसावी, प्रा. मित्र यांचे 'विषय कसे निवडावे ' या विषयींचे भाषण.

ह्यावर्षी संघटनेच्या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. वाणिज्य संघटनेचे सदस्य प्रा. कांबळे व प्रा. चिटणीस यांनी ह्या वर्षी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खूप परिश्रम घेतले. श्री. एस. वाय. कुलकर्णी व श्री. दोशी यांनी सहकार्य केले.

**प्रा. संजीवनी राहणे**
कार्याध्यक्षा.

## SCIENCE ASSOCIATION

The Year 1993-94 was marked by various kinds of activities organised by Science Association. Prof. S. F. Patil, Dean, Science Faculty of Poona University inaugurated the activities of Science Association. A wall paper activity was inaugurated by him. Our student Pramod Pokharkar (T. Y. B. Sc. Chem.) took keen interest in this activity throughout the years. Prof. Patil delivered a thought-provoking lecture on 'Some Aspects of Environmental Pollution.' His well organised lecture was well received by the audience.

In order to cultivate good reading and writing habits amongest the student, an essay competition was organised by the association for all students of the Science faculty. The Topics for essays were

1) Network in Computers.
2) Roll of Man in the Changing Environment.
3) Main Aspects of 1991 Population Census.
4) Tiger Project in India.
5) Social Life In Animals.
6) Fermat's Last Theorem.

We received a good response for the competition. The prize winners are

**(1) First Prize :**

Miss Seema S. Date. (T. Y. B.Sc.Maths) for her essay on " Fermat's Last Theorem."

**(2) Second Prize :**

Miss Mugdha M. Potnis (T. Y. B.Sc. Zoo.) for her essay on " Social life in animals."

**(3) third Prize :**

Mr. Himanshu M. Sankhye (T. Y. B. Sc. Zoo) for his essay on Project Tiger in India.

The job of assessment was done enthassiatically by some of the staff members.

The second term is always for various competitions, quiz contests etc. and Science Association is no exception.

Two quest lectures were arranged by the Dept. of Mathemetics. Dr. Katre S. A. from the Dept. of Mathamatics University of Poona spoke on ' Fermat's Last Theroem' and Dr. Gopal Krishnan, also from Dept. of Maths, Univ. of Poona gave a talk on ' Algebra'.

A wonderful lecture alongwith a film on "Prithvi Missile" was delivered by a young scientist Mr. Pradeep Kulkarni, Scientist C, Akash Group R & D Engineer, Dighi, Pune - 15. He is currently associated with the launching of missiles like AGNI, PRITHVI and AKASH. The lacture was full of information and the style of the speaker coming out of his almost dedication to this work made a lasting impression on listner's minds.

Science Quiz was the hallmark of the activities of Science Association conducted in the second term. Ninty students in 18 different teams participated in the contest.

There were three preliminary rounds and a final round. The following teams were declared winners.

**Ist Prize**

1) Anagha Naik.
2) Omkar Sampagaokar.
3) Sanjay Tiwari.
4) Steven D'souza.
5) Preyoosh Jain.

**IInd Prize :**

1) Manav Deshmukh.
2) Yashodhan Deshpande.
3) Balasaheb Aher.
4) Pinaki Deb.
5) Sunit Rajwade.

In addition to college quize contest, our students also participated in various other science quize and general quize contests. These include Indian Physics Association Quiz Contest, Shyam Memorial Quize Contest organised by A.F.M.C., Chemical etc. Our students, Deb Pinaki, Rajwade Sumit, Deshmukh Manav, Deshpande Yashodhan, Gokhale Makarand and Kelkar Anand participated in the softwate competition held of K.T.H.M. College, Nashik. Deb Pinaki, secured the first prize and Rajwade, Deshmukh and Deshpande were also among the prize winners.

The prize distribution ceremony of the association was celebrated on 1st March. Well known naturalist Mr. Vyankatesh Madgulkar delivered a fascinating lecture on animal behaviour and gave away prizes to the winners.

Thus, the activities of science association were full of enthusiasm. The credit goes to the student and staff members who gave their whole co-operation throughout the year.

**Dr. (Mrs.) V. R. Prayag.**

Chairperson, Science Association.

Dr. (Mrs.) S.V. Prayag presented a reaserch paper titled ' Nested ANOVA for repeated surveys with auto-corelation ' at the 81st session of Indian Science Congress held at Jaipur in Jan. 94.

# DEPARTMENT OF BOTANY

Department is engaged in the research project entilted as, "Micropropagation of strawberry", under the guidance of Dr. A. K. Pande.

Shri. S. P. Salunkhe is carrying out research at present on " Physiological Studies in Mahua Tree (Bassia latifolia L.) He would enroll for Ph.D. soon.

Shri. R. N . Ingloe has been working on Jojobha tree with reference to its seed viability and propagation through plant tissue culture under the guidance of Dr. A. K. Pande.

Miss N. N. Bankar is working on propagation of Gerbera through plant tissue culture.

The experiments are being carried out by Dr. R. S. Zunjarrao on the multiplication of Papaya through plant tissue culture.

# DEPARTMENT OF COMPUTER SCIENCE

From this year Department of Computer Science started functioning as a separate head. One of the major achievements of this year was the upgradation of the existing machines and installation of Local Area Network. The unique feature of this upgradation was the addition of supper VGA monitor which can distinguish 256 colour shads. Ours is the only college which having such facility. Student have developed an application software using fractal graphics on the same.

The results of last year B. C. S. attained a new height. Fourteen students are selected in the Master's Course in Computer Science which runs only at one centre in Pune. this year T. Y. B. C. S. students took part in the software exhibition-cum-competition held at Nasik and one of them Mr. Deb Pinaki secured a first rank in the same. Mr. Deshpande Yashodhan and Rajwade Sumit secured the prizes in other category of softwares.

One of our past student has been selected in SEEPZ at Bombay and has been currently working in United States with a prestigious company. One of our past students Mr. Jayant Gokhale, has attained a high position in chess ranking in India. He also visitied London recently and has been developing his skills through use computers. Such list of past student is unending one.

One of our major ambitions is to start the post graduate section in the department which will be possible in near future, we are becoming fully independent as far as actualy and equipment is concerned.

S. Chandrashekhar

# DEPARTMENT OF ELECTRONIC SCIENCE

This department has been newly established in July 1993. Earlier it was working as a part of Physics Department. The following activities were carried out in the department during 1993-94.

- Satellite receiving system was installed in the department for which a generous donation of Rs. 25,000/- was given by P. E. Society on the occasion of its Diamond Jubliee. This facility is useful to the entire college for participating in various educational programmes. The students of Ele. Sc. have already started utilising this facility they have developed some circuits and system which are under test.
- The research project on conducting polymers is in progress this year a new P–C based instrumentation system is partly purchased. This is a unique system where many parameters of the polymers can be controlled through a computers.
- Prof. A. V. Math, a lecturer in the electronics section of BCS was awarded a research scheme by DST as a co-investigator. He is working on design and development of disease management in grapes. This scheme worth 10 lacs is in collaboration with department of meteorology, College of Agriculture Pune. It is agri-electronics field and has opened many new avenues for research and development.
- Students of T. Y. B. Sc. carry - out projects as a part of their syllabus. This year, same students of S. Y. B.Sc. & F. Y. B.Sc. have taken interest in developing some gadgets (circuits) for home and laboratory appliances. This has helped in increasing confidence of the students.
- The department of Ele. Sc. is keen on carrying out interdisciplinary programmes which is the need of the day. In 1993-94 the collegues and students of the department have developed some timer circuits, moisture measurement system which are now used in the department of Zoology, Botany etc. In future also, the department wishes to develop similar projects as required by the other department.

Dr. (Mrs.) Deoskar

# रसायनशास्त्र विभाग

## केमियाड स्पर्धा परीक्षा

दरवर्षी जानेवारी महिन्यात पुणे विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागातर्फे (संयोजक डॉ. माळी) एफ वाय बी. एस

सी.ला बसलेल्या विद्यार्थ्यांसाठी "केमियाड स्पर्धा परीक्षा" आयोजित करण्यात येते. या स्पर्धेचा मूळ उद्देश मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी तसेच रसायनशास्त्र या विपयात थोडी गोडी निर्माण व्हावी, हा आहे. आपण मेडिकल इंजिनिअरिंगला जाऊ शकलो नाही, ही मुलांमधील भावना नष्ट व्हावी व यापुढील जीवनात त्यांनी चांगला अभ्यास करावा आणि काहीतरी चांगले करून दाखवविण्याची जिद्द त्यांच्यामध्ये निर्माण व्हावी, या उद्देशानेच ही स्पर्धा दरवर्षी घेण्यात येते.

सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्पात आपल्या महाविद्यालयातून एकूण ३४ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी खालील चार विद्यार्थ्यांना सर्टिफिकेट व बक्षिसे मिळालेली आहेत.

| | | |
|---|---|---|
| (१) | देशमुख किरणकुमार मारुतीराव. (विद्यापीठात दुसरा व केंद्रात प्रथम) | रु. २००/— |
| (२) | दासगुप्ता सूर्यसारथी (केंद्रात दुसरा) | रु. १५०/— |
| (३) | अगरवाल प्रवर (केंद्रात तिसरा) | रु. ९०/— |
| (४) | कु. जोशी जोगिनी श्रीकांत (केंद्रात तिसरी) | रु. ९०/— |

या व्यतिरिक्त मॉडर्न कॉलेजच्या रसायनशास्त्र विभागातील प्राध्यापकांनी पुढील चार विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ प्रत्येकी रु. २१/- चे बक्षिसे दिली अहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | चौघुले योगेंद्र प्रताप. | रु. २१/- |
| २) | कु. कुंभारे निलीमा नरसिंह. | रु. २१/- |
| ३) | साठे विश्वजित सौख्यशिला | रु. २१/- |
| ४) | कुलकर्णी अभिजित. | रु. २१/- |

**प्रा. लिमये** **प्रा. आढाव**
**प्रा. कुलकर्णी.** **प्रा गोखले**
केन्द्र संयोजक (केमियाड स्पर्धा - ९४)

# मानसशास्त्र विभाग

मानसशास्त्र विभागातर्फे सुरू करण्यात आलेल्या मानसशास्त्रीय सहयंत्रणा (Counselling) आणि मार्गदर्शन केन्द्राची स्थापना होऊन २ वर्पे झाली आहेत. तेव्हापासून आतापर्यंत सुमारे १५० विद्यार्थ्यांनी केंद्रातर्फे दिल्या जाणाऱ्या मार्गदर्शनाचा लाभ घेतलेला आहे. या शैक्षणिक वर्पात ६० हून अधिक विद्यार्थी, पालक व महाविद्यालयातील कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय यांनी केंद्राद्वारे मिळणाऱ्या सेवांचा लाभ घेतला.

दरवर्पीप्रमाणे या वर्पीही विभागातील विद्यार्थ्यांसाठी बाहेरील तज्ज्ञ व्याख्यात्यांची व्याख्याने आयोजित केली गेली.

३ सप्टेंबर १९९३ रोजी प्रा. सुधा दातार यांचे 'मानसशास्त्राची समाज कार्यातील भूमिका' या विषयावर ११ वी तें तृतीय वर्षापर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान झाले. व्याख्यानामधे त्यांनी Master of Social Work (M. S. W.) संबंधी सविस्तर माहिती दिली. सुमारे ३०० विद्यार्थ्यांनी त्यांच्या व्याख्यानाचा लाभ घेतला. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी 'लॉग टेबल व त्याचे उपयोग' या विषयावर प्रा. मीरा धर्माधिकारी यांचे व्याख्यान झाले.

दि. १० सप्टेंबर १९९३ रोजी मानसशास्त्र स्पेशलच्या विद्यार्थ्यांना Psycho हा चित्रपट दाखवून त्यातील मनोविकृतीवर चर्चा घडवून आणली. दरवर्षीप्रमाणे यंदाही दि. १८ फेब्रुवारी रोजी 'कामायनी' या मतिमंदांसाठी असलेल्या शाळेस विद्यार्थ्यांची अभ्यास-भेट आयोजित केली गेली. तृतीय वर्षाच्या मुलांनी अशीच एक अभ्यास-भेट मुलांच्या अभिरक्षण गृहास (Remand Home) दिली.

वाणिज्य विभागातर्फे घेतल्या गेलेल्या 'वाटा उद्याच्या' या कार्यक्रमामध्ये विभागातील प्रा. परुळेकर यांनी Group Discussion या विषयावर आणि प्रा. शाळिग्राम यांनी Psychological Tests या विषयावर प्रात्यक्षिकासह व्याख्यान दिले. वरील सर्व कार्यकक्रमात प्रा. सौ. अमृता ओक यांनी मनःपूर्वक सहकार्य केले. प्रयोगशाळा सहाय्यक श्री. आर. एल. कदम यांनी वरील कार्यक्रमास उचित सहाय्य केले.

**प्रा. सुधा शाळिग्राम**

# पदार्थ - विज्ञान विभाग

या वर्षी पदार्थ विज्ञान विभागातर्फे एस्. वाय. च्या विद्यार्थ्यांसाठी इ. एम. आर. सी. चे प्रमुख डॉ. निगवेकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानाचा विषय "करिअर ऑपॉर्च्युनिटीज फॉर फिजिक्स ग्रॅज्युएट्स" असा होता. तसेच एस. वाय. च्या विद्यार्थ्यांसाठी "एक्स्प्लोरेटरी"ला भेट आयोजित करण्यात आली.

एक नवीन उपक्रम म्हणून या वर्षी पदार्थविज्ञान विभागातर्फे ११वी च्या विद्यार्थ्यांसाठी " फिजिक्स - क्विझ" चा उपक्रम सुरू करण्यात आला. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी बहुसंख्येने भाग घेतला. दि. १२-१-९४ रोजी मा. प्राचार्य डॉ. परांजपे यांनी या स्पर्धेचे अनौपचारिक उद्‌घाटन केले व स्पर्धेची पहिली फेरी घेण्यात आली. अंतिम फेरीतील पहिल्या तीन गटांना मा. प्राचार्यांच्या हस्ते दि. २८-२-९४ रोजी बक्षिसे देण्यात आली. मा. प्राचार्यांनी या उपक्रमास सक्रिय प्रोत्साहन दिले. यशस्वी विद्यार्थ्यांना कॉलेजतर्फे बक्षिसे देण्यात आली. या विद्यार्थ्यांची नावे अशी :

**प्रथम क्रमांक :** १) श्री. समीर केळकर
२) श्री. सागर भणगे.
३) श्री. पुरंदर बेलूर
४) श्री. अंकित आगरवाल

| | |
|---|---|
| **द्वितीय क्रमांक :** | १) कु. संचाली देशपांडे |
| | २) कु. मानसी सोहोनी. |
| | ३) कु. तनवी सामगावकर |
| | ४) श्री. अमित शेलार |
| **तृतीय क्रमांक :** | १) श्री. राहुल शहा |
| | २) श्री. हृषिकेश राजहंस. |
| | ३) श्री. अमित जोगळेकर |
| | ४) श्री. भूषण लोखंडे |

# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी सेवक सहकारी पतपेढी मर्यादित, द्वारा/मॉडर्न महाविद्यालय, पुणे ४११ ००५.

र. नं. PNA पुणे सिटी / BSR 289 83

३१ मार्च १९९३ अखेर संस्थेची सभासद संख्या १८८ असून संस्थेचे अधिकृत भाग-भांडवल १५,००,०००/- आहे. या आर्थिक वर्षात संस्थेकडे जमा भाग-भांडवल रु. ७,२६,२८०/- आहे. सभासदांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी दीर्घ मुदत आणि तातडी कर्जापोटी रु. रक्कम १२,३३,६००/- कर्जवाटप केले आहे. व्याजाचा दर रु. १६% आहे. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून मुदत कर्ज रक्कम रु. ९०,०००/-, १४ टक्के व्याज दराने मंजूर करण्यात आले. मार्च १९९३ अखेर सभासदांकडून कर्ज येणे बाकी रु. १४,३४,५५०/- आहे.

संस्थेची सर्वांगीण प्रगती आणि यशस्वी वाटचाल यासाठी खालील संचालक मंडळ सतत कार्यरत आहे.

| | |
|---|---|
| १) श्री. कवडे एस्. बी. | अध्यक्ष |
| २) प्रा. आल्हाट व्ही. बी. | उपाध्यक्ष |
| ३) प्रा. गोखले के. अम्. | कर्ज समिती अध्यक्ष |
| ४) श्री. दळवी रघुनाथ एस्. | सचिव |
| ५) श्री. आव्हाड व्ही. एस्. | उपसचिव |
| ६) श्री. कदम व्ही. एस्. | कर्ज समिती उपाध्यक्ष |
| ७) श्री. जगताप के. एस. | खजिनदार |

सभासदांना आर्थिक सुविधा उपलब्ध करून देण्यामध्ये पी. डी. सी. बँकेचे विद्यमान संचालक मंडळ, त्या बरोबर बिगरशेती विभागाचे व्यवस्थापक मा. श्री. भोसले आर. सी. आणि त्यांचे सहकारी या सर्वांचे बहुमोल सहकार्य लाभले.

संस्थेचे अंतर्गत लेखापरीक्षणाचे काम प्रा. मेहंदळे ए. ए. यांनी केले. सन १९९३ चे आर्थिक वर्षाचे कामकाज पाहून मा. द्वितीय अप्पर उपलेखा परीक्षक श्री. ढगे सी. एन. यांनी संस्थेला 'अ' दर्जा दिला आहे.

| सचिव | अध्यक्ष |
|---|---|
| **दळवी रघुनाथ शिवराम** | **कवडे एस. बी.** |

## वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

१९९३-९४ ह्या शैक्षणिक वर्षाचा वार्षिक शैक्षणिक व क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ दिनांक २ मार्च १९९४ रोजी पार पडला. शैक्षणिक क्षेत्रात गुणवत्ता मिळविणाऱ्या विद्यार्थी - विद्यार्थिनींना डॉ. ए. आर. कुलकर्णी, कुलगुरू, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ह्यांच्या शुभहस्ते पारितोषिके देण्यात आली. क्रीडा क्षेत्रात गुणवत्ता मिळविणाऱ्या विद्यार्थी - विद्यार्थिनींना श्री. बाळासाहेब लांडगे, अध्यक्ष भारतीय कुस्ती संघटना, ह्यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. त्याचप्रमाणे छत्रपती ॲवॉर्ड मिळविणारी आपल्या महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. संगीता सोनावणे हिचा सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. एस्. वाय. परांजपे ह्यांनी महाविद्यालय व त्यात चालणारे उपक्रम ह्यांची माहिती उपस्थितांना दिली. डॉ. ए. आर. कुलकर्णी व श्री. बाळासाहेब लांडगे ह्यांनी विद्यार्थी - विद्यार्थिनी व पालक ह्यांना मार्गदर्शनात्मक भाषण केले.

**सौ. अनुराधा कुलकर्णी**
अध्यक्ष, पारितोषिक वितरण समिती.

साहित्य संघटनेच्या वतीने मराठी विभागातर्फे ' अपवाद दिशातुर' या आशा कर्दळे लिखित, लघुकादंबरीवर चर्चात्मक कार्यक्रम दि. २८ फेब्रुवारी १९९४ रोजी झाला. अध्यक्षस्थान डॉ. मंदा खांडगे यांनी भूषविले. या कार्यक्रमात दहा विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले. त्यातील ज्योती [illegible]गल या विद्यार्थिनीचा यावरील लेख सोबत प्रकाशित केलेला आहे.

**डॉ. स्नेहल तावरे**

## कार्यालयीन अहवाल

- **भारत सरकारची मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणारी फी सवलत**

| | |
|---|---|
| कनिष्ठ महाविद्यालय | ७२ विद्यार्थी |
| वरिष्ठ विद्यार्थी | १४० विद्यार्थी |

- **भारत सरकारची मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती**

| | |
|---|---|
| कनिष्ठ महाविद्यालय | ५० विद्यार्थी |
| वरिष्ठ महाविद्यालय | १५० विद्यार्थी |

- **महाविद्यालयीन फी मिळणारे विद्यार्थी**

२५ विद्यार्थी

- **श्री. गणेश मनोहर दाते व शंकर गणेश दाते यांचे धर्मदाय संस्था पुणे यांचे आर्थिक सहाय्य**

| | |
|---|---|
| श्री. आगलावे भीमराव शांताराम | १२ वी शास्त्र |
| कु. भालेराव मंजुषा अरविंद | तृ. वर्ष वाणिज्य |
| श्री. पायस संतोष एन्. | द्वि. व. शास्त्र |

- **सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत -**

| | |
|---|---|
| कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय | ०५ विद्यार्थी. |

- **माजी सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत**

| | |
|---|---|
| कनिष्ठ महाविद्यालय | २८ विद्यार्थी |
| वरिष्ठ महाविद्यालय | ९८ विद्यार्थी |

- **स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत**

| | |
|---|---|
| कनिष्ठ महाविद्यालय | नाही |
| वरिष्ठ महाविद्यालय | ०३ विद्यार्थी |

- **इ. बी. सी. फी सवलत घेणारे विद्यार्थी**

| | |
|---|---|
| कनिष्ठ महाविद्यालय | १०२विद्यार्थी |
| वरिष्ठ महाविद्यालय | ४७० विद्यार्थी |

- **प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत**

| | |
|---|---|
| कनिष्ठ महाविद्यालय | ५० विद्यार्थी |
| वरिष्ठ महाविद्यालय | ७३ विद्यार्थी |

- **मुलींना मिळणारी मोफत शिक्षण योजना**

(कनिष्ठ महाविद्यालय) इ. ११ वी व १२ वी

| | |
|---|---|
| फक्त विद्यार्थिनींसाटीच | ११२३ विद्यार्थीनी |

- **एस्. एस्. सी. डी. एड. फी सवलत घेणारे विद्यार्थी**

| | |
|---|---|
| कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय | ५ विद्यार्थी |

- **राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती**

| | | |
|---|---|---|
| १) | कु. पाटील मनिषा आत्माराम | प्रथम वर्ष शास्त्र |
| २) | कु. पारखे स्मिता वसंत | प्रथम वर्ष शास्त्र |
| ३) | श्री. मधाने पंकज रामेश्वरी | प्रथम वर्ष वाणिज्य |
| ४) | कु. प्रभुणे वर्षा रमेश | द्वितीय वर्ष शास्त्र |
| ५) | श्री. कुलकर्णी मकरंद सदाशिव | द्वितीय वर्ष संगणक शास्त्र |
| ६) | कु. दुर्गे माधवी भगवंत | तृतीय वर्ष कला. |
| ७) | कु. बोचरे सुरेखा भागवत | तृतीय वर्ष शास्त्र |
| ८) | कु. करमळकर ज्योती सुभाष | तृतीय वर्ष शास्त्र |
| ९) | कु. कदम कल्पना राजाराम | तृतीय वर्ष शास्त्र |
| १०) | श्री. आहेर बाळासाहेब ज्ञानेश्वर | तृतीय वर्ष संगणक शास्त्र |
| ११) | श्री. बवरे अनंत नारायण | तृतीय वर्ष वाणिज्य |
| १२) | कु. कानडे अलका रामेश्वर | तृतीय वर्ष वाणिज्य |
| १३) | कु. जैन रंजू भागचंद | तृतीय वर्ष वाणिज्य. |

- **राज्य सरकारची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती**

| | | |
|---|---|---|
| १) | कु. मराठे सुनित्रा प्रभाकर | द्वि. व. संगणकशास्त्र |
| २) | कु. शेट्टी सुमित्रा सिद्दू | द्वि. व. शास्त्र |
| ३) | श्री. आढाव अविनाश श्रीराम | तृ. व. शास्त्र |
| ४) | कु. कुलकर्णी सुजाता शशिकांत | प्र. व. शास्त्र |
| ५) | कु. कासट किशोरी शामसुंदर | प्र. व. शास्त्र |
| ६) | कु. कुलकर्णी शीतल सुभाष | प्र. व. शास्त्र |
| ७) | श्री, कुलकर्णी संतोष मोरेश्वर | प्र. व. शास्त्र |
| ८) | कु. कुंभार मनिषा आण्णा | प्र. व. शास्त्र |
| ९) | कु. देशपांडे माधवी सुधीश | प्र. व. वणिज्य |
| १०) | कु. दाबके रुपाली दत्तात्रय | प्र. व. वाणिज्य |

- **राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. बाहेती प्रकश सागर | ११ वी सायन्स |
| २) | कु. देशपांडे अनिता मनोहर | ११ वी सायन्स |
| ३) | श्री. भदौरिया नरेन्द्रसिंग गोविंदसिंग | ११ वी सायन्स |
| ४) | कु. कब्रे योगिता रमेश | प्र. व. वाणिज्य. |

- **गणित व भौतिक विषय शिष्यवृत्ती**

- **प्रज्ञावान विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती**

श्री. गोडबोले विक्रम उदय. — १२ वी शास्त्र

- **कनिष्ठ महाविद्यालय नवीन नेमणुका -**

| | शिक्षकांचे नाव - | विषय |
|---|---|---|
| १) | श्री. सी. टी. प्रधान. | संस्कृत / इंग्लिश |
| २) | श्री. डी. डी. खंडाळे. | मराठी |
| ३) | कु. एम्. जी. देसाई. | मराठी |
| ४) | सौ. एस्. व्ही. कुवळेकर | जर्मन |
| ५) | सौ. केबी. राजाध्यक्ष | गणित |
| ६) | कु. एस्. एम्. गायतोंडे | गणित |
| ७) | श्री. एस्. जे. बैले | गणित |
| ८) | श्री. व्ही. एम्. शेरीकर | शा. शिक्षण |
| ९) | श्रीमती पी. बी. लिखिते | रसायनशास्त्र |
| १०) | सौ. एस्. टी. वरपे. | रसायनशास्त्र |
| ११) | सौ. पी. आर. कोंडेदेशमुख | रसायनशास्त्र |
| १२) | कु. एम्. व्ही. कातरकी | पदार्थ विज्ञान |
| १३) | सौ. ए. यू. राणे | प्राणिशास्त्र |
| १४) | सौ. एस्. ए. ढोणसळे | अर्थशास्त्र |
| १५) | सौ. एस्. एस्. कर्वे. | मराठी |
| १६) | सौ. एस्. एस्. घारपुरे | अर्थशास्त्र |
| १७) | कु. एस्. जे. टक्कर | कॉमर्स |

| | | |
|---|---|---|
| १८) | श्री. जी. डी. राऊत. | इतिहास |
| १९) | सौ. एस्. आर. पेठे. | विद्युत शास्त्र |
| २०) | श्री. जे. व्ही. भिडे | संगणकशास्त्र |

- **अन्यत्र संधी मिळाल्यामुळे महाविद्यालय सोडून गेलेले**

| | | |
|---|---|---|
| १) | सौ. एम्. जे. लोणकर | कॉमर्स |
| २) | सौ. एस्. एस्. खांबेटे | जीवशास्त्र |
| ३) | कु. वाय. एम्. शेंडे | गणित |
| ४) | सौ. एस. ए. चिकोडीकर | अर्थशास्त्र |
| ५) | डॉ. (सौ.) के. ए. हर्डीकर | मराठी |
| ६) | श्री. आर. टी. पिंगळे | रसायनशास्त्र |
| ७) | कु. एस्. एस्. देशपांडे | रसायनशास्त्र |

- **वरिष्ठ महाविद्यालय नवीन नेमणुका**

| | | |
|---|---|---|
| १) | एम्. जे. देसले | वनस्पतीशास्त्र |
| २) | श्री. डी. डी. पोरे | संगणकशास्त्र |
| ३) | श्री. के. व्ही. गांधी | कॉमर्स |
| ४) | श्री. ए. ए. मेहंदळे | कॉमर्स |
| ५) | सौ. पी. आर. कोंडेदेशमुख | रसायनशास्त्र |
| ६) | सौ. जी. एम्. गोडसे | रसायनशास्त्र |
| ७) | सौ. एम्. के. अदमाने | इतिहास |
| ८) | श्री. एस्. पी. साळुंके | वनस्पतीशास्त्र |
| ९) | श्री. एस्. एस्. काशीकर | विद्युतशास्त्र |
| १०) | सौ. एम्. व्ही. नंदनवाडकर | भूगोल |
| ११) | सौ. ए. एस. आपटे | विद्युतशास्त्र |
| १२) | सौ. एन्. एम्. बोकील | राज्यशास्त्र |
| १३) | सौ. एस्. ए. वर्तक | अर्थशास्त्र |
| १४) | श्री. व्ही. आर. चिटणीस | कॉमर्स |
| १५) | सौ. एन्. एच्. महाजन | गणित |
| १६) | श्री. एल्. बी. टकले | संख्याशास्त्र |
| १७) | कु. जी. एस्. गुट्टीकर | प्राणिशास्त्र |

| | | |
|---|---|---|
| १८) | सौ. आर. आर. झुंजारराव | वनस्पतीशास्त्र |
| १९) | श्री. एस्. एस्. ठेंगडी | पदार्थविज्ञान |
| २०) | सौ. ए. पी. शिलोंत्री | संगणकशास्त्र |
| २१) | श्री. ए. व्ही. मठ | संगणकशास्त्र |
| २२) | श्री. एस्. यू. गावडे | कॉमर्स |
| २३) | सौ. आर. एस्. देशपांडे | इंग्रजी |
| २४) | श्री. जी. पी. गायकवाड | राज्यशास्त्र |
| २५) | सौ. एम्. एस्. सूर्यवंशी | मानसशास्त्र |

- **अन्यत्र संधी मिळाल्यामुळे महाविद्यालय सोडून गेलेले**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. ए. डी. पाध्ये | प्राणिशास्त्र |
| २) | श्री. जी. एम्. कुलकर्णी | राज्यशास्त्र |
| ३) | कु. आय. पी. केळकर | गणित |
| ४) | श्री. व्ही. एम. राऊत | राज्यशास्त्र |
| ५) | सौ. डी. एस्. कुलकर्णी | संख्याशास्त्र |

- **सेवानिवृत्त**

१) महाविद्यालयाचे प्राचार्य, प्रा. स. य. गंभीर हे ३० जून १९९३ पासून महाविद्यालयातून सेवानिवृत्त झाले.

२) वरिष्ठ महाविद्यालयात काम करणारे प्रा. बी. वाय. भिडे (रसायनशास्त्र) यांनी दि. ३०-९-९३ पासून स्वेच्छा निवृत्ती पत्करली.

३) कनिष्ठ महाविद्यालयात काम करणाऱ्या प्रा. श्रीमती एन्. एम्. मोने (मराठी विषय) ह्या दि. ३०-९-९३ पासून सेवानिवृत्त झाल्या.

४) महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. द. गो. बापट हे ३१ डिसेंबर १९९३ पासून महाविद्यालयातून सेवानिवृत्त झाले.

# विशेष उल्लेखनीय बाब

- यावर्षी महाविद्यालयाच्या व्यवस्थापन समितीची शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची निवडणूक झाली. त्यातून पुढील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी निवडून आले.

१) प्रा. पी. डी. कुलकर्णी — शिक्षक प्रतिनिधी

२) प्रा. वाय. आर. वाघमारे — शिक्षक प्रतिनिधी

३) श्री. शशिकांत सोपान कामठे — शिक्षकेतर कर्मचारी

- महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर महासंघाच्या उपाध्यक्षपदी श्री. शशिकांत सोपान कामठे यांची निवड झाली.

- विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वतीने साउथ गुजरात विद्यापीठ, सुरत ने आयोजित वेलेल्या कॉम्प्युटर अवेअरनेस व ऑफिस ॲटोमेशन प्रशिक्षण कार्यक्रमास श्री. आर. पी. काळे व प्रा. श्री. चंद्रशेखर सहभागी झालेले होते. हे प्रशिक्षण १५ दिवसांचे होते.

- डॉ. ए. के. पांडे यांची प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, शिवाजीनगर पुणे ५ या संस्थेचे कार्यवाह (सेक्रेटरी) म्हणून निवड झाली.

- वरील गोष्टी या महाविद्यालयाच्या दृष्टीने कौतुकास्पद असून महाविद्यालयाच्या लौकिकात भर टाकणाऱ्या आहेत.

# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

१६ मे १९३४ या दिवशी, अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर पुण्यातील काही नामवंत शिक्षकांनी एकत्र येऊन, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. त्या वेळी पुण्यात डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि शिक्षण प्रसारक मंडळी यांसारख्या शिक्षणक्षेत्रात नावाजलेल्या मातब्बर संस्था होत्याच. त्यांनी चालविलेल्या न्यू इंग्लिश स्कूल आणि नूतन मराठी विद्यालय यांसारख्या नामवंत शाळाही होत्याच. पण प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी स्थापन करणाऱ्या शिक्षकांना हे पक्के ठाऊक होते की, कोणत्याही काळामध्ये नवीन कल्पना उराशी बाळगून, नवे धाडसी प्रयोग करणाऱ्या संस्थेची त्या वेळी नितांत गरज होती. संस्थेचे आद्य संस्थापक कै. प्रा. शंकरराव कानिटकर स्वतः डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य होते. तेथून निवृत्त होऊन त्यांनी या संस्थेचा पाया घातला. सुदैवाने त्यांना प्रा. जोग, श्री. ताटके, श्री. कोपरकर, श्री. भाऊसाहेब लिमये यांच्यासारखे सहकारी लाभले. आणि मॉडर्न हायस्कूलचे शिक्षण क्षेत्रात पदार्पण झाले.

सुरुवातीला शनिवार पेठेतील मेहुणपुरा भागात श्री. रास्ते आणि श्री. हसबनीस यांनी देऊ केलेल्या वाड्यात शाळा भरू लागली. शिक्षकवर्गाची हातोटीच अशी होती की, हा हा म्हणता शाळेची कीर्ती सगळीकडे पसरली. यथावकाश शाळा आताच्या जंगली महाराज रोडवरील स्वतःच्या वास्तूत आली. आणि बरोबर एक तपाच्या तपश्चर्येनंतर संस्था चालकांच्या अविश्रांत श्रमांना यश लाभले. पी. आर. दुभापी (आता डॉ. पी. आर. दुभापी, कुलगुरू गोवा विद्यापीठ, सुप्रसिद्ध अर्थ तज्ज्ञ आणि सनदी सेवेतील एक अत्यंत ख्यातकीर्त अधिकारी) हे शाळेचे विद्यार्थी त्या वेळच्या मुंबई इलाख्यात पहिले आले.

तेव्हापासून प्रोग्रेसिव्हच्या सर्व शाखांमधून नामवंत विद्यार्थी निर्माण करण्याची अखंड परंपरा सुरू आहे. संस्थेतून बाहेर पडलेले लक्षावधी विद्यार्थी आज विविध व्यवसायात, शासनाच्या सनदी व प्रशासकीय विभागात, तसेच राजकारण, क्रीडा, समाजकारण आदी सर्व क्षेत्रात आघाडीवर तळपत आहेत.

१९३४ साली लावलेल्या रोपट्याचा आज साठ वर्षानंतर प्रचंड वृक्ष झाला आहे. त्याची फळे लक्षावधींनी चाखलेली आहेत. संस्थेच्या आज सहा शिशुशाळा, सहा प्राथमिक शाळा, सात माध्यमिक शाळा, दोन वसतिगृहे, दोन महाविद्यालये, एक मॅनेजमेंट इन्स्टिट्युट एवढा पसारा वाढलेला आहे. संस्था आता केवळ शिवाजीनगर भागातच नव्हे तर भोसे, कान्हेफाटा यासारख्या ग्रामीण क्षेत्रात आणि निगडीसारख्या उपनगरी विभागातही आपले दर्जेदार शिक्षण प्रसाराचे काम पार पाडीत आहे.

तथापि संस्थेने आजवर जे गौरवशाली कार्य केले आहे, त्यावर समाधानी राहून चालणार नाही. संस्थेपुढे आज अनेक लहान मोठे शैक्षणिक प्रकल्प आहेत. कान्हेफाटा येथे बी. पी. एड. कॉलेज तसेच मॉडर्न कॉलेज ऑफ फारमॅकॉलॉजी (बी. फार्म) तसेच विविध स्पर्धा आणि प्रवेश परीक्षा तयारी केंद्र, नाट्यशास्त्र प्रगत केंद्र — असे काही प्रकल्प नजीकच्या काळातच उभे राहत आहेत. त्याच बरोबर अनेक प्रकल्प हाती घेण्याची संस्थेची इच्छा आहे. या सर्वच उपक्रमांसाठी फार मोठ्या प्रमाणावर अर्थ सहाय्याची आवश्यकता आहे. संस्थेच्या सध्याच्या उपलब्ध साधन स्रोतातून ही रक्कम उभी करता येणे अशक्य आहे. आणि म्हणून संस्थेच्या या भावी उपक्रमांसाठी, संस्थेच्या सर्व सभासदांनी आणि शाळा, महाविद्यालयादी शाखातील सर्व कर्मचारी सहकाऱ्यांनी मदत करावी, असे नम्र आवाहन आम्ही करत आहोत. आपण स्वत: संस्थेला आर्थिक सहाय्य करू शकता किंवा आपल्या स्नेही-परिचितांना संस्थेची माहिती सांगून संस्थेचे सभासद, आश्रयदाते होण्याविषयी विनंती करू शकता. तसेच संस्थेला एकमुठी देणगी देण्यास विनंती करू शकता. संस्थेच्या हीरक-महोत्सवाचा एक भाग म्हणून एक स्मरणिका संस्थेतर्फे काढण्यात येणार आहे. त्यामध्ये जाहिरात देऊनही आपण संस्थेला मदत करू शकता. ह्या पैकी आपल्याला शक्य असलेल्या मार्गांनी आपण संस्थेला याप्रसंगी मदत करावी, अशी आग्रहाची विनंती आणि आवाहन आम्ही करीत आहोत.

**डॉ. ग. र. एकबोटे**
अध्यक्ष, नियामक मंडळ

**डॉ. अ. के. पांडे**
कार्यवाह

# अंतर्गत व्यवस्थापन समिती

## कनिष्ठ महाविद्यालय

**अंतर्गत व्यवस्थापन समिती**

| | | |
|---|---|---|
| प्राचार्य डॉ. एस. वाय. परांजपे | : | अध्यक्ष |
| मा. जे. पी. चिंचोरे | : | कनिष्ठ महाविद्यालय विभाग प्रमुख |
| मा. सौ. जे. ए. कुलकर्णी | : | पर्यवेक्षिका |
| मा. सौ. ए. एस. परुळेकर | : | समिती सदस्य |
| मा. कु. एस. एम. गायतोंडे | : | समिती सदस्य |
| मा. जे. बी. दशपुत्रे | : | समिती सदस्य |

**प्रास्ताविक :**

कनिष्ठ महाविद्यालय अंतर्गत व्यवस्थापन समितीचा, १९९३-९४ या शैक्षणिक वर्षातील ठळक गोष्टींचा अंतर्भाव असलेला हा अहवाल सादर करताना, समितीला अतिशय आनंद होत आहे.

कनिष्ठ महाविद्यालयात अकरावी व बारावी वर्गाच्या तिन्ही शाखा मिळून एकूण वीस तुकड्या आहेत. त्यांची विभागणी पुढीलप्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| कला शाखा | — | चार तुकड्या |
| शास्त्र शाखा | — | आठ तुकड्या |
| वाणिज्य शाखा | — | आठ तुकड्या |

१९९३-९४ या शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ झाला त्या वेळी अकरावीत नव्याने दाखल झालेल्या सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींना मा. प्राचार्य डॉ. परांजपे सरांनी उद्‌बोधक मार्गदर्शन केले. मॉडर्न महाविद्यालयाची धवल यशाची परंपरा सांगून त्यांना प्रोत्साहित केले.

कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मा. प्राचार्यांचा संदेश लक्षात ठेवून, निष्णात प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली १९९३-९४ वर्षात घवघवीत यश संपादन केले. त्यांच्या या कौतुकास्पद कामगिरीचा आलेख पुढीलप्रमाणे :

**यशाची शिखरे – मार्च १९९३ : उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा**

**अ) बारावी वाणिज्य**

१) कु. देशपांडे माधवी सुधीश — बोर्डाच्या गुणवत्ता यादीत ४ था क्रमांक
( ५१२/६००, ८५.३३टक्के)
व्यवसाय संघटन या विषयात बोर्डाचे प्रथम पारितोपिक

(९०/१००)

२) कु. शेट्टी सुजाता सिद्धू — 'हिंदी' विषयात बोर्डाचे प्रथम पारितोषिक (८५/१००)

३) कु. देशपांडे प्रज्ञा प्रभाकर : 'चिटणीसाचा व्यवसाय' या विषयात बोर्डाचे प्रथम पारितोषिक (८७/१००)

४) कु. मोंडल मधुचंद्रा शामसुंदर : १२ वी बोर्डाच्या परीक्षेत मागासवर्गीय विभागात प्रथम क्रमांक बोर्डाचे कै. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पारितोषिक ( ४५३ / ६००, ७५.५० टक्के)

**ब) बारावी शास्त्र**

१) नातू संजय अनिल — बार्डाची सर्वसाधारण गुणवत्ता यादी १४ वा क्रमांक (५५६ / ६००, ९२.६७ टक्के) व्यावसायिक अभ्यासक्रम, गुणवत्ता यादी ७ वा क्रमांक

२) कु. साठे तनुजा जयप्रकाश — बोर्डाची सर्वसाधारण गुणवत्ता यादी १४ वा क्रमांक (५५६ / ६००, ९२.६७ टक्के) 'व्यावसायिक अभ्यासक्रम' गुणवत्ता यादी ११ वा क्रमांक

३) रामन रघु राजाराम — बोर्डाची सर्वसाधारण गुणवत्ता यादी १५ वा क्रमांक (५५५ / ६००, ९२.५० टक्के) 'व्यावसायिक अभ्यासक्रम' गुणवत्ता यादी १२ वा क्रमांक

४) कु. दास पौर्णिमा करनकांता — बोर्डाची व्यावसायिक अभ्यासक्र गुणवत्ता यादी १४ वा क्रमांक (५५३ / ६००, ९२.१४ टक्के)

५) कु. तुंगार वृपाली श्रीधर — 'जीवशास्त्र' या विषयात १०० पैकी १०० गुण — बोर्डाचे प्रथम पारितोपिक

ह्या सर्व गुणवान आणि महाविद्यालयाचे नाव उंचावणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार पुणे महानगरपालिकेचे आयुक्त मा. श्री. रत्नाकर कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला.

शैक्षणिक क्षेत्रात अभिनंदनीय यश मिळविण्यासाठी मदत व्हावी या हेतूने, बारावी शास्त्र व बारावी वाणिज्य या वर्गातील निवडक विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन करण्यासाठी 'स्कॉलर बॅच' हा उपक्रम महाविद्यालयाकडून राबविला जातो. १२ एप्रिल ते १२ जून १९९३ या काळात रोज सकाळी १०-४० ते दु. २-५० या वेळेत हा उपक्रम या शैक्षणिक वर्षात संपन्न झाला.

बोर्डाच्या प्रश्नपत्रिकांच्या धर्तीवर प्रश्नपत्रिका काढून चाचण्या घेण्यात आल्या. या उपक्रमासाठी महाविद्यालयातील खालील शिक्षकांनी विशेष मेहनत घेतली. ह्या सर्व शिक्षकांविपयी मन:पूर्वक कृतज्ञता !

**शास्त्र शाखा :**

| | | |
|---|---|---|
| प्रा. सौ. राजाध्यक्ष | प्रा. काळे | प्रा. सौ. देव |
| प्रा. कु. गायतोंडे | प्रा. डॉ. सौ. देऊसकर | प्रा. इंगोले |
| प्रा. सौ. चाफेकर | प्रा. मराठे | प्रा. सौ. सातभाई |
| प्रा. लिमये | प्रा. दशपुत्रे | प्रा. सौ. बुटाला |
| प्रा. गोखले | प्रा. भोमे | प्रा. डॉ. दांडेकर |
| प्रा. गोहेल | प्रा. सौ. शिंदे | प्रा. काशीकर |
| प्रा. भिडे | प्रा. सौ. पेठे | |

**वाणिज्य शाखा :**

| | | |
|---|---|---|
| प्रा. सौ. आगाशे | प्रा. कु. गायतोंडे | प्रा. सौ. नाडगीर |
| प्रा. सौ. नरगुंद | प्रा. चिंचोरे | |
| प्रा. सौ. गोसावी | प्रा. आर. व्ही. कुलकर्णी | |
| प्रा. सौ. राजाध्यक्ष | प्रा. दत्ता लिमये | |
| प्रा. सौ. कुदळेकर | प्रा. प्रधान | |
| प्रा. सौ. पाटणकर | प्रा. डोईफोडे | |

कनिष्ठ महाविद्यालयातील उत्साही विद्यार्थी केवळ शैक्षणिक क्षेत्रातच उंची संपादन करतात असे नाही, तर वक्तृत्व-वादविवाद-नाट्य-एकांकिका-नाट्यवाचन इ. अभ्यासेतर क्षेत्रात त्यांची प्रगती कौतुकास्पद आहे. अनेक स्पर्धांत सहभागी होऊन असंख्य पारितोषिके त्यांनी मिळविलेली आहेत. या संदर्भातील सर्व तपशील कला मंडळाच्या अहवालात सविस्तरपणे दिलेला आहेच. आमच्या सर्व विद्यार्थ्यांचा आम्हाला अभिमान वाटतो. कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शैक्षणिक आणि अभ्यासेतर उपक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी सदैव तत्पर असतात. म्हणून त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केलीच पाहिजे.

कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीचा आलेख उंचावत नेण्यासाठी माननीय प्राचार्य डॉ. एस. वाय. परांजपे सरांचा आश्वासक आधार सदैव मिळतोच. तसेच उपप्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, कार्यालयीन कर्मचारी, सेवकवर्ग ह्या सर्वांचा पाठिंबा आणि तत्पर मदत सदैव मिळते. १९७० साली स्थापन झालेल्या या महाविद्यालयाची ही 'धाकटी पाती' अत्यंत कार्यक्षमतेने महाविद्यालयाच्या कीर्तीत भर टाकते, हे नमूद करताना अतिशय आनंद होत आहे.

| | |
|---|---|
| **सौ. जयश्री कुलकर्णी** | **श्री. जगदीश चिंचोरे** |
| पर्यवेक्षिका . | प्रमुख, कनिष्ठ महाविद्यालय |

# RESEARCH ACTIVITY

## T. D. NIKAM

Research activity during the academic year 1993-94 is as follows :

1. Nikam T. D. and M. G. Shitole, Regeneration of niger (Guizotia abyssinica Cass) C. V. Sahyadri from seddling explants. Plant Cell, Tissue and Organ Culture, 32 : 345–349, 1993.
2. Nikam T. D. and M. G. Shitole, Selection and Characterization of NaCl–tolerant callus lines of safflower (Carthamus tinctorius L.) C. V. Al. Third International Congress of Plant Molecular Biology. Molecular Biology of Plant Growth and Development. Tucson, Arizona (USA) 6-11 OCt. 1991. Abstract No. 874.
3. Research work on "In Vitro multipllication and biochemical studies in sofflower (Carthamus tinctorius L.); niger (Guizotia abyssinica Cass) and ghypat (Agave sisalina) is in progress.

## DR. GANDHE RAVINDRA VASANT

**U. G. C. Minor Research Project sanctioned for two years**

The Project entitled 'Relationship of Aquatic fungi to water pollution. 31-7-93 to 31-7-95 (Ref. F. 4. 20/92 (SR 2))

**Research Paper Published :**

Four papers published upto 1990. Following papers are accepted for publication.

1) Teliospore germination in Melanotaenium brachiarae var. paspalidi Shrinivasan and Thirum J. Indian bot. Soc. Vol. 73 (1993) 1-2.
2) Teliospore germination and nuclear behaviour in Entyloma Mudkuri Patil and Gandhe. Indian Phytopath. Soc. (In press)
3) Taxonomical Studies on Indian Ustilaginales – R. V. Gandhe, N. D. Sharma and Kalman Vanky Mycotaxon (In press).
4) Aquatic fungi of river Mutha; A Preliminary Report – R. V. Gandhe and Desale M. J., Biologica Indica (In press.)

**Following papers are in process :**

1) Teliopore germination and nuclear behaviour in Urocystis hypoxis Taxter. Indian Phytopath.
2) Two new species of Entyloma Current Science.


गिरिजा


गिरिजा



सायन्स असोसिएसन वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात अध्यक्षीय
भाषण करतांना ख्यातनाम साहित्यिक श्री. व्यंकटेश माडगूळकर



सायन्स असोसिएशनच्या पारितोषिक वितरण प्रसंगी
श्री. व्यंकटेश माडगूळकर यांच्या भाषणात रंगून गेलेला श्रोतृवर्ग

# PROGRESSIVE EDUCATION SOCIETY
## PUNE – 411 005.

- Modern High School, Pune 5.
- Girls' High School, Pune 5.
- Prathamik Vidya Mandir, Pune 5.
- Shishu Vidya Mandir, Pune 5.
- Montessorie Teachers' Training Course, Pune 5.
- S. S. D. Hostel, Pune 5.
- Girls' Hostel, Pune 5.
- English Medium School, Pre–Primary, Pune 5.
- English Medium School, Primary, Pune 5.
- Modern College of Arts, Science & Commerce, Pune 5.
- Modern Centre For Career Guidance, Pune 5.
- Modern High School, Pune 16.
- Shishu Vidya Mandir, Pune 16.
- Prathamik Vidya Mandir, Pune 16.
- N. C. L. – K. G. School, Pune 8.
- N. C. L. – Primary School, Pune 8.
- N. C. L. – Secondary School, Pune 8.
- Modern High School, Pune 44.
- Shishu Vidya Mandir, Nigadi, Pune 44.
- Prathamik Vidya Mandir, Nigadi, Pune 44.
- I. M. C. D. Nigadi, Pune 44.
- Modern High School, Bhose. (Tal. Khed, Dist. Pune)
- Modern College Of Arts, Science & Commerce, Pune 16.
- WIE Badmintom Complex, Pune 5.
- Education Complex, Kanhe Phata.

PRINTED BY : SIDDHARTHA ENTERPRISES, B–3, SHRIKRISHNA NAGAR, 128, ERANDAWANA, PUNE 4.